# खैय्याशी

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १९६९७

REFBK-0013309

मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष

९५६ विदा
७०१६९
९।३।०७
१९६८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
अनुक्रम ६०८१६९ दि. ...निवंद्ते...
वर्ग ९६६७ नों. दि. ०१३१८७

# खंडोबाशी

मंगेश
विठ्ठल
राजाध्यक्ष

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........
शाखा (फक्त मत)
REFBK-0013309

मौज प्रकाशन गृह
मुंबई ४

मौज प्रकाशन : ८०

पहिली आवृत्ति : ७ जून १९६३

© १९६३, मं० वि० राजाध्यक्ष

वेष्टनावरील चित्र :
द० ग० गोडसे

किंमत पांच रुपये

मुद्रक
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

# विजूस

[तिच्या अनुमतीविना]

# आभार

या पुस्तकांतील तेरा लेख गेल्या एकोणीस वर्षांत वेळोवेळीं प्रसिद्ध झाले. त्यांतील लेखांचे विषय साहित्य-सृष्टीशीं संबंधित आहेत, हें त्यांना बांधणारें एक सूत्र. त्यांची धाटणी विनोदी असली तरी त्यांमागे विचाराचेंहि एक निश्चित सूत्र आहे असें मला वाटतें. एकसुरीपणा आहे की काय हें अर्थात् वाचकांनी ठरवायचें.

इतकीं वर्षें रद्दीवजा होऊन पडलेल्या या लिखाणाला असें नेटकें पुस्तकरूप देण्याचें श्रेय 'मौज'च्या भागवतबंधूंचें. विशेषतः प्रा० श्री० पु० भागवतांनी माझ्या जन्मजात चालढकलखोरीपुढे हात न टेकतां नेट धरला नसता तर हें पुस्तक 'आगामी'च्या अवस्थेंत आणखी किती वर्षें राहिलें असतें कोण जाणे! पुस्तक (मथळ्यासह) जाहीर झाल्यावरहि त्याच्या प्रकाशनाला इतका विलंब लागत आहे याचें श्रेय सर्वस्वी माझेंच! तें बिनतक्रार मला लाभूं दिल्याबद्दल, आणि या सगळ्याच व्यवहारामागील अव्यवहारी आपुलकीबद्दल भागवतबंधूंचा मी फार ऋणी आहें. आभाराचा गहिवर याहून अधिक चढवणें त्यांच्या सच्च्या स्नेहाला रुचणार नाही.

या पुस्तकाला उठाव येण्यास आणखी दोघा नामांकित स्नेह्यांच्या कसबाचा वजनदार हातभार लागत आहे. त्याला सुखकारक दर्शनी भाग पुरविणारे चित्रकार श्री० द० ग० गोडसे हे एक, आणि आरंभीच माझी ओळख वाचकांना आपल्या खास ढंगांत करून देणारे श्री० पु० ल० देशपांडे हे दुसरे. त्यांनी केलें तें स्नेहाच्या ऊर्मीने; आभार मानण्याने उगाच त्या स्नेहास उणेपण येईल.

*मुंबई ५*
*१ मे १९६३*

**मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष**

या संग्रहांतील लेख पुढील नियतकालिकांमध्ये प्रथम प्रसिद्ध झाले :

*"माझी मैत्रीण म्हणाली..."* : अभिरुचि, एप्रिल १९४४; *पुस्तकांचीं दुःखें* : केसरी, दिवाळी १९५८; *प०पू० आबाजी : परिचय आणि पत्रें* : मौज, दिवाळी १९५१; *साहित्याचीं धुळाक्षरें* : सुगंध, दिवाळी १९५६; *बंडू मेबर्न स्टेडियमला जातो* : मौज, दिवाळी १९५३; *केवळ पुरुषांसाठी* : दीपावली, दिवाळी १९५९; *इतकी रद्दी पुरे झाली* : मौज, दिवाळी १९४६; *स्मरणशक्तीचा बळी* : शिरीष, दिवाळी १९५३; *बेबी गोष्ट लिहिते* : वसुधा, ऑगस्ट १९५९; *फुकट्या मारुती* : दीपावली, दिवाळी १९६१; *आणखी एक सांस्कृतिक परिषद* : दीपावली, दिवाळी १९६२; *प्रस्तावना कशी लिहावी !* : वसुधा, दिवाळी १९६२; *अभिनव काव्यबोध* : दीपावली, दिवाळी १९५४.

*मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष* नऊ

“माझी मैत्रीण म्हणाली...” १

पुस्तकांचीं दुःखें ८

प० पू० आबाजी : परिचय आणि पत्रें १९

साहित्याचीं धुळाक्षरें ३४

बंडू ब्रेबर्न स्टेडियमला जातो ४१

केवळ पुरुषांसाठी ५२

इतकी रद्दी पुरे झाली... ६७

स्मरणशक्तीचा बळी ७४

बेबी गोष्ट लिहिते ९०

फुकट्या मारुती ९९

आणखी एक सांस्कृतिक परिषद ११२

प्रस्तावना कशी लिहावी ? १२९

अभिनव काव्यबोध १३९

## मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. केवळ विदग्ध वाङ्मयाला वाहिलेलें एक मराठी मासिक निघत असे. त्यांतल्या एका संपादकीय स्फुटाची आठवण झाली. नामदार मुकुंदराव जयकरांना डॉक्टरेट मिळाल्याबद्दल तें अभिनंदनपर स्फुट होतें. त्याची सुरुवात होती, '...मुकुंद रामराव जयकर ह्या व्यक्तीकडे आमचें लहानपणापासून लक्ष होतेंच'; त्यापुढला सारा सूर, '...जयकरांचा हा मुकुंदा पुढेमागे नांव काढील याची खात्री होती ती खरी ठरली.' अशा स्वरूपाचा होता. त्याच चालीवर मीहि म्हणतों की, 'मंगेश विठ्ठल राजाध्यक्षांकडे आमचें लहानपणापासून लक्ष होतें.' फरक इतकाच की आम्ही लहान होतों. पार्ल्याच्या आद्य वसाहतवाल्यांपैकी आमचीं घराणीं. बाकी आमच्यासारख्या कारकुनी जमातींत जन्मलेल्या लोकांनी घर आणि अब्रू ही माहे दीड ते दोनशें रुपयांत संभाळणाऱ्या कुटुंबांना घराणीं म्हणणें म्हणजे मांजरपाटाच्या पैरणीला चिलखत आणि डग्यांच्या दुकानांत सेलमध्ये घेतलेल्या टोपीला जिरेटोप म्हणण्यापैकी आहे. खर्डेखाशी करून दुसऱ्यांच्या फुगीव उत्पन्नाच्या आकड्यांची जमाबंदी लिहिण्यांत आमचे पूर्वज खर्ची पडलेले. पेशवाईत मोडींतून हिशेब मांडले; इंग्रेजी आल्यावर त्यांचें विलायती वळण उचललें. ह्या खर्डेघाशींतून एक तारखेला हातावर पडणाऱ्या तनख्यांतून दरमहाच्या एक ते तीस एकतीस दिवसांशीं तोंडमिळवणी करणें हें ह्या घराण्यांचें ब्रीद. राजाध्यक्षांचा जन्म असल्याच घराण्यांत झाला. परंपरेने लेखणी हातीं आली ती कारकुनींतच कुरकुरायची, पण तिने कुळधर्म सोडला आणि साहित्यिक वळण घेतलें.

साहित्यिक म्हटल्यावर आता कूळ आणि मूळ हुडकणें आलें. माणसाचा पाहातां पाहातां चरित्रनायक झाला. घराचा वास्तु झाला आणि ओसरीवरच्या पत्र्याच्या आडोशाची चिंतनिका किंवा अभ्यासिका झाली. लग्नपूर्व बबडीचें लग्नोत्तर सुलभा-सुरेखा व्हावें, तसें झालें. आणि चरित्रनायकाविषयी लिहिणाराला त्यांत स्वतःच्या चरित्राची खऱ्या-खोट्या जरीची काडी गुंफणेंहि ओघानेच प्राप्त झालें.

राजाध्यक्षांचें चिमुकलेपण दादरमध्ये गेलें. रेल्वेवर त्या काळीं पूल पडले नव्हते. गिरगावांतली मंडळी हवापालट म्हणून दूरवर दादरास येऊन राहत तो काळ. पेंडश्यांनी 'कलंदर' कादंबरींत तें दादर बारकाव्यांसकट रेखाटलें आहे. दादर मुन्सिपाल्टीची शाळा आणि छबिलदास हायस्कूल इथे राजाध्यक्षांनी विद्या केली. आणि मॅट्रिकच्या अलीकडलीं दोन वर्षे पार्ल्यास त्यांचें बिऱ्हाड आलें. पार्ल्यास तीनचारशे हात लांबीच्या आणि चारसहा हात रुंदीच्या एका गल्लीला त्या काळीं 'डंबेल रोड' म्हणत. पुढे तो 'अजमल रोड' झाला. ह्या गल्लीने मराठी साहित्याला तीन अमोल देणीं दिलीं. इथे 'अमोल' हें केवळ 'देणें' ह्या शब्दाला अपरिहार्यपणे विलगलेलें विशेषण म्हणून वांपरलें आहे. एरवी जें दिल्याचें कोणालाहि सोयरसुतक नसतें आणि न दिल्याची खंत नसते त्यालाच 'अमोल देणें' म्हणतात असा माझा नम्र अंदाज आहे. 'देणें' हा शब्द नुसताच वापरला तर ओकाबोका वाटतो. ह्या तीन अमोल देण्यांपैकी त्या गल्लीच्या मध्यावर असलेले कै० ऋग्वेदी हें एक. दुसरें देणें त्या गल्लीच्या शेवटाला राहात असे. त्याचें नांव आत्मश्लाघेचा दोष पत्करूनच घ्यायचें. आणि तिसरें, गल्लीच्या तोंडाशींच राहणारे मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष.

साहित्यांत ख्यातनाम होण्याचा त्या अजमल रोड नामक गल्लीच्या वहिवाटीच्या हक्काप्रमाणे अग्रहक्क राजाध्यक्षांचा. त्यांनी तो सोडला. आणि गल्लीचें शेवटलें टोक हळूच पुढे सरकलें. दिसामाजि कांही तरी तें लिहावें हा पूर्वार्ध मीं पकडला आणि राजाध्यक्ष प्रसंगीं अखंडीत वाचीत राहिले. इथे त्यांचें चुकलें. नाही तर एव्हाना पेशवेदप्तराच्या सगळ्या रुमालांची भरती उणी ठरावी इतकी साहित्यसंपदा कागदी वा कापडी बांधणी नेसून त्यांच्या नांवाने कुठल्याहि मोफत वाचनालयाचें अर्धे कपाट तरी अडवती.

एक हुशार विद्यार्थी म्हणून आमच्या पंचक्रोशींत त्यांची ख्याति होती. हुषारीला साजेल अशी तोळामासा प्रकृति आणि आरशी त्यांना लवकर लाभली होती.

स्वतःच्या घराच्या चिमुकल्या अंगणांत खुर्ची टाकून किंवा झोपाळ्यावर बसून जाडजूड पुस्तक घेऊन वाचीत बसलेले राजाध्यक्ष आम्ही बालपणीं सतत पाहात होतों. अंगणांत बसून वाचण्याचा एकमेव हेतु म्हणजे घरांत बसायला जागा नव्हती हाच होता. त्यांच्या मूळच्या तोळामासा प्रकृतींतले बरेचसे तोळेमासे कमी करण्याचें श्रेय त्या पुस्तकांना आहे की आमच्या त्या काळच्या लहानश्या पार्ल्यांतल्या, केवळ एकटेच असल्यामुळे अद्वितीय असलेल्या डॉक्टरांना आहे हें सांगणें अवघड आहे. एकदोघांहून अधिक डॉक्टरांना प्रॅक्टिस परवडण्यासारखी नसल्यामुळे त्यांच्या खेरीज आम्हांला गति नव्हती. अशा काळांत राजाध्यक्षांच्या प्रकृतीशीं त्यांनी बराच लडिवाळपणा केला—आणि विद्यार्थिदशेंत त्यांना सतत आजारी ठेवून त्या वयाचें 'दशा' हें नांव सार्थ केलें. इंटरच्या परिक्षेच्या वेळीं बहुधा ते डॉक्टरच एकमेकांचें औषध घेऊन आजारी पडले असावेत. म्हणून राजाध्यक्षांची प्रकृति ठणठणीत राहून त्यांना 'वर्ड्स्वर्थ प्राइझ' मिळालें. गल्लीच्या अपेक्षा वाढल्या. पण डॉक्टरांनी त्यांना पुन्हा घेरलें. पुढे ते रीतसर एम्. ए. झाले आणि भाषाविषय घेऊन एम्. ए. झालेल्या माणसाचें जें व्हायचें तें होऊन, जिथे शिकले त्याच एल्फिन्स्टन् कॉलेजांत इंग्रजीचें अध्यापन करूं लागले. तें कार्य आजतागायत चालू आहे.

इंग्रजीच्या प्राध्यापकाने मराठीकडे, साधारणतः वारावर जेवायला येणाऱ्या मुलाकडे यजमानीणबाई ज्या नजरेने पाहतात तसें पाहायचें असा पूर्वी रिवाज होता. प्रिन्सिपल वासुदेव बळवंत पटवर्धनांसारखे कांही खंदे अपवाद सोडल्यास इंग्रजीचा प्रोफेसर त्या काळीं मराठी भाषा आणि मराठी वाङ्मय ही कांही महत्त्वाची बाब आहे असें मानायलाच राजी नसे. किंबहुना इंग्रजीच्या प्राध्यापकाला मराठी लिहितां बोलतां येणें हे मराठीवर उपकार असत. न येणें अधिक साजून दिसे. आजहि आपण मराठींतून नीट 'एक्सप्रेस' करूं शकत नाही अशी सबब सांगून इंग्रजींतून तें करूं शकतों असें ध्वन्यर्थाने सुचवणारी मराठी मंडळी मौजूद आहेत. राजाध्यक्षांनी इथेहि चूक केली. मराठी भाषा आणि मराठी वाङ्मय यांवर अतोनात प्रेम केलें. शाळेंत असतांना अच्युतराव कोल्हटकरांचा 'चाबुकस्वार' वर्गांत नेल्याबद्दल त्यांनी छड्या खाल्ल्या. इंग्रजीच्या मास्तरांना राजाध्यक्ष एम्० व्ही० ह्या विद्यार्थ्याने टाइम्सचा अग्रलेख पाठ करायचें सोडून अच्युतरावांचें अशिष्ट (म्हणजे संस्कृत शब्द कमी असलेलें) मराठी वाचण्यांत वेळ घालवावा हें त्या काळीं मंजूर होण्यासारखें नव्हतें. पण केसरी घराण्याच्या चिपळूणकरी मराठीऐवजी राजा-

ध्यक्षांनी अच्युतरावांच्या 'मऱ्हाटी'वर अधिक प्रेम केलें. त्यामुळेच आज त्यांच्या गद्याने संस्कृत आणि इंग्रजी ह्यांपैकी कुठलाच पेहराव न घेतां तिचें देशी स्वरूप स्वीकारलें. चॉसरच्या जोडीला रामदास आणि ब्राउनिंगबरोबर गडकरी वाचतांना ते रमून गेले. कारण त्यांना साहित्याची गोडी होती. कोणत्याहि परंपरेची दिंडी घेऊन निघायचें नव्हतें. आपल्याकडे साऱ्याच क्षेत्रांत एक जबरदस्त वर्णव्यवस्था आहे. मराठीच्या प्राध्यपाकाने केवळ उतारे धुंडण्यासाठी इंग्रजी वाचायचें आणि इंग्रजीवाल्याने मराठीला कंट्री मानायचें, फिजिक्सच्या प्राध्यापकाला काव्य हा पोरखेळ वाटला पाहिजे, गणिताच्या शिक्षकांनी इतिहासांतल्या सनांपुरता देखील त्या भागाशीं संबंध ठेवायचा नाही, अशी कांहीशी ह्या देशींची रीत आहे.

पुस्तक हा राजाध्यक्षांच्या हाताला चिकटलेला अवयव असूनहि—आणि स्त्रीरोग ते नेत्ररोगापर्यंत सर्व रोगांवर बाटल्या भरण्याचें काम करणाऱ्या त्या डॉक्टरांच्या कृपेने त्यांच्या चष्म्याच्या नंबराचा उणेपणा वाढूनहि—राजाध्यक्षांच्या चेहऱ्यावर पांडित्याचें कळकट तेज विलसलें नाही. विद्वत्ता ही जड असावी असा एक आपल्याकडे लोकभ्रम आहे. खेळकर विद्वान् हें बहुधा वदतोव्याघाताचें उदाहरण म्हणूनच शिकवण्यांत येत असावें. त्या कुण्या महानुभावाने आपल्या शिष्याला कोणचासा ग्रंथू, 'वैराग्या ऐसा जाहला नाही' असें बजावल्या-पासून साऱ्या मराठी लेखकमात्राने आणि टीकाकारवर्गाने भलतीच दहशत घेतली आहे. कांही मंडळी तर स्वतःच्या लेखांत सोपे शब्द घुसल्याचा वहीम आला तर ते चिमटीने उचलून तिथे गहन शब्द डकवतात असेंहि ऐकिवांत आहे. बालकवींची, "हिरवे हिरवे गार गालिचे" वाचतांना त्या नादाने गुंगत जाणाऱ्या-हून हिरव्यानंतर हिरवा पडल्यावर काय होतें आणि गालिच्याचा गारवा मखमल शब्दाने किती डिग्री वाढला-उतरला याची नळी लावून बसणारा टीकाकार विद्वान् ठरतो. दिवसेंदिवस ही शाखा फोफावते आहे. राजाध्यक्षांची विद्वत्ता आस्वाद घेणाऱ्याची आहे. वाचनाची संग्रही नोंद करणारी नाही. ना० घ० देशपांड्यांची एक कविता प्रसिद्ध झाली होती. त्यांतल्या 'हालून गेला जरा अंधार मागेपुढे' ह्या ओळीने आम्हा मित्रमंडळीची झोप उडवली होती. आत्रे नामक एका अज्ञात लेखकाचें 'गांवगाडा' हें पुस्तक तीसबत्तीस वर्षांपूर्वी त्यांच्या हातीं लागलें होतें. त्यांनी त्या पुस्तकाचीं बायबलसारखीं पारायणें केलीं होतीं. मीं प्रथम तें पुस्तक त्यांनी दिलें होतें तेव्हा वाचलें होतें. वास्तविक आम्ही मुंबईकर मंडळी! आम्हांला

कारकुनीखेरीज अन्य बलुतें ठाऊकच नाही. पण त्या पुस्तकाच्या देशी भाषेने मराठीचा स्वाद कसा असतो त्याचा अंदाज आला होता. 'गांवगाडा', 'स्मृति-चित्रें' किंवा 'उपेक्षितांचें अंतरंग' यासारखें पुस्तक वाचतांना भाषेची नितळ अंगलट म्हणजे काय तें कळतें. 'एकसमयावच्छेदेंकरून'चा वैदिक वळसा मराठीने घेतला आणि भाषा अलंकारांच्या ओझ्याने गुदमरली. पूर्वी माणसें बोलल्यासारखें सरळ लिहीत. लिहिण्याचा म्हणून निराळा आव नव्हता. आमच्या नाटकांच्या दुनियेंत तर किर्लोस्कर-देवलांची मराठी जाऊन श्रीपाद कृष्णांची मराठी आल्यावर नाटकाचे अंक इतके फुगले की नाटकाला चालणें जड जाऊं लागलें. भाषाशास्त्रज्ञ काय म्हणतात मला ठाऊक नाही. परंतु भाषा ही मुख्यतः बोली. लेखी भाषा आणि बोली भाषा ही शास्त्रीपंडितांनी स्वतःचें स्तोम माजवण्यासाठी केलेली वर्णव्यवस्था आहे असें मला वाटतें. त्या तथाकथित 'विदग्ध' शैलीच्या उदोउदोच्या मागे एक सूक्ष्म अहंकारहि दडलेला असे. त्याचमुळे साहित्यिक मराठी म्हणजे कांही तरी निराळें अशी समजूत होऊन बसली. भारदस्तपणा नांवाचा एक भोंगळ गुण विद्वत्तेच्या पोकळींत जाऊन दडून बसला. कोणताहि लेख इंग्रजी वा संस्कृत अवतरणांनी वरबटल्याखेरीज लेखकाला पांडित्याचें सर्टफिकेट मिळेनासें झालें. स्वतंत्र विचार गुदमरत गेले ते इथूनच. आपल्या साहित्याविषयी बोलतांना आपल्या रीतीभाती, आपलीं माणसें, त्यांचे संस्कार ह्या आधाराने विचार करण्याऐवजी न पचलेलें इंग्रजी आणि कळकून गेलेलें संस्कृत यांतून आधार शोधण्यांत सारी मेहनत खर्ची पडूं लागली. सुदैवाने राजाध्यक्ष त्या संकटांतून बचावले. त्यांचा पिंड इंग्रजी शिकवूनहि मऱ्हाटी राहिला. मुंबईकर असूनहि कृष्णाकोयनेशीं नातें तुटलें नाही.

ह्या शतकांतल्या तिशीपस्तिशींतला काळ मला आठवतो. राजाध्यक्षांच्या लहानशा अंगणांतल्या झोपाळ्यावर बसून आम्ही मित्रमंडळींनी रात्री जागवल्या. आम्ही विशींत होतों. मी तर हल्लीच्या भाषेंत सांगायचें म्हणजे, 'टीन एजर'! परंतु अंगभूत आगाऊपणाच्या आधारावर ह्या ज्येष्ठ मित्रांत वावरत होतों. सगळ्यांचीच भूमिका वाचकाची होती. राजाध्यक्ष, अद्वरकर, जुन्या नव्या पुस्तकां-मासिकांचा न कंटाळतां पुरवठा करणारे शिरवळकर अशी मंडळी अजमल रोडची गल्ली जागती ठेवीत असे. आमच्यापैकी कोणीहि साहित्यसेवेंत लेखी गुंतला नसल्यामुळे खिशांतून उरलेली विडी चोरून काढावी तशी कविता किंवा

कथा बाहेर काढीत नसे. कुणालाहि महाराष्ट्राचा कीट्स् व्हायचें नव्हतें की शेली! कॉलेजच्या मासिकांतून राजाध्यक्षांनी टोपणनांवाने कांही लिहिलें होतें. मीहि कॉलेजच्याच मासिकाचीं कांही पृष्ठें खराब केलीं होतीं, यापलीकडे कांही नाही. अत्रे–फडके–खांडेकर–माडखोलकर आणि रविकिरण मंडळ यांचें तें युग! आम्हांला अत्रे अधिक जवळचे. 'झेंडूच्या फुलां'चीं पारायणें होत होतीं. (असें पुस्तक मराठींत पुन्हा होणें नाही.) खांडेकरांचा ध्येयवादहि फारसा मंजूर नव्हता आणि फडक्यांचा देहवादहि! त्यांतल्या त्यांत फडक्यांच्या कादंबऱ्या किंचित् सुखावून जात. खांडेकरांच्या टीकालेखांतील नर्मविनोदावर गट अधिक खूष असे. शामराव ओकांच्या विनोदाला बहर आला होता. 'प्रतिभे'च्या अंकांची प्रतीक्षा असे. 'यशवंत'-'रत्नाकरा'चा अंमल ओसरला नव्हता. रांगणेकरांच्या 'वसुंधरे'खेरीज शनवार घडत नसे. केशवराव भोळ्यांची गायकगायिकांवरची लोकप्रिय लेखमाला ह्याच काळांतली. रांगणेकरांनंतर तसें साप्ताहिक काढणें कुणाला जमलें नाही. ह्याच सुमाराला बापू कोल्हटकरांचा 'वायुपुत्र'हि असाच नित्य पठणांतला! राजाध्यक्षांचा आणि अनिलांचा आणि त्यामुळे आम्हा सर्वांचा परिचय झाला. मी थोडासा संगीताशीं झटापट करणारा असल्यामुळे अनिलांच्या कवितांना लावलेल्या चालींना मला हक्काचे श्रोते मिळत होते. अनिल आणि कुसुमावतीबाई यांचें नागपुराहून मुंबईस आगमन ही आम्हांला पर्वणी असायची. आठवडा काव्यशास्त्र-विनोदांतून उडून जायचा. अनिलांच्या ताज्या ताज्या कविता त्यांच्या तोंडून ऐकण्याचें भाग्य त्या काळांत आम्हाला लाभलें. काव्यगायनाच्या जाहीर कार्यक्रमांचा उबग आला होता, अशा वेळीं कवीला छोट्या मैफलींत शरीक करून घेऊन जें काव्यगायन चाले, त्यांत गर्दीवर छाप पाडण्यासाठी कराव्या लागणाऱ्या करामतीचा भाग नसे. वास्तविक अनिल आम्हां सर्वांच्या मानाने सर्वार्थाने ज्येष्ठ! पण त्यांनाहि आमच्या उटपटांग गटाविषयी प्रेम निर्माण झालें होतें. साहित्यांतल्या गहिवरसंप्रदायाच्या तेहि विरुद्ध. अनिल कवि झाले नसते तर उत्तम विनोदी लेखक झाले असते. आम्ही मुंबईकर असूनहि पार्ल्यांत राहत असल्यामुळे वागण्यांत एक देशी ऐसपैसपणा होता. तो त्यांच्या वऱ्हाडी मनाला रुचला असावा. त्यांनी मुक्तछंद लिहिला आणि मराठी काव्यमंदिरांत 'अब्रह्मण्यम्' असा आक्रोश जाहला. 'गगनिं उगवला सायंतारा', 'फुलति कळ्या मोगरिच्या' अशीं गीतें लिहिणारे अनिल मुक्तछंद लिहूं लागले हें पाहून माझ्यांतला गाणेंबजावणेंवाला

हिरमुसला होता. पण अनिलांच्या तोंडून 'प्रेम आणि जीवन' प्रथम ऐकलें, त्यानंतर राजाध्यक्षांच्या अंगणांत पुढल्या तीनचार रात्री आम्ही हैराण होऊन बसलों होतों. त्या अनोळखी प्रेमिकांच्या जोडीला 'छोटीशीच आहे बरें आपुली फौज' म्हणणारे अनिल कवितेचा कांही निराळाच साक्षात्कार घडवून गेले. अनिलांच्या मुक्तछंदाविरुद्ध जुनीं कविमंडळें झडझडून उठलीं. अशाच एका जुन्या कवीने 'हें काय काव्य आहे?' म्हणून राजाध्यक्षांचें अंगण तापवल्याचें मला आजहि स्मरतें. विरोध व्हायचा तसा झाला, मावळलाहि. मुक्तछंदाने मराठींत ठाण मांडलें. ह्या काव्यप्रकाराचा अनिलांनाहि पस्तावा व्हावा इतका तो आता माजला आहे.

साहित्यांतली 'ओल्ड ऑर्डर' बदलत होती अशाच काळांत अनिलांचें राजाध्यक्षांना पत्र आलें की बडोयाला चित्रे नामक वाङ्मयप्रेमी पतिपत्नी आहेत. त्यांची नवीन मासिक काढण्याची इच्छा आहे. आमची तातडीची सभा झाली. दरमहा एक तारखेला मासिक काढावें लागतें एवढी नियमितपणाची अट सोडली तर एक चांगलें मासिक काढायला झालें आहे ही कल्पना आम्हांला मंजूर होती. लेखन ही आपल्यामागे कायमची लागणारी पीडा व्हावी असें आमच्यापैकी कोणालाच वाटत नव्हतें. त्याच काळांत लेखक रक्ताने लिहितात वगैरे आवया उठल्या होत्या. आणि आपलें रक्त इतक्या सस्त्यांत घालवायचें नाही, ह्याविषयीं मंडळी ठाम होती. मराठी साहित्यांतली लाल पगडी जाऊन तिथे गालावरची लाली आली. आता असेल तसल्या आवाजांत क्रांतीचा लाल शेंदूर उधळला जात होता! ह्या रणधुमाळींत साहित्य ह्या गोष्टीचा कांही खेळकरपणांने विचार करावा, नवी कथा किंवा कविता क्रांतीच्या गर्जना न करतां छापतां येतात की नाही पाहावें, साहित्यिक शब्दांच्या पिंजऱ्यांतून बाहेर पडून कांही मोकळ्या वातावरणांत फुलतां येतें की नाही बघावें, एवढाच हें मासिक काढण्यामागे उद्देश होता. पण इथे तर प्रत्येक जण एकांडा शिलेदार होता. मंडळ-संप्रदायाच्या विरुद्ध! कुठे ती खाजगी पत्रांतून देखील साहित्यिक चर्चा करणारी थोर मंडळी आणि कुठे हीं, भंडाऱ्याकडची कोंबडी उडवतां उडवतां 'काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे'च्या ओळी आठवणारीं उथळ माणसें? दरमहा नियमितपणे मासिक सजवायचें काम सोपें नव्हतें. राजाध्यक्षांना साहित्याचें वेड खरें, पण क्रिकेट मॅचिस् पहाणें, ब्रिज खेळणें आणि सर्वांत वाईट म्हणजे तयारी करून वर्गांत शिकवणें वगैरे कामांपुढे फुरसद नव्हती—मी तर त्या काळीं नाटकासिनेमांतून हिंडणारा; अळुरकरांची फिरतीची नोकरी, बुद्धिबळ, कोहिनूर

सिनेमांतलीं स्टंट पिक्चर्स पाहणें इत्यादि कामगिऱ्या; चित्रकार गोडश्यांच्यावरहि वक्तशीरपणाचा आरोप करण्यांत अर्थ नव्हता;—अशा परिस्थितींत हें मासिक काढणें कसें काय जमणार ही चिंता चालू असतांना बडोद्याला 'अभिरुचि' मासिकाची सुरुवात झाली. चित्र्यांनी अनियमितपणाची अट शेवटपर्यंत पाळली. एकूणच सगळ्या अव्यवस्थितपणांत गुरुस्थानीं शोभणारा संपादक लाभल्यामुळे मासिकाच्या यशाची सुरुवातीलाच खात्री पटली. राजाध्यक्षांनी प्रथम 'टीपा आणि टिपणी' हें सदर 'निषाद' या टोपणनांवाने सुरू केलें. दोन महिन्यांनंतर गोडश्यांनी दरमहा एक व्यंगचित्र द्यायचें ठरवलें. (चित्र्यांचा मुलगा दिलीप ह्याने त्याला विंगचित्र हें नांव देऊन आपलेहि पाळण्यांतले पाय दाखवले.) राजाध्यक्ष 'निषाद आणि शमा' ह्या मुलखावेगळ्या जोड टोपणनांवाने त्या मासिकांतून 'वादसंवाद' लिहूं लागले. त्या सदराने कुणाला सुखावलें, कुणाला दुखावलें; कुणाची टोपी उडाली–कुणाला चपखल बसली; पण गंभीर साहित्यिक विचारदेखील खेळकर पद्धतीने मांडतां येतो आणि विद्वत्ता आणि विनोद यांचें वावडेंच असलें पाहिजे असें कांही नाही हें तत्कालीन तरुण पिढीला पटलें. आज ही पिढी चाळिशींत शिरली आहे. 'अभिरुचि' माखिकाला अनपेक्षित साद मिळाली. आज मान्यता पावलेल्या बहुतेक साहित्यिकांची सुरुवातीची हजेरी अभिरुचींत लागली आहे. त्या मासिकाकडे आकर्षित होण्याच्या अनेक कारणांपैकी 'निषाद आणि शमा' यांचा 'वादसंवाद' हें महत्त्वाचें कारण आहे. राजाध्यक्ष 'निषाद' आणि गोडसे 'शमा' असाहि हा समास सोडवतात. त्या काळीं गोडसे उर्दू काव्यांत रमल्याची ही एक निशाणी आहे. 'अभिरुची'वर कांही बुजुर्गांचा किंचित् रोषहि झाला. क्वचित् सकारणहि. गद्धेपंचविशींतली मंडळी जमली होती. यौवनाचा अपराध होताच. पण त्या मासिकांतल्या राजाध्यक्षांच्या लिखाणाने खोट्या प्रतिष्ठेचे वरेचसे पडदे हटवले यांत शंका नाही. साहित्यिक नांवाची मंडळी पूर्वी नाकासमोर टोपी घालून तरी हिंडत किंवा आकाशगामी प्रतिभेचा शोध घेण्याचा आक्रस्ताळेपणा करीत. अभिरुचीने विवेक केला. लेबलें झुगारलीं. शब्दांचीं कोळिष्टकें झाडून टाकलीं. केरसुणी एवढीशी होती, पण जळमटांना भारी ठरली.

ह्या अभिरुचीमुळेच रास्त्यांचे पुन्हा गोखले व्हावे तसे आम्ही चांगले इमानी वाचक होतों ते लेखक झालों. मी, अळूरकर आणि राजाध्यक्ष असे तिघांनी मिळून 'पुरुषराज अळूरपांडे' ह्या भरघोस नांवाने विनोदी लेखांचा घाणा काढला. त्यांत

राजाध्यक्षांचा वाटा फार मोठा आहे. साहित्य आणि साहित्यिक क्षेत्र हा राजाध्यक्षांच्या विनोदाचा लाडका विषय आहे. त्यांच्या विनोदी लेखनांतले बरेचसे संदर्भ सर्वसाधारण वाचकाच्या नजरेंतून निसटण्याचा संभव असतो. ते स्वतः त्या समुदायाच्या आसपास वावरले आहेत. मिष्किलपणाने वावरले आहेत. दुर्बिणींतून कामगारांची सभा पाहून कामगारजीवनावर कथा-कादंबरी लिहिण्याची धिटाई विनोदी लेखकाला मानवणें शक्य नसतें. विनोदाला 'पोज' घेतां येत नाही. त्यांना जें दिसलें, ज्यांतल्या विसंगती त्यांना उमगल्या त्यावरच त्यांनी लिहिलें आहे. मात्र हीं विनोदी चित्रें लिहितांना कुठे तीव्र संताप, चीड नाही. एक निक्षेप खट्याळपणा आहे. सावंतवाडी-शिरोडा भागांतले कोकणी चिमटे काढायचीहि खोड डोकावते. मात्र विनोदांत कुठे आकस नाही. विनोदांत आकस आला की त्याचें स्वरूप भयानक होतें. मला वाटतें, हा आकस स्वभावांतच असतां कामा नये. मुळांतलीच एक प्रसन्नता आणि जिव्हाळा असावा लागतो. हा जिव्हाळा अगदी सख्या-सुहृदांना पोटाशीं धरूनच व्यक्त करावा लागतो असें नाही. राजाध्यक्ष माणसांचे लोभी आहेत. त्यांच्या परिवारांत साहित्यिक मित्र आहेत आणि संपूर्ण बिगरसाहित्यिक सज्जनहि आहेत. किंबहुना गेल्या इतक्या वर्षांत आमच्या बैठकींत साहित्यांतल्या कोंड्या व त्या फोडण्याचे मार्ग, किंवा कथेंतली आकृतिबद्धता आणि आशयनिष्ठा असल्या वाङ्मयीन विषयावर बोलल्याचें स्मरत नाही. कारण ह्या विषयांतलें आपल्याला विशेष कळतें असें त्या मैफलींत कुणीच कुणाला भासवायचें नसतें. मला तर वाटतें, खाणें-गाणें-नाटकें ह्याच विषयावर आम्ही अधिक रंगलों आहोंत. खाण्यांत एके काळीं अळूरकरांच्या खास भलामणीवरून खाल्लेल्या चौपाटीवरच्या रगड्यापासून ते खरा जर्दा इब्राहिमी की गोडबोले, हेच विषय आले असतील. कोणींहि चांगलें लिहिलेलें वाचावें आणि स्वतःच्या लिखाणाबद्दल न बोलावें हेंच पथ्य पाळलें आहे. राजाध्यक्षांना गाण्याची चव आहे आणि क्रिकेट हा त्यांचा आवडीचा खेळ आहे. बॉम्बे जिमखान्यावर होणाऱ्या त्या (कै० हाय) चौरंगी सामन्यांतले ते एक अत्यंत उत्साही प्रेक्षक! तंबूंत शिरकाव होण्याइतके पैसे मुठींत जमण्यापूर्वी झाडाच्या फांदीवरून आणि रॅली ब्रदर्सच्या गच्चीवरून देवधर-नायडूंच्या लीला पाहण्याची तपश्चर्या त्यांना घडली आहे. आणि ह्या साऱ्या गोष्टींची त्यांची चव पक्की असल्यामुळे चौपाटीवर गळ्याखाली शर्ट न भिजवतां पाणीपुरी लोटतांना 'पश्चिमेकडे सांध्यराग कसा आळवला जात होता' ह्याचीं साहित्यिक वर्णनें त्यांनी

केलीं नाहीत. म्याच पाहिली, पण उद्या त्यावर 'मुस्ताकअलीचें नेत्रदीपक हस्त-लाघव' किंवा 'अमरनाथचें गात्रशामक पदलालित्य' असलें साहित्यिक समालोचन लिहिलें पाहिजे, म्हणून नव्या उपमा आणि नवे शब्द शोधण्यांत समोरचा खेळ हरवून ते बसले नाहीत. गाण्याच्या मैफलींत तोंडांतल्या गोडबोल्याची पीक आवरीत दाद देतांना तें सांद्रसंगीत होतें की कलेचीं क्षितिजें रुंदावणारें होतें याची त्यांनी वाङ्मयीन चिंता केली नाही. नाटक हा आवडीचा विषय असूनहि त्यांनी फक्त नाटकें पाहिलीं. कॉलेजांतल्या संमेलनाच्या नाटकांत भावबंधनांतल्या धुंडिराजाच्या स्टेशनवरील प्रवेशांत वास्तवता आणण्यासाठी चहाचा कप हातांत घेऊन पीत पीत ते रंगभूमीच्या उजव्या बाजूने डाव्या बाजूकडे गेले होते. चिंतामणराव कोल्हटकरांचा त्यांच्यावर लोभ असे. एवढया भांडवलावर अभिनयाच्या सूक्ष्म कडा केव्हा आणि कुठे मिसळतात ह्याची हौशी, किंवा इंग्रजींतून मराठी नाटकांची चिकित्सा करणाऱ्या, मंडळीपुढे मार्गदर्शनपर भाषणें करायला त्यांना हरकत नव्हती. राजाध्यक्षांनी आयुष्यांतल्या अशा सुवर्णसंधींचा वेळीच स्वीकार केला नाही. साहित्याचा आस्वाद घेतांना ह्या विषयावर आपल्याला टीकात्मक टिपणी लिहायच्या आहेत ह्या चिंतेपासून मुक्त असलेला हा एक अपवादात्मक प्राध्यापक आहे. महादेवशास्त्री जोशी, सरिता पदकी, ना० घ० देशपांडे यांच्या संग्रहांना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना भारदस्त झाल्या नाहीत. कारण त्या प्रस्तावनांतून तें साहित्य वाचतांना मिळालेल्या आनंदाची पावती आहे. त्यांतल्या वाङ्मयीन गुणांची ताळेबंदी नाही की साहित्यनिघंटूंतल्या ठराविक मात्रांचे त्यांत वळसे आणि वेलांट्या नाहीत.

राजाध्यक्षांचें मराठीइतकेंच इंग्रजी भाषेवरहि प्रेम आहे. म्हणूनच दोन्ही भाषा ते शब्दांचा मान ठेवून लिहितात. राजाध्यक्षांच्या विनोदी लिखाणांत ठिक-ठिकाणीं शब्दांच्या वारेमाप उधळपट्टीच्या प्रवृत्तीवर केलेली टीका आढळते. मला वाटतें, काव्यवाचनाची (जाहीर नव्हे!) आवड आणि सूक्ष्म विनोदबुद्धि यामुळे त्यांची शब्दांची निवड कशी अचूक असते. वाक्यें कशीं टुणटुणीत दिसतात. जें लिहिण्यांत, तेंच त्यांच्या बोलण्यांत आहे. भाडभाडभाडभाड शब्द उधळीत जाण्याला आपण वक्तृत्व मानीत आलों आहों. राजाध्यक्षांचें वक्तृत्व त्या अर्थानें प्रभावी नाही. मराठी आणि इंग्रजी दोन्हीहि भाषांवर त्यांचें प्रभुत्व आहे तें त्यांतल्या समर्पक शब्दयोजनेंतूनच दिसतें. बाकीचा मैदानी आवेश त्यांत नसतो. दिल्लीला कांही वर्षांपूर्वी आकाशवाणीच्या साहित्यसमारोहांत राजाध्यक्षांनी आधुनिक मराठी

वाङ्मयाचा इंग्रजींतून आंतरभारतीय मेळाव्यापुढे एक आढावा घेणारें भाषण केलें होतें. अध्यक्षस्थानीं श्री० जवाहरलाल नेहरू होते. राजाध्यक्षांचें भाषण संपलें. त्यानंतर नेहरू जाणार होते. ते रंगमंचावरून खाली उतरले व लगबगीने फिरून वर चढले. राजाध्यक्षांकडे गेले आणि त्यांना म्हणाले, "इतकें रेखीव इंग्रजी आणि समर्पक समालोचन मीं फार दिवसांनी ऐकलें." त्या दिवशीं दिल्लींत राजाध्यक्षांच्या इंग्रजीचा भाव भलताच वर गेला होता.

राजाध्यक्षांच्या बाबतींत आम्हा जवळच्या आप्त-मित्रांना दोन प्रमुख चिंता. त्यांनी ग्रंथ लिहावा ही एक आणि लग्न करावें ही दुसरी! कांही वर्षांपूर्वी त्यांनी 'पांच कवि' नांवाच्या कवितासंग्रहाचें संपादन केलें. राजाध्यक्षांच्या चोखंदळ रसिकतेच्या त्या पुस्तकांत पुष्कळ खुणा आहेत. पण हें त्यांच्या स्वतंत्र लिखाणाचें पुस्तक नव्हे. त्या पुस्तकाचें त्यांनी दाईपण केलें आहे, आईपण नव्हे. आमच्या मनाला रुखरुख होती. तेवढ्यांत त्यांचें लग्न झालें. त्यांच्या पत्नींनी मराठीची प्राध्यापकी पत्करून त्यांच्या विनोदाचा एक विषय बंद करून टाकला. साहित्य-क्षेत्रांत राहून स्वतंत्र ग्रंथरचनेचा टिळा न लागल्यामुळे अनेक माळांचा मार्ग खुला नव्हता. श्री० पु० भागवतांनी कोण्या गाफिल क्षणीं त्यांचा होकार घेतला कोण जाणे. शेवटीं राजाध्यक्षांचा साहित्यिक झाला.

राजाध्यक्ष माझे प्रोफेसर. त्यांनी कांही काळ मला इंग्रजी शिकिवलें. अभिरुचीचा नेट त्यांनी धरला म्हणून मींहि खर्डेघाशी केली. मराठी-इंग्रजीच्या उत्तमोत्तम ग्रंथांचें वाचन त्यांच्याच प्रेरणेने झालें. अशा वेळीं गुरुवर्य राजाध्यक्ष ह्या विषयावर मी म्हणजे आदराने मान तुकवीत तुकवीतच लिहायला हवें. पण आदराचा कप्पा कोटाच्या छातीवरच्या खिशावर शिवूं नये हें त्यांच्याचकडे पाहून मी शिकलों. तो कप्पा आपल्याला दिसावा! त्यांच्या लग्नांत त्यांच्या शिष्येने केलेल्या पराजयाबद्दल जशी थट्टा केली त्याच सुरांत ह्या त्यांच्या पहिल्या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या वेळीं करावीशी वाटली. जाणकारांच्या जगांत राजाध्यक्षांना मान्यता मिळालीच आहे. त्यांच्या पुस्तकाला मीं कसली प्रस्तावना लिहायची? पण फकीर वयाने आणि मानाने मोठा का असेना, आपल्या मशिदींत आला ह्याची लहान्या फकिराला झालेली खुषी व्यक्त करणें एवढ्याचसाठी हा इतक्या ओळींचा प्रपंच!

गुरूची विद्या गुरूला फळते ती अशी!

पु० ल० देशपांडे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
दा. क्र. ९३३०९

१

## “माझी मैत्रीण म्हणाली...”

हें लघुनिबंधांचें युग आहे असें विद्वान् लेखक म्हणतात आणि तें खरेंहि आहे. आजकाल चांगलें मासिक म्हणजे मुखपृष्ठावर चित्रपट-तारका लाभली नाही तर, कमीअधिक लगट करणारीं शहरी अथवा खेडवळ तरुणतरुणी लागतात—तसेंच आंत एखादा लघुनिबंधहि. खांडेकरच पाहा किती लघुनिबंध लिहितात ते; आणि दांडेकर त्यामुळेच प्रसिद्धीला आले! म्हणून मीहि लघुनिबंध लिहावयाचें ठरविलें. शाळेंत आणि कॉलेजांत सक्तीने निबंध लिहीत असेंच; आता त्यांत लांबीने लघुत्व आणि शैलीने लाघव आणलें की झाले लघु-निबंध. त्यांचें तंत्र कडक आखलेलें आहे म्हणा—त्यासंबंधी विद्वत्तापूर्ण लेख तुम्हीहि वाचले असाल. तो आरंभ, तो मध्य आणि तो अंत! आरंभ आकर्षक हवा, विषय क्षुल्लक, आणि लिहिण्यांत सहजपणा. मला हें सगळें पाठ होतें.

पण एक अडचण होती. मी आपल्या ‘ख्यातनाम’ लेखकांच्या पुष्कळ लघुनिबंधांचीं पारायणें केलीं. त्यांत ठिकठिकाणीं “माझी मैत्रीण मला म्हणाली” असे उल्लेख आढळले. क्वचित् दोनचार वेळां ‘मैत्रीण’ऐवजी ‘पत्नी’ सापडली, पण (मनांतलें बोलायचें म्हणजे) त्या ठिकाणीं खरा रंग भरला नाही! लेखक हळुवार हाताने एखाद्या विषयाला गोंजारत असतो, आणि नेमका मान्याच्या जागेवर आला की, ‘माझी मैत्रीण’ लाडिकपणे मुरडत काय म्हणाली तें सांगून टाकतो तेव्हा बरें वाटतें! मीहि मोठ्या खुशीने तेंच केलें

असतें; पण माझी अडचण अशी की मला मित्र पुष्कळ आहेत पण मैत्रीण एकसुद्धा नाही! हें कबूल करवत नाही; पण लघुनिबंधांत आडपडदा न ठेवतां आत्मकथन करण्यांत 'सौंदर्याची किल्ली' आहे असा निर्वाळा "लोकप्रिय लघुनिबंधकार कसें व्हावें?" या ग्रंथाच्या आरंभींच दिला आहे, म्हणून हें सगळें.

तेव्हा आता पडदा थोडा बाजूला करतों. (वाचक फार बारकाईने न्याहाळणार नाहीत असा भरवसा आहे.) मी या पुण्यांतच शाळाकॉलेजचा विद्यार्थी म्हणून आठदहा वर्षें काढलीं आणि आता येथेच कारकुनी करतों. शाळेंतलें सोडा, पण कॉलेजांत शेदीडशे मुली असत भोवती; आणि आता दररोज सकाळीं मुलींच्या घोळक्यांतून पायचाकी दामटत कचेरी गाठतों व त्याच थाटांत संध्याकाळीं परततों. जिमखान्यावर फिरायला जातों. चित्रपट चुकवत नाही—आणि व्याख्यानेंदेखील ऐकतों. आता इतकें खरें लिहिलें तेव्हा आणखी थोडें; त्यांत लाज कसली? मला फडक्यांच्या कादंबऱ्या आवडतात. त्यांत घडतात तसले गोड अपघात आम्हांला कोठचे घडायला? आमचीं नुसतींच हाडें मोडायचीं. पण त्या नायकांच्या चारदोन लकबी उचलण्याचा मीं प्रयत्न केला. तसे कपडे केले; केस चापूनचोपून बसवले आणि मग दोन बोटें त्यांत शिरकवून नाजूकपणें विसकटून टाकले. पुष्ट, भरदार पोटऱ्या उघड्या दिसल्या की नायिका प्रेमविव्हल होतात या संकेतानुसार मी लांड्या विजारीने हिंडूं लागलों—विशेषतः प्रवासांत (कारण अपघात प्रवासांतच अधिक घडायचे!); पण पुण्याच्या बसमध्ये आणि आमच्या दौंडच्या गाडींत फक्त चिलटांनी चावे घेऊन पोटऱ्या लाल केल्या. तेव्हा त्या झाकल्या आणि हा ललित खटाटोप सोडला. एकूण आपल्याला तें जमायचें नाही हें पटलें. जगांत अन्याय फार आहेत, समता कमी, सर्वांना सारखी संधि मिळत नाही हेंहि पटलें. माडखोलकरांच्या नायकांना एकास तीनचार किंवा अधिक मैत्रिणी (किंवा, क्वचित्, बदला म्हणून, एकीस तीन किंवा चार मित्र); तेहि गांवढ्यांत किंवा जंगलांत; आणि भर पुण्यांत राहून आमच्यासारख्यांना...तेचि पुरुष भाग्याचे!

पण ही कथा माझी एकट्याचीच नाही. (म्हणून तर लिहिण्याचा धीर केला.) बहुतेक आमच्याच माळेंतले. रस्त्यांत (कोणत्याहि वयाची) ओळखीची स्त्री दिसली तरी आमचे डोळे पायाचीं नखें कुरतडूं लागायचे आणि जीभ

सुकायची. कॉलेजच्या चार वर्षांत मुलीशीं भाषण मी एकदा केलें—आणि तेंहि अर्धेंच! त्याचें असें झालें. एकदा वर्गाबाहेर मी आणि बापू पंडित कोणाचें 'गाईड' घ्यावें याचा खल करीत उभे होतों. समोरून आली एक मुलगी. (उगीचच नांव कशाला घ्या तिचें !) तिने आम्हां उभयतांना विचारलें, "आज प्रो० घाटपांड्यांचा तास आहे का?" बापूने जेमतेम "ना" म्हटलें. आणि मी, आवंढा गिळून "ही" केलें—आणि नकार पूर्ण केला. बापू पंडित तेव्हा कविता करीत असे; आता तोहि माझ्यासारखा कारकुनी करतो. परवाच लकडी पुलावरून आम्ही चाललों असतां, अचानक स्फूर्ति उसळून, त्याने ही कविता केली :

*इकडे पोरी, तिकडे पोरी, वर्दळ पोरींची*
*मैत्रिण म्हणण्या कोणी नाही, करणी नशिबाची.*

यांतील यमक चिंत्य असलें तरी विचार प्रामाणिक आहे. हिरव्या टेकडीवरच्या उघड्या कातळासारखे आम्ही, मी म्हटलें. बापूने रूपक लावलें : नदीकाठच्या घाटावरचे आपण वरचे दगड. कधी काळीं पूर येऊन न्हाऊं घालील या आशेवर तापत राहायचें! पण ही तक्रार नाही. माझी अडचण मी दाखवीत आहें. लघुनिबंधांत घालायला मैत्रीणच नव्हती मला.

आता एकच उपाय राहिला होता. ज्यांना अशा मैत्रिणी होत्या त्यांची चालचलणूक हेरून जमतें का पाहायचें. आमच्या वेळीं कॉलेजांत असे थोडे भाग्यवान होते. गोपू जोशीच घ्या ना. पट्टीचा खेळाडू आणि नट. त्याला मित्रांपेक्षा मैत्रिणीच अधिक; पण त्याने कधी त्यांच्यासंबंधी लघुनिबंध लिहिले नाहीत. एकदा कॉलेजमासिकाच्या संपादकाने त्याला तसलें कांही लिहिण्यास सांगितलें तेव्हा त्याने म्हणे आपली रॅकेट त्या संपादकाच्या डोक्यांत हाणली.

अशांचा काय उपयोग? इतक्यांत मला राम काळेचें नांव आठवलें. राम काळे सदैव लघुकथा आणि लघुनिबंध लिहीत असतो. बृहन्महाराष्ट्रांत सत्तावन नियतकालिकें आहेत—मराठवाडा आणि माळवा धरून. प्रत्येकाने आपले वर्षाकाठीं दोन लेख छापले तरी शेकडा पुरा होतो हा त्याचा हिशेब त्याने मला एकदा सांगितला होता. बारा-पंधरा लेख एकत्र छापून एखाद्या प्रथितयश साहित्यिकाची प्रस्तावना जोडली की एक पुस्तक होतें आणि सातआठ पुस्तकें

बाहेर पडलीं की आपणच प्रथितयश होतों हें त्याचें वाङ्मयीन कोष्टक बिनचूक ठरलें. म्हणून आज त्याचा एवढा बोलबोला झाला आहे. असो. त्याच्या लघुनिबंधांत मैत्रिणींची ये-जा फार असते; आणि त्या मैत्रिणीसुद्धा तऱ्हेतऱ्हेच्या. आपल्या सगळ्या महाराष्ट्रीय जाती आहेतच, पण गुजरातीहि आहेत. बंगालची नामवंत नटी बासरीबाला हिने किती 'आग्रही गोडव्याने' आपल्याला रसगुल्ला दिला याचें त्याने केलेलें मिष्टास वर्णन तुम्हाला आठवत असेलच. तसेंच, पांचगणीला भेटलेली पारशीण, फ्रॉंटिअर मेलमधून उतरतांना जिचा धक्का लागला ती झेक ज्यू युवती—तिनेच दिलगिरी प्रदर्शित करण्यासाठी त्याला 'रिफ्रेशमेंट रूम'मध्ये ओढत नेऊन कसलेंसें "ईषत्बदामी रंगाचें मादक पेय" पाजलें, नाही का?...इंग्रज आणि अमेरिकन तरुणी तर अगणितच. आणि किती सहजपणे राम काळे त्यांचा उपयोग करतो! परवाच 'गुलबर्गा समाचार'च्या पाडवा अंकांत त्याचा एक लघुनिबंध पाहिला. त्याचा आरंभ, संपादक म्हणतात त्याप्रमाणे, "अतीव कलासुंदर आणि तंत्रनिष्ठ" आहे :

"मानवी मन म्हणजे एक गूढ-मधुर कोडें आहे, त्याच्या गोफाची वीण फार फसवी आणि सूक्ष्म-तरल आहे" असें एक रशियन मनोविश्लेषणशास्त्रज्ञ म्हणतो तें मला पटतें.

काल संध्याकाळचीच गोष्ट. बंडगार्डनजवळून मी एकटाच विचारमग्न अवस्थेंत चाललों असतां समोरून येणारी एक डौलदार 'मर्सिडीज' गाडी ब्रेकचा कर्कश आवाज करीत माझ्याजवळ थांबली. नाजुक रिस्टवॉच लावलेला चाकावरचा आपला गौर-कमनीय हात उचलून गळ्यावर ठेवीत नि ओठांचा मोहक चाळा करीत माझी मैत्रिण रेना अँजेलो म्हणाली.

"आज आकाशांत फार सुंदर रंगसंगति आहे असं तुला नाही वाटत? हें पाहून मला मिलानची आठवण होते."

आणि मी यावर कांहीतरी मार्मिक बोलणार तोंच आपल्या किंचित् आरक्त लांबसडक बोटांनी माझ्या कोटाची बाही खेचल्यासारखी करून ती लाघवीपणे म्हणाली, "चल ना रे, आपण मुरॅटॉरमध्ये जाऊन खाना घेऊं या."

—हें असलें वाचून कसें मोहरून गेल्यासारखें व्हायचें आणि राम काळेचा

हेवा वाटायचा. तसें म्हटलें तर त्याच्यांत इतक्या मैत्रिणींना आणि 'असल्या' मैत्रिणींना ओढ लावील असें काय होतें? अंगाने पसरट, करपलेल्या हरभऱ्याचा वर्ण, विरळ होत चाललेले केस आणि शिक्षकाचा पेशा; पण प्रभावी व्यक्तित्व हें अशा बाह्य तपशीलापलीकडचें असतें असें आपला एक मोठा कादंबरीकार म्हणतो तें खरें असावें.

म्हणून राम काळेच्या व्यक्तित्वाचें गुपित हुडकून काढावयाचें व त्याच्या असल्या मैत्रीचें 'तंत्र' अभ्यासावयाचें असें मीं ठरविलें. त्याचीमाझी कॉलेजांतील पुसट तोंडओळख; तिच्या आधारावर कसलेंसें निमित्त काढून मी त्याच्या घरीं गेलों. भीत भीतच. एवढा मोठा लेखक, केवढया त्याच्या ओळखी आणि माझ्यासारख्या साध्या कारकुनाने वेळ घेतलेला त्याला आवडेल की नाही ही शंका टोचत होती. एका जुनाट वाड्यांत पुढच्या बाजूच्या एका खणांत तो राहतो. तेथे धीर करून शिरलों. त्याच्या खोलींत टेबल, खुर्ची, वळकटी, अडकित्ता, तांब्या, कागदांचे गठ्ठे या साहित्याशिवाय भिंतीवर अनेक फोटो दिसले. त्यांपैकी बहुतेक स्त्रियांचेच होते. बासरीबालेचा होताच—कोपऱ्यांत तिची स्वाक्षरीच असावी. मी इंग्रजी चित्रपट फार पाहात नाही, पण तेथील परदेशी स्त्रियांपैकी एकीचा चेहरा चित्रपटांत पाहिला असल्याची आठवण झाली. तिचा याचा पत्रव्यवहार तर चालू नसेल? ही टेहळणी चालू असतांच राम काळे आंत आला. जुनी ओळख पटवली आणि सावधपणे गोष्टी काढल्या. पण बिलंदर मनुष्य, मग दिसो कसाहि. त्याने कसलीच दाद लागू दिली नाही— म्हणजे त्या मैत्रिणींबाबत. इतर पुष्कळ बोलला. आपलीं आगामी नऊ की दहा पुस्तकें कोणतीं तें सांगितलें; आपल्या पुस्तकांवरील परीक्षणांचीं कात्रणें दाखविलीं; जरा लाजतच, संपादकांचीं लेखांसाठी विनंति करणारीं डझनावारी पत्रें माझ्या डोळ्यांपुढून फिरविलीं. चहा घेतां घेतां 'युगशाली सिनेटोन' व आणखी एक कंपनी यांच्यासाठी 'सिनेरिओ' लिहीत असल्याचेंहि कबूल केलें. त्याचा वेळ घेतल्याबद्दल मला कसेंसेंच वाटत होतें; त्यांतच कळलें की तो दररोज नियमाने किमान साडेतीन पानें लिहितो—सणासुदीला साहजिकच चारदोन पानें अधिक. तेव्हा त्याच्या लिहिण्यांत व्यत्यय नको म्हणून घाईनेच निरोप घेतला. इतका मोठा मनुष्य खुलेपणाने बोलला याचा आनंद होत होता, पण 'त्यां'बद्दल कांहीच कळलें नाही याचेंहि वाईट वाटत होतें.

—पण शेजारच्याच खणांत आमचा सदू ठोसर राहातो हें आढळलें तेव्हा बरें वाटलें. म्हटलें त्याच्या आडोशाने राम काळेचा नकळत वास काढतां येईल. पण सदू ठोसरसारख्या भोळसट माणसाला संशय येऊं लागण्याइतक्या खेपा मारूनहि कांही पदरांत पडलें नाही. राम काळेच्या लेखनाच्या शतांशानेहि त्याच्या घरांत स्त्रियांचा वावर दिसेना. तो ब्रह्मचारी होता (असावयाचाच म्हणा!) त्याला 'करून घालायला' कोणी एक सोवळी दूरची आत्या घरांत होती. आणखी एक स्त्री तेथे दररोज एकदोनदा येऊन जात असे—ती जनी मोलकरीण; ती आली होती एकसष्टी करण्याच्या वयानजीक; वाड्यांत चार ठिकाणीं कामें करून पोट भरायची. आणि ती केरसुणी परजवीत खोलींत आली की हा म्हणे गच्चींत जाऊन उभा राहायचा! एकूण राम काळे त्या सगळ्या जणींना बाहेरच भेटतो म्हणावयाचा! खरें म्हणजे, त्या कितीहि प्रेमळ असल्या तरी अशा खोलींत पाऊल टाकावयाला कचरतील ही शंका मला केव्हाच आली होती—पण स्वतःशींच बोलून दाखवायला धजलों नव्हतों!

—म्हणजे राम काळेचें हें 'दुहेरी जीवन' आहे तर! कसब्यांत कार्तिकस्वामी आणि कँपांत कन्हैया!! पण त्याचीं संकेतस्थळें कुठचीं? आणि तेथे हा जातो कधी? अकरा ते पांच हा शनिवार पेठेंतल्या 'आदर्श शिक्षण मंदिरां'त. ती शाळा इतकी 'फक्त मुलांसाठी' होती की, रस्त्यावरून जाणाऱ्या मुली आंत बघतील या भीतीने तिच्याभोवती—म्हणजे शाळेभोवती—उंच पत्र्यांचा कडक गोषा उभारला होता. आणि संध्याकाळीं "रोख एक पैसा" वाचनालयांत उभ्याने वर्तमानपत्रें वाचण्यासाठी जाऊन घरीं परतेपर्यंत त्याचें नियमित चार फर्लांगांचें उघड्या हवेंतील फिरणें होत असे—नंतर नियमित लेखन. क्वचित् सिनेमाला गेला तर धडफळे मास्तरांबरोबर चार आण्यांत आणि तेथील मोठा षोक म्हणजे मुरळींतले शेंगदाणे खाणें! या दुरंगी माणसाचें गूढ उकलेना—आणि म्हणून त्याच्याबद्दलचा आदरहि वाढला...पण रुखरुख मात्र जाईना...

पण गेल्या रविवारीं संध्याकाळीं कडक इस्त्रीचे कपडे करून आणि टोपी किंचित् कलती ठेवून राम काळे सोमणांच्या घरांत शिरतांना दुरून पाहिला तेव्हा 'यांत कांही तरी आहे' ही खात्री उगाच मनांतून चमकून गेली आणि मीहि तिकडेच वळलों. सोमण म्हणजे बापू पंडितचे मावस—कोणी तरी.

त्या ओळखीवर, काय सबब सांगावी या विचारावर अडखळत, पांच मिनिटांनी मी आंत शिरलों. तों काय? एका बाजूला आदर्श शिक्षण मंदिराचे हेडमास्तर शेंबवणेकर आणि दुसऱ्या बाजूला धडफळे मास्तर यांमध्ये राम काळे अंग चोरून जाजमावरच्या शाईच्या डागाकडे पाहत, बसला होता. समोर जाजमाच्या कडेला सोमणांची गोदू (म्हणजे गोदाबाला) खाली मान घालून बसली होती. बापूने मला बाजूस नेऊन वरच्या दातांनी खालचा ओठ दाबत माझ्याकडे न पाहण्याचा प्रयत्न करीत बातमी दिली—"तिला पाहायला आला आहे राम काळे." आता हें का सांगायला पाहिजे, बापू?—तिकडे आंत अजूनहि त्याच एका डागाकडे पाहत राम काळे कापऱ्या आवाजांत गोदूला प्रश्न विचारीत होता—"तुबन्त आणि धातुसाधित यांपैकी तुम्हांला अधिक कोणतें आवडतें?"—"गझनीचा महमूद कधी मेला?"

मी बापूला जातों असेंहि म्हटलें नाही.

घरीं जाऊन मी कागद पुढे ओढला आणि लघुनिबंध लिहावयाला सुरुवात केली. तिसऱ्या ओळींत एक सुंदर पंजाबी तरुणी टाकली आणि लिहिलें, "माझी मैत्रीण म्हणाली..."

२

## पुस्तकांचीं दुःखें

....म्हणजे लेखकांचीं दुःखें नव्हेत. तीं आहेतच. युगानुयुगें त्यांची कर्मकथा आपण ऐकत आलों. त्या व्यथा आणि वेदना आता तोंडवळणीं पडल्या. तें रक्त आणि अश्रूंचें रंगीत रसायन आता आंबून गेलें. मी बोलत आहें पुस्तकांविषयी : कागद, शाई, पुठ्ठा, डिंक इत्यादि द्रव्यांनी बनलेल्या वस्तूविषयी : तिचें पितृपद, परमार्थाने, एका (किंवा क्वचित्, अनेक) इसमांकडे असेल; पण, म्हणून, त्या पुस्तकाला अलग अस्तित्वच नाही का? की पित्याचीं सुखदुःखें तींच अपत्याचीं? आनुवंशिकतेचा अतिरेकच आहे यांत जरा. इतकी इमानी वारसदारी बरी नव्हे. त्या पुस्तकाचीहि यथाकाल नाळ कापून त्याला निराळें जगूं द्यावें; आपल्या पायांवर उभें राहूं द्यावें. की जन्मभर अंगावर आवाळूं उठल्यासारखें त्याने लेखकाला चिकटून राहायचें, लोंब्रायचें? आणि त्याच्या एवढ्यातेवढ्या खोकल्याने याने ठुसठुसायचें? जन्मभर म्हणजे अर्थातच लेखकाच्या जन्मभर; कारण त्याचा अवतार संपला म्हणून पुस्तकाचा संपत नाही. मग कोठे तें आपल्या जिवाने जगूं लागतें—निदान बरेंचसें. पोरकें झालें की त्याला स्वतःची प्रतिष्ठा येते. पण तोंपर्यंतचा, म्हणजे ऐन उमेदींतला, परावलंबीपणा वाईटच. एकंदरीने जरा नामुष्कीचाच. हें कोणत्याहि स्वाभिमानी पुस्तकाचें मोठें दुःख. मुख्य म्हणजे पुस्तकाला आपलें स्वतःचें दुःख असूं शकतें—त्याचा लेखक अगदी सुखाने तुस्त झाला असला तरीहि. ज्या दिवशीं हें आपल्याला, विशेषतः लेखकांना, पटेल तो पुस्तकाचा सुदिन!

आणि लेखकाचीं दुःखें म्हटलीं की तीं शारीरिक नव्हेत असा आपला संकेत. तो खरा नाही; त्याला तीं इतरांपेक्षा चार जास्तच. त्याचें सदैव कांही तरी दुखत खुपत असतें. त्याला हें सोसत नाही; तें बाधतें. शिंकेशिंकेने विव्हळतो बापडा. पहिली भूक पथ्यपाण्यांतच जिरली तरी दुसरी भूक प्रबळ. पण या सर्वांविषयी कोणी सहसा लिहीत नाही—अगदी त्याचें खाजगी उणें काढण्यासाठी टपलेला दुसरा लेखक सोडून! एकंदरीने वेशीवर टांगायची असते ती त्याच्या काळजाची व्याधि. कलावंताचें काळीज म्हणजे जरा लिबलिबीतच; कशानेहि हालतें, झिरपतें आणि दुखावतें. बऱ्याचशा साहित्याची ती सार्वजनिक गंगोत्री. निम्म्या कथा आणि पाऊण कविता त्याच तोटींतून आलेल्या असतात. सगळा हुरहुरीचा, आसवांचा आणि उसाशांचा उपसा. पण त्याचा केवढा डंका! त्याला हळवेपणा म्हणायचें—आणि (भाव) भावना वगैरे. खरें म्हणजे हा सगळा बुळेपणा, दुबळेपणा; पण त्याच्यावर शिक्का असतो : 'आत्मिक आणि अथवा आंतरिक; जपून हाताळा.' लेखकाचा आत्मा हा दुसऱ्यांहून निराळा, खास बनावटीचा असें आपण पाठ केलेलें. असेलहि बेटा. येथे आपल्याला त्याच्याशीं कर्तव्य नाही.

पुस्तकाला दोन्ही तऱ्हेचीं दुःखें असतात हें मात्र खरें. फक्त त्याला तीं बोलून दाखवितां येत नाहीत. त्याचा वाचाळपणा दुसऱ्याच्या वतीने अशिलाचे कज्जे प्राणपणाने लढविणाऱ्या फर्ड्या वकिलाने घरांतले घोर अन्याय तोंड दाबून सहन करण्यासारखा अथवा मळकट कपड्यांतल्या परटासारखा आहे. तीं दुःखें आपण जाणून घेतलीं पाहिजेत. 'ग्रंथ हे आपले गुरु होत' हें सद्वचन असलें तरी थोडें व्यवहारांत आणावें. हे छापील गुरु कसल्या गोठ्यांत खितपत पडतात, त्यांची काय दैना उडते हें पाहिलें पाहिजे. शाळामास्तराचीं लक्तरें नाही का आपण 'गुरुजीं'च्या पायघोळ कफनीने झाकूं पाहात? अशा अनेक सोयिस्कर कफन्या आपल्या बासनांत असतात. फार कशाला, पुस्तकाला तोंड भरून ग्रंथ म्हणायचा आणि मग त्याची वास्तपुस्त करायची नाही हें त्यांतलेंच. एकंदरीने संस्कृत शब्द सोंग सजवायला चांगले! असोत. आपण पुस्तकाला ठीक पुस्तकच म्हणूं या!

प्रथम पुस्तकांचीं शारीरिक दुःखें. खरें म्हणजे तीं उघड्या डोळ्यांना दिसावींत; पण नेहमीच दिसतात असें नाही. तीं तऱ्हेतऱ्हेचीं असतात. केवळ

मनुष्यप्राण्यानेच निर्माण केलेलीं नव्हेत, तर खालच्या (समजल्या जाणाऱ्या,) प्राण्यांनीहि. आणि सजीव सृष्टीप्रमाणे निर्जीव सृष्टीनेहि. एकूण सृष्टीचें पुस्तकांशीं जमत नाही म्हणायचें. पुस्तकें आपली निराळी (कलात्मक, आदर्शवादी वगैरे) सृष्टि निर्माण करतात या भाबड्या बकव्यामुळे ही तेढ निर्माण झाली असेल कदाचित्! नाही तरी निसर्ग दुबळ्याशीं जरा शिरजोर असतोच! माणसाला (किंवा 'मानवाला') उघडा निसर्ग मानवतो, तो त्याच्या भौतिक आणि आध्यात्मिक अशा उभय प्रकृतींना हितावह, हें बऱ्याचशा पुस्तकांचेंच ठाशीव तात्पर्य असतें—पण पुस्तकांना तो मानवत नाही. ऊन सोसत नाही; वाऱ्याने त्यांची पाठ धरते. धूळ हा निसर्गाचाच भाग; धरतीमातेचा घराघरांतून वावरणारा अंश. त्यानेहि पुस्तकें घुसमटतात. मग पाऊसपाण्याचें काय? त्याने पुस्तकाचा पाहतां पाहतां लोळागोळा होतो. पण तो सांगूनसवरून तसा झालेला पुरवला. या मुंबईत बाहेर पाऊस पडला (किंवा पडला नाही) तरी माणसाप्रमाणे पुस्तकांची चिकचिक होते. माणूस ती धुवूनपुसून काढतो. पुस्तकाची परवड मात्र तेथे थांबत नाही. त्याला बुरशी चढते; ती पुसण्याचा खटाटोप केला तर पुठ्ठयावर हिरवट-पांढुरके चट्टे उठतात. त्याची सगळीच कळा हरवते, आणि बापडें पुस्तक खंगत जातें. अशी या दमट हवेची कर्तबगारी; निसर्गदेवतेचीच म्हणा. तिला साथ उंदीर, झुरळें, वाळवी व अन्य कृमिकीटकांसारख्या आपल्या निसर्गबांधवांची. यांतील प्रत्येक बंधुभगिनीचें वळण आणि तंत्र निराळें असतें. उंदराचें कांहीसें पेंढारीपणाचें; गरज लागेल तेव्हा 'ब्लिट्झ' पद्धतीचा एकदम हल्ला—पण एकट्याने; टोळधाड नव्हे. जमेल तें कुरतडून, वसूल करून, मागल्या पायीं पसार. पुन्हा नामानिराळा. तसा एखादा भुरटा, उपरा, अकुलीन उंदीर सोडून द्या, पण प्रतिष्ठित उंदीर कधी पुस्तकांच्या आसपास वसतीला राहावयाचा नाही. कुळाबिळाचा अभिमान त्याच्या रोमारोमांत भिनलेला असतो; त्यालाहि परंपरा आहेच! तेंच आपल्या परीने इतर कुळांचेंहि; आचारधर्म निराळा असेल, पण त्यावरील निष्ठा तेवढीच जाज्वल्य. त्यांचा बारीक अभ्यास एखाद्या संस्कृतिशास्त्र्याने करावयास हवा. झुरळांसारख्या प्राणिशाखांत "हें विश्वचि माझें घर"ची व्यापक आणि उदात्त दृष्टि जन्मादारभ्य असावी. झुरळांना कुळाचार पाळायलाहि आडोसा चालतो; तेथे तीं पितृऋण फेडतात. पुस्तकांच्या

बांधणीच्या खाचींत, कपाटांच्या सांध्यांत जेथे कोन घडत असेल तेथे अंडीं घालून वंशसातत्य टिकविण्याची कोशीस करतात. त्यांतहि कांहीशी "मा फलेषु कदा च न"ची निर्मम, निष्काम वृत्ति असतेच. हें माझें, हें तुझें, अशी झुरळ-भगिनींत चुरस आणि हक्कदारी असेल असें नाही वाटत. पुस्तक नीट झटकलें तर अंड्यांची अख्खी रांग परलोकाची वाट धरते. त्याचा व्यर्थ शोक नाही. पुस्तक विद्वत्तापूर्ण, आणि सरसकट उच्च, (म्हणजे अगदीच 'ग्रंथ') असलें तर हें भ्रूणहत्येचें किंवा गर्भहत्येचें पातक टळण्याचा संभव अधिक; कारण त्याला सहसा कोणी हात लावत नाही. पुस्तकांमुळे विद्वान् निपजतात हा गौरव; पुस्तकांतून पुस्तकें निपजतात हा स्वतंत्र बुद्धीच्या दृष्टीने दोष. पण ही निपज लाक्षणिक अर्थाने. अक्षरशः पुस्तकांतून प्राणिमात्र निपजावेत हें जरा लाजिरवाणेंच. पुस्तकाचें प्रसूतिगृह होऊं नये.

पण उंदीर सोडल्यास, उपर्युक्त प्राणिविशेषांना पुस्तकाचें मरण अभिप्रेत असेल असें वाटत नाही. त्यांच्या खेळांत पुस्तकाचा जीव कासावीस होत असेल; पण तो कांहीसा अजाणतेपणे. उलट, जाणूनबूजून पुस्तकाला 'लागणारी' आणि लागल्यावर त्याचा निर्धाराने अंत पाहणारी, कसर ही पुस्तकाची परम-वैरिणी होय. ही खल-स्त्री पुस्तकाच्या आरपार आणि मागेपुढे जाऊन त्याची चाळण करते. पुन्हा विनयशील; सहसा दृष्टीस पडायची नाही. "कपड्यास, कागदास, भातास, पिठास, तांदुळास वगैरेस खाणाऱ्या कसरीच्या आळ्या भिन्न भिन्न जातींच्या असतात," असें कोणी एक जीवशास्त्रज्ञ सांगतात. या सर्व आळ्यांची आका म्हणजे साहित्यिक आळी असावी—कागदाला लागणारी. संस्कृतीला पोशाखी (अथवा कपड्यापुरती) असें अवहेलनेने म्हणतात; अन्नधान्य तर तिच्या दृष्टीने कःपदार्थ ! पण कागद हें तिचें वाहन. उद्या कागदाचे कारखाने थांबले तर संस्कृति लुळीपांगळी होईल अशी भीति. असा हा संस्कृतीचा आधारस्तंभ पोखरणारी, तिचीं सगळीं गुह्यें जाणणारी जी कसर तिची महती काय वर्णावी ? कसरींच्या मंडळांत तिचा टेंभा मोठाच असणार. पण कांही पुस्तकें अशीं असतात म्हणे की, त्यांना कसरसुद्धा लागत नाही. ही पुण्याई लेखकाची की कागदाची याबाबत संशोधन झालें पाहिजे.

रोग म्हटलें की औषधें आलींच. पुस्तकांसाठी चूर्णें-तेलें न निघतीं तरच आश्चर्य ! त्यांनी पुस्तकांचें खरोखरच रक्षण होतें तरीहि आश्चर्यच ! उगाच

पुस्तकें कसल्या पांढऱ्या भुकटीने माखून निघतात आणि डागळतात. रूप जातें आणि कसले भलते वास येतात. कोऱ्या पुस्तकाला जो छान गंध असतो तो केव्हाच उडून जातो. एरवी धडधाकट असलेलीं जुनीं पुस्तकें कित्येकदा उगाच केविलवाणीं दिसतात. तीं या उडालेल्या वासाच्या आठवणीने का ?

अर्थात् ही विरूप करणारी वैद्यकी माणसाचीच. रोग पुरवला पण वैद्य आवर असें पुस्तकें पुटपुटत असतील. खुद्द वैद्यच रोगापेक्षा जालीम धिंडवडे करतो. गबाळा, बेफिकीर, धसमुसळा वाचक पुस्तकाचे जे हाल करतो त्या मानाने कसर मऊ म्हटली पाहिजे. वास-डागाचेंच घ्या. वामकुक्षीसाठी पुस्तक वापरण्याची सवय लागलेली गृहिणी आपल्या डोक्याचा शिक्का आणि वास पुस्तकाला हटकून देते, आणि वाचतां वाचतां गृहकृत्यें उरकण्याइतकी तिची साहित्यभक्ति असली तर त्या वासा-डागांत विलक्षण वैचित्र्य येतें. यजमानीणबाईच्या वाचनांतील पुस्तक निरखून तिने वाढलेल्या पदार्थांची कृति अजमावणाऱ्या चतुर स्त्रिया असतात म्हणे. शक्य आहे. पुस्तकांची देवाणघेवाण हा प्रणय-व्यवहारांतील प्रारंभिक उपचार बहुधा गुणकारी ठरतो तो कां याची (निदान पुरुष-पार्ट्यांच्या बाजूने) आता संगति लावतां येईल. धुंदीसाठी त्याच्या कल्पनेला वास फुलवायला नकोत. अर्थात्, पुरुषांचा वास पुस्तकाला लागत नाही असें नव्हे; आणि तो कांही अगदीच जातिकुसुमांचा नसतो हेंहि खरें. तें भाग्य एखाद्या वसंतसेनेचेंच. पण पौरुषेय वासांची आणि डागांची धाव चहा-सिगरेट-तपकीर-पान असल्या व्यसनांबाबतच्या अजागळपणापुरतीच. आणि ते वास-डाग त्या त्या व्यसनाचे; स्त्री-धर्म लक्षांत घेतां त्यांनी प्रेमाऐवजी राग स्फुरण्याचाच संभव अधिक.

पुस्तकें धसमुसळेपणाने वापरण्याकडेहि स्त्रियांचाच अधिक कल असतो असा माझा अनुभव आहे. पुस्तकें दुमडून वाचणें, आपण कोठपर्यंत वाचलें आहे हें जरा वेळाने आठवण्याची खात्री नसल्यामुळे पुस्तक उघडून उपडें ठेवणें, अथवा पानाचा कोपरा दुमडणें, अथवा दुसऱ्या कोणीं घेऊं नये म्हणून गादी-खाली दडवणें असल्या अपौरुषेय क्लृप्त्यांनी कसल्याहि पुस्तकाचा चोळामोळा होतो. पुरुषांप्रमाणे पुस्तकांतहि जीं अगदीच स्त्रैण असतील तीं सोडल्यास इतरांना यांत केवढी मानखंडना वाटत असेल. अशीं, मुखपृष्ठें फाटलेलीं—खिळखिळीं झालेलीं बापुडवाणीं पुस्तकें घरोघर दिसतील...

तसाच बाल-हट्टाचा प्रताप. मग पुस्तकाचे नाकडोळे ओरबाडले जातात; अवयव अलग होतात, आणि या चिरफाडींतील चलाखपणाचें आई-बापें भरल्या गळ्याने कौतुक करीत असतात. चांगल्या प्रौढ पुस्तकाची बाहुली होणें (किंवा बालवाङ्मय होणें) लाजिरवाणें आहे—त्या पुस्तकाला! बाळ-लीलांच्या वरच्या इयत्ता आहेतच. आपण साक्षर झाल्याचा साक्षात्कार होतांच चिरंजीव, बालवॉशिंग्टनच्या कैफांत, पानापानांवर तें हत्यार चालवतात. पुढे कुमारपणाच्या पहिल्या कुतूहलांत इतिहासाच्या पुस्तकांतील नूरजहाँला मिशी कोरून जहांगीरची सूरत आणण्याची धिटाई येते किंवा सचित्र पौराणिक कथांतील अकारण बायकी दिसणारा राम सीतेहून भिन्न नाही हें सिद्ध करण्याचा मोह होतो. हीं चित्रकलेचीं पहिलीं पावलें असतील, पण त्यांचे डाग बिचाऱ्या पुस्तकांच्या उरावर कां?

याला निदान पोरपणाची चिट्ठकली सबब आहे; पण भल्या निबर माणसाने पुस्तकावर रंगीबेरंगी चिताडकाम करावें म्हणजे काय? आणि तेंहि आपल्या ज्ञानलालसेचें प्रदर्शन करण्यासाठी. ओळींओळींखाली बटबटीत रेघा मारणें, समासांत चमत्कारिक खुणा करणें आणि, कहर म्हणजे, शेरेबाजी करणें. असल्या विकृत विद्वत्तेने पुस्तकांच्या अंगावर काटा उभा राहात असेल. माझे एक अति चिकित्सक स्नेही आहेत. त्यांचा प्रत्येक पुस्तकांतील प्रत्येक विधानाशीं ठाम मतभेद असतो व ते कटाक्षाने तो बाजूला नमूद करून ठेवतात; परिणामीं छापील मजकुराइतकेंच त्या हस्तलिखित गिचमिडीचें ओझें पुस्तकाला वागवावें लागतें. त्याला दुसरें एखादें नितळ आणि निर्मळ पुस्तक पाहिल्यावर शरमल्यासारखें होत असेल; तोंड फिरवत असेल तें.

तसें म्हटलें तर, वाचकाच्या लेखनकर्मासाठी, पुस्तकाच्या आरंभीं, व क्वचित् शेवटींहि, एकदोन पृष्ठें कोरीं सोडण्याची दूरदृष्टि दाखवलेली असते. त्यांचा उपयोग पुस्तकावरील मालकी-हक्क पुकारण्याकडे सहसा केला जातो. हा पुकार तऱ्हेतऱ्हेचा असतो. संपूर्ण नांव—कधी नवेपणासाठी मध्यमपदलोपी रूपांत; पदव्यांचा, कधी कंसांकित तपशीलांसह, विस्तृत उल्लेख; संपूर्ण पत्ता, कधी घरच्याप्रमाणे बाहेरचाहि; पुस्तक केव्हा आणि कोठे विकत घेतलें याची नोंद; पुस्तक केव्हा आणि कुठे वाचलें याचाहि कष्टाळू लेख कोरणारे आत्मतुष्ट वाचक मला माहीत आहेत. आणि कधी नुसतीच सही, कमीजास्त फर्डी, कमीजास्त

दुर्वाच्य; विशींतली नखरेल, विशेषतः शाळकरी मुलीची (अथवा तत्सम प्रकृतीच्या मालकाची) अधिक नक्षीदार. यांतील कांही तपशील असा आहे की तो केव्हा कोरड्या व्यवहारबुद्धीने, केव्हा भपक्यासाठी तर कित्येकदा भावनेच्या तात्पुरत्या उद्रेकाने आलेला असतो. ती भावना बहुधा शाईमागोमाग वाळून गेली तरी तिचा रेंगाळणारा वास कांही काळ आठवणीला गुदगुल्या करीत राहातो. असल्या 'भावनिक' तपशिलाचा एक विशेष दिखाऊ प्रकार म्हणजे आद्याक्षरें अथवा लाडकीं सांकेतिक नांवें इत्यादि वापरून लिहिलेली भेटपत्रिका. एका कवितेच्या पुस्तकावर मीं पुढील मजकूर पाहिला, तो उदाहरणादाखल: "'ईला' 'बू'कडून. खोल दडलेल्या झिम्प्रीच्या दाढीसाठी. हिरवी संध्याकाळ ७.४१". म्हणजे उगाच वाचणाऱ्याची कल्पना आणि संशय चाळवायचे; आणि बरेचसे वाचक तेवढेंच वाचून पाहण्यासाठी पुस्तक घ्यायचे! यांत त्या पुस्तकाला बरें कसें वाटणार? बिचारें निमित्तमात्र होऊन बसतें.

अशीं आणखी पुस्तकांचीं किती शारीरिक दुःखें सांगूं? माळ्यावर अडगळींत टाकलेलीं, गंजलेल्या मोडक्या ट्रंकांतून कोंबलेलीं, केरासारखीं कपाटाखाली सारून ठेवलेलीं—असल्या पुस्तकांची काय अवस्था असेल? उद्या कसला साहित्यसोहळा उभा राहिला तर याच पुस्तकांविषयी आपण गहिवरून बोलूं. हें ढोंग त्यांना अधिक बोचत असेल. पुस्तकें रद्दीवाला खुषीने घेत नाही म्हणून; नाही तर त्यांची तशी वासलात केव्हाच लागली असती. अर्थात्, जुन्या पुस्तकांचा बाजार आहेच; पण तेथे स्वतःचीं पुस्तकें कोणी फारसा देत नाही. पुस्तकांच्या दुर्दैवाच्या दशावतारांपैकी एक म्हणजे फूटपाथवर उन्हातान्हांत 'बे बे आना'च्या समानतेंत भलभलत्यांशीं भागीदार होणें. तेथे गीतारहस्याशीं गुलबकावली सलगी करते आणि रागिणी सगनभाऊ आणि वात्स्यायन यांच्यामध्ये अंग चोरून बसते. हें दुःख म्हटलें तर शारीरिक म्हटलें तर आंतरिक; उन्हांत पानांचे पापड भाजले जात असतात, आणि कुसंगतीमुळे आंतून पोळत राहतें पुस्तक.

आपल्या अनेक शरीर-व्याधि आणि वैगुण्यें यांना जन्मदाते जबाबदार असतात, तसेच पुस्तकांचेहि. त्यांचे खरेखुरे जन्मदाते म्हणजे मुद्रक आणि प्रकाशक आणि त्यांचे साहाय्यक. त्यांच्या घिसाड-करणीने पुस्तकांचें काय होतें तें आपण वारंवार पाहतों. बटबटीत छपाई, बेडौल मांडणी, भडक मुखपृष्ठ,

विसविशीत बांधणी, असल्या उपाधि घेऊन जें पुस्तक जन्माला आलें त्याला सुख कसें लागणार? असले जन्मदाते म्हणजे वैरीच!

पण हीं सगळीं दुःखें भाग्याने टळलीं, सुदृढ अंगें लाभलीं आणि रेखीव रूप, मालक मोठा टापटिपीचा आणि संपन्न मिळाला, तरी पुस्तक सुखी होईलच असें नाही. भौतिक गरजा म्हणजेच सगळें नाही, आत्मिक शांतिसुद्धा हवी, असा गजर होत राहिला आहे तो काय उगाच? पुस्तकालाहि 'व्यक्तित्व' असतें, त्याची जोपासना झाली पाहिजे, तें फुललें-उंचावलें पाहिजे, त्याच्या आध्यात्मिक प्रेरणांना अनिर्बंध वाव हवा, इत्यादि.

या सगळ्या, कानांत भरणाऱ्या, शब्दांचा भावार्थ असा की, दुःखें केवळ देहाचीं नसतात; आंत मनालाहि कांही गोष्टी खुपतात. मन हा शब्द साधा, अगदीच गद्य, झाला...पण अर्थाला ताठ आहे तो; आणि कामाला बळकट. मग पुस्तकाच्या मनाचे वैरी कोण? त्याला आंतून छळणारे हे छुपे गनीम कोण?

त्यांतील अव्वल गनीम म्हणजे टीकाकार. तसें पाहिलें तर टीकाकार या शब्दाचा लौकिक फारसा चांगला नाही. छिद्रान्वेषी, अहंमन्य आणि प्रतिभाशून्य प्राणी अशी त्याची व्याख्या त्याच्या टीकाकारांनी सात्त्विक संतापाने वारंवार केलेली आहे. आणि टीका म्हणजे असलेंच कांही तरी हा साधारण वाचकाचाहि विश्वास. त्याला जें चांगलें वाटतें तें वाईट कसें हें पटवून देते ती टीका असा त्याचा अनुभव. टीकाकाराचें त्याचें मनोमय चित्र असें: मुरलेल्या अग्निमांद्यामुळे तोंडाची रुचि गेलेला, निस्तेज डोळ्यांचा (म्हणून जाड भिंगांचा) दुर्मुखलेला, थोडाफार विद्वान् दिसणारा (थोडाफार) माणूस. उणीं काढणें हा जणु त्याचा शरीरधर्मच. तो खळखळून हसणार नाही की आनंदाने नाचणार नाही. थोडक्यांत टीकाकार म्हणजे निंदक. असल्या माणसाकडून पुस्तकाला उपजल्यापासूनच भय असतें हें पुस्तकांचा ब्रह्मदेवच बोलून चुकला आहे. पण अगदी मनांतलें सांगायचें म्हणजे मी पुस्तक असतों तर थोडा धीर करून म्हटलें असतें, "हा निंदक पत्करला, मग तो कितीहि दुष्ट, अनुदार आणि बथ्थड असो. लोकांना त्याची रीतभात चांगली ठाऊक आहे. आणि दोष दाखविले म्हणून कांही भोकें पडत नाहीत. उलट, त्याने चार दोष दाखविले आणि त्यांतला एकच खरा असला तरी तें दुरुस्तीला बरें. पण सांगूनसवरून

स्तुति करायला बसलेला सज्जन टीकाकार नको." असल्या सज्जनांच्या जाती दोन. पहिली नेहमीची पण तुलनेने निरुपद्रवी. नियतकालिकाचीं पोटभरू पानें भरण्यासाठी पोचट, गुळगुळीत अभिप्राय लिहून हरएक पुस्तकाची एकसाची तारीफ करणारे. पुस्तक न वाचायला त्यांना घाईची लाचार सबब असते. दुसरी जात : सखोल विवरण आणि अचाट रसग्रहण करण्यासाठी हट्टाने मांडी मोडून बसलेला कलावंत-टीकाकार. हरएक पुस्तकाचें गुह्य आपण जाणतों अशा आविर्भावाने तो त्याची चिरफाड करतो. प्रतिभेचा झटका येऊन लेखक कांही लिहून जातो; आपल्या हातून काय घडलें हें त्यालाच उमगत नाही; टीकाकाराला मात्र तें स्वच्छ दिसतें. लेखकाच्या अंतर्मनाचा नकाशा तो सगळ्या आडवळणासह सराईतपणें काढतो. लेखकाला अंतर्दृष्टि असल्याचा आजवरचा गैरसमज आता दूर झाला. ती टीकाकाराची मिरास. हरपलेलें सगळें त्याला चटकन गवसतें, आणि बसल्या जागीं. त्या खुळ्या लेखकाला आपलें कांही हरपलें होतें हेंसुद्धा—टीकाकाराने तें लक्षांत आणून देईपर्यंत—कळलेलें नसतें. त्याने वापरलेल्या शब्दामागील विशाल अर्थ त्यालाच बजावून सांगितला जातो. काय कशाचें प्रतीक हें गणित त्यालाच समजून घ्यावें लागतें. ज्या शास्त्रांच्या अस्तित्वाचीहि त्याला पुरेशी बातमी नव्हती त्यांतील प्रमेयांच्या आधारें आपली लेखनप्रक्रिया घडल्याचें त्याला कळून चुकतें. आपण करायला गेलों काय आणि शेवटीं झालें काय असें त्याला होत असावें. बरें वाटतें—आपण एवढे मोठे आहोंत हें कळल्यावर थोडें गरगरायलाहि लागतें आणि वाईटहि वाटतें—यांत आपली आणि आपल्या लेखनाची कुतरओढ होत आहे असें वाटून. टीकाकाराला प्रतिभेचें अजीर्ण असलें—आणि ती चिघळली की तिचा लेखकाला उपद्रव. या दोन प्रतिभांच्या झगड्यांत टीकाकाराची सरस ठरते. कवितेपेक्षा तिचें रसग्रहण दसपट गूढ होतांच वाचक म्हणतो, "हा टीकाकारच खरोखर दसपट कवि." ज्या पुस्तकाचें हें असें होतें त्याला किती मानखंडना वाटत असेल ? 'मला वांचवा,' अशीच तें करुणा भाकील.

मग इतर टीकाकार आहेतच. जुन्या पद्धतीचे जडजंबाल घ्या. त्यांतील कांहींना तुलनात्मक लिहायचें व्यसन जडलेलें असतें; मूळ पुस्तक बाजूलाच राहतें. किंवा आपला तंत्राचीं मोजमापें पाठ करून तीं पुस्तकाला लावणारा टीका-कारागीर; किंवा तुच्छतेच्या एका फटकाऱ्यांत पुस्तकाचें कंबरडें मोडणारा उच्च टीकाकार

किंवा पुस्तकाऐवजी लेखकाच्या वर्मांवर अचूक बोट ठेवणारा मार्मिक किंवा पुस्तक न वाचतांच त्याविषयी चुरचुरीत लेख लिहिणारा चलाख लेखणीबहाद्दर —हे व आणखी किती तरी प्रकार आहेत टीकाकारांचे. कधी त्यांतील दोघां-तिघांची एखाद्या पुस्तकावरून जुंपते आणि त्यांच्या उमंट उखाळ्यापाखाळ्याना कोणी हुषार संपादक जागा पुरवतो. वाचक ती गरम चर्चा उत्सुकतेने, आदराने, वाचतात; ती कोणत्या पुस्तकावरून पेटली हें त्यांना आठवतेंच असें नाही. झुंजणाऱ्या कोंबड्यांवर सगळें लक्ष असतें; ते बहुतेक तुरेवाले असतात. मग बघे लोक मोजदाद करतात. कोणाचीं किती पिसें उपटलीं गेलीं याची. तीं ज्या दाण्यासाठी, तो कोठे हिरमुसला पडून असतो. अर्थात्, तोहि तसलाच क्षुद्र पोकळ दाणा असला तर तीं पिसें खोवून मिरवील. पण टणक आणि कसदार असला तर दुःखाने पिचेल...

चांगल्या पुस्तकाचे तऱ्हेतऱ्हेचे दुरुपयोग हरघडी होतात. कधी तें परीक्षेला लावलें जातें आणि त्याची धाऊक विटंबना होते. त्याच्यावर कांही धंदेवाईक मढ्यांकडून परीक्षार्थी 'गाईड्स्' तयार होतात; तीं अगोदर वाचून शहाजोग अध्यापक व्याख्यानें देतात; नंतर तींच पाठ करून घाईला आलेले विद्यार्थी उत्तरें लिहितात. पुस्तक कोणी वाचीत नाही; त्याची खूपशी स्तुति आणि त्यावर थोडीशी 'टीका' करतात. शॉने आपलीं नाटकें हीं 'विद्यार्थ्यांवर अत्याचार करण्यासाठी लिहिलेलीं नाहीत म्हणून तीं परीक्षेसाठी नेमूं नयेत' असा आग्रह धरला; त्याला आपल्या पुस्तकांचें मन कळलें! आड-गिऱ्हाइकी विद्वत्तेचे असे इतरहि कु-प्रकार असतात. कोणी त्यांतील उतारे पाठांतरासाठी काढतो; कोणी त्यावर चर्चा घडवितो; तींत पुस्तकांपेक्षा चर्चिकांचेंच माहात्म्य अधिक ठसतें. कोणी त्याचे अन्य तऱ्हेने पाट काढतो. एकूण चांगल्या पुस्तकाचें जिणें बरें नव्हे हेंच खरें.

चांगल्या पुस्तकाचें कौतुक चुकीच्या कारणासाठी होणें हीसुद्धा खंत वाटण्या-सारखीच गोष्ट नव्हे का? "विवाहप्रसंगीं भेट देण्यालायक" अशी आपली जाहिरात झाल्याचें समजलें, तर कोणतेंहि स्वाभिमानी पुस्तक शरमेने मान खाली घालील. भल्याभल्या पुस्तकांचें असें झालेलें आहे. तेंच पारदर्शक वेष्टना-आडून चिथावणाऱ्या मुखपृष्ठावरील बहुरंगी बाईच्या आमिषाने खप वाढल्याचें कळलें तर. पण बाजारांत बसलेल्या प्रकाशकाला आणि लेखकाला त्याचें काय

होय? पुस्तक ही विक्रीची वस्तु एवढेंच ते जाणतात, मग त्याच्या आंत उदात्त विचारांचा कितीहि खच पडलेला असो! कोण जाणे! फारच चिकित्सा केली तर कदाचित् असें दिसायचें की टीकाकाराच्या खालोखाल पुस्तकाचा वैरी म्हणजे त्याचा लेखक! तो हपापलेला असतो पैशाला, कीर्तीला; आणि त्या हपापाच्या आवेगांत पुस्तकें जन्माला घालतो. पानें भरण्यासाठी मजकूर फुगवतो. 'संग्रह' पुरा व्हावा म्हणून लेख पिळून काढतो. खूपखूप शब्द भरतो. असलीं पोटफुगीं पुस्तकें जन्मभर दुबळीं राहतात. लेखक मात्र माजतो. हा 'शब्दोदरा'चा विकार जुनाच आहे. पण नव्यांत तो नव्या ढंगाने आहे, इतकेंच.

पण जोपर्यंत प्रत्येक पुस्तकाला स्वतंत्र अस्तित्व आहे, व्यक्तित्व आहे...आणि तें त्याच्या पोटभरू, शब्दव्राज, सोंगाड्या लेखकापेक्षा अलग आहे हें आपण ओळखणार नाही तोंपर्यंत पुस्तकें अशींच झुरणार, सुकणार आणि तळमळणार ...आणि आपण असेच साहित्य आणि साहित्यिक यांविषयी पोकळ बडबड करणार...

पुस्तकाचा बचाव करायचा तो नुसता झुरळ-कसरींपासून नव्हे. तें दुखणें बरें करतां येईल; करतां आलें नाही तर सोसतां येईल. पण वरून आश्रयदात्याचा आणि कसला कसला आव आणणारे हे 'उच्च' वैरी नकोत. त्यांच्यापासून ताप होतो त्यावर उतारा नाही. तो असह्य असला तरी मुकेपणाने सोसायचा, आणि वर हसून प्रसंग साजरा करायचा. अशी पुस्तकांची कर्मकथा.

३

## प० पू० आबाजी : परिचय आणि पत्रें

प० पू० आबाजींच्या जीवनांत हरिद्वारच्या गंगामैय्याचें पावित्र्य, सांगलीच्या कृष्णाबाईची गंभीरता, आणि हट्टीमुळी (हॉस्पेटच्या ईशान्येस आठ कोस) येथील तुंगभद्राअम्माचा विस्तार यांचा उदात्तमधुर समन्वय आहे, असें गेल्या भाद्रपद शुद्ध पंचमीस, म्हणजे ऋषिपंचमीस, प० पू० आबाजींचा सत्तेचाळिसाव्या वाढदिवसानिमित्त सत्कार झाला, तेव्हा रिसबूड गुरुजी सद्‌गदित कंठाने म्हणाले. जणु मंचर तालुका गुरुजींच्या मुखाने बोलला. या तालुक्यांतील जनतेसाठी गेलीं अडीच तपें प० पू० आबाजींनी अपार कष्ट सोसले. दिवसरात्र, ऊनपाऊस पाहिला नाही; लहानथोरांत भेद केला नाही; सेवेसाठी गरिबांइतकेच श्रीमंत आपले मानले. अथांग प्रेम; पण कीर्तीची हाव नाही. मागे मंचर तालुका राजकीय परिषदेंत दे० भ० शेठ रूपमल लोलकचंद यांनी त्यांना 'मंचर-माउली' म्हटलें, तेव्हा ते (म्हणजे प० पू० आबाजी) ढळढळा रडले. म्हणाले, "नाही, नाही. शेठजी, मी क्षुद्र माणूस. आपले त्रैलोक्यकीर्ति दानशूर पिताजी वैकुंठवासी शेठ लोलकचंद गट्टुमल हीच आपली माउली होती. त्यांनी आमचा प्रतिपाळ केला. मी केवळ त्यांचा पाईक." केवढी लीनता! तशीच क्षमाशीलता. वरील भावसमृद्ध प्रसंगाची विटंबना करून 'राहुरी-समाचार' या प्रतिस्पर्धी पत्राने 'माय मरो पण मावशी जगो' या मथळ्याखालील कुत्सित अग्रलेखाच्या शेवटीं त्यांना 'मंचर-मावशी' अशी टारगट पदवी दिली. पण प० पू० आबाजींची

शांति लेशमात्र ढळली नाही. त्या पत्राच्या पुढील दिवाळी अंकासाठी आशीर्वादपर संदेशहि त्यांनी लिहून ठेवला होता. दुर्दैवाने तो प्रकाशित होऊं शकला नाही; कारण जिल्ह्यांतील—केवळ तालुक्यांतील नव्हे—प्रमुख कारखानदार आणि व्यापारी बंधूंनी आपल्या जाहिराती मागे घेतल्यामुळे तें पत्र बंद पडलें. या लोकक्षोभांत प० पू० आबाजींच्या तपस्येचें तेज दिसलें, हें कोण नाकबूल करील?

पण लोकभक्तीचेंहि सामर्थ्य अगाध आहे. निस्संग सत्पुरुषालाहि आपले सन्मान ती प्रेमाच्या सक्तीने धारण करायला लावते. प० पू० आबाजींच्या जीवनकथेंत या सत्याची प्रचीति येईल. पंचविशींतच ते 'दे० भ०' झाले. बेचाळीसच्या क्रांतिलढ्यानंतर त्यांना 'आचार्य ठोसर' म्हणूं लागले. सत्तेचाळिसांत त्यांच्यासारख्यांच्या पुण्याईने स्वातंत्र्य मिळाल्यावर नव्या ऋणाने आणि आपुलकीने समस्त जनतेचे ते 'पूज्य आबाजी' झाले. त्यांच्या सेवेचें मान चढतेंच होतें; म्हणून गतवर्षापासून अधिकच लवून 'परमपूज्य आबाजी' असा जनता त्यांचा गौरव करूं लागली. बेचाळीसनंतर 'आचार्यां'ची आणि स्वराज्याच्या गेल्या चार वर्षांत 'पूज्यां'ची संख्या फार वाढल्यामुळे विशेष श्रेष्ठतेच्या निर्देशासाठी अशी सन्मानाची चढती श्रेणी व्यवहारी जनमनाने उपयोगांत आणावी हें साहजिकच होतें.

प० पू० आबाजींचें संपूर्ण नांव त्र्यंबक रंगनाथ ठोसर. घराण्यांत उपाध्यायवृत्ति आणि सावकारी होती. वडीलमातोश्री सच्छील आणि पापभीरु होतीं. घरची शिस्त नमुनेदार, वळण बाळबोध. चि० त्र्यंबकचें शिक्षण इंग्रजी चार इयत्तांपलीकडे गेलें नाही. कारण त्याचा पिंडच रूढ पुस्तकी शिक्षणाला अनुकूल नव्हता; आणि परकी शिक्षणपद्धतीबद्दल रक्तांतच घृणा होती. पण हस्तव्यवसाय, धर्मग्रंथ, निसर्ग यांजकडे बुद्धि आणि सेवेचा छंद अंगांत मुरलेला. कोणा शिक्षकाने "आब्या (किंवा त्रिंब्या), तूं इतका मठ्ठ कसा रे?" असा भर वर्गांत अधिक्षेप केला तर त्याचा राग मानला नाही. त्या शिक्षकाच्या घरीं परड्यांतील भाजी पोचवली. पुढे स्कूल बोर्डाचे अध्यक्ष झाल्यावर, त्या शिक्षकाने येऊन पाय धरतांच त्याची आडगावची बदली मोठ्या मनाने रद्द केली. लहान वयांतहि सोबत्यांच्या वर्तणुकीवर, जणु पितृभावाने, लक्ष. कोणीं कांही अयोग्य केलें तर गुरुजींना, आणि त्याच्या वडील मंडळींना, त्याविषयी तत्परतेने सांगून अपराध्याला

सन्मार्गावर आणण्याची थोर प्रवृत्ति. त्याबद्दल अनेक वेळां गैरसमजाने आणि मूलपणाने सोबत्यांनी शासन केलें, तरी तें क्षमाशीलतेने फुलासारखें झेललें.

वयाबरोबर सेवावृत्तीहि वाढली. कुळपरंपरेने आलेलें, म्हणजे उपाध्याय आणि सावकार हें, क्षेत्र तिला अपुरें पडूं लागलें. त्याचा पुरा त्याग न करतांहि जीवनाच्या विशाल क्षेत्रांत पदार्पण केलें. प० पू० आबाजींच्या एकूण सार्वजनिक कार्याचा केवळ नामनिर्देश करावयाचा म्हटलें तरी लहानसा ग्रंथ होईल. लोकसंग्रहाचा धर्म आचरला आणि कोणाला नाही म्हटलें नाही. त्यांच्या सेवाधर्माची कक्षा किती विस्तृत होती याचें उदाहरण द्यावयाचें म्हणजे असें की, ज्या आस्थेने त्यांनी विश्वबंधुत्वाचा पुरस्कार करून खिस्तवासी वेंडेल विल्की यांच्याशीं पत्रव्यवहाराने आणि शेठ रामकृष्ण डालमिया यांच्याशीं समक्ष विचारविनिमय केला, त्याच आस्थेने देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण परिषदेचें अध्वर्युपद सांभाळून मोठ्या श्रमाने 'दे० ऋ० ब्रा० आर्थिक नियोजना'चा खर्डा तयार केला. कोणतेंहि कार्य क्षुद्र मानलें नाही. मंचरच्या पंचक्रोशींतील मधुकऱ्यांना शिस्त आणि लीनता शिकविण्यासाठी त्यांचें मंडळ स्थापलें. अस्पृश्यांना स्वच्छतेचे धडे देऊन महारवाड्यांत तुळसीवृंदावन बांधवलें. अधिक वेतन मिळण्यासाठी मजुरांनी स्वार्थी आणि द्वेषपूरित चळवळ सुरू केली, तेव्हा मध्ये पडून त्यांनी तिची अनैतिकता त्या अज्ञ बांधवांच्या मनावर ठसवून चळवळीला प्रेमाची कलाटणी दिली. केवळ पैशाने सुख कसें लागत नाही, त्यामुळे उच्च मूल्यांचा ऱ्हास कसा होतो, याचें प० पू० आबाजींनी तेव्हा आपल्या लेखन-भाषणांत केलेलें विवरण जगाच्या अभिजात विचार-साहित्यांत मोडावें असें आहे. "आत्मपरीक्षण करा. संकुचित स्वार्थ टाका. 'स्व'चा आत्मबलाने इतका विस्तार करा की, त्यांत पराचा अंतर्भाव झाला पाहिजे. हा सायुज्यभाव हें आपल्या संस्कृतीचें उपनिषत्कालापासूनचें लेणें आहे. तें मूढपणें विसरू नका. श्रम अधिक केलेत की, 'स्व'च्या फोल विचारास वाव मिळणार नाही. (इत्यादि)" याच्या अनुषंगाने काटकसरीची रहाणी, चैनींचा त्याग, सात्त्विक आहार, दानधर्मांतील पुण्य हीं तत्त्वें त्या श्रमजीवींच्या मनांवर प० पू० आबाजींनी इतकीं स्पष्टपणे बिंबवलीं की, त्यांनी दान-पट्टी आपखुषीने बसवून घेतली आणि तें द्रव्य व स्वतःचे शारीरिक श्रम यांच्या बळावर मंचर गावांत गीतामंदिर उभारलें.

प्राथमिक शिक्षकांच्या गैर तक्रारीहि त्यांनी अशाच दूर केल्या. त्यांच्या संमेलनाचें उद्‌घाटन करतांना स्वागताध्यक्षांना ‘आचार्य’ असें भावनिर्भर स्वरांत संबोधून आलिंगन दिलें, तेव्हा सभेचे डोळे डबडबले. प० पू० आबाजींनी सर्व वर्गांचें हित पाहिलें. गावोगावीं आठवड्याच्या बाजारांत घाऊक खरेदी करणाऱ्या व्यापारी बंधूंच्या गैरसोयी जातीने लक्ष घालून नष्ट केल्या. लढाईच्या सरत्या दिवसांत धान्यदाणा मिळेना, म्हणून दूरदृष्टीने धान्याचा संचय केलेल्या कांही व्यापारी बंधूंविरुद्ध कोणा घातक्यांच्या चिथावणीने आततायी मोर्चा निघाला, तेव्हा त्या निरपराध बंधूंना पाठीशीं घालून (पोलीस येईपर्यंत) त्यांचें संरक्षण केलें व नंतर मोर्चाच्या पुढाऱ्यांना तुरुंगांत भेटून त्यांची मनःशुद्धि केली आणि त्यांजकडून क्षमापत्रें लिहून घेतलीं. अशी त्यांची सेवा. तिला राजकीय पक्षाचें बंधन नव्हतें. फक्त आत्मिक बळ न मानणाऱ्या नतद्रष्ट पक्षांचें त्यांना वावडें होतें. इतर सर्व पक्ष त्यांनी आपले मानले. त्यांतील चांगले गुण ओळखून साधर्म्यावर भर दिला. “सेवा हेंच ब्रह्म, पक्षोपपक्ष केवळ माया” असें ते म्हणतात. कॉंग्रेसच्या जंगल सत्याग्रहाप्रमाणे सोन्यामारुती सत्याग्रहासाठीहि त्यांनी तुरुंगवास भोगला. बेचाळीसच्या चळवळींतील भूमिगत पुढाऱ्यांचा त्यांच्या इतमामाप्रमाणे महिनेच्या महिने पाहुणचार केला. आपल्या अनेक समाजवाद्यांनाहि ते आपलेसे वाटतात तें उगाच नव्हे. त्या वादांतील वर्गकलहाचें विषबीज फेकून देऊन त्याला आत्मबळाची जोड मिळवून गोडवा प्राप्त करून दिला. किंबहुना, त्यांनी (मंचर तालुक्यापुरतें तरी) अवघें राजकीय जीवन मधुर केलें. मौजे आटपाडी येथे “सर्वेऽपि सुखिनः सन्तु” या विषयावर प्रवचन करतांना साधनशुचितेवर त्यांनी जें स्फूर्तिदायक भाष्य केलें त्यांत आजच्या स्पर्धानिष्ठ जगाला योग्य दिग्दर्शन केलें आहे. “वादाने वाद काढावा, असें त्यांचें कांहीसें होमिओपॅथिक वैचारिक तंत्र आहे,” असें ‘साक्षात्कार’चे संपादक म्हणाले, तें खरें आहे. स्वतः प० पू० आबाजीच म्हणतात की, “संवाद, समन्वय व संगम ही आपली सूत्रत्रयी आहे. व्यक्तीप्रमाणे वादाच्याहि अस्मितेचा लोप होण्यांतच सार्थकता आहे. वाद आहेत म्हणून दुःखें आहेत. आर्ष जीवनांत वाद नव्हते, म्हणून तें इतकें उज्ज्वल व सुंदर होतें.” विचार वरून दिसायला जितका सोपा तितकाच खोल आणि समृद्ध आहे.

अशा वैचारिक नेतृत्वामुळे मंचर तालुक्याचें जीवन उजळून निघालें आहे. तेथे शांतीचे मळे फुलले आहेत. आनंदभुवन अवतरलें आहे. आजच्या कृत्रिम राहणींतील फुगून दिसणाऱ्या गरजांची तेथे तमा नाही. अर्थशास्त्र्यांच्या अचेतन गणितानुसार तेथील राहणीचें मान कमी असलें तरी मानवतेच्या चिरंतन आदर्शानुसार तेथे जीवनाचें मान उंचावलें आहे. अन्नाचा तुटवडा पडला, किंमती आवाक्याबाहेर गेल्या, तरी तेथील जनता तोंडावर निष्पाप हास्य ठेवून आणि पोट अधिक घट्ट बांधून राबत आहे. गरिबांना श्रीमंतांचा हेवा वाटत नाही; श्रीमंतांना गरिबांविषयी आदर वाटतो. "अमंगळाचें जाहलें मंगळ" आणि अनर्थशास्त्राचीं सगळीं किल्मिषें जळून गेलीं. "या भागांत साबणाचा खप कमी झाला; त्या मानाने आत्मिक शुद्धि वाढली" असें आचार्य पित्रे (कांहीसें विनोदाने) म्हणाले तें सत्य आहे.

प० पू० आबाजींच्या खाजगी जीवनाविषयी चार शब्द. त्यांची राहणी अति साधी असते हें मुद्दाम लिहिणें नकोच. वडिलोपार्जित वित्तांत स्वकष्टाने भर घातलेली आहे; पण खरी वृत्ति अपरिग्रहाची. सुखांवर वासना नाही; मिळाल्यास त्यांचा अलिप्तबुद्धीने स्वीकार करतात. धर्मविषयक मतें उदार; पण परंपरेवर निष्ठा म्हणून (व वृद्ध मावससासूबाईस दुखवूं नये म्हणून) सर्व नेमधर्म पाळतात. खाण्यांत मांसमच्छर अर्थात् नाहीच; पण कांदालसूणहि वर्ज्य. टोमॅटो, बीट इत्यादि खाद्यांचा लाल रंग हिंसासूचक आणि तीं खाद्येंहि परकीं, म्हणून त्यांचा अंगिकार केला नाही. इतकेंच काय, पण लाल वांगींहि निषिद्ध मानलीं. कोपरगावच्या मळ्यांत उसाला कसलें किड्यांचें (हिंसक) खत वापरतात असें कळलें, तेव्हा प० पू० आबाजींनी तेथील गुळाच्या ढेपी नाकारल्या. अशी परम ध्येयनिष्ठा. "भोजन, रंग, आणि भावना" हा त्यांचा 'पुरुषार्था'तील एतद्विषयक लेख फार गाजला होता; इतकी त्यांतील विचारसरणी 'मूलगामी' होती. दुग्ध हा प० पू० आबाजींचा मुख्य आहार. त्यांतच तूप, लोणी, ताक आलें. असें सारें सात्त्विक आणि निर्मळ. जोंधळ्याची भाकरी हें गरिबांचें खाद्य, या भावनेने पंचपक्वान्नाचें भोजन सिद्ध असलें, तरी पानांत चतकोर भाकर हवी असा त्यांचा आग्रह असतो. धातूचीं ताटें कधी वापरलीं नाहीत. पानें अथवा पत्रावळी यांवरच जेवण्याचा निर्धार. त्यांनी भारताच्या सगळ्या यात्रा केल्या. लोकजीवन जवळून पाहिलें. परदेशयात्राहि घडली. फार

काळ प्रकृति अस्वस्थ असतांहि कर्तव्याची हाक ऐकली आणि ग्रामसेवासंघाच्या वतीने स्वित्झर्लेंडमध्ये तीन महिने राहून दूधदुभत्याचा अभ्यास केला. त्यांतच आल्प्स पर्वताचें तौलनिक सौंदर्यनिरीक्षणहि केलें. अविरत उद्योग. असा जीवनयोग. त्याबद्दल कोणाला प्रेमादर वाटणार नाही ?

प० पू० आबाजींच्या जीवनाविषयी लिहावें तितकें थोडेंच. येथे त्यांचें साहित्यिक अंग प्रस्तुत आहे. वस्तुतः पांडित्य, साहित्यनिर्मिति असल्या सांस्कृतिक अहंकारांपासूनहि ते अलिप्त आहेत. "मी लिहितों" असें ते कधी मानीत नाहीत. "आधी जीवन, मग ग्रंथ" ही त्यांची भूमिका एकदा त्यांनी सुंदर रूपकांत मांडली. "जीवनाच्या प्रवाहाला वेग आणि वळण मिळालें की, त्यांवर येणारा फेस हेंच साहित्य." त्यांनी लिहिलें पुष्कळ; पण तें निर्ममवृत्तीने. "मी बोलत नाही, विचार बोलत आहे. मी केवळ त्याची वेणु." असें ते एकदा म्हणून गेले. काय ही साधुता ! तुरुंगांत त्यांना लिहिण्यावाचण्याच्या सवलती नेहमी मिळत. त्यांचा त्यांनी सदुपयोग केला. मुख्यतः लिहिण्या-साठीच. कारण 'वाचनासाठी वाचन' हें बुद्धीला बधिरता आणतें असें त्यांना वाटतें. (आपल्या पुस्तकी पंडितांकडे पाहिल्यावर तें कोणालाहि पटेल.) त्यांच्या लेखनापैकी केवळ अल्पभाग प्रसिद्ध झाला आहे. त्यांतहि 'कुराण आणि उपनिषदें', 'भारत हाच विश्वाचा त्राता', 'विश्व-धर्म' हे ग्रंथ व बौद्धाचें 'धम्मपद', खिस्त्यांचा 'नवा करार' (न्यू टेस्टॅमेंट), स्माइल्सचें 'आत्मसाहाय्य' *(Self-help)*, कॉर्नेगीचें 'स्नेहतंत्र' *(How to Win Friends)*, कँटचें बुद्धिवादचिकित्सा' *(A Critique of Pure Reason)* इत्यादि भाषांतरें महशूर आहेत. पण प० पू० आबाजींच्या जीवनाचा परमोच्च आविष्कार त्यांच्या पत्रांत आढळतो, असें आमचें मत आहे. त्यांचीं पत्रें शेकड्यांनी, नव्हे हजारांनी, उपलब्ध आहेत. आप्त, स्नेही, सहकारी, इतकेंच काय पण अपरिचितांनाहि त्यांनी मुक्त हस्ताने पत्रें लिहिलीं. "आपल्या अंतरंगाचें क्षणदर्शन दिलें. आपल्या गाभ्याचा सुगंध भोगूं दिला." (साहित्यश्रेष्ठ चिं० का० पन्हाळकर.) "दिसामाजीं एक तरी पत्र लिहावें," असा त्यांचा बाणा. हीं पत्रें ख्यालीखुशालीचीं किंवा मनोविनोदनार्थ लिहिलेलीं नव्हेत. प्रखर कर्तव्यबुद्धीने तीं लिहविलीं. तोहि वाग्यज्ञाचा एक भाग, जीवनधर्माचा एक महदाचार, अशी त्यांची भावना. त्यांतहि मुलांमुलींना लिहिलेलीं पत्रें हीं अति सुंदर. वाचकाइतकाच लेखकहि

निष्पाप. परिणतप्रज्ञेने पण बालभावाने जीवनाचे पापुद्रे त्यांत हाताळले आहेत. "गहन तत्त्वें ते लीलेने उकलतात आणि साध्याहि विषयांतील विकट गुंता नजरेस आणतात." (आचार्य धडफळे, बी० ए० (ऑ०), एस्० टी० सी०, राष्ट्रभाषाकोविद, साहित्यविशारद). "जोवर (मराठी) मुलें आहेत तोवर हें पत्रसाहित्य अमर आहे" हें सौ० मधुवंती भुस्कुटे यांचें म्हणणें खरें आहेच. पण मोठ्यांनाहि त्यांत अनेक सौंदर्यें आढळतील. ख्यातनाम पत्रकार विनयकुमार बोंद्रे यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "प० पू० आबाजींच्या स्नेहतरल पत्राविष्कारांत बौद्धिक प्रागल्भ्यालाहि भावनात्मक आवाहन आहे." असो.

यांतील बहुतेक पत्रें प० पू० आबाजींनी आपल्या आठ मुलांना लिहिलेलीं आहेत. त्यांचीं धाकटीं तीन मुलें (वय ४॥, २॥ व १। वर्षें) अर्थातच त्यांत नाहीत; पण त्यांचेहि वत्सल उल्लेख ठायीं ठायीं येतात. मुलाला वाचतां येऊं लागलें की, प० पू० आबाजी त्याला पत्रें लिहूं लागत. प्रवासांत किंवा परगावीं असले तर लिहीतच; पण, नेम पाळण्यासाठी, घरांतल्या घरांतहि लिहीत. मुलांना वार वाटून दिले आहेत. पत्राचें वाचन (आणि मनन) केल्याशिवाय अन्नाला स्पर्श न करण्याची प्रेमळ शिस्त मुलांना लागली आहे. कधी परगावहून पत्र यायचें असलें तर ज्याचा वार तें मूल टपालवाल्याकडे (प्रेमाने) व्याकुळ होऊन डोळे लावून बसतें. तो नच आला तर उपास घडतो. अशी त्या कुटुंबांत आपुलकी आहे. प० पू० आबाजींचे तीन चिरंजीव, येथील शिक्षणावर न विसंबतां, अमेरिकेला जाऊन आले. एक कन्या आणि एक चिरंजीव सध्या तेथे आहेत. अमेरिकेंतहि प्रत्येक जण हा पत्राचा वार पाळतो. असें पितृप्रेम! तसेंच हीं पत्रें जपून ठेवून त्यांचें व एकमेकांच्या पत्रांचें वारंवार पारायण करण्याची शिस्तहि त्यांना लागली आहे. म्हणून अशीं कित्येक हजार पत्रें उपलब्ध आहेत. प० पू० आबाजींनी "तीं पत्रें आता माझीं नव्हेत, तीं मुलांचीं— बृहन्महाराष्ट्रांतील मुलांचीं!" असें म्हणून त्याबद्दल उत्साह दाखवला नाही. पण त्यांच्या चहात्यांनी त्यांचे दोन संग्रह प्रसिद्ध केलेच आहेत. आणखीहि सात-आठ प्रसिद्ध होऊं घातले आहेत. त्यांच्या अप्रकाशित पत्रांपैकी कांही पुढे देत आहोंत. त्यावरून प० पू० आबाजींच्या जीवनदृष्टीची कल्पना येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
क्रमांक ७८९६९ वि. [illegible] निबंध
दि. ९.८.६७ नों. दि. ८।३।६७

पत्र : १

कुडची-हुकेरी प्रवास
२०-९-१९४५ (वामनजयंति)

चि० बापू[1] यास शुभाशीर्वाद.

काल रात्रीं कृष्णाकाठीं पावणेतीन तास वैश्विक मूल्यांवर बोललों. श्रोते मोजकेच, पण मोठे प्रेमळ. आनंदांत डुंबत होते, डोळे मिटून डोलत होते. कृष्णामाईहि रंगांत आली होती, भरांत होती. जलमय अंग घुसळून हर्षाने साथ करीत होती. चांदण्याच्या मासोळ्या लहरींवर नाचत होत्या. तिच्याशीं एकरूप झालेली कोयना तिच्या कुशींत आहे, असें मधूनच वाटे. 'सखे ग सुरेख संगम किती.' दोघी जणी महाबळेश्वरच्या उत्तुंग आठवणी कुजबुजत आहेत असा भास होई. सावित्रीचें कुशल एकमेकीला विचारीत होत्या. ती गरीब बहीण. दरिद्री कोकणांत पडली. तिच्या आठवाने डोळ्यांत पाणी आलें. नद्यांचें हें असें असतें. माणसाच्या जातींत ही माया नाही. संसाराच्या तापाने आटून जाते; पण सुखाच्या वर्षावाने पुन्हा भरत नाही. बहीण बहिणीचा दुस्वास करते.

मला तें पाहून फ्रांकफुर्ट येथील ऱ्हाईन नदीची राहून राहून सय येत होती.

या गाडींत विलक्षण गर्दी आहे. खा० ब० होरमसजी ताडीवाला यांनी प्रेमाग्रहाने पहिल्या वर्गाचें तिकीट काढून दिलें आहे. सोबतीला या खणांत एक मारवाडी सज्जन आणि त्याचें कुटुंब आणि एका संस्थानचे दिवाणसाहेब आहेत. मोठी आतिथ्यशील मंडळी. घरच्यासारखें माझें करताहेत. मेवामिठाई आणि फळफळावळ यांचा सारखा आग्रह. मोह टाळला पाहिजे; रसना निरंकुश होतां कामा नये. इंद्रियें ताब्यांत असलीं तरच 'तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता' असें गीतेंत म्हटलें आहे. आणि कालचें अजीर्णहि होतें. म्हणून फक्त फळें भक्षण केलीं. त्यांना अमृतमधुर कां म्हणतात तें कळलें. चि० गंपू[2],

१. चि० बापू (प्रफुल्लचंद्र) हे प. पू. आबाजींचे तिसरे चिरंजीव. हे अमेरिकेहून फळ दुकान-मांडणीची परीक्षा देऊन आले आहेत. सध्या इमारतींचे कंत्राटदार.

२. चि० गंपू (गौतम) हे पांचवे चिरंजीव. हे हल्ली अमेरिकेंतील मिनेसोटा विद्यापीठांत पाली शिकत आहेत.

गार्गी[1] व बंडू[2] यांजसाठी थोडी मिठाई बांधून घेतली. बालकेंच तीं !

वाटेंतल्या स्टेशनांवर सडलेलीं फळें, तेलकट भडक चिवडाभजीं, त्यावर घोंघावणाऱ्या माश्या, हें पाहून वाईट वाटलें. आपले तिसऱ्या वर्गातील बांधव अधाशीपणाने हें खाणार. खाद्याखाद्यविवेक नाही. त्या डब्यांतून गोंगाट चालू आहे. मारामाऱ्या होत आहेत. शांति नाही. पायऱ्यांवर, दोन डब्यांमध्ये आणि डब्यांवरसुद्धा माणसें चढून बसलीं आहेत. जणु रामरायाची वानरसेना. दिवाणसाहेब म्हणालेच की, कशाला हवा या लोकांना प्रवास ? घरीं बसून उद्योग करण्याकडे कल नाहीच. मुलेंबाळें चेंगरताहेत; पण आईबापें त्यांस घरीं सोडून येणार नाहीत. खरें आहे तें. शिस्त नाही. इंग्रजी राज्य येण्यापूर्वी जाणीव होती, ती आता उरली नाही. तेव्हा अशी अकारण गर्दी करून माणसें उगाच इकडेतिकडे फिरत राहिलीं नाहीत. जीवनाला स्थैर्य होतें. मागच्याच स्टेशन-वर एका बेशुद्ध वृद्धेला तिसऱ्या वर्गातून बाहेर काढली. कोणी म्हणतात, मेली. तसें असेल तर सुटली बिचारी. अनेक तापदायक द्वंद्वांतून वाचली.

त्याच स्टेशनवर भिकाऱ्यांचा केवढा थवा होता. सगळ्यांच्या लाचार मुद्रा. कोणी कांही बरेंवाईट टाकत होता, त्यावर श्वानांप्रमाणें तुटून पडत. काय ही माणसाची अवस्था ! मारवाडी मातोश्रींना तें पाहवेना. हळवें स्त्रीमन. त्यांनी घुंगट आणखी खाली ओढलें.

याला कारण काय ? गरीब आणि श्रीमंत ह्या खोट्या भेदावर आपल्या सगळ्या आधुनिक विचारांचा भर आहे. अर्थशास्त्र घ्या, राजकारण घ्या. आजचा गरीब उद्या श्रीमंत होईल; कालचा श्रीमंत आज गरीब झाला आहे. म्हणून माणूस बदलला का ? आपण माणुसकी विसरून फक्त गरिबीश्रीमंती उगाळीत बसतों. सगळी भुकेची प्रतिष्ठा. मनुष्य म्हणजे देवाचा अंश. काय त्याला उच्च क्षुधा नाहीच ? मी म्हटलें, भूक आहे म्हणून भीक आहे. शेटजींना पटलें. भूक ताब्यांत ठेवणारी आंतरिक शक्ति आपण गमावून बसलों आहोंत. म्हणून या

१. कु० गार्गी ही तिसरी कन्या. येथील ना. दा० ठा० (म्हणजे कर्वे) विद्यापीठाची मॅट्रिक नापास झाल्यावर नॉर्वे देशांत बुरसलेल्या भाकऱ्या खाण्यास योग्य कशा कराव्यात या शास्त्राच्या अभ्यासासाठी गेल्या आहेत.

२. चि० बंडू (कालिदास) हे सहावे चिरंजीव. वडूजच्या कृषिशाळेंत शिकत आहेत.

वखवखलेल्या नजरा आणि दुसऱ्याच्या वित्तावर डोळे. दैवी संपत्तीबाबत आपण आंधळे झालों आहोंत. उपनिषदांतील प्रवहण जैवलि ब्रह्माच्या शोधार्थ लीनतेने हिंडला. आपण नोकरीसाठी, पैशासाठी, चणेफुटाण्यांसाठी वणवण हिंडतों. ज्यांच्यापाशी आहे त्यांचा हेवादावा करतों. 'आहे' आणि 'नाही' हीं सापेक्ष क्रियापदें आहेत. अशाश्वतहि आहेत. पण आज त्यांचेंच माहात्म्य. जीवन खरोखर आकाशाएवढें. पण आम्ही त्याचा संकोच भाकरींत केला. त्याचें वाटोळें केलें.

प्राचीन भारतांत आजचें 'अर्थशास्त्र' नव्हतें. तेव्हा अर्थ हें धर्माचें अंग होतें. म्हणून अनर्थ नव्हते. माणूस आपापल्या जागीं सुखी होता. चारुदत्त गरिबांत गरीब, पण श्रीमंतांत श्रीमंत होता. त्याच्यांत आत्मिक चारुता होती. वसंतसेना म्हणजे प्रेमाचें प्रतीक. ती गणिका; पण तिचें अंकगणित केवढें विशाल. शूद्रकाने ते आदर्श दिले; प्रतीकें दिलीं. श्रीमंतीचींहि दुःखें असतात आणि गरिबीने गुणांना उजळा मिळतो हें सांगितलें.

आज एवढेंच पुरे. मातोश्रींनी दुधाची लोटी भरून ठेवली आहे. तीहि अग्निसाधनाच. 'उपस्थाय मातरमन्नमैट्ट' असें वेदांतच आहे. गीतापाठाचीहि वेळ झाली.

तुझ्या भावंडांस प्रेमळ आशीर्वाद व मातेस सादर नमस्कार. वंदे मातरम्.

तुझा प्रेमळ पिता,
बाबा

**पत्र : २**

मंचर
३-८-४९ (अंगारकचतुर्थी)

चि० बाबी[1] हीस अनंत आशीर्वाद.

माझ्या मागील पत्रांतील मानव आणि निसर्ग यांच्या गूढ संबंधाविषयींचे

१. चि० बाबी (ब्रह्मपुत्रा) ही चौथी कन्या व आठवें अपत्य. सध्या मराठी पांचवींत विद्याव्यासंग चालू. मूलेद्योगाची मोठी आवड.

विचार तूं चर्वण केले असशीलच. आपण अन्नचर्वणदेखील नीट करत नाही: मग विचारच्चर्वणाचें काय?

काल संध्याकाळीं महादेव टेकडीवर फिरावयास गेलों होतों, तेव्हा तुला घेऊन गेलों नाही; पण तुला आज लिहावयाच्या या पत्राचा विचार अखंड चालू होता. त्यांत तुझ्या बोलण्याचा व्यत्यय आला नसता का? माझ्याबरोबर त्यागमूर्ति मफतलालजी जव्हेरी होते. पण ते अति मितभाषी, अंतर्मुख वृत्तीचे. बोलतील तें अर्थाने ओथंबलेलें. काल इंद्रधनुष्य दिसलें तेव्हा त्यांनी भावनिर्भर-पणे केवळ 'अहाहा' म्हटलें. त्यांत तुमच्या हल्लीच्या कवितांचें सौंदर्यसार आलें. त्यांचे शब्दच सारमय. ते पृथ्वीच्या पाठीवर जन्मभर हिंडले. जवाहिराचा व्यापार केला. पण विकलेल्या जवाहिराच्या शतपट मोलाचें विचारधन त्यांनी देशोदेशीं गोळा केलें. काल सहज एक फारसी तत्त्वमौक्तिक त्यांच्या वाणींतून गळलें. खटाई बुझुर्गो गिरफ्ताँ खता स्त. तुझ्यासाठी उतरून घेतलें. शब्दार्थ असा : वडील माणसांच्या चुका दाखविणें हेंच चूक आहे. बाभुळगावच्या डोहाइतका खोल अर्थ आहे त्यांत.

तूं म्हणशील की 'मा गृधः कस्यचिद्धनम्' असें ईशावास्योपनिषदांत आहे. पण तें जड धनाविषयी, विचारधनाविषयी नव्हे. हें धन दिल्याने वाढतें; आणि राखल्याने कुजत नाही. 'राखावीं बहुतांचीं अंतरें' असें आपले श्रीसमर्थ रामदासस्वामी वदले ते या गूढ अर्थानेच.

टेकडीवर गेलों तेव्हा तेथील गार वाऱ्याने चित्ताला आनंद झाला आणि विचाराला नवें चैतन्य मिळालें. म्हणून पर्वतांचें माहात्म्य. तेथे दगडालाहि काव्य फुटतें. गिरा आणि गिरि. सती गिरिजा आणि तिचे नाथ गिरीश. तूं व्युत्पत्तिशास्त्राचा अभ्यास कर. तुला त्यांत अनेक कोडयांचें उत्तर मिळेल.

तूं कधी डोंगरी वाऱ्याचें संगीत ऐकलें आहेस का? त्यांत हिंदी संगीताची 'मेलडी' आहे आणि पाश्चात्य संगीताची 'हार्मनी' पण आहे. गुरुदेवांना या उभय संगीतप्रणालींचा समन्वय करण्याची स्फूर्ति अशीच दार्जिलिंगच्या पठारावर फिरतांना झाली असेल.

हा वारा सदैव वाहत असतो; इंद्रायणीचा प्रवाह अखंड चालू आहे. सागराचेंहि तेंच; त्याच्या लाटांना विश्रांति नाही. अविरत आणि निःस्वार्थ सेवा हें निसर्गाचें व्रत. त्याला सुटी नको, पगारवाढ नको. तो संपाची भाषा

बोलत नाही, संताची भाषा बोलतो. सगळें मधुर. ज्याच्यासाठी निसर्ग अंग मोडून इतकें करतो तो मानव मात्र कृतघ्न आहे. तो निसर्गाकडे पाठ फिरवतो आणि द्वेषसूक्तें बडबडतो.

तूं आणि तुझ्यासारखी बालगोपाल मंडळी निसर्गासारखें सगळ्यांची सेवा आणि सगळ्यांवर प्रेम करायला शिकाल ना? तरच जगाचें मंगल होईल. आपलें घर हेंच अणुरूपाने जग आहे. तेथे प्रेम करावें, सेवा करावी. मागच्या बुधवारीं अक्काने[1] तिच्या चपला पुसण्यास तुला सांगितलें, तेव्हा तूं ती सेवा न करतां तिला 'अक्किटले' म्हणालीस, त्याने मला सहस्र इंगळ्या डसल्या. शिस्त म्हणून त्या रात्रीं उपाशी झोपावें लागलें. पण इतरांना दुःख दिलेंस त्या मानाने ती शिक्षा कांहीच नाही. हें पत्र वाचतांच तुला पश्चात्ताप झाल्याचें येऊन सांग. माझ्या वेदना कमी होतील. मी माडीवर आहें.

जय हिंद.

तुझा मायाळू पिता,
आबा

**पत्र : ३**

पुणें,
२७-३-१९५१, एकनाथषष्ठी

चि० बंडूस नमस्ते.

आज एकनाथांची पुण्यतिथि. अंत्यजसहभोजनाचा नेम पाळला. सकाळींच आम्ही कांही जण महारवाड्यांत गेलों. अंत्यजबंधूंनी सारवून जागा निर्मळ केली होती. उदबत्त्या लावल्या होत्या. भोजन प्रतीकात्मक असल्यामुळे साधें होतें. दूधपोहे व केळीं. अंतरात्मा तृप्त झाला. मग तासभर एकनाथांवर बोललों. तो 'ज्ञान्याचा एका'. त्याचें संकीर्तन करतांना वाणीला गोडी चढावी

१. चि० अक्का (तापी) ही ज्येष्ठ कन्या. आता सौ० शीलवतीदेवी. डोणगावकर इनामदार घराण्यांत सुखाने संसार करीत आहे.

यांत काय नवल! आतुले कृपेचेनि बळें। बोलें मृदुमंजुळ कोवळें। श्रवणासि दोंदों एक वेळे। तेणें वचनमेळें निवालीं॥ श्रोते हरखून गेले. सेवितां सद्गुरु-चरण। कोंदाटे ब्रह्म परिपूर्ण॥ या नाथोक्तीचें निरूपण केलें. कांही पत्रकार बंधूहि होते. त्यांनी प्रेमाने सगळें उतरून घेतलें. ज्ञानदेव-एकनाथांच्या काळीं लघुलिपि असती, तर जगाचा आणखी केवढा उद्धार झाला असता, असा विचार मनांत आला. असो. उद्याचीं येथील दैनिकें नीट पाहा व नेहमीप्रमाणे कात्रणें करून ठेव. अंत्यज बंधुभगिनींना खाद्यपेयविवेक सांगितला आणि कपडे शुभ्र ठेवण्याची कळकळीची विनंति केली. हें उपड्या घड्यावर पाणी होतें असा निराशाजनक अनुभव आहे. पण कर्तव्य केलें पाहिजे. अध्यक्षस्थानीं येथील थोर समाजसेविका श्रीमती यमुताई बारपुते होत्या. त्यांनाहि पटलें.

अस्पृश्यतानिवारण आता झाल्यासारखेंच आहे. साडेतीनशे वर्षांपूर्वी एकनाथांनी आरंभिलेलें कार्य सफळ झालें असें म्हणतां येईल. पण कांही लोकांना उगाच बाऊ करण्याची खोड असते. देशविघातक आहे ती. चि० गंपूच्या एका पत्रांत अमेरिकेंत निग्रो लोकांना बंधुभावाने आणि समानतेने वागविलें जात असतांहि त्याबाबत खुसपटें काढून त्या महान् देशाची कांही दुर्जन कशी बदनामी करतात, याविषयी गाढ विवरण आहे तें तुला आठवत असेलच. अस्पृश्यतेचेंहि कांहीसें तसेंच आहे. वस्तुतः हिंदुधर्माएवढा उदार धर्म नाही. त्याने तथाकथित अस्पृश्यांना सेवेचा मक्ता देऊन जणु त्यांचा गौरव केला. पण आपण तिकडे मलिन बुद्धीने पाहिलें. स पश्यति दुर्मति.

सहभोजनानंतर नदीवर गेलों. नाथषष्ठीला दोनदा स्नान करण्याचा माझा नेम तुम्हांला ठाऊक आहेच. अधिकस्याधिकं फलम्. सरत्या फाल्गुनांतील नदीस्नानाची मौज काय वर्णावी? थंडीची धार गेलेली असते; पण तिचे चिमटे लागतातच. उष्णतेचा पहिला स्पर्शहि होत असतो. दोहोंचा आस्वाद घेत जणू 'समदुःखसुखं धीरं' वृत्तीने पाण्यांत राहावयाचें.

पण स्नान करतांना एक दृश्य टोचत होतें. पुणेकरांनी आपल्या या गंगेला सिमेंटचे बांध घालून कोरड्या दिवसांसाठी तिच्या प्रवाहाची सोय केली आहे. अमंगल शब्द लिहवत नाही; पण लिहितों—गटारासारखी नदी दिसते त्याने. काय हा अहंकार! जी गंगा आत्मसुखाने धुंद झाली की, प्रचंड वृक्ष आणि दगडी वाडे उपटून नेते तिचें आम्ही नियंत्रण करणार! जिकडे तिकडे नियंत्रण!

कोणी मानवी जीवनाचें नियंत्रण करूं पाहत आहेत. खाण्यापिण्याचें, वेष-भूषेचें, घरादाराचें, बाजारहाटाचें नियंत्रण कराल. पण आत्मारामाचें नियंत्रण कसें करणार? अर्थात् आत्मा न मानणाऱ्यांना हें पटणार नाही.

अशीं आपण नदीला वळणें देत आहोंत. मध्येच गंगामाई हळूच लहरींत हसल्याचा भास झाला. सह्यसुता ती. उद्या विकट हास्य करूं लागली की, तुमच्या पेठा आणि पूल धुवून नेईल. मग कोठे कोठे बांध घालणार? चीनच्या पिवळ्या नदीचें चरित असेंच स्व-तंत्र आहे. सिंधूचें तसेंच. कोणी म्हणेल, मी नर्मदामातेला कान्हदेशांतून फिरवून आणीन. पण ती आली पाहिजे ना? तुमच्या भक्तीसाठी येईल; 'योजने'साठी येणार नाही. गंगाजी स्वर्गातून भगीरथजींसाठी उतरलीच ना? उपनिषदांत कवष ऐलूषाची कथा आहे. तो नीच जातीचा. सरस्वती नदी त्याला पावन करण्यासाठी, दिशा बदलून त्याच्यापाशीं आली. तो इंजनेर नव्हता, भक्त होता.

या गंगेच्या तीरावर उद्यानांचीहि योजना आहे असें ऐकतों. हाहि अहंकारच. नदीतीरांचें सौंदर्य आपण मानव वर्धमान करणार! ज्या नद्यांनी आजवर जीवन दिलें, त्यांना शृंगारणार!

पुणें शहरांत हाच खटाटोप चालू आहे. रुंद, डांबरी, सरळ सडकांसाठी जुन्या वास्तूंचा नाश होत आहे. घर म्हणजे दगडविटांच्या भिंती याच्यापार विचार जात नाही. त्यांना चुना सांधत नाही, भावना सांधते, हें विसरले. आता घरें एकमेकांपासून दुरावत आहेत. पूर्वी आळींतील कुटुंबांत सौहार्द होतें. एकाच्या दुःखाने दुसऱ्याच्या डोळ्यांना पाणी यावयाचें. सहभाव होता. आता मध्ये डांबरी अंतर आलें. धूळ गेली म्हणून कोणी आनंद मानतात. हा धुळीचा देश; तिच्या कणाकणावर आपण वाढलों. पण आता आरोग्याच्या पाश्चात्य कल्पना आल्या. चिलटें आणि ढेकूण गेले याची प्रौढी ऐकली. कां? त्यांना जगण्याचा अधिकार नाही? पुणे शहर तुमच्याआमच्याइतकेंच त्यांचेंहि. पण नवी संस्कृति स्वार्थी आणि संहारक आहे. आता सुखाने निद्रा लागते म्हणे. जणु निद्रा हें जीवनाचें महामूल्य! रस्त्यांवर विजेचा लखलखाट आला असेल; पण अंतरांतील घोर अंधाराचें काय? तो कोणती म्युनिसिपालिटी उजळणार? रस्ते रुंद झाले म्हणून मनें रुंद होत नाहीत. असा हा मूल्यांबाबत संभ्रम आहे.

याचा तूं विचार कर. गीतेने सांगितल्याप्रमाणे एकाकी यतचित्तात्मा निराशीर-परिग्रहः होऊन विचार कर. म्हणजे सत्य सत्वर गवसतें.

तुझ्या दहाहि बंधुभगिनींस न विसरतां माझे प्रेमवत्सल आशीर्वाद आणि तुमच्या मातेस आदरपूर्वक प्रणाम कळव.

जय हिंद.

तुझे पिताजी,
आबा

४

# साहित्याचीं धुळाक्षरें

अक्षराशिवाय शब्द आणि शब्दाशिवाय साहित्य कोठचें ? साहित्य म्हणजे शब्द आणि अर्थ यांची (पार्वतीपरमेश्वरा-प्रमाणे अभेद्य) युति. या व्युत्पत्तीबावत आपल्या विद्वानांतहि (अजून) मतभेद झालेला नाही. पण निराकार अर्थाला मोजमाप नसल्यामुळे तो नसून असल्या-सारखा वाटतो; त्याचें श्रेय धरून चालावयाचें. उरला शब्द—म्हणजे अक्षरें. आपले गुजराती (राज-)बांधव साहित्यिकाला 'साक्षर' म्हणतात; अशी अर्थाविषयी निर्विकारता दाखविण्यांत त्यांची व्यवहारदृष्टि दिसून येते. आपला मराठी व्यवहार अर्थातच उफराटा (आणि उरफाटाहि !). अर्थाची तात्त्विक चिकित्साच फार. आम्ही गोतांतल्या साहित्यिकाच्या कसल्याहि लिखाणाला 'अक्षर वाङ्मय' म्हणून गौरवतों तें अशा अभिप्रायाने की त्यांतील अर्थाला जगाच्या अंतापर्यंत धोका नाही; आणि गोताबाहेरच्या लेखनकर्मांची चिरफाड करून त्यांत अर्थ हातीं लागत नाही, सबब तें पोकळ आहे, अशा सराइत वैतागाने मार्मिक टीकाकार लिहीत असतो. वाणी म्हणजे अर्थाचा बडेजाव ! असो. पण शेवटीं अर्थाचें दृश्य रूप म्हणजे अक्षरच. अक्षरांच्या विशिष्ट जुळणीला विशिष्ट अर्थाचा संकेत मग प्राप्त होतो. तो कसा प्राप्त होतो याचा आपल्या प्राचीन (म्हणजे पंचवीस वर्षांपूर्वीच्या नव्हे, हजारबाराशें वर्षांपूर्वीच्या) साहित्यशास्त्रज्ञांनी खूप कीस पाडला आहे. वैय्याकरणांनी शब्दांत अर्थाचा 'स्फोट' कसा होतो, व्यंजनें आणि स्वर यांच्या जुळणींतून तो कसा अंग धरतो,

याचा आपल्या परीने खुलासा केला आहे. पण या विद्वान् खटपटींशी व्यवहारी माणसाला कर्तव्य नाही. 'ता'वरून ताकभाताच्या कल्पनेने त्याच्या तोंडाला पाणी सुटतें (अथवा, रुचिभिन्नत्वेंकरून त्याचें तोंड वाकडें होतें) साहित्य हा शेवटीं व्यवहारच आहे. तेव्हा आद्याक्षरांतच अर्थ पकडून ठेवणें सोयीचें. नाही तरी कित्येक साहित्यिक आडनांवांपेक्षा आद्याक्षरांनीच मनांत ठसतात!

असो. झाली एवढी प्रस्तावना पुरेशी वजनदार झाली. आता साहित्यिक धुळाक्षरांचा नवीन तक्ता. हीं धुळाक्षरें जो मनोभावें आणि अक्कलहुशारीने गिरवील त्याला साहित्याचीं गुह्यें विनासायास स्पष्ट होतील:

**अ–अद्वितीय** : म्हणजे प्रत्येक लेखक (त्याच्या साहित्यिक मित्रांच्या सार्वजनिक मताप्रमाणे.)

**आ–आशय** : लेखनांत जो आहे असें कल्पून ज्याच्याविषयी हवें तें लिहिलें तरी तें सखोल वाटतें. म्हणून टीकाकाराच्या सोयीचा शब्द. पण थोडा शिळा झालेला. ताज्या सोयीचा आणि विरुद्ध अर्थाचा असें मानावयाचा शब्द म्हणजे—आकृति.

**इ–इलियट्** : ज्याच्या उल्लेखाविना काव्यावर लेख लिहिल्यास तो मागासलेला समजला जाण्याची भीति असते.

**ई–ईषत्** : विशेषणाला हा टेकू दिल्यास विद्वत्तेचा हमखास गवगवा होतो. जसें—ईषत्करुण. ईषत्‌विद्वानांना विशेष सोयीचा; उपयोग करून पाहावा.

**उ–उत्कट** : काव्याच्या रसग्रहणांत सहज वापरण्याचें बिनधोक विशेषण.

**ऊ–ऊर्जस्वल** : पादपूरणार्थ विशेषण, जसें 'ऊर्जस्वल प्रतिभा' म्हणजे कांही नाही; आपली नुसतीच प्रतिभा.

**ओ–ओवी** : जी पूर्वी संतकवींनी लिहिली व जी आता व्यवहारचतुर साहित्यिकाने आपली जाहिरात करूं शकणाऱ्या धेंडाची गावयाची असते.

**औ–औदार्य** : ज्यांत लभ्यांश आहे अशा (उदाहरणार्थ चित्रपटनिर्मात्याच्या) स्तुतींतील ओसंडून जाणारा (शाब्दिक) गुण.

**अं–अंकलिपी** : सर्वांत निरुपद्रवी पुस्तक. पण पुढील सर्व उपद्रवांचें मूळ.

**अः–अः अः** : (म्हणजेच अहाहा) आपल्या पठडींतील साहित्यिक लिखाण वाचून दाखवीत असतां मधून मधून (जांभई झाकण्यासाठी) काढण्याचा प्रेमळ उद्‌गार.

**क–कला** : साहित्य-टीका-क्षेत्रांतील सर्वांत मोघम शब्द. अति कामसू. त्यावरून अनेक शब्द व जोड शब्द साधतां येतात. जसें : कलात्मक म्हणजे 'साधारण बरें'पासून 'अचाट गुणाचें'पर्यंत कुछ भी. टीका 'कलात्मक दृष्टिकोनां'तून करावयाची असते. या सैल शब्दाचे सगळे धागेदोरे दाखवायचे म्हटले तर सगळा तक्ता त्यांनीच चिताडावा लागेल. म्हणून एवढेंच.

**ख–खिसा** : संपादक-प्रकाशकांचा; ज्यावर आपलें साहित्य घेतल्याने तुष्टिपुष्टि लाभते.

**ग–ग** : चार ठिकाणीं नांव छापून आल्यावर, व्याख्यानें व दिवाळी अंक यांचीं आमंत्रणें येऊं लागल्यावर, साहित्यिकाला याची बाधा होते व आपण असाधारण आहोंत अशी त्याची प्रामाणिक समजूत होऊं लागते.

**घ–घोळ** : साहित्यिक शैलीची एक भारदस्त लकब. टीचभर मुद्दा तर पानभर शब्दांचा भुसा; तो पाखडायची यातायात नको म्हणून लेखक मोठा विद्वान् हें वाचक कबूल करून टाकतो.

**ङ**–अनुनासिकाची गोड उकल. (गेल्या पिढीला विशेष प्रिय). जसें : रंग—भिंतीला फासायचा; रङ्ग—नायिकेचा.

**च–चौर्य** : ताजीं इंग्रजी मासिकें आणि पुस्तकें (उसनीं) घेऊन मायबोलीच्या आणि आपल्या भरभराटीसाठी करावयाचें कर्म. तसेंच दुसऱ्यांनी केल्यास तें हुंगून काढण्याची शिताफी; त्यांतून साप्ताहिकांत झणझणीत पत्रापत्री होऊं शकते.

**छ–छापखाना** : अमरपट्ट्यांचा कारखाना. छापून येतांच अमर होऊं, या श्रद्धेने साहित्यिक लिहितो. (साहित्यिकांसाठी छापखाना की छापखान्यासाठी साहित्यिक असा कांही नियतकालिकें पाहून प्रश्न पडतो.)

**ज–जनता** : जी अमर असल्यामुळे जिच्यावर कसलेहि शाब्दिक अत्याचार केले तरी त्याचा जाब विचारला जात नाही.

**झ–झब्बू** : समिती-सभा-संमेलनांत डोळ्यांत भरण्यासारखी जागा उबवून, वृत्तपत्रांतून आपला सचित्र उल्लेख आणवून, कोठल्याहि साहित्यिक प्रश्नावर (चालू) मत ठासून मांडणारा व्यवहारी सत्पुरुष.

**ञ–ङ प्रमाणे** : जसे मंचर=एक गाव; मञ्चर=रोमँटिक् (रविकिरणी काळांतला) किंवा—'जीव रंजीस आला'; पण 'रञ्जना सुंदर आहे.'

**ट–टीकाकार :** सर्वज्ञ. "मी डोळ्यांत तेल घालून बंदोबस्त ठेवीत असतों म्हणून साहित्यांत थोडी तरी शिस्त राहिली आहे," असा याचा गैरसमज. पण एकंदरीने पूर्वीचें (म्हणजे, सोयीप्रमाणें, कालचें किंवा येरवाचें) साहित्य उदात्त (वगैरे) आणि आजचें कुचकामी असा 'तौलनिक' उद्वेग त्याच्या लेखणींतून सदैव झिरपत असतो. (खरें म्हणजे, त्याला 'तौलनिक' लिहिण्याची सवयच जडलेली असते. "अ मध्ये ब चे ब[१] व ब[२] हे गुण असले तरी क चे क[५] व क[६] हे दोषहि त्याच्यांत प्रतीत होतात.") थोडासा अंतर्ज्ञानी; लेखकाचीं गुह्यें ("भावजीवनांतील सूक्ष्म अंतर्विरोध") सहज जातां जातां उघडीं करतो. किंचित्सा द्रष्टा; उद्याचें साहित्य कसें असेल याचा आराखडा बाळगून असतो.

**ठ–ठराव :** साहित्यसंमेलनें भरविण्याची सबब, आणि त्यांतील सर्वांत कमी महत्त्वाचा व सर्वांत अधिक औपचारिक भाग.

**ड–डामडौल :** यांत बहुतेक साहित्य आलें!

**ढ–ढोंग :** ज्याच्या विनाशासाठी (भगवंतासारखा) साहित्याचा अवतार असतो, पण जेंच त्याच्यामुळे फोफावतें, असली विपरीत वस्तु.

**ण–बहाद्दर अक्षर :** इतके शब्दघिसाडी नावीन्याच्या सोसाने शब्द पाडीत असतात, पण या अक्षराने आरंभ होणारा शब्द अजून कोणाला पाडतां आलेला नाही. (कोणा कुत्सित 'वायुपुत्रा'ने वीस वर्षांपूर्वी 'नाना'चा 'णाणा' केला होता; पण तो बोबडा विनोद म्हणून त्याज्य. बाल-भाषा आणि बोली-भाषा शिष्ट साहित्यांत नामंजूर.)

**त–तंत्र :** ललित साहित्याचें सर्वस्व. तें प्रा० ना० सी० फडक्यांनी फार सोपें करून दाखविलें. हरएक साहित्यप्रकारची 'क्रिया' (अशुभ अर्थाने नव्हे) तपशीलवार सांगितली. त्यामुळे पोरीबाळींसुद्धा साहित्य सराईतपणे पकवूं लागल्या. त्याचें झटपट मोजमाप करण्यास टीकाकारांनाहि ती सोयीची फूटपट्टी झाली. ["कु० अमला चिरगुटे यांची ही ग्रामीण प्रेमकथा वाचवत नसली तरी तंत्रदृष्ट्या नितांत सुंदर झाली आहे; तिची निरगांठ उठाव देणारी आहे."]

**थ–थापा :** साहित्यिक वैऱ्यांना चिकटविण्याचें पाप. एकटी-दुकटी थाप सोडली तर तिला धोका फार. कोणीतरी घाला घालून ती फेडणार! पण जमावाने निघाल्या तर सत्काराचा संभव अधिक. अशा थापांच्या भाऊगर्दीला

'आत्मचरित्र' म्हणतात. ठेवलेले मैत्र हमरस्त्यावर स्तुतीचे बुभुःकार एकसुरांत करतात. (खाजगींत कांही कां बोलेनात!!)

द–दौत : साहित्याची गंगोत्री. (पण शाई आणि पेन्सिलीचें शिसें यावर बंदी घातल्याने साहित्य-निर्मिति आटेल ही आशा व्यर्थ. शाहीर वेळवखत पडला तर रक्ताने लिहितो म्हणतात. दहाबारा वर्षांपूर्वी कांही गद्यलेखकहि तसें करत अशी आवई होती.)

ध–धाडस : वाचन—कधीकाळीं कांही चांगलें आढळेल या विश्वासावर घोर निर्धाराने करण्याची क्रिया.

न–'नव' : आज खास चलती असलेलें विशेषण; समासांतील पूर्वपद, जसें नवकथा, नवकाव्य, इत्यादि. 'समजत नाही तें नव' असें भाबडेपणाने मानून साजरें करणाऱ्या वाचकाला 'नववाचक' व तशा संपादकाला 'नवसंपादक' म्हणावें अशी थिल्लर सूचना कानीं आली आहे. त्या त्या विभागांत प्रथम 'नव' कोणाच्या हातून घडलें यावर आणखी अनेक वर्षे मतभेद आणि पोटदुखी राहणार; तोपर्यंत तें 'नव' शिळवटूनहि जाईल.

प–पश्चिम : साहित्याचा सूर्य प्रथम तेथे उगवतो; त्या दिशेला अर्घ्य देण्याची परंपरा आहे. पाश्चात्य (की पाश्चिमात्य?) साहित्याचें सोयर न पाळतां साहित्य निर्माण करावें असा निर्बंध घातल्यास हाहाःकार उडेल.

फ–फुकटेगिरी : साहित्यिक जमातींत पदोपदीं आढळणारें कसब. चहापाणी, भोजन-पान, विडीकाडी, जमल्यास आरामाचा प्रवास, हे चोचले रसिकपणें, पण परस्पर, पार पाडण्याची हुशारी. कलेच्या धुंदींत रुपयेआणेपैचा हिशेब नाही—यजमानाच्या. स्वतःचा संपादकप्रकाशकाशीं व्यवहार मात्र दक्षतेने ठेवायचा.

ब–बुद्धि : जी गद्याला आवश्यक पण काव्याला अनावश्यक असते, या समजुतीच्या आधारेंच बहुतेक काव्याचा बचाव करतां येईल. गद्यासाठी दुसरा बचाव शोधावा लागेल.

भ–भावना : (वरील पाहा). हिचें बुद्धीशीं वैर, आणि ही काव्याचें भांडवल, हा वरील समजुतीचा उत्तरार्ध. या शब्दाला ठाम अर्थ नसल्यामुळे त्याच्याइतकी कुतरओढ दुसऱ्या कोणत्याच शब्दाची झाली नसेल. "भावना म्हणजे कसेसेंच वाटणें" ही एका विद्यार्थिनीने परीक्षेंत केलेली फोड विचार करण्यासारखी

आहे. बरेंचसें गद्य वाचून तसें वाटतें, यावरून गद्याला 'काव्यमय' हें विशेषण वारंवार कां लावतात तें उमगतें.

**म–मूल्य** : नव्या टीकेंतील मोक्याचा शब्द. 'टीका म्हणजे मूल्यविचार' याबाबत वाद घालूं नये.

**य–युगप्रवर्तक** : म्हणजे नवीन चूष आणणारा. प्रत्येक वाङ्मयशाखेंत दर पांचसात वर्षांनी एखादा युगप्रवर्तक लेखक उद्भवल्याची हाकाटी उठते. भगत आणि चलाख स्नेही उठवतात. साहित्यिक युग म्हणजे काळालाहि संकोचल्यासारखें होत असावें.

**र–रद्दी** : साहित्याची परिणति आणि सदुपयोग. येथे साहित्यांतील वाद थंड होऊन प्रतिपक्षी एकाच गठ्ठयांत गुण्यागोविंदाने राहतात. त्या अंतिम शांतीवर ध्यान ठेवून साहित्य वाचावें आणि लिहावें. पण रद्दीचा लगदा, पुन्हा त्याचा कागद आणि पुन्हा कागद आहे म्हणून लेखन–असें हें घातचक्रहि आहे!

**ल–लालित्य** : साहित्याचें परमोच्च साध्य, तंत्र हें त्याचें साधन, अशी श्रद्धा फडक्यांनी फैलावली. सगळें कसें टापटिपीचें, गोंडस, गुलगुलीत आणि गुळगुळीत हवें! अजूनहि ती श्रद्धा बलवान् आहे. फडक्यांवर टीका करणारे कित्येक लेखक स्वतः चोरून लालित्य पैदा करतात!

**व–वैयक्तिक** : आपल्या अंगावर बेतणारी टीका झटकून टाकण्यासाठी वापरण्याचें शहाजोग विशेषण. सामनेवाल्या साहित्यिक मठांतील व्यक्तीवरील टीकेला 'मार्मिक' म्हणण्यास हरकत नाही.

**श–शब्द** : साहित्याचा कच्चा माल. ज्यांच्यापाशीं अधिक शब्द—नव्या बनावटीचे, लंबेचवडे, कानांना थक्क करणारे शब्द—तो अधिक मोठा साहित्यिक या सोप्या अंकगणिताच्या बळावर अनेक 'शैलीकार' गाजले.

**ष–षोडषी** : आपलें बरेंचसें 'ललित' साहित्य तिच्यावर लिहिलें जातें—आणि तिच्यासाठी!

**स–समस्या** : नवनाट्य (जें सगळ्या नव-प्रकारांत वयाने ज्येष्ठ) हिच्याशिवाय तयार करतां येत नाही असें (पंधरा वर्षांपूर्वीचे) टीकाकार सांगत. नाट्य नसलें तरी चालेल, पण समस्या हवी, असा पुरोगामी फतवा होता.

**ह–हशा** : वक्त्याच्या आणि नाटकाच्या जाहिरातीसाठी याची संख्या वापरायची असते. लौकरच भाषणाच्या वृत्तांताप्रमाणें नाटकाच्या पुस्तकांतहि

ठिकठिकाणीं कंसांत हशा घालून वाचक-श्रोत्यांची विनोदबुद्धि तयार ठेवली जाईल असा रंग आहे. नाटकांच्या नव्या आवृत्त्या काढतांना याचा विचार व्हावा. नाटककार स्वतःच हें कंसकर्म बहुतेक करतील. अर्थात् त्यांना वेळ नसल्यास गोतांतील सांगकामे तें हिरिरीने पार पाडतीलच.

ळ–खास मराठी वर्ण पण (की म्हणून ?) शब्दारंभीं बसण्याचा मान नाही.

**क्ष–क्षुधा** : शरिराच्या दोन क्षुधांविषयी कोण्या एके काळीं फार नवलाईने लिहिलें गेलें; पहिली अन्नक्षुधा आणि दुसरी कामक्षुधा. वाचकाची दुसरी क्षुधा चेतवून आपली पहिली क्षुधा थंड करणाऱ्या लेखकांची गर्दी माजली; ती विशेष हटलेली नाही.

**ज्ञ–ज्ञानेश्वर** : ज्याचें वेळींअवेळीं नांव घेऊन त्या खऱ्याखोट्या गहिवराने साहित्यांतील (व इतरहि) अनेक पापें पुसून टाकण्याचे आजवर प्रयत्न झाले आणि पुढे होतील, ती मराठीची माऊली.

५

## बंडू ब्रेबर्न स्टेडिअमला जातो !

बंडू, बंडू, ब्रेबर्न स्टेडिअम् म्हणतात तो हाच ! असा भांबावून जाऊं नकोस. हाच तो. तुला ओळखतां आला नसेल, कारण तूं याचीं नेहमी छायाचित्रें पाहातोस तीं मराठी दैनिकांतील. या अचाट विस्ताराने तुझे डोळे दिपले असतील हें मी जाणतों. येथे माणसांच्या गंजीवर गंजी रचल्यासारख्या तुला दिसत असल्या तरी तीं माणसें एकमेकांवर बसलेलीं नाहीत, आणि तुला कोणी सांगितलें तशीं तीं दीडदोन लाखहि नाहीत. आज टेस्ट मॅचचा रविवार—तेव्हा सर्वांत अधिक म्हणजे चाळीसएक हजार असतील. आता तुझीं बुबुळें स्थिरावलीं असलीं, आणि कानांचे दट्टे उठले असतील तर सावधान चित्ताने ऐक आणि पाहा—नाही, खेळाकडे पाहण्याची गरज नाही. अगा, तेथे काय जाहलें, तें साग्रसंगीत उद्यांच्या वर्तमानपत्रांत वाचूं. नाही तरी या चाळीस हजारांपैकी वीस हजारांचें तरी लक्ष या वेळीं दुसरीकडेच आहे. आणि खेळाकडे पाहणाऱ्यांपैकी निम्म्यांहून अधिकांना काय चाललें आहे तें नीटसें समजत नाही. नाही, माझ्या राजा, मी अतिशयोक्ति करीत नाही. आणि आपण निश्चिंतपणे बोलूं या. जरा भोवती पाहा. जो तो बोलतच आहे—कोणी सिनेमाविषयी, कोणी राजकारणाविषयी, कोणी पोरींविषयीं, कोणी खाण्यापिण्याविषयी, कोणी कपड्यांविषयी, कोणी जुन्या सामन्यांविषयी. चालू खेळाविषयी सहसा बोलावयाचें नसतें. आपण त्याच्याविषयीच बोललों, किंवा कांहीच बोललों नाही, तर उगाच शेजारपाजारचे लोक आपल्याकडे पाहूं लागतील.—तेव्हा तूं ऐकच...

बंड्ू, सिंहस्थपर्वणीसारखी या क्षेत्रीं ही असली झुंबड उडाली आहे, आणि येथेहि जातवारी आहे बरें. अगदी कडक चातुर्वर्ण्य. ती समोरची तिमजली इमारत डोळे भरून पाहा. तिला सी० सी० आय्० म्हणतात—हो, म्हणजेच क्रिकेट क्लब ऑफ इंडिया, हें मलाहि माहीत आहे, दोस्त; पण तसें पुरें नांव उच्चारलेंस तर तुला बावळट म्हणतील. तेथे आद्याक्षरांची सफाई आणि सलगी हवी. होशील, एकदोन दिवसांत तूंहि तयार होशील. इथल्या निम्म्या दुर्बिणी तुला सी० सी० आय्० वर रोखलेल्या दिसतील. कां म्हणून नाही विचारलेंस? ती मुंबईकर धनवंतांची पेठ. तेथे प्रवेश मिळावयाला स्वतः सभासद असलें पाहिजे, किंवा सभासदाचा पाहुणा म्हणून दिवसाला वीस-पंचवीस रुपये मोजले पाहिजेत. खूप लोक आहेत तसे. पैसे कांही अगदीच वाया जात नाहीत त्यांचे. तेथे ओळखीपाळखी होतात, बरेवाईट सौदे जमतात आणि हजारों लोक आपल्याकडे दुर्बिणींतून पाहतात. ती नव्यानव्या फॅशन्सचीहि पेठ आहे; त्याहि येथून दुर्बिणींतून टिपावयाच्या असतात. आपल्या ओळखीचा कोणी तरी तेथे आहे हेंहि प्रौढीने सांगावयाचें असतें. असा हा येथील वरिष्ठ वर्ग. आपण त्यांच्यांतील कधी होऊं—निदान एखाद्या दिवसापुरतें तरी—याची येथे फार जणांना हाव लागलेली असते. असो. त्याच्या डाव्या हातची दुमजली बंगली आहे ना, तो गव्हर्नर्स पॅव्हिलिअन. वरच्या गच्चींत तेथे कधी कधी गव्हर्नरसाहेब आणि त्यांचे मंत्री थोडा वेळ येऊन बसतात—मग मात्र सी० सी० आय्०मधील शक्य तेवढ्या दुर्बिणी तिकडे लागतात. उजव्या हाताला ती तशीच बंगली आहे, तो पतियाळा पॅव्हिलिअन. तो भुताटकीच्या घरासारखा सदैव सुना असतो.

आता तसाच पुढे पाहा. चार धर्मांच्या जिमखान्यांसाठी राखून ठेवलेले ते भाग. जुन्या चौरंगी सामन्यांचें हें स्मारकच जणु येथे जतन केलें आहे. त्यांतला बॉंबे जिमखाना म्हणजे खरा गोऱ्या साहेबांकरिता. धर्मांबरोबर वर्णांचेंहि माहात्म्य. पण आता साहेबांची टंचाई सुरू झाल्यापासून मोजक्या काळ्या आदमींना तेथे प्रवेश मिळूं लागला आहे. या सगळ्या जिमखान्यांत प्रवेश महागरा, त्यांतल्या त्यांत साहेबांच्या सर्वांत अधिक—पण सी० सी० आय्०च्या मानाने थोडा आवाक्यांतील. म्हणून येथील अनेकांची माफक महत्त्वाकांक्षा या

जिमखान्यांत बसण्याची असते. सी० सी० आय्०चा अव्वल स्वर्ग नाही, तर हा जिमखान्यांचा दुय्यम स्वर्ग !

ब्राह्मण आणि क्षत्रिय झाले. आता आपण वैश्य. आपले हे अॅसोसिएशन स्टँड्स्. निरनिराळे क्लब्ज आणि शाळा-कॉलेजें यांच्यासाठी त्यांचे काप पाडून दिलेले आहेत. पण ते अलग दिसणें शक्य नाही. मात्र त्यांतहि दोन पोटजाती तुला दिसल्याच असतील, गादीवाले आणि बिनगादीवाले. म्हणजे विजारीला गादीचा मळ लागावयाचा की फळकुटयांचा—त्याप्रमाणे रुपयाभर कमी-जास्ती. तेवढें सोडल्यास हे सगळे ब्लॉक्स समान. अर्थात् जाणत्यांच्या हिशेबीं त्यांतहि बारीक फरक असतात. उदाहरणार्थ, खालच्या कोणत्या रांगांवर केव्हा ऊन येतें, कोठून खेळ चांगला दिसतो इत्यादि. पिचच्या रेषेंतून खेळ पाहिला की सूक्ष्म कसबहि दिसतें या श्रद्धेने तेथे, म्हणजे नॉर्थ स्टँडमध्ये, फक्त खेळ पाहाण्यास आलेले भाबडे लोक विशेष गर्दी करतात. असो. खेळ न पाहण्यासाठी आलेल्या कांही भाबड्या लोकांना कॉलेज-विद्यार्थ्यांच्या (म्हणजे विद्यार्थिनींच्या) ब्लॉक्सविषयी अनावर कुतूहल असतें. तें तुलाहि असेलच, गड्या. ते पहा, ते ब्लॉक्स. तेथे स्त्रियांचे पुंजके अधिक दाटीने आहेत आणि त्यांचा कलकलाटहि अधिक. तेथील हुल्लड फक्त पुरुषच माजवीत आहेत असा भोळा ग्रह करून घेऊं नकोस ! पण तिकडे आता फार लक्षहि देऊं नकोस. आपल्या भोवती शे-दीडशे क्रिकेट-क्लबांचा खच पडला आहे. सरकारी-बिनसरकारी कचेऱ्या, जाती-पोटजाती आणि शहराचे कांही विभाग यांचे हे क्लब्ज. जातवार क्लबांचीं नांवें मोठीं मौजेचीं असतात बघ. पण त्यांच्यासंबंधी पुन्हा कधी तरी. या क्लबांचीं तिकिटें सभासदच घेतात असें नाही. त्यामुळे येथे विनासायास माणसांची भेळ तयार होते. सगळ्या धंद्यांचे लोक सापडतील तुला. काळ्या कोटांतील वकील, स्टेथॉस्कोपवाले डॉक्टर, लांब डगल्याचे व्यापारी आणि कोण कोण सांगूं?—या वकाल शहरांतल्या सगळ्या बऱ्या-वाईट धंद्यांचे प्रतिनिधी येथे आहेत. पण मला वाटतें, सर्वांत कारकून अधिक भरतील. कोणी आजाराच्या सबबीवर—स्वतःच्याच नव्हे हां ! तो पाहा हिरवी टाय चाचपणारा कष्टमसधला सत्यवान नाडकर्णी. बायको आजारी असें सुपरिंटेंडेंटला सांगून सकाळींच ऑफिसबाहेर पडला. त्याच्या बाजूला बसली आहे तीच त्याची बायको सावित्री नाडकर्णी. ती आहे रेशनिंगमध्ये. नवरा आजारी म्हणून ती आज कॅज्युअल

लीव्हवर आहे. असा हा जोडआजार आहे, बाबा. इतर बहुतेक कारकून वरिष्ठांचा डोळा चुकवून आले आहेत; त्यांतील कांही वरिष्ठहि आपल्या वरिष्ठांना थापा मारून आले आहेत. आता मध्येच परत जाऊन वरिष्ठाला खेळाची रसभरित बातमी दिली की, तोहि फार खटखट करीत नाही.

हं, आता पुढे. तो ईस्ट स्टँड पाहा. स्वस्त दराचा. शूद्रासारखा तो दिवसभर उन्हांत काळवंडत असतो. तेथल्या खिचडींत शाळकरी मुलांची भरती जास्त. आणि स्त्रीवर्ग जवळजवळ नाहीच. त्यामुळेच कदाचित् येथे नेहमीच खुली दंगल चालते. हें वागणुकीचें स्वातंत्र्य स्टेडिअमच्या या वर्गव्यवस्थेंत उलट्या क्रमाने असतें. सी० सी० आय्० वर सगळे इस्त्रीचे कपडे! ओरडायचें तर नाहीच, पण टाळ्याहि मोजून आणि तालांत. बिचारे!...ईस्ट स्टँडच्या प्रेक्षकांची रुचीहि निराळी. तिला नखरा नको; दणका हवा. पुढे जाऊन हाफ व्हॉली ठोकणारा, विशेषतः अस्मानांत चढविणारा, खेळाडू त्या लोकांचा मोठा लाडका. मग सिक्सर चढली की तेथे वावटळ गेल्यासारखे उभे राहतील, हर्षाचे चीत्कार करतील—आणि थोडेसे नाचतीलहि...छेः छेः, मुलेंच नव्हेत, बाप्येहि! उलट, तुमचा एखादा शास्त्रशुद्ध खेळाडू मख्खपणें अगदी बॅटीच्या मध्याने चेंडू अडवूं लागला की त्याला मर्दासारखें खेळण्याच्या सूचना धमकीवजा सुरांत मिळतात त्या ईस्ट स्टँडमधूनच; आणि त्या बाजूला फील्डिंग करणें महाकठीण बरें, बंडू. एखादा झेल सुटला, किंवा चेंडू हातांतून निसटला, तर 'कोंबडी पकड' असा सल्ला कोरसमध्ये मिळेल. म्हणजे काय कोण जाणे?...आणि मग छळवाद मांडतील, संत्र्याकेळ्यांच्या सालीहि मारतील. पण चांगली कामगिरी केलीत तर कौतुकाचाहि तसाच गिल्ला करतील. असा रोखठोक कारभार. बंडू, मला वाटतें, स्टंटपिक्चर अथवा राणा भीमदेवी नाटक यांचे खास प्रेक्षक हेच. म्हणजे आपल्या या स्टँड्स्मधले सोशल पिक्चर-आणि-नाटकवाले पांढरपेशे सभ्य लोक, अर्थात् तुलनेने. ईस्टस्टँडची इतकी तारीफ ऐकल्यावर सर्वांत जास्त आणि सर्वांत कडक फटाके तेथेच फुटतात, आणि सर्वांत अधिक पोलीस तेथेच ठेवतात, हें ओळखण्याइतका तूं हुशार आहेसच, बंडू. असे हे येथील चार बंदिस्त वर्ग.

ईस्ट स्टँडच्या अलीकडे त्या प्रचंड स्कोअर बोर्डाच्या खाली चित्रांतल्यासारखें तें हिरवें खोपट दिसलें का तुला बंडू? ती प्रेस बॉक्स—म्हणजे पत्रकारांचा

पिंजरा. इंग्रजी पत्रकार तेथे टाईपरायटर खडखडावतात. आपले मराठी पत्रकारहि तेथेच बसून "मंत्रीने नेत्रलोलुप यष्टिरक्षण केलें", "हजारेची कलात्मक फलंदाजी" असलें वेडेंविद्रें लिहीत असतात—नाही, बेटा, त्यासाठी त्यांना असल्या कडेकोट बंदोबस्तांत ठेवतात ही तुझी कल्पना चलाख असली, तरी खरी नव्हे. आपले वाचक कांहीहि मानून घेतात; आणि या पत्रकारांचा राग कसला करायचा? दया करावी. आपला तो बाळू बोडस. गेल्या सालपर्यंत आंजर्ल्यास मुलांत विटी-दांडू आणि मुलींत सागरगोटे यापलीकडे कांही खेळला नाही की त्याने दुसरा कांही खेळ कधी पाहिला नाही. त्याला त्याच्या संपादकाने, 'वाणि-सत्ता'वाल्याने, या खुंटावर आणून बसवलें तर तो तरी काय करणार? त्याला स्पिन् आणि स्विंग, कट् आणि हूक—सगळें सारखेंच. ढवळ्यांची इंग्लिश इंटु संस्कृत डिक्शनरी घेऊन तिच्याखाली सगळें झाकतो...हो, हो, पण त्याला तरी वेळ आणि उत्साह हवा ना? दिवसभर बापडा येथे कष्टाने शब्द उपसतो. पुन्हा संध्याकाळीं चित्रपट पाहून त्याच्यावर स्तुतीचें कांही लिहितो. रात्रीं तारांचीं भाषांतरें बडवतो. फुरसत मिळाली की कसल्याहि जाड्या विषयावरच्या पुस्तकांचीं सखोल परीक्षणें करतो. आता या रगाड्यांत माणसाचा माणूस कसा राहावयाचा, तूंच सांग.

असा दचकूं नकोस, बंडू. हा एकदम कल्लोळ उठला त्याचें कारण म्हणजे कोणी तरी आऊट झाला. जो खेळायला आला तो आऊट व्हायचाच, त्याजागीं दुसरा, मग तिसरा—पुन्हा पहिल्यापासून—असा हा चक्रनेमिक्रम चालणार, या धीरगंभीर विचाराने तूं गंडेरी खाण्याचें अंगीकृत कार्य पुढे चालव कसा. पण जरा चौफेर पाहाहि. सगळीं शाळकरी मुलें, त्यापलीकडे बौद्धिक वाढ न झालेले बुवा, आणि बहुतेक ललना या वेळीं स्कोअर-कार्डवर कोण कसा आऊट झाला हें कोरून, पण सहसा चुकीचें, लिहीत आहेत...थांब, क्षणभर थांब, आणि मागे कान दे—मघापासून दिला नसलास तर. हें चोरून ऐकणें नव्हे. आपण सर्वांनी ऐकावें या उदात्त हेतूनेच त्यांनी केव्हाची वरची पट्टी लावली आहे. सगळे वयस्क लोक आहेत ते—एकदोन तर पेन्शनर आहेत. या वारकऱ्यांनी वर्षानुवर्षे असली मोठी यात्रा चुकवली नाही—नेम पाळून हजेरी लावली. पण आता ते समोरचा खेळ फारसा पाहतच

नाहीत. त्यांच्या डोळ्यांपुढे तें जुनें बॉंबे जिमखान्याचें मैदान आणि ते तंबू आणि ते जुने वीरच अजून तरळत आहेत. त्या आठवणींचा रवंथ ते प्रतिवर्षी सार्वजनिकपणे आणि अहमहमिकेने करतात. आठवण जितकी मुरते तितकी अधिक गोड हेंच खरें. आल्यापासून ते चिरचिरताहेत की गेले ते विठ्ठल, ते देवधर आणि जय, आणि ते ड्राईव्ह्ज्, आणि ते ग्लान्सेस. या तुमच्या हजारेंत आणि उमरीगरमध्ये तें नाही. त्यांना हा पोरवडा पसंत नाही. 'त्या पंचवीसच्या फायनलला देवधरने हौलेटला चॉप मारला तो चार स्लिप् फील्डर्समधून—' दुसरा कोणी दुरुस्ती करील—'हौलेटला नाही, वेस्टला...' मग ते आपल्या सुरकुतलेल्या बोटांनी फील्डर कोठे होते तें तळहातावर दाखवितील; मतभेद माजतील. आठवणींत आठवणींच्या तंगड्या अडकून सगळा गोंधळ होईल—पण भक्तिभावाने त्या नामावळीची उजळणी होईल. चंदाराणा आणि एस्० एम्० जोशी, डॉली कापडिया आणि अबदुस सलाम, ऱ्होड्स आणि कांगा, एरम् आणि एलचीदाना...आणि नायडू आणि अर्थात् पालवणकर बंधू—बाळू, विठ्ठल, शिवराम आणि अकालीं गेलेला गणपत...कशाने गेला तो?...तो पाहा पलीकडचा म्हातारा तशाच दाटींत अर्धवट उभा राहून, विठ्ठलचा 'स्टान्स' डावें पाऊल उभारून दाखवितांना लटपटत आहे. इथेच कशाला, अवघ्या स्टेडिअमभर चाळिशीपारच्या तोंडांत याच नांवांचा गजर या ना त्या निमित्ताने उमटतो. तिशीपारचे गट निसार आणि अमरसिंग आणि मर्चंट हीं नांवें घोळवतात, तेव्हा त्या ज्येष्ठांना त्यांची दया येते. मग 'आजच्या पोरांचें काय बोलावें? त्यांचीं दैवतेंच खुजीं! राहावत नाही म्हणून येथे यावयाचें, इतकेंच...' असें त्यांचें चालू असतें...हा पोलादी स्टेडिअम्‌देखील त्यांना बोचतो. त्यांचें म्हणणें, त्या जुन्या तंबूत अधिक आपुलकी होती—खेळाडू असे समोर माणसासारखे दिसत, इथल्या-सारखे नुसते पांढरे ठिपके नव्हत. आणि तेव्हा तंबूतंबूतून हिंदु-पारश्यांचें वाग्युद्ध चाले तेंहि आता संपलें—वैरांचीहि परंपरा गेली—अशी सगळी हळहळ...हसूं नकोस, बंड्या, उद्या केस पिकले की तूंहि हेंच करशील. आजच्या आठवणी चघळीत चघळीत तेव्हाचा खेळ पाहायचं विसरशील—नुसता फडकर, मांकड, आपटे, गुप्ते—अशी कवळी वाजवीत बसशील... आणि तेव्हाचीं पोरें तुला अशींच हसतील.

येथे माणसांची आणखी एक जात टाळली पाहिजे. ते आकडेबाज लोक—म्हणजे ज्यांना आजवर या जगांत जे जे सामने झाले त्यांचे सगळे तपशीलवार स्कोअर आणि पार्टनरशिप्स आणि बॅटिंग-बोलिंगच्या सरासऱ्या तोंडपाठ असतात—आणि एवढेंसें निमित्त मिळालें रे मिळालें की ते भडाभडा म्हणून दाखवतात. आता या क्षणीं असले पांचपन्नास अतिज्ञानी पहिल्या विकेटचा टेस्टरेकॉर्ड कोणाचा, नुसताच जागतिक कोणाचा, हिंदुस्थानांतील कोणाचा, हें तारीखवार बडबडून आजूबाजूच्या लोकांना सळो की पळो करून सोडीत असतील. शहाणा असलास तर या वाचाळ रेकॉर्ड-मार्तंडांपासून नेहमी चार रांगा दूर राहा, बंडू. पण कानावर पडलेंच तर मात्र त्याचा नेमस्तपणे शेजार-पाजारच्या बाळगोपाळांवर उपयोग करावा. वजन वाढतें.

—बंडू, मला नेहमी असें वाटतें की चूपचाप बसून खेळ पाहिला पाहिजे असा या स्टेडिअमवर सक्त नियम केला तर येथे कोणी फिरकणार नाही. तोंडें चालवायला आम्ही येथे येतों—बोलण्याबरोबर खाण्यालाहि. डोळ्यांनी बघतोंहि—पण नुसता खेळ नाही. हीं सगळीं माणसें बघतों. एकदा रणजी ट्रोफी मॅचसाठी एकटाच आलों होतों—शंभरावर माणसें नसतील येथे. स्टेडिअमचा सगळा सांगाडा उघडा पडला होता—आणि खायला उठत होता. तासाभराने हळूच बाहेर पडलों...

—आता हळूहळू तूंहि क्रिकेटबद्दल फाडफाड बोलूं लागणार, बंडू. तुझा चेहेराच सांगतो. हरकत नाही. श्रोते कोण आहेत हें जोखून बोलावें म्हणजे झालें. पण त्यांतहि एक युक्तीची गोष्ट सांगूं? हटकून परिणाम साधण्यासाठी दोन विषय कामीं येतील. एक म्हणजे सव्वीस सालीं सी० के० नायडूने मारलेल्या अकरा सिक्सर्स आणि दुसरें तेहतीस सालीं अमरनाथने इंग्लंडविरुद्ध केलेलें शतक. जणु आपण स्वतः ते पराक्रम पाहिले आहेत अशा सुराने बोलावें. कोणी शंका काढणार नाही, असा हुकमी गहिवर आहे त्या दोन आठवणींत. लाख वेळां त्या येथे निघाल्या असतील, पण अजून आंबत नाहीत...अरे, त्या एका आठवणीच्या पुण्याईवर त्यानंतर अमरनाथचे येथेच पांचदहा भोपळे पचले...

होय, बंडू, आता तुझें खाणें संपलें—तेव्हा मी या समस्त स्त्रियांविषयी बोलतों. गेला बाजार येथे तीन-चार हजार स्त्रिया असतील. त्या कां आल्या?

इतके लोक येतात म्हणून !—आणि त्या येतात म्हणून आणखी लोक लोटतात. असें हें घातचक्र आहे. या वरच्या बुजुर्गांनाच विचार. त्यांना याचें मोठें दुःख—कारण त्यांच्या काळीं कोठे तुरळक औषधाला एखादी बाई यायची —आणि तीहि सहसा औषधासारखीच असे म्हणे ! मग आता ही जत्रा कां लोटते ?...बरें, या येतात कोठून ? हे यक्षप्रश्न तुझ्यामाझ्या पार आहेत. यांत फक्त विद्यार्थिनीच नाहीत; चाकरमान्या आहेत—आपला गहन सेवाधर्म सांभाळून त्या येथे बसायला येतात. पैकी निम्म्यांची तरी निशाणी त्या त्या ऑफिसच्या हजेरीपटावर आज झालेली आहे. त्याशिवाय शेकडो पुरंध्रीहि आहेत. त्या निरनिराळ्या कारणांसाठी येथे उपटतात. कमलाबाई गेल्या तर विमलाबाईंनी न जाऊन कसें चालेल ? उद्या भगिनी मंडळांत मान वर राहिली पाहिजे ना ? कोणी आपल्या यजमानांचें हें विश्रांतिस्थान कसें आहे हें जातीने पाहण्यासाठी सांसारिक सावधगिरी बाळगून येतात. तुझ्यामाझ्यापुरतेंच बोलायचें म्हणजे, बंडू, आपल्या मालूताईंना यंदाच कुठलें हें क्रिकेटचें प्रेम आलें ?— परवाच दादल्याने किंमती काश्मिरी साड्या आणल्या आहेत म्हणून ! अर्थात् इतरांनाहि मॅचकरिता नव्या साड्या घ्याव्या लागतातच. तिचें आपलें उलटें झालें.

नको तो विषय काढूंस, बंडो,...येथेच होतात बरें ते—फिल्मष्टार्सचे सामने. आणि तेव्हाहि माणसें लोटतात—पण हीं माणसें नसतील तीं !—निदान मला अशा वेळीं कधी पाहिलेंस तर बेलाशक अब्रू घे.

आता तुझी दृष्टि हळूहळू बारीक होऊं लागली, बंडू—तेव्हा तुझ्या हें लक्षांत आलेंच असेल की या महिलांचें नेहमीच्या मानाने बोलणें कमी आहे. कारण त्यांचीं तोंडें खाण्यांत गुंतलेलीं आहेत. एरवी ज्या पदार्थांना त्या चार लोकांत नाक मुरडतील, ते खाण्याबद्दल पोरांना दटावतील आणि नवऱ्यांना हिणवतील,—त्यांच्यावर येथे त्या निर्धाराने तुटून पडतात. भेळ म्हणूं नकोस, पुरी-पकोडी म्हणूं नकोस, चिकी म्हणूं नकोस—शहाणा असशील तर कांहीच म्हणूं नकोस ! जें जें होईल तें तें पाहावें ! त्याशिवाय एक पदार्थ संपून दुसरा येण्याच्या, किंवा कोणी तरी आणण्याच्या मध्यंतरांत तोंड हलवायला सुका मेवा, चॉकलेट किंवा च्यूइंग गम याहि पोटउपाधि लागतात. आणि हें सगळें खेळ चालू असतां. मधल्या सुटींत बाहेर खाऊन जाणें हें तों कर्तव्यकर्म. तेंहि निष्ठेनेच पार पाडलें पाहिजे. मग पॅरिशिअन किंवा पुरोहित, बॉम्बेली अथवा

एशियाटिक...हीं नांवें ठाऊक झालेलीं असतात—आणि स्त्रीच्या कुतूहलबुद्धी-सारखा उपद्रव नाही—हें अजून तुला कळावयाचें आहे, बचा !

कबूल, पुरुषहि खात असतात,—पण ते पुरुषासारखे, म्हणजे भिडस्तपणे. एका दिवसांत सगळ्या तऱ्हा झाल्या पाहिजेत असा त्यांचा अधाशी आग्रह नसतो. आणि त्यांना खूप बोलायचें असतें, आणि थोडासा खेळहि पाहायचा असतो. माफ कर, बंडोबा, तुझें अजाण स्त्रीदाक्षिण्य मीं दुखवलेंसें दिसतें—पण तुला पुढे सुख लागायचें असलें तर...! बरें, राहिलें. पण एक सांगतों की नुसतेच पुरुष असले तर निढळाच्या घामाचा पैसा वाचविण्याकरिता मैलाची पायपिटी करून एखादा स्वस्त उडिपी, नाही, तर मद्रासी गाठतील !

बंडू, तूं चोरून पान खात असशीलच. दोन पैशांचें 'मसाला पान' म्हटलें की,—बघ, आताच तुला लाळ सुटूं लागली, पोरा. दहा तऱ्हेचा सुगंधी कचरा पानाच्या पुरचुंडींतून तिरका गालांत कोंबतांना उगाच पांच वर्षें चढल्यासारखीं तुला वाटत असतील, नाही? पण इथे, बंडू, पांच रुपयांची जवानमर्द पानपट्टी मिळते. ती कोणीं घेतांना मीं किंवा कोणींच अजून पाहिलेली नाही, कबूल —पण जाहिरात वाचून रुपयापर्यंत पान खाणारे, आणि नंतर तें खाऊन काय चमत्कार झाला तें रंगवून सांगणारे महाभाग खूप पाहिले आहेत. एखादे दिवशीं तूंहि तेंच करणार—तें सुटत नाही !

कोणी तरी परवा म्हणाला तें मात्र खरें, की बॉंबे जिमखान्यावरचे जुने सामने आणि हे नवे सामने यांत इतर फरक कितीहि असले तरी एक दुवा मोठा घट्ट राहिला आहे. या वरच्या खाण्याबाबत ! तेच भेळवाले, तेच चिकीवाले, गंडेरीवाले आणि पानवाले. इतकेंच की तेव्हा जें पोरटें भेळ खाल्ल्यावर तुमच्या हातांवर पाणी ओतण्याच्या कामावर होतें तेंच आता त्या रंगीबेरंगी चटण्यांत बोटें बुडवितें. पिढी बदलली पण चटण्या त्याच, आणि बोटांची चवहि तीच ! त्यावरून आठवण झाली. माझ्या ओळखीचे कांही हुशार नवरे आपल्या भार्यांना असल्या सामन्यांना कधी कधी आणतात. आणि तें अशा हेतूने की पुढे वर्षभर, निदान कांही महिने तरी, आपल्या तामसी खाण्यावर त्यांनी उठल्यासुटल्या तोंड सोडूं नये !

बंडू, यो बायकांना क्रिकेटमधलें कांही म्हणजे कांही कळत नाही रे ! आपल्या त्या पत्रकारांइतकेंहि नाही. वारकावे जाऊं द्यात—ते त्या खेळाडूंनाहि

समजत नसतील कदाचित्—आणि या अभंग अज्ञानाला त्या फार जपतात. कोणाला हात लावूं देणार नाहीत. त्याच्या सुरस कथा म्यां किती सांगाव्यात? मधूनच एखादी विदुषी खेळाबद्दल अशी मौलिक आणि चमकदार शंका विचारते—की ऐकणारे थिजून जातात. 'तो अंपायर कधी औट होणार?' 'कॅप्टनला ओळखतां यावें म्हणून निराळा पोशाख कां देत नाहीत?' हे उगाच एकदोन मासले. स्कोअरबोर्डवरील एकंदर धावांचा आकडा आणि बाद झालेल्या खेळाडूंची संख्या यांत हटकून घोटाळा न करणारी वनिता अजून या स्टेडियमवर यावयाची आहे—असें म्हणतात! अकरा खेळाडूंपैकी दहाच बाद होऊं शकतात हें बाईला पटवून देणारा बुवा तर अजून जन्माला यावयाचा आहे, असेंहि म्हणतात. तरीसुद्धा त्या येतात. दर वर्षी लोंढा वाढतोच आहे. अज्ञानाचा हव्यास मोठा जबरा खरा! यांतल्या कांही जणी दहाबारा वर्षें तरी व्रत घेतल्यासारख्या येत आहेत—

त्यांची तुला पुरी माहिती हवी असेल तर ते पलीकडे काळ्या कोटांतले चष्मेवाले गृहस्थ बसले आहेत ना, त्यांना विचार. माहीतगार माणूस. त्यांची पन्नाशी केव्हाच उलटली, पण उत्साह अजून ढळलेला नाही. वीस सालच्या चौरंगी सामन्यापासून आजपर्यंत कोणकोण स्त्रिया येऊन गेल्या, याच्या क्षेत्रांतल्या बडव्यांसारख्या त्यांच्याकडे याद्या आहेत. आता त्या स्त्रियांच्या मुली येतात त्यांचीहि त्याच जिव्हाळ्याने ते माहिती जमवितात. आईबाप कोण, शिकली कुठे, नोकरी कोठे करते, लग्न झालें असल्यास कसें झालें, झालें नसल्यास किती वेळां मोडलें—सगळें त्यांना विचार. येथील स्त्रियांचा तो बोलता चरित्रकोश आहे; व्युत्पत्तिकोशहि म्हणालास तरी चालेल. अर्थात् त्यांच्यासारखे आणखी अनेक आहेत. परंतु यासम हा! इतका दीर्घ आणि बिनचूक व्यासंग अन्यत्र मिळणें कठीण.—नमस्कार कर त्यांना.

माझ्याप्रमाणे तुलाहि प्रश्न पडला असेल, बंडू, की इतकीं स्त्रीपुरुषें येथे चार दिवस दाटीवाटीने बसतात, पण तसे सांसारिक अपघात येथे फारसे घडत नाहीत. त्याहूनहि आश्चर्य म्हणजे आपल्या कथाकारांनी नायकनायिकांना या स्टँडवर कोठे प्रेमांत पाडलेलें नाही. अगदी फडक्यांनीसुद्धा—कारण ते प्रेमाची पार्श्वभूमि प्रत्येक प्रसंगीं कटाक्षाने बदलतात म्हणे. पण याचा अर्थ असा नव्हे की, येथून माणूस सुका जातो. इतकेंच की, येथे पांच प्रेमविवाह घडले तर

ग्रं. क्र. ९३३०९

पांचशे प्रेमभंग जमतात—थोडी क्रियापदांची गफलत झाली वाटतें ! शेवटीं अर्थ एकच. माझा असा अंदाज आहे की दर सामन्याला येथे कमसे कम हजार हृदयें फुटतात—तीं चारदोन दिवसांत सांधतातहि. पण दरम्यान कांही हजार प्रेमपत्रें लिहिलीं जातात. उगाच कागदांची खराबी आणि पोस्टाला भार. शेदोनशे कविताहि होत असतील—म्हणजे संपादकांना उपद्रव. अर्थात् या सगळ्या निसर्गाच्या माकडचेष्टा बरें, बंडोपंत ! ही गर्दी, हा उकाडा, तें चरबट खाणें म्हणून अपचन आणि त्या तुमच्या कविता-कादंबऱ्या—यांचा परिणाम हाच होणार. शेजारचा वसंत गुप्ते ओळखतोस ना ? तो येथे घाऊक प्रेम करतो—आणि पुढे वर्षभर तो तें पुरवून पुरवून वापरतो !—म्हणजे एकदम आठदहा जणींवर. अर्थात् हें प्रेम एकतर्फी. या वेळीं ही साथच असते. आमचा एक डॉक्टर-दोस्त म्हणतो त्याप्रमाणे या जत्रेआधी तसलें कांही इनॉक्युलेशन सक्तीने केल्यास लागण-संख्या उतरेल. टोचून घ्या, मग आंत शिरा. अशी ही प्रेमाची पंढरी आहे, राया.

आणखीहि एक उपाय आहे, बंडू. हीं प्रेमें बहुतेक दुरून बसतात. थोडासा खेळ पाहिला तरी डोळ्यांवर ताण पडलेला असतोच—उन्हाने डोळे दिपलेले असतात—आणि मग दुरून कांहीहि साजरें दिसतें, वत्सा ! आणि दुर्बिणी तर फसव्या असतात. म्हणून ज्याचें असें होतें—म्हणजे ज्याला एकाएकी दुरून प्रेमाची भावना होऊं लागते—त्याला उचलून प्रेम-मुळाजवळ, म्हणजे त्या बाईजवळ, नेऊन बसवावें. पंधरा मिनिटांत ताप उतरेल—अगदीच हट्टी असला तर तासाभरांत. कारण जवळून तो तिचें बालिश बोलणें ऐकेल, मर्दानी खाक्या निरखील, पावडरीचे ओघळ पाहील—आणि तिचे हसायचे दात आणि खायचे दात निराळे आहेत हें दिसतांच गपकन् डोळे मिटून घेईल—किंवा प्रामाणिकपणे खेळाकडे पाहूं लागेल !

—नको, बंडू, असा गंगाधर गाडगीळांच्या बंडूसारखा मुद्दाम बावळटपणा करूं नकोस—त्या पोरींचेंहि लक्ष सगळीकडे नीट असतें. त्या चॉकोलेटचा आणि आइ-स्क्रीमचा रतीब ठीक उकळतात. पण त्यांची जातच हिशेबी आणि सावध ! अरे, माशीची धडपड जास्त असते; कोळी कसा निरिच्छपणे तिच्याकडे पाहत असतो !

—ओ ! लंच टाईम झाला वाटतं. उठा. संपला सकाळचा खेळ...एकंदरीने चांगला झाला, नाही का, बंडू ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत
वसुक्रम ७८९६८ दि. १।८।६१
१०६६८ नों. दि. ८।३।६२

६

## केवल पुरुषांसाठी

'पुरुषांचें मासिक' ही कल्पना वाटते तेवढी विनोदी नाही. स्त्रियांचीं मासिकें असतात, मुलांचीं असतात; पण या खास जमातींची सोय आणि कौतुक पाहतांना बहुसंख्य पुरुष वाचकांची कुचंबणा होते हें त्यांच्याहि ध्यानीं येत नाही, इतकें तें अंगवळणीं पडून गेलें आहे. तसें म्हटलें तर बहुतेक मासिकें पुरुषांचींच असतात—निदान वरवर तरी. मुद्रक-प्रकाशक-संपादक-लेखक बहुतांशीं पुरुषच; पण त्यांच्या डोळ्यापुढे वाचक असतो तो मात्र पुरुषच असतो असें नव्हे; किंबहुना सहसा नसतोच. उगाच नाही एवढ्या 'पुरुषी' मासिकांचीं नांवें स्त्रीलिंगी आहेत. आणि कांही फक्त व्याकरणा-पुरतीं पुल्लिंगी असतात; इतकीं नाजुक आणि मऊ. त्यांचे मुखवटे पाहा, विषयांची निवड आणि त्यांची सजावट पाहा, काय बिशाद आहे त्यांच्या पुरुषी कारभाराचा संशय येईल! इतकेंच काय, पण जीं सांगूनसवरून स्त्रियांचीं मासिकें त्यांपैकी बहुतेक पुरुषच चालवीत आले आहेत. या सगळ्या वाङ्मयीन स्त्रीसेवेंत स्व-जाति-द्रोह होत आहे याची आम्हां पुरुषांना फारशी जाणीवहि नाही—

याला अपवाद आहेत, पण ते अगदीच थोडे. 'पुरुषार्था'सारखें मासिक नांवापासूनच सोवळें आहे खरें; पण त्याच्या विवंचना पारमार्थिक असतात; आपलें बोलणें आहे पुरुषांच्या लौकिक, व्यावहारिक, दैनंदिन विवंचना आणि निकडी यांबाबत. त्यांची दखल कोणी घेत नाही. आणि तसें म्हटलें तर, त्या सोवळ्या निकडींबाबत स्त्री-पुरुष भेद असतोच कुठे? अध्यात्माला लिंगविचार

नाही. तेव्हा तसलींहि मासिकें फक्त पुरुषांसाठी नव्हेतच. आणखी एक प्रकार आहे. अशी कांही विद्वत्तेने खचलेलीं, सखोलतेचा हट्ट चालविणारीं, शब्दांच्या वजनाने फरफटणारीं,—थोडक्यांत, 'उच्च'—मासिकें असतात की स्त्रिया त्यांना सहसा (पुसायलासुद्धा) हात लावीत नाहीत. तीं आपले पुरुष कष्ट करून वाचतात अशी स्त्रियांची श्रद्धा. पण कोणाच्या तरी भिडेस्तव, किंवा बैठकीच्या खोलींत एखादें संस्कृति-चिन्ह असावें म्हणून, त्यांची वर्गणी आंबट तोंडाने भरणारे तसले बहुतेक पुरुष वेष्टन टरकविण्यापलीकडे, किंवा, फार तर, अनुक्रमावरून डोळे फिरविण्यापलीकडे, तीं हातांत धरीत नाहीत. मन लावून वाचणारे थोडे; समजणारे त्याहून. (पण तशा प्रकृतीच्या स्त्रियाहि तीं वाचतात; त्यांतील कांहीना तर तीं समजतातहि म्हणे.)

एकूण, पुरुषांसंबंधीचीं आणि पुरुषांसाठी अशीं मासिकें नाहीत; तीं हवींत. हें कबूल करायला अवघडल्यासारखें वाटेल; पण वाटूं नये. शेवटीं स्वतःचें पाहिलें पाहिजेच. गैरसमज होऊं नये म्हणून चटकन् खुलासा करावा. "फक्त पुरुषांसाठी" म्हणतांच 'For Men Only' या त्याच्या इंग्रजी पर्यायाच्या चावट आठवणीने उगाच कल्पनाशक्ति हुळहुळून जाईल. तसला चोरटा, रंगेल, निद्रानाशक हेतु यांत नाही. (अर्थात् 'तसल्या' मासिकांना पुरुषांपेक्षा स्त्री-वाचकच अधिक असतात, असा प्रवाद आहे.) असलें मासिक (आबालवृद्ध) स्त्री-पुरुषांनी एकत्र बसून वाचण्याजोगें असेल. त्याला झिरझिरीत वेष्टन नको की एखाद्या सद्ग्रंथाचा आडोसा नको.

हा सगळा विचार अगदीच हवेंतला नाही. पुरुषांची अशी मासिक सोय करतां येईल का, याची आम्ही कांही जणांनी सावध आणि बारीक छाननी केली. ती सोय करतां येईल असा आता विश्वास वाटूं लागला आहे. अर्थात् पुरुषांची म्हणजे समस्त पुरुषजातीची नव्हे. तसला 'जागतिक' आव नाही. (म्हणून वार्षिक वर्गणीदेखील फक्त रुपयांत द्यायची. शिलिंगांत नाही की डॉलरांत नाही—अर्थात् तेथील एखादा साहेब [आमच्या] सांस्कृतिक उन्नती-साठी भक्कम शिधा पाठवूं लागला, तर त्या सांस्कृतिक माधुकरीला आमची ना नाही हें स्पष्ट केलेलें बरें.) खरें म्हणजे आमचें संकल्पित मासिक सगळ्या पुल्लिंगी महाराष्ट्रीयांसाठीहि नाही. मुंबईचा चित्रपटदिग्दर्शक आणि पंढपूरचा बडवा यांच्या किती गरजा सारख्या आहेत? मग त्यांची दावण कशाला?

थोडक्यांत, पुण्यामुंबईसारख्या लहानमोठ्या शहरांतील कमीअधिक शिक्षण झालेल्या मध्यमवर्गीय मराठी पुरुषांसाठी हें मासिक असणार. 'खालच्या' वर्गासाठी तें नाही, कारण तेवढी अक्षर-ओळख आणि फुरसत आणि वाचून करण्याची सवय त्याला नसते. आणि 'वरचा' श्रीमंत वर्ग आपल्याकडे नाहीच. (तिघेचौघे आहेत म्हणतात; त्यांच्या जाहिराती आम्ही मिळवूं!) स्त्रियांचीं मासिकेंसुद्धा नाही का अशाच (संख्येने) मूठभर महिलांसाठी असतात? आणि मुलांचीं मासिकेंसुद्धा छानछान नव्या धर्तीचीं नांवें आणि हुशार अथवा पैसेवाले पालक असलेल्यांसाठीच बहुधा असतात.

तात्पर्य, प्रस्तुत मासिकापुढे निश्चित व्याप्ति आहे. समाजवादापासून राशि-भविष्यापर्यंत आणि आधुनिकतम चित्रकलेच्या विश्लेषणापासून ते वृत्तपत्राच्या (अथवा जाहिरातींच्या) एजंटाच्या कुटुंबांतील लग्नाच्या छायाचित्रांपर्यंत समबुद्धीने सर्व छापण्याची कडबोळी करामत आम्ही करणार नाही. मासिकाचे वाचक कोण आणि त्यांच्या अपेक्षा, अभिरुचि व गरजा काय यांचा स्पष्ट आलेख आमच्या डोळ्यांपुढे आहे. म्हणून मासिक बंद करतांना वाचकांचें मागासलेपण अथवा महाराष्ट्राचें दैन्य यांचा उद्धार आम्ही करणार नाही हें आगाऊच सांगून ठेवतों.

या उद्दिष्टांच्या अनुरोधाने आम्हीं मासिकाचा आराखडा तयार केला आहे; त्यांतील प्रत्येक सदर अशा कसोशीने आखलें आहे की आमच्या प्रिय (पुरुष) वाचकांना हें अगोदर पाहूं की तें, असा संभ्रम वाटेल, आणि नव्या अंकाची ते सोत्कंठ चित्ताने वाट पाहातील. आणि आपल्या घराला त्याच्याशिवाय पूर्णता येणार नाही अशी आपुलकीची जाणीव त्यांच्यांत निर्माण होईल, असा आम्हांला विश्वास आहे. एकाच घरांत अनेक पुरुष असले तर मी अगोदर पाहणार की तूं, अशा चढाओढींत अंकाची ओढाताण, आणि संबंधांत बिघाड होण्याचा संभव आहे. कोणी गादीखाली अंक लपवून ठेवील, कोणी पुस्तकाखाली, कोणी आणखी कुठे. या मासिकाने पुरुषजीवनांत क्रांति होईल असा आमचा अतिरेकी दावा नाही, पण घरांत आणि घराबाहेर त्याचें स्वत्व नव्या जोमाने फुलेल आणि त्याच्या अस्मितेला पुरा वाव मिळेल. ही प्रौढी जाहिरातवजा वाटेल, पण तिच्यांत एका नव्या निष्ठेचा आविष्कार आहे, एका अपूर्व कार्याचें आवाहन आहे.

कोणत्याहि मासिकाच्या आराखड्याचा सर्वांत महत्त्वाचा, म्हणून पहिला, भाग त्याच्या बहिरंगाचा. एक नूर मजकूर तर दसनूर सजावट. त्यांतहि आघाडीला, अर्थातच, मुखपृष्ठ. तें रंगीत हवेंच. आमच्या मुखपृष्ठावर चित्र असेल तें पुरुषाचें—हा कोणाला बेरंग वाटेल; पण मासिकाच्या ब्रीदाशीं आणि हेतूशीं तें सुसंगतच आहे. तें सोडलें, तरी स्त्रियांच्या रूपाची दृष्टीला अशी मिठी बसलेली आहे की पालट आणि नावीन्य म्हणून मर्दानी रुबाब रुचायला हरकत नाही. मात्र तो खराखुरा मर्दानी ढंग असेल. नाही तर चित्रपट-नायकांचे मुखवटे जाहिरातीच्या दराने छापतां येतील! मर्दानी घाटाचा ज्याच्या हाताला अजून सराव आहे अशा चित्रकाराच्या शोधांत आम्ही आहोंत. अर्थात् छायाचित्रेंहि वापरूंच; पण त्यांतसुद्धा कटाक्ष राहील तो पौरुषावर. सहसा अशा चित्रांना पुरुषजीवनाचा संदर्भ असेल. उदाहरणार्थ : गोंडस मूल कडेवर असलेला हसरा बाप; सहलींत गवतावर अथवा वाळूंत अस्ताव्यस्त लोळत वृत्तपत्र अथवा पुस्तक वाचणारा (पण गवताची काडी न चघळणारा) रसिक, क्रिकेट-फुटबॉल-खेळाडू, कचेरींत टेलिफोनवर बोलणारा चटपटीत अधिकारी, किंवा कचेरींत जातांना आगगाडीच्या दाराशीं उभा राहिलेला नोकदार कारकून इत्यादि. आंतील चित्रांचें वळणहि तेंच असेल. म्हणजे स्त्रियांना अजिबात मज्जाव असें नव्हे; तर पुरुषांची पायमल्ली होऊं दिली जाणार नाही.

आता अंतरंगाविषयी. अशा विशिष्ट ध्येयाला वाहिलेल्या मासिकांचें वैशिष्ट्य म्हणजे त्यांतील सदरें. त्यांत कथा-कविता असतील, प्रासंगिक लेख असतील; लेखांशेवटची जागा भरून काढण्यासाठी उतारे, पुरुषोत्तमांचे संदेश, संपादकीय, चुटके इत्यादि सोयीचा मजकूरहि असेल. पण मुख्य भर सदरांवर. कवितांबाबत एक खुलासा आवश्यक आहे. अशा मर्दानी मासिकांत कविता कशाला, असा एकाने बूट काढला; पण चित्रांप्रमाणे काव्यांतहि बिन-जनानी ढंग शक्य आहे असें बहुमत पडलें. म्हणजे फक्त पोवाडे अथवा सज्जन व सद्गुण यांविषयींची सोज्ज्वळ कविताच नव्हे; किंवा भक्ति-घराण्याची अति-लिंगी कविता नव्हे; सांगूनसवरून प्रेमाविषयींच्या कविताहि पुरुष-निष्ठ असायला हरकत नाही. आमच्या एका सल्लागाराचें कांहीसें चमत्कारिक मत असें पडलें की प्रेम-कविता मुख्यत्वें कवयित्रींच्या घ्याव्या; त्यांनी दिलेलीं उदाहरणें ऐकल्यावर तें पटलें. इतकेंच नव्हे तर त्यांनी उन्मादकुमारी उपाध्ये आणि

सारिका शेवाळे या दोघींकडे आमच्यासाठी शब्द टाकण्याचें कबूल केलें आहे.

मासिकांत जीं सदरें असतील तीं दोन प्रकारचीं—तात्त्विक आणि व्यवहारोपयोगी. अर्थात् तत्त्वचर्चा आणि व्यवहार यांची पूर्ण फारकत केली जाईल असें नव्हे; एकाला दुसऱ्याची डूब असेलच. तत्त्वें केवळ पुस्तकी नसतील. त्यांचा पुरुषजीवनाशीं घटकेघटकेला संबंध येईल. उलट, क्षुद्र वाटणाऱ्या व्यावहारिक सोयीगैरसोयींमागील सखोल तत्त्वें कटाक्षाने दाखविलीं जातील. तेव्हा वरील भेद स्थूल आणि केवळ तुलनार्थी मानावयाचे.

तत्त्वचर्चा म्हणजे समस्या आल्याच. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी आपल्या महाराष्ट्रांत स्त्रियांच्या फार समस्या उभ्या राहिल्या आणि त्याहि कांहीशा अकस्मात्. मागोमाग महायुद्ध ठाकलें. तों त्या धड मोजूनदेखील झाल्या नव्हत्या. पण त्या जागतिक धुमश्चक्रींत बरेचसें इकडचें तिकडे होऊन कित्येक बिकट समस्या चटकन् सुटल्या आणि कांही तर वेड्या गहाळ झाल्या. सुटल्या त्या कांही रंगभूमीवर, कांही चित्रपटांत, कांही सभांत, आणि परिसंवादांत, तर कांही रेशनिंग कचेऱ्यांत. अजूनहि थोड्या आहेत; पण पंचवीस गेल्या, पांच उरल्यासारख्या. उरल्या त्या बहुतेक वातड हें साहजिकच; एका पिढीचे दात पडले, तर पुढची पिढी त्या चावायला सज्ज आहे. स्त्रियांच्या आणि स्त्रीनिष्ठ मासिकांना तो चिकटा अजून बराच काळ पुरेल असा रंग आहे. पुरो. पण या रगाड्यांत पुरुषांचें काय ? की त्यांचे प्रश्नच (म्हणजे समस्या) नाहीत ? स्पष्ट बोलावयाचें म्हणजे महायुद्धाने पुरुषांपुढे अकल्पित प्रश्नांची फौज खडी केली आणि स्त्रियांचे जे प्रश्न सुटले म्हणायचे ते पलटी खाऊन पुरुषांचे प्रश्न झाले; किंबहुना या लिंगांतराने ते अधिक खडतर आणि कडवट झाले. त्याबाबत मात्र आजवर आळींमिळी गुपचिळी. ते असून नसल्याचा धीरोदात्त बहाणा करायचा आणि आपल्याच दांतांनी आपलेच ओठ चावत लष्करच्या भाकऱ्या भाजण्याचा निःस्वार्थी उद्योग चालवायाचा. हें कोठवर चालणार ? आजचा पुरुष गांजून आणि गांगरून गेला आहे.

आर्थिक प्रश्नच घ्या. तें जोखड आजवर पुरुषजातीने गाजावाजा न करतां वागवलें. कालपरवापर्यंत. तो जणु निसर्गक्रम म्हणून तिकडे कोणीं मुद्दाम लक्ष दिलें नाही. पण आता धापा टाकूं लागल्या स्त्रिया; म्हणून जो तो तिकडे पाहूं लागला. कोणी करुणेने, तर कोणी (स्त्रीजातीवरील) अन्यायाच्या परिमार्जनासाठी

संतापाने बद्धपरिकर होऊन. (कष्टाने मिळवून संसार चालविणाऱ्या स्त्रियांचा यांत अंतर्भाव नाही; त्या बापड्या अशा शाब्दिक जंजाळांत पडत नाहीत.) असो. चाकरी, बेकारी, महागाई, प्राप्तिकर इत्यादि काळज्या मुख्यतः पुरुषांच्या, पण स्त्रियांना त्यांची झळ लागतेच. चाकरमान्या स्त्रियांच्या आक्रमणामुळे पुरुषांची बेकारी वाढली आहे ही पोट-काळजी अर्थात् फक्त पुरुषांची. या सगळ्याबाबत आमचें मासिक पुरुषहिताच्या अनुरोधाने योग्य तें दिग्दर्शन करीलच. कचेऱ्यांतून पुरुषांना लोकसंख्येच्या प्रमाणांत नोकऱ्या मिळाव्यात, हातून होणारें काम आणि मिळणारा पगार व बढती यांचा संबंध असावा, (काळ-काम-वेगांबाबत स्त्रीपुरुषांचें तौलनिक कोष्टक असावें,) पुरुषांची कार्यव्यग्रता विचल करणाऱ्या विभ्रमांवर बंदी घालावी, दाक्षिण्याचा फाजील फायदा घेतला जाऊं नये—असल्या मागण्यांविषयी जी कारवाई व्हायला पाहिजे तिला आम्ही उत्तेजन देऊं. याबाबतची आकडेवारी कसोशीने मिळवूं. तज्ज्ञ संख्याशास्त्री तिची निःपक्षपाती चिकित्सा करतील. त्याचप्रमाणे स्त्री-सहकाऱ्यांशीं कसें वागावें, स्त्री-वरिष्ठांपुढे किती नमावें, याबाबतहि बारीक सूचना देण्यांत येतील. सचिवालयांतून नुकतेच निवृत्त झालेले एक ज्येष्ठ अधिकारी हा विभाग सांभाळणार आहेत इतकें सांगितलें म्हणजे पुरे.

हें पैसे मिळविण्यापुरतें झालें; तो खर्चणें हा त्या आर्थिक प्रश्नाचा उत्तरार्ध. तोहि तेवढ्याच महत्त्वाचा आहे; किंबहुना अधिक, कारण त्यांत पुरुषांची कुचंबणा होते ती अवघड जागींच्या दुखण्यासारखी दडवून ठेवावी लागते. कोण्या एके काळीं काय होत असे कोण जाणे, पण सांप्रत पुरुष फक्त 'मिळवता' राहिला आहे; 'खर्चता' तो नव्हे. तो त्याच्या स्त्रीचा अधिकार. तो तिने बजावल्यावर त्याने आपला बजावायचा—(जमाखर्चाच्या) तोंडमिळवणीचा. हिशेबनिशी त्याची, बेहिशेबी तिची. चहापाणी, विडीकाडी, कपडेलत्तें यासाठी ती कांही तोडून देईल त्यावर त्याच्या आर्थिक स्वातंत्र्याची गुजराण. मंजुरीच्या वेळी ती विरोधी पक्षाच्या नेत्यासारखी (अथवा अकौंटंट जनरल सारखी) घार-नजरेने काटछाट करते; आणि वेळोवेळीं आपल्या पुरुषाचें खिसा-पाकीट तपासून 'कॅश' मोजते ती ऑडिटरच्या गुर्मीत; कधी त्यांतीलच कांही, 'हाताशीं सुटे पैसे नसल्यामुळे', मिर्चीकोथंबिरीसाठी उचलते. असा आणखी खूप तपशील देतां येईल; पण तो येथे नको. थोडक्यांत, याबाबत पुरुषांत पुरी जाग

आली पाहिजे; आपल्याला हक्क आहेत (म्हणजे असावेत), जो कमावतो त्याला मामुली रकमेसाठी अजीजी करावी लागूं नये, आर्थिक पाहारा जरा ढिला व्हावा, यांची जाणीव झाली पाहिजे. ही जाणीव निर्माण करण्याचा, त्या हक्कांची पायमल्ली होऊं नये याविषयी उठाव करण्याचा आणि ते हक्क राजीखुषीने न मिळाल्यास अक्कलहुशारीने कसे मिळवावे व मिळाल्यावर त्यांना जपावें कसें याबाबत सल्लामसलत देण्याचा हें मासिक धडाडीने प्रयत्न करील असें आम्ही आश्वासन देतों. या विषयाची धुरा आमचे एक स्नेही वाहणार आहेत. त्यांना संसाराचा अडीच तपांचा (आणि कांहीसा विविध) अनुभव असून, त्यांनी दलितोद्धाराचें व कामगारसंघटनेचें कार्य केलें आहे. याशिवाय कांही काळ त्यांनी एका मोठ्या उद्योगपतीकडे हिशेब लिहिले हा अनुभवहि चलाख सल्ला द्यायला त्यांना उपयोगी पडेल.

या प्रश्नाचीं उपांगेंहि आहेत. फावल्या वेळीं द्रव्यार्जन करण्याचें एक. शिकवण्या, टायपिंग, एजन्सी, इत्यादि जुनीं कलमें आहेतच. त्याशिवाय, पुरुषांच्या हस्तकौशल्याला उत्तेजन आणि दिग्दर्शन पुरविलें जाईल. इतर कांही कौशल्य असल्यास त्याबाबतहि. कोणी एखाद्या विषयांत पारंगत असतो त्यांत तो गरजूंना सल्ला आणि साहाय्य देऊं शकेल. आमचा बापू पंडित पाहा. ‘आमचे समारंभ-सम्राट्’ असें त्याची पत्नी कुचेष्टेने म्हणो, पण (सभा सोडून—तिचा त्याला तिटकारा—) कसलाहि समारंभ असो, अगदी बारशापासून श्राद्धापर्यंत, बापूवर व्यवस्था सोपविलीत तर अथपासून इतिपर्यंत सगळें सुरळीत आणि नावाजण्यासारखें व्हायचेंच. विशेषतः चहापाणी अथवा जेवणखाण असलें तर बापूला आणखी चेव चढणार. पक्कान्नाच्या मांडणीपासून ते हात पुसायचा रुमाल नळाच्या कोणत्या अंगाला ठेवायचा येथपर्यंत त्याची टापटीप असते. शुभ-अशुभ, श्रीमंती-गरिबीचें, शाकाहारी-मांसाहारी यांपैकी कोणतेंहि असो, बापू विजार दुमडून पुढे. तेंच बाजारहाट करण्यांत. चांदीसोन्यापासून कात-चुन्यापर्यंत आणि नायलॉनपासून पायपुसण्यापर्यंत कोठे कोणत्या भावाने मिळतें हें त्याला तोंडपाठ; मुंबईतले सगळे बाजार त्याला जणु पायपाठ. जवाहिऱ्यापासून कोळणीपर्यंत ओळखी. रविवारीं सकाळीं हा तज्ञ अनेकांच्या पिशव्या हाताखांद्याला अडकवून निघतो. आणि मटण-मासळीसारखी त्या दिवसाला साजेशी, पण कांहींच्या पोषाखीपणाला आणि जातीपातीला न

साजेशी, खरेदी घाऊक प्रमाणांत करतो. पण हें सगळें श्रमदान निष्काम-बुद्धीने. कोठे चहाच्या कपापुरती कृतज्ञता लाभली तर फार झालें. म्हणून, मला वाटतें, त्याची गृहिणी तापत असावी. असे बापू चाळीचाळींतून असतात. त्यांनी खरोखर हा दुय्यम व्यवसाय म्हणून केला पाहिजे. यांतून कदाचित् एक उपप्रश्न निर्माण होईल. असली धडपड करायची ती आर्थिक स्वातंत्र्या-साठी; पण हेंहि द्रव्य पगाराप्रमाणें जस्त झालें तर? आमचें मासिक अशा सर्व अडचणींतून वाट दाखवील.

आर्थिक प्रश्न मुख्य. इतर खूप आहेत. सामाजिक घ्या. या बदलत्या समाजांत पुरुषाचें स्थान काय याचा सांगोपांग विचार झाला पाहिजे. पुरुषांचे 'समाज' असावेत का, असल्यास त्यांत (स्वतःच्या व मिळवती बायको असल्यास तिच्या) पगारांतून निर्माण होणारे भेद टाळून एकजिनसीपणा कसा आणतां येईल, तसेंच समाजासमाजांत सलोखा कसा राहील, फाटाफूट होणार नाही, असल्या 'समाजां'त मनोरंजनाशिवाय बौद्धिक विकासाचा कोणता कार्यक्रम असावा, समाजसेवेसाठी गरिबांच्या वस्त्यांना अथवा तुरुंगा-इस्पि-तळांना गटाने (सचित्र) भेट द्यावी काय, असले अनेक महान् प्रश्न आहेत. पुरुषमनाच्या विकासाप्रमाणे त्याचें रंजनहि झालें पाहिजे, आणि तेंहि खेळीमेळीच्या चढाओढींतून; म्हणजे भ्रातृभाव वाढेल. कॉन्ट्रॅक्ट ब्रिज अथवा बुद्धिबळ यांसारखे बैठे, हॉकी-फुटबॉल-क्रिकेटसारखे मैदानी आणि कुस्ती-मलखांबसारखे विशेष मर्दानी खेळ यांची सोय अशा समाजांत असणारच; त्याशिवाय उत्सवप्रसंगीं सिगारेटच्या धुराचीं वर्तुळें सोडण्याच्या, राख पडूं न देतां सिगरेट ओढण्याच्या, एका काडींत अधिकांत अधिक सिगरेट पेटविण्याच्या, सतत बोलण्याच्या, पायजम्यांत नाडी घालण्याच्या, डोळे झाकून भांग पाडण्याच्या वा दाढी करण्याच्या इत्यादि चढाओढी असतील. एकूण पुरुषांचें सामाजिक स्थान आणि संबंध यांचा नव्या युगाच्या संदर्भांत सहानुभूतीने विचार झाला पाहिजे. तसेंच या युगाची एक नाजुक निकड आहे, तिचीहि दखल घेणें अवश्य आहे. ती म्हणजे लैंगिक प्रश्नाबाबत. कोणी म्हणेल, ती खरोखर साहित्यिक निकड आहे; असेलहि. आणि मासिक पुरुषांसाठी असलें तरी तें साहित्यच. असो. अज्ञान, गैरसमज आणि प्रेमविषयक कथाकविता यांमुळे, आणि पुरुषसुलभ लज्जेमुळे, आजवर अंधारांत

चाचपडणाऱ्या संसारोन्मुख तरुणांना या प्रदेशांतील शास्त्रीय सत्यें सुबोध पण संभावित भाषेंत सांगण्याचा आम्ही प्रयत्न करूं. एक प्रख्यात डॉक्टर या भागाचें संपादन करतील. त्यांची ख्याति वैद्यकीपेक्षा लेखनांत आहे हें मुद्दाम सांगावयाचें. त्यांचें परदेशी मासिकांचें अद्ययावत् वाचन साहित्याच्या इतर क्षेत्रांतल्याप्रमाणे येथेहि उपयोगी पडेलच. वाचकांच्या पत्रांना उत्तरें देऊन ते त्यांच्या अडचणींबाबत काळजीपूर्वक सल्ला देतील. आम्हांला लिहिलेल्या एका पत्रांत ते लिहितात, "तुमची योजना हजारों वाचकांना फलदायी होईल. त्यांचे संसार सुखी, सुंदर आणि संपन्न होतील. त्यांचा व त्यांच्या संबंधितांचा तुम्हांला दुवा मिळेलच; पण वैद्यकशास्त्राचाहि मिळेल; कारण ही पुरुषरोगचिकित्सेची शाखा एकंदरीने उपेक्षिली गेली आहे; तिला आता उठाव मिळेल." मासिकाच्या या सदराचा ज्यांना वास लागला आहे अशा कांही भावी वाचकांनी पाठविलेल्या पत्रांची आताच केवढी चळत झाली आहे. बुलढाण्याहून यादव चक्रधर पांढरीपांडे लिहितात, (खूपशा खाजगी तपशीलानंतर) "एकूण आमचें कुटुंब फार विस्तारलें. कर्ताकरविता श्रीहरि ही आमची श्रद्धा म्हणून तक्रार करणेचि नाही. पण आमचे देहाची झीज झाली ती दुरुस्त होणेसाठी तुमच्या शास्त्रग्रंथांत कांही भेटेल का?" सावंतवाडीचे गुरुनाथ झिलबा गायतोंडे यांची पृच्छा अशी स्वतःपुरती नाही, सर्वसाधारण आहे. ते विचारतात, "पुरुषांत तिशी-चाळिशीनंतर टप्प्याटप्प्यांनी जे शारीरिक बदल होतात (उदाहरणार्थ: आमच्या शांताराम लाडाचें पोट सुटत चाललें आहे किंवा नानू शिरोडकराला केव्हाच टक्कल पडलें.) त्याबाबत कांही पथ्यें पाळावयाचीं असतात काय?"

याशिवाय पुरुषवर्गापुढे नेहमी उभे राहणारे विविध आणि लहानसहान प्रश्न असतातच. त्यांचा परामर्श घ्यायला हवा, म्हणून एक सदर योजिलें आहे. साहेबाच्या 'ब्रेन्स ट्रस्ट'च्या देशी आवृत्त्या हल्ली निघाल्या आहेत, तसलीच ही असणार. नांवांत नावीन्य हवें. म्हणून तें 'बुद्धिं शरणं गच्छामि'. प्रश्न वाचकांचे; सर्वांत चतुर प्रश्न विचारणाराला सव्वा रुपया (आणि अंक) बक्षीस. तसल्या वाचकांच्या अभावीं सध्या तरी आम्हीच प्रश्न बनविणार आहोंत. चालू प्रथा तीच आहे म्हणा! एक खुलासा: हीं प्रश्नोत्तरें फक्त थिल्लर—अगदीच विनोदी—नसतील. त्यामागे पुरुषोन्नतीची निश्चित विचारसरणी असेल; तीं मार्गदर्शक असतील. उदाहरणार्थ, पहिल्याच अंकांतील प्रश्नांपैकी एक:

"सौभाग्यवतीला नको असलेले पाहुणे बसले असतांना आंत ती आदळ-आपट करूं लागली, तर आपण सावरासावर कशी करावी?"

याचें उत्तरहि तयार करून ठेवलें आहे. तें असें:

"पाहुण्यांना म्हणावें, कालच आम्ही नवीन भांडीं खरेदी केलीं आहेत. त्यांना कधी पोचे पडणें शक्य नाही असा दुकानदाराचा दावा आहे. तो ती खोटा पाडीत आहे."

दुसरा एक असा: "आमची जागा लहान, पण कुटुंब मोठें. मी काय करावें?" हा केवढा मोठा प्रश्न. जवळजवळ राष्ट्रीय, आणि करुण. पण त्याचें संपूर्ण उत्तर द्यायचें म्हणजे लेखमाला लागेल. म्हणून या सदराचे संपादक 'बिरबल' (म्हणजेच, प्रसन्नकुमार हसबनीस—ज्यांच्या झटपट आणि प्रसंगोचित विनोदावर खूष होऊन आचार्य शिंत्र्यांनी त्यांना 'हजर-विनोदी' ही पदवी बहाल केली.) यांनी त्याचें चटपटीत उत्तर तयार केलें आहे तें असें:

(अ) कुटुंबाला दोरीच्या उड्या मारावयास लावणें;

(आ) कुटुंबाचें मीठ तोडणें.

बिरबलांनी येथे विनोदी श्लेष काढून वेळ मारून नेली असें वाटेल, पण श्लेषामागे अपार सहसंवेदना आहे हें सूक्ष्मदृष्टीच्या वाचकांस मुद्दाम सांगणें नलगे.

विस्तारभयास्तव आणखी उदाहरणें नकोत. तरी पण एकच प्रश्न: "आमच्या घरीं कधी सुटीच्या दिवशीं हळदीकुंकू–मंगळागौर असले स्त्रियांचे समारंभ साजरे होतात, तेव्हा आम्हा पुरुषांची कुचंबणा होते. आम्ही काय करावें?" अथवा "वटपौर्णिमेला आणि हरितालिकेला माझी पत्नी "सातजन्मीं हाच पति लाभावा' असें मागून घेते. यावर आम्ही काय उपाय करायचा?"

कांही प्रश्न असे चटपटीत उत्तराने सुटण्यासारखे नसतात. त्यांची सर्वांगीण चर्चा आवश्यक असते. त्यासाठी 'वादस्थळी' या नांवाचें सदर (म्हणजेच आपला 'सिंपोझियम'. कित्येकांना तोच शब्द लौकर समजेल!). दर अंकांत नवा प्रश्न. पहिल्या अंकांत: "पुरुषांनी रविवार दुपारचा वेळ कसा घालवावा?" निरनिराळ्या क्षेत्रांतील व्यक्तींना (म्हणजे पुरुषांना) आम्हीं हा प्रश्न विचारला आहे—एका गव्हर्नरापासून एका बस-कंडक्टरपर्यंत. (गव्हर्नर साहेबांचें विस्तृत उत्तर उलट-टपालींच आलें. इतरांचीं उत्तरें, त्यांना वेळ मिळतांच, येतील.)

'प्रकाशांतील पुरुष' हें आणखी एक सदर. नांव मिळविलेल्या पुरुषांविषयी त्यांच्या सांसारिक तपशिलांवर भर देऊन सचित्र लिहिलें जाईल. मुलेंबाळें किती, आवडीचे पदार्थ, कपडे आणि रंग कोणते, यजमान म्हणून पाहुणे-मंडळींना ते कसे आकर्षक वाटतात, ते केस कोठे व कोणत्या 'स्टाईल'ने कापून घेतात, त्यांचा शिंपी कोण, चांभार कोण याबाबतच्या वाचकांच्या चौफेर कुतूहलाचें पूर्ण समाधान केलें जाईल. अशी एक सूचना आहे की दर अंकांत एकाविषयींच लिहावें; ती स्वीकारली गेल्यास त्याला—आणि सदरालाहि—'मासिक पुरुषोत्तम' (अथवा 'मासिक पुरुषपुंगव') असें म्हटलें जाईल. कदाचित् त्याचें चित्र मुखपृष्ठावरहि येईल. यांतून मासिकाला आर्थिक बळ लाभेल असा अंदाज आहे. शेवटीं व्यवहार पाहिलाच पाहिजे.

'शतपावली' हें सदर पेन्शनरांसाठी असेल. त्याचें संपादन पुण्यांत केलें जाईल—श्री० निवृत्तिनाथ सोनामुखे यांजकडून. आहार, पचन, दंतचिकित्सा, पेन्शन मिळण्यांतील आणि अध्यात्मांतील अडचणी इत्यादि विषयांचा त्यांत खल होईल.

हीं सगळीं सदरें मुख्यतः तात्त्विक स्वरूपाचीं; पण असल्या मासिकाच्या वाचकवर्गाच्या दुसऱ्याहि अपेक्षा असतात. नुसती तत्त्वचर्चा तर मासिका-मासिकांतून वाहत असते. गरज भासते ती दैनंदिन व्यवहारांतील मार्ग-दर्शनाची. म्हणून पुरुष-वाचकांना संसारांत पदोपदीं उपयोगी पडेल असा मजकूर पुरविणारीं कांही सदरें आम्ही देणार आहोंत. त्यांपैकी कांही अशीं :

वेषभूषा : देहशृंगार म्हणजे फक्त स्त्रियांचा, हा शिळा संकेत आता पुरे. पुरुष म्हणजे गैदी, गबाळा आणि बावळट हा काय न्याय झाला ? वस्तुतः तोहि बापडा आपल्या परीने डोळ्यांत भरण्याची धडपड करीत असतो. पण तसें उघड बोलण्याची चोरी. मग तो छापील वर्णनें, चित्रें, चित्रपट इत्यादींतून कांही तरी कसें तरी जुळवून आपली सजावट करतो. वेषाबाबत कापडविक्या आणि शिंपी यांचें स्वार्थी सांगणें मानायचें; केसाबाबत न्हाव्याचें आणि पादत्राणाबाबत चांभाराचें. त्याचा सगळा शृंगार असा परावलंबी. तो विवाहित असला तर—सगळेंच परावलंबी तसें हेंहि. त्याची पतिव्रता आपल्या कल्पनेने त्याला मढविणार. हा एक मुद्दा, विशेषतः समाजशास्त्रज्ञांनी आणि मानसशास्त्रज्ञांनी, विचारांत घेण्यासारखा आहे की स्वतःच्या वेषभूषेबाबत

चोखंदळ सौंदर्यदृष्टि दाखविणारी स्त्री नवऱ्याच्या दर्शनी भागाबद्दल इतकी बेफिकीर कां, इतकेंच नव्हे तर त्याला त्याविषयी बदसल्ला कां देते ? 'मोरपंखी' विजार आणि 'गुलबक्षी' किंवा 'चटणी-कलर' बुशकोट एकसमयावच्छेदेंकरून त्याच्यावर चढवून, भल्या माणसाला खुळा कसा करून दाखवते? यांतून त्याची सोडवणूक व्हावी, (स्वतःबाबत) त्याची सौंदर्यदृष्टि साफ व्हावी आणि एकंदरीने जग अधिक देखणें व्हावें हा या सदरामागील हेतु.

त्यांत रंगसंगतीबाबत काळजीपूर्वक माहिती दिली जाईल. (त्या संगतींत त्वचेचा रंगहि अंतर्भूत असेल!) सगळा जामानिमा त्यांत येईल; म्हणजे विजार, कोट अथवा शर्ट इत्यादि प्रधान वस्त्रें, आणि नेकटाय, हातरुमाल (विजारीच्या खिशांतील वापरायचा व छातीवरच्या खिशांतील दाखवायचा), मोजे, इत्यादि उपवस्त्रेंहि. इतकेंच नव्हे तर पादत्राण, कमरेचा व घड्याळाचा पट्टा, चष्म्याची फ्रेम यांचाहि विचार होईल. रूढ रंगसंगतीपार जाऊन नव्यांचाहि विचार होईल. तेंच खुद्द कपड्यांबाबतहि. घरांत पट्टयांचा चटोर पायजमा, किंवा अघळपघळ धोतर यांऐवजी सुटसुटीत आणि सोयीस्कर लुंगी वापरावी का ? 'थ्री फोर्थ्स' विजारीची नेमकी लांबी केवढी असावी ? फेंगड्या पायांना ती साजून दिसेल का ? लांड्या बाह्यांचा शर्ट अधिक शोभिवंत की लांब बाह्या कोपरापर्यंत दुमडाव्या ? कॉलरचे प्रकार, बटनांची संख्या आणि आकार, इतकेंच काय पण मनगटी घड्याळ डाव्या मनगटावर लावावें की उजव्या, आणि तेंहि शर्टाच्या 'कफ'वर बांधावें का, येथपर्यंत बारकावा असेल. पुन्हा 'सब घोडे बारा टक्के' नाही. पुरुषांत रंगाप्रमाणें बांधणीचीहि विविधता असते; कोणी स्थूल, कोणी शेलाटा (म्हणजे हाडकुळा), कोणी उंचेला, कोणी ठुसका (म्हणजे ठेंगू), कोणी कोठे वक्र, असें परमेश्वराचें कसब असतें. त्याच्या अनुषंगाने, आणि तें शक्य तोंवर झाकलें जावें, असें आपलें कसब असावें. शिलाईतच नव्हे तर कापडाचा रंग आणि त्यावरील रेघा, ठिपके व इतर डिझाइन यांच्या निवडींतहि वस्त्र पेहेरणाऱ्याच्या लांबीरुंदीवर बेतलें पाहिजे. पुरुषांना याची कधी जाणीव नसते; ती आम्ही करून देऊं. त्या कामीं मुंबईतील धोबीतलावचा प्रसिद्ध शिंपी 'जॉन् डी शिल्वा' याचें तज्ज्ञ साहाय्य आम्हांला मिळणार आहे; त्याच्या पाठीशीं पांच पिढ्यांचा अनुभव आहे; आणि दर दोन वर्षांनी नवी 'फॅशन' रुळविण्याबद्दल

त्याचा लौकिक आहे. त्याच्या आणि आमच्या नवनवीन वेष-योजना प्रत्यक्षांत दाखविण्यासाठी दर अंकांत एखाद्या देखण्या पुरुषाचीं त्या वेषांत, आणि निरनिराळ्या पोजेसमध्ये, छायाचित्रें देण्यांत येतील. तींहि आर्टपेपरवर. पण 'फॅशन'च्या गोंडस नांवाखाली आम्ही उधळमाधळ शिकविणार नाही. काटकसरीचेहि धडे देऊं. उदाहरणार्थ, न विरलेला शर्ट फाडून, त्याच्या पाठीचे हातरुमाल कसे करावे, पुढच्या भागाचा उपयोग बूट पुसण्यासाठी कसा होईल, बटनें लावायची पट्टी काढून घेऊन तसल्याच कापडाच्या नव्या शर्टला कशी लावावी, असल्या उपयुक्त सूचना देऊं. कपडयांच्या घडया कशा घालाव्या, घरीं इस्त्री कशी करावी इत्यादि बाबींकडे आमचें लक्ष असेल.

तेंच केशभूषेविषयी. चेहेऱ्याच्या ठेवणीला शोभतील असे केस कापणें, भांग पाडणें, झुलपें किंवा फुगे ठेवणें वा न ठेवणें याबाबत, तसेंच शोभा आणि निगा या दोहोंसाठी कोणतीं तेलें व तत्सम द्रव्यें कशी वापरावीं याबाबत तपशीलवार आणि सचित्र मार्गदर्शन करूं. तेंच मिशीप्रकरणीं, आणि श्मश्रू-प्रकरणीं. दाढी करण्याचा प्रकार साधारणतः एकच. ती सुलभपणे कशी होईल, ती झाल्यावर कसलीं चूर्णें आणि द्रव्यें चोळावीं याची चर्चा करूं. दाढी वाढविण्याचे अनेक प्रकार आहेत, त्यांचीहि सचित्र आणि तौलनिक चिकित्सा करूं. दाढी फक्त चेहऱ्याचें वैगुण्य झाकण्यासाठी नसते; तिच्यांत कलेचा आविष्कारहि हवा. कला दोघांचीहि : तिला वेळोवेळीं छाटणाऱ्या नापिताची आणि ती वाढविणाऱ्याची. दुसरी उमगायला विविध कलांचें, त्यांचीं उद्दिष्टेंमाध्यमें, त्यातील आकृतिबंध इत्यादींचें ज्ञान लागतें. म्हणजे दाढीच्या ठेवणीवरून ती ठेवणारा चित्रकार आहे की शिल्पकार की साहित्यिक—त्यांतहि पुन्हा, नवकवि की संताळु गद्यलेखक, हें ओळखतां येतें. असो. तसेंच कोणतीं प्रसाधनें केव्हा आणि कशीं वापरावीं याची माहिती पुरवूं. या शिरशृंगार-शाखेचें नेतृत्व आचार्य फणींद्र केशव कात्रे करतील एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

पुरुषांच्या मासिकांत पाकशास्त्र, शिवणकला आणि बालसंगोपन हीं सदरें असल्याचें वाचून अनेकांना विनोदाची शंका येईल; पण थोडा विचार केला तर हें पटेल की, पुरुषांना या कला शिकण्याची आवश्यकता आहे. विशेषतः विवाहित पुरुषांना. वरीलपैकी क्रमांक तीनची कला फक्त विवाहितांसाठीच आहे

हें स्त्रियांनाहि पटेल. पहिल्या दोहोंचें कसें ? त्यांबाबत ब्रह्मचर्याच्या सबबीवर तो इतरांवर अवलंबून राहूं शकतो, पण ती सबब आखडतांच त्याची अवस्था बिकट होते. काटकसरीच्या काचामुळे तो बाजारी कसबहि मिळवूं शकत नाही. अर्थात स्वस्त्रीठायीचें कसब तत्त्वतः त्याच्यासाठीच. पण तें कमीअधिक असूं शकतें, आणि समान हक्कांच्या बजावणीचा भाग म्हणून, आणि कधी सहकार्याच्या सक्तीसाठी, त्यालाहि तें शिकून घ्यावें लागतें आणि तिच्या गैरहजेरींत तें आचरावेंच लागतें. पाकशास्त्राचीं लहानमोठीं पुस्तकें हल्ली फार प्रसिद्ध होत असतात; तीं वाचणें स्त्रियांना फार आवडतें. त्यांचा उपयोग मात्र अधिक करून पुरुषांना होतो. पण पुरुषांसाठी तसलें सुटसुटीत पुस्तक कोणी प्रसिद्ध करीपर्यंत त्यांच्यासाठी आम्ही एक सदर चालवूं. वेळखाऊ, पैसेखाऊ आणि दिखाऊ पदार्थांऐवजी साधे, स्वस्त आणि रुचकर पदार्थ आम्ही देऊं. पिस्त्यांची चटणी अथवा रताळ्याची बिर्यानी (उपासाची) असले चमत्कार नकोत. पुरुषासारख्या पुरुषाला चहा कसा करावा, कुकरमध्ये भात-डाळ-भाजी कशी शिजवावी आणि राहावलेंच नाही तर अंडें कसें उकडावें अथवा तळावें, अथवा (महत्त्वाकांक्षा फारच पेटली तर) त्याचें ऑम्लेट(सारखें कांही तरी) कसें करावें, इतकें किमान आलें पाहिजे. येईल, फक्त आत्मविश्वास हवा. गृहिणीच्या देखरेखीखाली सगळें करतांना तो डळमळतो, इतकेंच. तेंच शिवणकलेविषयी. तुटलेलें बटण लावतां येणें, थोडेसें उसवलेलें शिवणें, फाटलें असल्यास साफ छाटून टाकणें, हा स्त्रीवर्गाच्या हातचा मळ असा समज. पुरुषांच्या हातांनी काय पाप केलें आहे ? याबाबतहि आम्ही वाचकांना शिक्षण देऊं. म्हणजे असल्या जुजबी गरजांसाठी त्यांना तोंड वेंगाडावें लागणार नाही.

बालसंगोपन ही पुरुषांची नवी जबाबदारी. पूर्वी म्हणे बापाने मुलाला उचलून घेणें अशिष्ट मानीत. आता बाप हाताशीं असतां आईने मुलाला उचलून घेणें अशिष्ट मानलें जाईल की काय, अशी शंका वाटते. तेंच खेळविण्याविषयी. त्यांत चूक आहे असें नाही. आईला अन्य अवधानें सांभाळायचीं असतात आणि मुलाची नीट वाढ झाली पाहिजे. तेव्हा मुलाची स्नानादि साफसफाई, त्याची वेषभूषा, त्याच्या मनोरंजनासाठी (वयाच्या गटाप्रामाणें) विविध आवाज काढणें, मूल ज्याला गाणें म्हणतें ती क्रिया करणें (‘अंगाई’ हा त्यांतीलच एक प्रकार), गोष्ट सांगणें आणि वेळप्रसंगीं उडया मारणें इत्यादि

कर्तव्यें बापाला पार पाडावीं लागतात. सरावाने तीं जमतातच, पण सराव होईपर्यंत कोणी तरी सांगायला हवें. आई बापाला सांगायची नाही, कारण (त्यांतलें तिला कांही येत असलें तरी) अपत्याचें प्रेम मिळविण्याबाबत चढाओढ असते. एक बाप दुसऱ्या बापाला विचारायचा नाही, कारण आपल्याला घरीं असें करावें लागतें हें कबूल करण्याची लाज वाटते. आमचें मासिक याविषयी आवश्यक माहिती पुरवील. केवळ बालसंगोपनाची 'कृती'च नव्हे तर बालमानसशास्त्र, नवख्या बापाने कसें वागावें वगैरे विषयासंबंधी वेळोवेळीं लेख प्रसिद्ध होतील. परदेशीं काय परिस्थिति आहे याचाहि तौलनिक विचार होईल. 'अमेरिकेंतील बाप' यावर तीन (भाषांतरित) लेख तयार आहेत.

असे विषय अनंत आहेत, पानें थोडीं. पुरुषजीवन समृद्ध करणें हें मासिकाचें ध्येय. त्या जीवनाचीं अंगें केवढीं विविध आहेत. त्यांपैकी बहुतेक आजवर दुर्लक्षिलीं गेलीं आहेत. त्यांचा योग्य परामर्श घेतला तर नव्या युगांत पुरुषाला आपलीं कर्तव्यें यशस्वीपणाने पार पाडतां येतील. नुसतीं कर्तव्येंच नव्हे तर सुखेंहि; तींहि अंगीं लागलीं पाहिजेत, मोठीं काय किंवा लहान काय? यासाठी पान कसें लावावें, तंबाखूच्या जाती आणि त्यांचे गुणधर्म, धूम्रपानाचें तंत्र असले विषयहि या मासिकाच्या कक्षेंत येतील. हें मासिक पुरुषजातीची सर्वांगीण सेवा बजावील अशी आमची गाढ निष्ठा आहे.

या मासिकाचें नांव अजून आम्ही निश्चित केलेलें नाही. वर दिलेलें ध्येय व कार्यपद्धति ध्यानांत ठेवून प्रिय वाचकांनी नांवें सुचवावींत. जें नांव निवडलें जाईल तें सुचविणाऱ्यास पारितोषिक दिलें जाईल. आतापर्यंत पुढील नांवें आलीं आहेत. 'गृहस्थ', 'श्रीयुत', 'मर्द', 'सखा', 'नरका नारायण'. नांवांत काय आहे हें शेक्सपिअरपासून शाळकरी मुलांमुलींपर्यंत अनेकांनी हजारों वेळां म्हटलें आहे—तेव्हा तें खोटें नसावें. मात्र अशा मासिकाची आवश्यकता आणि हा आराखडा आमच्या पुरुष वाचकांना आवडला आणि पटला असेल अशी आशा आहे.

७

## इतकी रद्दी पुरे झाली...

लढाईचे अनेक फायदे झाले. ते सर्वच येथे सांगत सुटल्यास हा लघुनिबंध होणार नाही. भय लांबीचें नाही. कारण सर्वशक्तिमान् संपादक तिची काळजी करण्यास समर्थ आहे. भय आहे तें लालित्य चुकेल याचें : आणि संपादकांना तर तेंच हवें आहे! ऐन दिवाळींत त्यांना दुखविल्यास वर्षफळ वाईट लागेल म्हणून दोनच फायदे सांगतों. पहिला असा की, इच्छा नसतांनाहि माझें भूगोलाचें ज्ञान वाढलें आहे. अनेक वर्षांपूर्वी शाळेंत जो भूगोल, विशेषतः युरोपचा, आगामी परीक्षेच्या आणि समोरच्या छडीच्या मुर्वतीखातर शिकलों आणि प्रसंग टळल्यावर मनापासून विसरलों, तो पुनश्च डोळ्यासमोर नाचूं लागला. नद्या, पर्वत, बंदरें, राजधान्या—तीं गाडलेलीं भुतें उठलीं; पण सूडाच्या चेकाळणीने नव्हे, तर हरकाम्या देवदूतांच्या अजीजीने. जुनें वैर फिटलें आणि नव्या प्रेमाचा ओलावा फुटला. नकाशे आवडीने असे आयुष्यांत प्रथमच पाहिले. बातम्या ऐकतां वाचतां सगळे तपशील विनासायास उलगडूं लागले. रशियाच घ्या. त्याचा तो अस्ताव्यस्त भूगोल तेथील शहाण्या माणसांनाहि पुरा माहीत नसावा. मग आपलें काय? अर्थात् ती ज्यांची स्वर्गभूमि अशा आपल्या उत्साही भाई-ताईंना तें सगळें तोंडपाठ असतेंच. पण आपण बोलत आहों साधारण आणि निरुपद्रवी माणसांसंबंधी. जर्मन फौजा रशियांत शिरल्या, तसें माझें ज्ञानहि पुढे सरकूं लागलें; आणि रशिया उलटून जर्मन मागे

रेटले जाऊं लागले, तशी सोपी उजळणी झाली. हसतखेळत शिक्षण देण्याच्या नव्या पद्धतींत लढाईची गणना करतात की नाही कुणास ठाऊक! लढाई संपण्याच्या सुमारास ही भूगोलज्ञानाची अडगळ इतकी माजली की, माझी मलाच लाज वाटावी. सुदैवाने आता ती, म्हणजे अडगळ, कमीकमी होत आहे. वर्षभरांत त्या विषयांतील परीक्षेपुरतीच सुटसुटीत सामग्री माझ्याजवळ उरलेली असेल, असा भरंवसा आहे.

झालें इतकें विषयांतर पुरे झालें! लढाईच्या दुसऱ्या फायद्यावर आपलें, म्हणजे या लघुनिबंधाचें, लक्ष आहे. तो असा की, रद्दीचा भाव वाढला. छापलेला मजकूर फक्त शिळा झाला म्हणून त्याची किंमत वीस रुपये मण! म्हणजे जें वाचावयाचें तें वाचवेनासें झालें की त्याची किंमत वाढते, असें उफराटें गणित डोक्यांत थैमान घालूं लागलें. एका दैनिकाच्या संपादकाने वर्गणीच्या वार्षिक, सहामाही, तिमाही, देशी आणि परदेशी, आकड्यांऐवजी, "एका मणास एकोणीस रुपये (ट० ख० माफ)" असें प्रामाणिकपणे छापून चढाओढ लावण्याचा निर्धार प्रकट केला होता असें ऐकलें. माझा त्यावर विश्वास नाही. या धाडसी व्यवहारांत, संपादक आणि रद्दीवाला त्यांच्यामधले विक्रेता व वाचक हे दोन निरुपयोगी दुवे किंवा दलाल टळत होते ही दूरदृष्टि असेल! पण वर्तमानपत्र आणि रद्दी यांतील तात्त्विक अंतर मग कोठे उरलें? (आणि वर्तमानपत्रें तर तत्त्वासाठी चालवायचीं असतात!) कोणाहि अब्रूदार रद्दीवाल्याने त्या गठ्यांकडे ढुंकूनहि पाहिलें नसतें. त्या धंद्यांतील एक अनुभवी गृहस्थ तर असें म्हणाला की, वर्तमानपत्राला चारचौघांचा हात लागल्यावरच खुमारी येते. ती माणुसकी रद्दींत उतरली पाहिजे. त्या माणुसकीचें मोल आता वाढलें आहे.

ज्या रद्दीवाल्या गृहस्थांचा वर उल्लेख केला आहे त्यांच्या गिरगावांतील दुकानांत मी फार वेळां जाऊन बसतों. तेथे एकसारखीं हीं कागदी कलेवरें येतात. आलीं की त्यांची तपासणी होते, मग वर्गवारी, मग घड्या पाडून त्या सुबकपणे रचल्या जातात. एकंदरीने या दुकानाची कळा बहुतेक ग्रंथालयांहून अधिक प्रसन्न आहे. वर्गवारी होते ती आकार आणि टिकाऊपणा असल्या चोख कसोट्या लावून! मालकांचा मासिकाविरुद्ध कटाक्ष फार. एकाचीं दुसऱ्याशीं मतें जुळतील, पण आकार जुळावयाचे नाहीत. त्यामुळे दुकान

गैरशिस्त दिसतें. तेव्हा तीं मुळांतच नकोत असें त्यांचें म्हणणें. 'चित्रमय-जगत्'हि त्यांच्या डोळ्यांत भरत नाही, तेथे इतरांची कथा काय? पण दैवाला वात्रटपणाची लहर आली की त्यांच्याकडे चुकून 'समाजस्वास्थ्या'चा अंक येतो. त्यांचा व कर्व्यांचा मतभेद लांबीरुंदीपुरताच आहे, हें सांगितलेलें बरें. 'समाजस्वास्थ्या'चा इवलासा अंक कोठल्याहि वर्तमानपत्राच्या घडींतून नकळत येऊं शकतो. पण 'केसरी'च्या अंकांतून तो फार वेळां आल्यापासून, निदान मालकांचा तसा ग्रह झाल्यापासून, 'केसरी' ते नेहमीच नीट झटकून घेतात! एरवी, 'केसरी'चा मजबूतपणा त्यांना फार पसंत आहे. किराणा मालाच्या पिशव्यांना म्हणे फार चांगला!

या दुकानांत वेळ चांगला जातो. केवळ मनोरंजन होतें इतकेंच नव्हे, तर नको म्हटलें तरी विचाराचीं यंत्रें सुरू होतात. ताजें वर्तमानपत्र वाचतांना आपण विचार केलाच तर तो किती पैसे वाया गेले याचा! पण तींच पत्रें जुनीं झालीं, काळाच्या बरणींत मुरलीं की, त्यांची चव वाढते आणि सत्त्वहि वाढतें आणि विचाराला पुष्टि मिळते. दैनिकाच्या ताजेपणाची घाई कशी अंगीं लागणार? आणि साप्ताहिकाचा संबंध आपण रविवारच्या सुस्तीशींच अधिक लावतों. माझा अनुभव असा आहे की, चांगलें वर्ष सव्वा वर्ष पार पडल्याशिवाय हे छापील विचार बाळसें धरीत नाहीत. त्यांतल्या त्यांत दोन पावसाळ्यांत ते भिजले तर अधिकच चांगले. तोंपर्यंत आपले पहिल्या मुसंडींतले हेके आणि हेवेदावे थंड पडलेले असतात. गेल्या वर्षी दोन साप्ताहिकांत एक खडाजंगी वाद झाला; त्यांत माथें फिरून मीहि एक साडेतीन ओळींचें पत्र प्रसिद्ध केलें आणि त्यांतील उपरोधावर स्वतःच कित्येक दिवस खूष होतों! परवा त्या दुकानांतील एका चळतींत ते अंक सापडले. वाचतांवाचतां ज्या विरुद्ध पक्षाच्या लेखाने मला सुरसुरी आली होती तो अर्धाअधिक बरोबर वाटूं लागला, आणि माझा जो उपरोध त्या वेळीं वाचकांना समजला नसेल तो आता मलाहि समजेना! आणखी दोन वर्षांनी काय होईल याचा विचारहि करवत नाही! (प्रतिपक्षाला समाधान वाटूं नये म्हणून तो वाद कोणता तें येथे सांगत नाही!) यावरून असें वाटतें की, आपल्या या जाहीर वादांतून कांही निष्पन्न व्हावयाचें असेल तर उत्तरप्रत्युत्तरांत एका वर्षाचें तरी अंतर ठेवावें, त्याने प्रत्युत्तरें वाढणार नाहीत. भीति एवढीच की, कदाचित् लेखक नकळत

बाजू बदलायचे !—म्हणजे वाद चालूच ! पण असा वाद बरा. त्यांत कडवटपणा येणार नाही आणि तापल्यामुळे उगाच फुगून दिसणारी विद्वत्ता निवल्यावर जेवढ्यास तेवढी होईल. यांत संपादकांची गैरसोय होईल हें मात्र खरें! 'मागील अंकावरून पुढे चालू' असें छापणें त्यांना नामुष्कीचें वाटायचें. याशिवाय त्यांना हवा तसला खुसखुशीतपणा अशा वादांत कसा येणार? वादपटु विद्वानांना ही सूचना पटणें शक्यच नाही. आपला वाद रेंगाळत चालला तर जगाची प्रगतीहि अडखळूं लागेल अशी त्यांना धास्ती वाटणार. आणि असला वार्षिक उपसा यांच्या खोल आणि अद्ययावत् विद्वत्तेला कितीसा पुरा पडणार ?

प्राचीन भारतांत तत्त्वज्ञानाने इतकी मजल मारली याला त्या वेळची वादपद्धति कारण असावी. पंचवटीच्या कोणा सांख्याची वाराणशीच्या मीमांसकाशीं जुंपली. पंचवटीकराने पूर्वपक्ष भूर्जपत्रावर लिहिला आणि आश्रमांत निरुपयोगी ठरलेल्या एखाद्या मठ्ठ शिष्याबरोबर मुहूर्त पाहून तो पाठविला. शिष्य रेंगाळत, रस्ता चुकत, नदीनाल्यांतून डुंबत, दुसऱ्या आचार्यांकडे पोचेपर्यंत भूर्जपत्रावरील निम्मी अक्षरें धुवून, पुसून अथवा उडून गेलीं होतीं. वाराणशीकराने, आजच्या संशोधकासारखें, लावून लावून तें सगळें वाचलें. लागलें नाही तेथे शिष्यास पुशिलें. त्या खटाटोपाची डोकेदुखी उतरल्यावर, विचारासाठी मांडी घातली. समाधीच ती ! कांही वर्षांनी ती उतरल्यावर तिच्या प्रकाशांत मग उत्तरपक्ष भूर्जपत्रावर लिहिला. आणि तें शिष्याकडे देऊन, त्याचें तोंड दक्षिण दिशेस फिरवून, त्याला क्षेत्राबाहेर काढला. पुनश्च नदीनाले आणि दिग्संदेह ! मधल्या अनेक पावसाळ्यांनी पूर्वीची वाट झाकून टाकली होती, हा त्या बापड्या शिष्याचा अपराध नोहे ! जिवानिशीं तो पंचवटीप्रत येऊन पोचतो तो पीठावर दुसराच आचार्य : कारण पहिल्याचें वार्धक्यवशात् अवसान झालेलें असतें. पुनश्च भूर्जपत्रवाचन, मनन, लेखन...इत्यलम्! असे हे वाद पीठांचे चालत आणि पिढ्यापिढ्यांतून चालत. म्हणून त्यांना एवढी प्रतिष्ठा लाभली, आणि त्यांतून विचारांचें सार निथ्रालें. सुज्ञांस यांतील बोध सांगणें नलगे.

—असे अनेक विचार त्या दुकानांत गर्दी करतात, त्या जुनाट घड्यांतून खुणावतात. दोन वर्षांपूर्वी गाजलेला एक मोठा मृत्युलेख आता शब्दांचा पाचोळा वाटतो : त्यांतील उसनीं आसवें केव्हाच सुकून गेलीं. उलट, मागे

एका विनोदी लेखकाचीं कांही स्फुटें वाचतांना हुकमी हसूं आलें होतें; आज त्यांत निराळाच ओलावा जाणवला. थिल्लरपणाआड लपविलेले व्रण काळाने उघडे केले. घाईत खपणारी फसवणूक कधी तरी बाहेर फुटणारच; फक्त ती पाहावयास सहसा आपण तेथे नसतों. आपण नव्या घाईत दुसऱ्याच फसवणुकींत त्या वेळीं गुरफटलेले असतों.

जुनीं वर्तमानपत्रें चिवडतांना अशा अनेक अकल्पित चिजा भेटतात. त्या वेळीं मामुली वाटलेला, आणि संपादकाने कोठल्या कोपऱ्यांत टाकलेला, तुकडा आता नजरेंत भरतो. कालच्या उपेक्षितांचें अंतरंग आज उमगतें. रद्दींतील हीं रत्नें काळ हलक्या हाताने पारखून काढतो. बंद पडून अनेक वर्षें लोटलेल्या पत्राचा एखादा अंक पाहिला की, चमक मारून जाते, आणि आठवणींचें मोहोळ जागें होतें—आणि त्या दंशाच्या लहरी सळसळतांना नकोशा वाटतात आणि हव्याशा वाटतात...

आजचीं वर्तमानपत्रें कांही वर्षांनी अशींच महत्त्वाचीं वाटूं लागतील. माझा रद्दीवाला मित्र त्या गाढ श्रद्धेने सकाळीं एवढ्या कोलाहलाने विकल्या जाणाऱ्या पत्रांकडे पाहातो. त्यांचें भवितव्य ठरलेलें आहे. कांही दिवसांपूर्वीची गोष्ट. दुपारीं आम्ही दुकानांत गोष्टी बोलत बसलों होतों, तेव्हा एका दैनिकाचा संपादक समोर चालत जातांना दिसला. त्याचा चेहरा 'तत्त्वशोधक' म्हणतात तसा दिसत होता आणि तो स्वतःशीं पुटपुटत होता. मी व दुकानदार एकमेकांकडे पाहून हसलों. दोघांच्याहि मनांत हाच विचार की, "बाबा रे, तुझा तो जळजळीत आणि स्वतंत्र प्रज्ञेचा आणि तेजाळ शैलीचा आणि इतक्या कष्टाने जन्म घेणारा अग्रलेख भोवतालच्या पानांसह लौकरच येथे येणार. आज तुझ्या डोक्याला शीण, उद्या वाचकाच्या आणि परवा रद्दी उचलून आणणाऱ्याच्या ! तो एकदा येथे आला की, तुझ्या प्रतिस्पर्ध्यांच्या अग्रलेखाजवळ तो अंग टाकील." सगळ्या राजकीय समेट-परिषदांनी या दुकानांतून थोडी अक्कल उसनी घ्यावी ! येथे 'लोकयुगा'ची घडी 'लोकमान्या'च्या पोटांत सापडेल आणि हिंदुत्वनिष्ठ 'काळ' एखाद्या कडव्या उर्दू अखबाराला गुण्यागोविंदाने लपेटून बसलेला दिसेल. शाई वाळली नाही, तोंच वैर उडून जातें. आपण फक्त तोऱ्यांत समजूत करून घ्यावयाची की, आमचा 'राजकीय संघर्ष' इतका तीव्र की कागदाला कागद भिडला तरी ठिणगी उडायची ! आज ते कसे थंड आहेत. ठिणगी उडालीच तर कधी

ओल्या कोळशांविरुद्ध धुमसणाऱ्या एखाद्या गृहिणीकरवीं स्वैपाकघरांत उडायची...आणि दोघेहि एकाच सुरळींत पेटायचे !

या दुकानांतून ही रद्दी परत बाहेर जाते. कांही पिशव्यांसाठी, कांही पुड्या बांधण्यासाठी, कांही केवळ 'रद्दीसाठी रद्दी' म्हणून. तिचीं गिऱ्हाइकेंहि चोखंदळपणा दाखवतात. एका भेळवाल्याचा राशिभविष्याच्या पानांवर डोळा असतो. तो त्यांतून चार आण्यांवरची 'ऑर्डर' पुरवतो. फक्त वरची तारखेची चिंधी टरकावली की, त्याचा आश्रयदाता त्या लगद्याबरोबर भविष्यहि अधाशीपणे फस्त करीत असावा. त्याच्या राशीला 'प्रकृतीला अपाय आणि खिशाला खार' असल्याची सूचना त्यांत असली तर लौकरच त्याचा विश्वासहि बसावयाचा ! कांही गिऱ्हाइकांना चित्रपटांच्या जाहिरातींचीं पानें विशेष प्रिय असतात. तेवढाच त्यांतून विकल्या जाणाऱ्या पदार्थांना कलेचा वास लागायचा ! अशी एक दंतकथा आहे की, मुंबईच्या शास्त्रीहॉलमधील कोणा सात्त्विक ब्रह्मकुलोत्पन्नाला कोणत्याशा एकादशीला रात्रीं खरोखरीचा उपवास घडला—कारण वाण्याने शेंगदाणे की साबुदाणे पाठविले ते कसल्या म्लेंच्छ पत्राच्या पिशवींतून !

धंदा म्हटला की या आवडीनिवडी सांभाळाव्या लागतात. उघड्या डोळ्यांनी कोणी कवितांचीं पानें घेत नाही असा माझ्या मित्राचा अनुभव आहे. तोलांत आलीच तर कसर भरून काढायला चार इतर कागद वर टाकावे लागतात ! पण अशाच रद्दींतून आलेल्या—पेपरमिंटच्या पुड्याला बांधलेल्या म्हणा —नायकाच्या कवितेवरून नायिका प्रेमांत पडते या घटनेवर कादंबरी व्हावी—निदान लघुकथा. या कथानकाचे सर्व हक्क (चित्रपटाचेदेखील) मी माझ्या स्वाधीन ठेवीत नाही.

पण रद्दीसंबंधी एवढा विचार कोण करतो ? वर्तमानपत्रांतील आपल्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यावरील तारीख. ती ताजी असली की आपण खूष. माझ्या माहितीचा एक गृहस्थ सकाळचें वर्तमानपत्र संध्याकाळीं वाचणें मागासलेपणाचें लक्षण समजतो. आणि संध्याकाळचें मिळालें नाही तर त्याला रात्रीं धड जेवण जात नाही ! आपली आधुनिकता कॅलेंडर आणि घड्याळ यांच्यासभोवती फिरत असते. 'धकाधकीचा मामला' वगैरे आपले आवडते शब्दप्रयोग पाहा. काळाच्या खांद्याला खांदा लावून चालल्याचा आपण आव

आणतों. किंवा जणु तारखेच्या चौकटीने त्याच्या सुबक वड्या कापून सुग्रणीच्या तत्परतेने भरून ठेवायच्या आणि दररोज सकाळीं एक एक काढायची!— आणि काळ काबूंत आला म्हणून आपणच आपलें कौतुक करावयाचें! एखाद्या दैनिकाच्या संपादकाने पंधरा दिवसांपूर्वीचा अंक फक्त वरची तारीख बदलून छापला तरी अनेक वाचक भक्तिभावाने तो ताजा म्हणून वाचतील! प्रयोग करून पाहण्यासारखा आहे.

हा तारखांचा सासुरवास ज्यांना चुकवावासा वाटतो अशीं अनेक माणसें असतील.

*कोठेंतरि जाऊं बसुनी शीघ्र विमानीं*
*अज्ञात ठिकाणीं*
*जेथे न मिळे दैनिक, साप्ताहिक आणी*
*तेथे चल राणी*

कविलोकांना ज्या शांत कोवळ्या स्थळाचा ध्यास लागतो तें असेंच असावें. तेथे कधी काळच्या जुन्या वर्तमानपत्रांतील सौंदर्य चविष्टपणें शोषून घेतां येतें. त्यांत गेलेल्या दिवसांचा आणि रात्रींचा खुष्बू जिरलेला असतो...

वर्तमानपत्रें ही वाङ्मयाची एक आघाडी आहे, ती नवनवोन्मेषशाली आहे, जीवनस्पर्शी आहे, वगैरे भव्य विचार कोणीहि उपसंपादक ठासून सांगेल. मग त्याला अत्र्यांच्या निर्मलेच्या नाटकी जोषांत सांगावेंसें वाटतें: "वर्तमानपत्र हें क्षणाचें वाङ्मय आणि अनंतकालची रद्दी आहे." क्षणाच्या काल्पनिक वाङ्मयीन घिसाडघाईपेक्षा तें रद्दीचें विश्रब्ध सौभाग्य बरें! संसारांत त्यांतील वाङ्मयापेक्षां रद्दीच हाताशीं अधिक उपयोगी पडेल.

आता या रद्दीचें मोल आपल्याला रुपयेआण्यांतहि समजूं लागलें. ती जपून ठेवणें, कधी तिच्यावर मायेचें फडकें फिरवणेंहि, कमीपणाचें वाटत नाही. शेवटीं बहुतेक लिखाणाची तीच अवस्था होणार हें ओळखल्यावर पाहण्याची दृष्टि बदलली. तींत थोडी आपुलकी आली. ती लेखकवर्गाला अधिक आली पाहिजे. तावातावाने लिहितांनाहि 'रद्दी असशी रद्दिस मिळशी' अशी त्या लिखाणाबाबत अलिप्त वृत्ति हवी. नाही तर उगाच तें लिखाण हातपाय पसरावयाचें! आपल्या लेखकांत वास्तवता हवी, असें म्हणतात तें खोटें नाही.

एक वेळ तुमचें लिखाण कल्पनारम्य असलें तरी चालेल, पण त्याबद्दलची तुमची वृत्ति कल्पनारम्य होऊं देऊं नका. ती व्यवहारी आणि प्रामाणिक असावी. 'मी आज अमुक शेर रद्दी लिहिली' असा निदान स्वतःच्या मनाशीं हिशेब ठेवावा. एकंदरीने, कला आणि तंत्र यांच्या तोळामासा हिशेबापेक्षा हाच शेरापासरीचा हिशेब प्रामाणिक ठरेल. पण मीहि फार लिहिलें. झाली इतकी रद्दी पुरे झाली...!

८

## स्मरणशक्तीचा बळी

गुणहि फार झाला की त्याबद्दल माणसाची दया येते. गुणदोष उपजत असोत नसोत, पण दोषांप्रमाणे गुणहि कह्यांत ठेवले पाहिजेत—नाही तर माणसाचें डॉ० वासुदेव गणपति साळुंके, एम्० ए०, एस्० टी० सी०, पीएच्० डी०, राष्ट्र-भाषा-भास्कर (सासवड), आचार्य (म० सा० प०, पुणें) इत्यादि, यांच्यासारखें अकारण हसें होतें. तसा डॉ० वा० ग० साळुंके लाखांतला माणूस—माझा जुना स्नेहीच तो—पण चारचौघांसारखे अनेक दोष अंगीं असतांहि केवळ एका गुणामुळे वाया गेला. एखाद्या गंभीर तत्त्वाने आरंभ करून "अमक्याचें असेंच झालें" असलें उदाहरण देण्याचें ललित तंत्र मी येथे गिरवीत नाही—कारण ही सगळींच घटना तितकीशी प्राथमिक आणि परीटघडीची नाही. या देशांतील साहित्यशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि जंतुशास्त्रज्ञ यांनी चिकित्सेंत हात टेकले म्हणून आता ही केस कोणत्याशा अमेरिकन सांस्कृतिक-आणि आत्मिक-साहाय्य-योजनेच्या खर्चिक औदार्यामुळे ओक्लाहामा विद्यापीठाच्या मानस-विकार-प्रयोगशाळेकडे सुपूर्द होणार असल्याची दाट वदंता आहे.

डॉ० वा० ग० साळुंके यांचा हा महान् गुण (अथवा महान् दोष) म्हणजे त्यांची स्मरणशक्ति. तल्लख हा शब्द तिची तारीफ करायला फारच तोकड पडेल. आटोपशीर संततींतहि एखादा क्रमांक (निदान इतरांच्या, विशेषतः शेजारील प्रजेच्या, तुलनेने) स्मरणांत तल्लख असल्याची बढाई कोणी ना कोणी

मातृदेवता पाहुण्यांपुढे मारीत असतेच. पाढे, सनावळ्या, वंशावळ्या, स्तोत्रें, आरत्या, चित्रपटांतील गाणीं, आणि भेंड्या इतपतच या बहुतेक बाल-बृहस्पतींची दुडदुड धाव. पुढची पायरी म्हणजे कोणाला क्रिकेटची सरासरी कंठगत, तर एखादें अकाल तरुण पोरटें गेल्या कांही वर्षांतील सगळ्या हिंदी चित्रपटांतील नायकनायिकांचे द्वंद्वसमास घडाघडा म्हणून दाखवतें. पण हीं कवतिकें घरगुती आणि सामान्य. डॉ० वा० ग० साळुंक्यांचें स्मरणेंद्रिय जन्मतःच बलिष्ठ. असें ऐकिवांत आहे की मातुःश्रींची एकूणएक अंगाईगीतें आणि बाळगाणीं वाचा फुटतांच वासुबाळाने सहीसही अगदी हेलांसकट आणि (खोड्या) बोबड्या उच्चारांनिशी तिच्यावर उलटविलीं. ही दंतकथाहि असेल, पण वयाबरोबर आणि देहाबरोबर वासुदेवाचें तें भयानक इंद्रियहि वाढलें हें खरें. विद्या करूं लागल्यावर त्याला चेव आला. काबूंत राहीना. क्रमिक पुस्तकें 'मे० दायरेक्तर, विद्याखातें यांच्या कोणत्या हुकुमान्वयें तयार केलें असे' येथपासून ते शेवटच्या धड्यांतील स्वाध्यायाच्या शेवटच्या प्रश्नचिन्हापर्यंत, गणिताच्या उत्तर-संग्रहांतील शेवटच्या आंकड्यापर्यंत, आणि अशुद्धांसह मुखोद्गत. वर्गांत गोंधळ. शिष्याला प्रश्न विचारण्याची गुरूंना सोय नाही, कारण या अचाट पाठांतराला पूर्णविराम ठाऊक नव्हता. पुस्तकाबरोबरच तें संपायचें. सवंगडी—पण त्याला कोठचे सवंगडी ?—वर्गबंधु भ्याल्यागत वागत. कसलें तरी निमित्त घडून वासुदेवाला हें स्मरणाचें फेपरें आलें की त्यांचा थरकाप होई. त्याच्यापासून चार हात दूर राहत. आदरहि वाटे, भीतीहि वाटे. वासूऐवजी देव म्हणण्याइतकी त्याची थोर कळा होती. शिक्षणाची इयत्ता वाढत चालली तशी त्याची स्मरणशक्ति चेकाळत होती. तिला अभ्यासाचीं पुस्तकें पुरेनत. शाळेच्या ग्रंथालयाचें कपाट वाळवीसारखें तिने फस्त केलें. नियतकालिकांचा फडशा पाडला; शब्दकोश रिचवले. पुढे उच्च शिक्षण सुरू झालें तरी तेंच. मात्र आता वर्गबंधु (आणि भगिनी) भेदरेनात. उलट कुचेष्टा होऊं लागली. कॉलेजमासिकांत कोणी त्याचें व्यंगचित्र काढलें, त्यांत पुस्तकांच्या चळतीला जीभ फुटल्याचें दाखविलें होतें. साळुंकेला त्याचा राग आला, पण त्या झटक्यांत व्यंगचित्रें आणि विडंबनकाव्य यांवरील सव्वीस पुस्तकांतले लंबेचवडे उतारे धाप लागेपर्यंत त्याच्या तोंडांतून निघाले. आणि मग त्याला स्वतःचाच राग आला. पण त्याच्या हातीं आता कांही उरलें नव्हतें. सर्व कांही शोषून घेणाऱ्या

टीपकागदाइतकीच त्याच्या आठवणीला आवडीनिवडीची मुभा होती. तिला कांहीच वर्ज्य नव्हतें, कसलाच विवेक नव्हता. त्या कैदाशिणीच्या जाचाने त्याचें बाल्य आणि नव तारुण्य मरगळून गेलें होतें. त्यांतून सुटका नाही या भयाण जाणिवेने त्याची उमेद खचली होती...

त्याने हरतऱ्हेचे उपाय केले. ॲलोपथी, होमिओपॅथी, नेचरोपॅथी, इलेक्ट्रोपॅथी, सायकोपॅथी, युनानी, आयुर्वेद, गंडादोरा, जडीबुट्टी, योगविद्या—जें जें ऐकलें तें मनोभावें करून पाहिलें, पण गुण नाही. त्या वैतागांत कोणा चारगट स्नेह्याच्या सल्ल्यावरून एक आक्रस्ताळी प्रकारहि करून पाहिला. स्मृतिशैथिल्यावरील कसल्याशा 'ब्रेन टॉनिक'च्या जाहिरातींत "वि० सू० नकली मालापासून सावध राहा. त्यामुळे तक्रार दुरुस्त होण्याऐवजी वाढण्याचा धोका असतो" हें वाचून मोठ्या प्रयासाने त्या नकली मालाचा शोध काढला, आणि तो नेमाने व सरळपणाने वापरला. परिणाम इतकाच झाला की त्या सगळ्या जाहिराती, आणि तीं सगळीं अनुपानें व वैद्यकें, घट्ट स्मरणांत बसलीं. आणि कांही महिने साळुंकेला जत्रेंत खोक्यावर उभा राहून औषधांचे गुण आणि शिफारसी पुकारणाऱ्या वैदूची अवकळा ओली होती. कधीकधी भान न राहून तो म्हणूं लागे—"वढवाणहून शा० रणछोडदास बुलाखीदास लिहितात–आपले फक्त एक बाटलीने (मोठी साईज्) स्त्रीस बहुत गुण आला. ताबडतोब व्ही० पी० ने तीन बाटल्या (मोठी साईज्) पाठवून देणें... गोंदियाहून बाई शेवंतीबाई वझलवार लिहितात..."

वा० ग० साळुंकेच्या विद्यार्थीदशेंतील अशा आठवणी आणि आख्यायिकांचे तीन खंड सहज काढतां येतील. त्यांनी चावट वाचकांना बरें वाटलें तरी खुद्द नायकाच्या बाबतींत क्रूरपणा केल्यासारखें होईल. व्यंगाचा असा बाजार मांडू नये. पण व्यंगांतीलहि चमक दाखविणारी एखादी कथा सांगायला हरकत नसावी. साळुंकेच्या स्मरणशक्तीचा बोभाटा कॉलेजांत झाला तेव्हा, विद्यार्थ्यांची असूया सोडा, पण अध्यापकादि अधिकारीवर्गांत चलबिचल झाली. कोणी एक फर्डे अध्यापक एकदा वर्गांत अडखळले, मग अडले आणि शेवटीं बुजले; तेव्हा साळुंकेने त्यांची सोडवणूक करून त्यांना रस्त्याला लावण्याच्या स्तुत्य उद्देशाने पुढील वाक्यें खणखणीत म्हणून दाखविलीं. अध्यापकमहाशय लाजले, हसले—पण पुढील क्षणीं चमकलेहि—कारण ज्या (वर्गांत शिफारस न

केलेल्या) पुस्तकांतून आपण पाठ म्हणतों तें उघडें झालें एकूण! त्यांनी पुस्तक बदलून पाहिलें, पण साळुंके वर्गात तींच वाक्यें पुटपुटतो हें त्याच्या ओठांच्या हालचालींवरून त्यांनी ताडलें (निदान त्यांना तसें भासलें)—आणि त्यांना साहजिकच घाम फुटला. शेवटीं, सदरहू साळुंके वर्ग चालू असतां स्वतःशीं वडबडत असतो, त्यामुळे आपलें लक्ष 'डिस्टर्ब' होतें व वर्गाची शिस्त बिघडते, या सबबीवर त्यांनी त्याला कायमचा वर्गाबाहेर काढला. कांही वात्रट विद्यार्थ्यांना तें कोलीतच मिळालें. त्यांच्या चिथावणीवरून पण सद्धेतूने बापड्या साळुंकेने इतर कांही वाग्शूर अध्यापकांच्या वर्गात तोच पराक्रम केल्यामुळे कॉलेजांतून उचलबांगडी—त्याची, अध्यापकांची नव्हे!—होण्याची पाळी आली होती. त्यांतच काल्पनिक वा चुकीचीं अवतरणें ठोकणाऱ्या गुरूंचें आणि पाहुण्या-व्याख्यात्यांचें पितळ त्याने अनेक वेळां उघडें केल्यामुळे मामला आणखी चिघळला! पण त्यांतील कांही गुरु आणि व्याख्याते यांची अशी शोभा होणें हें प्राचार्यांना संस्थेच्या हिताच्या (म्हणजे राजकारणाच्या) दृष्टीने इष्ट वाटल्यामुळे त्यांनी साळुंकेला वाचवलें—एकाच अटीवर की त्यांच्या पठडींतील अध्यापकांच्या तासांना त्याने हजर राहायचें नाही.

साळुंकेच्या या असाधारण स्मरणशक्तीचा कॉलेजने उपयोगहि करून घेतला. वक्तृत्वांतील आंतर्विद्यालयीन चढाओढींत त्याच्यामुळे कॉलेजला पहिलें बक्षीस ठेवलेलें. संमेलनाच्या नाटकांत असें पाठांतर म्हणजे दिग्दर्शकाची केवढी सोय, या हिशेबाने साळुंकेला मोठ्या आशेने काम दिलें. त्याचें पहिलें भाषण जरा लांबटच होतें. तें इतकें अस्खलित चालू झालें की प्रॉम्प्टरला काम उरलें नाही आणि दिग्दर्शक खुषींत आला. पण तें संपतांच थांबण्याऐवजी साळुंकेने इतर पात्रांची—नायिका व कोणी पुरुषपात्र यांचीं—पुढचीं भाषणें त्याच दमांत घेतलीं. पडद्यामागे हाहाःकार उडाला, पण नाटक ऐतिहासिक असल्यामुळे श्रोत्यांना तें उमगलें नाही. तेवढ्यांत मशारनिल्हे नायिकेने प्रसंगावधान राखून चढ्या सुरांत कसलें तरी गाणें (पेटीवाल्याला 'काळी पांच' असें खुणवून) सुरू केलें आणि नाटक सावरलें. या घटनेमुळे त्यापुढील नाटकांत साळुंकेची बदली दर्शनी रंगभूमीवरून विंगमध्ये झाली—अर्थात् प्रॉम्प्टर म्हणून. तें काम त्याने चोख बजावलें—दोन भाषणांमध्ये थांबण्याचें अंगवळणीं पडल्यावर. त्याची ती अफलातून स्मरणशक्ति एकदाची सत्कारणीं लागली.

पण नियतीची बदचाल अशी की त्यामुळेच बापड्यावर प्रेम ओढवलें. त्याचें असें झालें. कॉलेजच्या कोठल्याशा नाटकांत 'दुसरी दासी' ही मूक-प्राय भूमिका करणाऱ्या सुकन्येला आपलीं एकूण साडेतीन ओळींचीं भाषणें ("जशी आज्ञा, ताईसाहेब", "युवराजांची स्वारी येत आहे", "अगबाई, खरंच?" इत्यादि) पाठ होण्याबाबत इतकी दहशत बसली होती की पुस्तकाला स्पर्श न करतां बेगुमानपणे नांदीपासून (राग यमनकल्याण, ताल दीपचंदी) तो तहत भरतवाक्यापर्यंत शब्दन्‌शब्द बिनचूक म्हणून दाखविणाऱ्या या विंगेतील पुरुषोत्तमाबद्दल तिची नको ती भावना झाली. रंगभूमीच्या अंतर्गृहांतील खोट्या प्रकाशांत—आणि—अंधारांत, तेथील संमिश्र सुवासांत आणि बेसूर कोलाहलांत तिने (म्हणजे त्या भावनेने) अंग धरलें. त्यांतच अपघात असा की तिसऱ्या आणि चौथ्या अंकांच्या मध्यंतरांतील रिकामपणीं लताकुंजांच्या विंगला टेकून उभा असतां साळुंकेला आठवणीची उबळ अनावर झाली आणि तो कोठल्या तरी (सामाजिक आणि पुरोगामी) नाटकांतील नायकाने नायिकेला उद्देशून केलेलें एक अतिप्रेमळ भाषण स्वतःशींच, पण खालच्या आणि घोगऱ्या आवाजांत, म्हणूं लागला. त्याच्या कमनशिबाने तें तिच्या कानांवर पडलें व तें तिने अकारण स्वतःला लावून घेतलें,—आणि घोर निर्धार केला. त्यांत स्त्रीच्या उपजत व्यवहारबुद्धीचा हाहि भाग होता की संसाराचे किचकट जमाखर्च आणि कोष्टकें या पुरुषाला छान जमतील आणि तो गाडा हा राजीखुषीने ओढील. असो. जगरहाटीप्रमाणे यथाकाल—किंवा यथावकाळ—तिने श्रीयुत वासुदेव गणपति साळुंकेचें आपल्याशीं लग्न लावलें. झाला हा प्रीतिविवाह अशी इतरेजनांप्रमाणे त्याचीहि समजूत असल्याकारणाने त्याचा आनंद द्विगुणित झाला. तो योग्य काळपर्यंत टिकला असावा. (असें मानण्यास जागा आहे.) त्याच्या अकरा ग्रंथांपैकी पांच पत्नीला अर्पण केलेले असून अकराहि ग्रंथांचे संपूर्ण हक्क तिच्याच स्वाधीन ठेवलेले आहेत. पण हा परिचयलेख त्याच्या सांसारिक गुह्यांविषयी नसून मुख्यतः त्याच्या साहित्यिक, तथा सार्वजनिक, गुणांविषयी असल्यामुळे या अवघड भागावर लौकर पडदा टाकावा हें योग्य!

एकंदरींत साळुंक्यांची विद्यार्थिदशा लौकिकार्थाने चांगली पार पडली. कांही पारितोषिकें मिळालीं. आणखीहि मिळालीं असतीं, पण बेसुमार पाठांतरामुळे परीक्षेंत किमान प्रश्नहि लिहून होत नसत. बी० ए० होण्याच्या सुमारासच

विवाह घडल्यामुळे प्रपंचासाठी शाळेंत विद्यादान आणि उन्नतीसाठी विद्यार्जन असा खडतर जोडउद्योग त्यांनी कांहीं वर्षे केला. एम्० ए० होण्यापूर्वीच दुय्यम शिक्षणव्यवसायांतील एस्० टी० सी०चा दाखला मिळविला. त्याच प्रखर कर्तव्यबुद्धीने राष्ट्रभाषा आणि मातृभाषा यांतील उच्चतम परीक्षा दिल्या. तशाच आणखीहि दोनतीन जुजबी परीक्षांना यशस्वीपणे तोंड दिलें. आणि शेवटीं या सर्व विरुदांवर कळस म्हणून पीएच्० डी०साठी सखोल संशोधन करून 'डॉ०'ची नामपूर्व उपाधि प्राप्त करून घेतली. त्यांच्या प्रबंधाचा विषय 'मुकुंदराज ते माधव जूलियनपर्यंत मराठी कवितेंतील छेकापह्नुति'. या गाढ्या प्रबंधांत ३७१३ अवतरणें उद्धृत केलेलीं आहेत अशी विद्वानांत बोलवा आहे. डॉ० नंतर 'प्रा०' होणें ओघानेच आलें.

आज प्राध्यापक म्हणून डॉ० वा० ग० साळुंके यांची कीर्ति महाराष्ट्राच्या अवघ्या जिल्ह्यांत दुमदुमत आहे, ती निखालस योग्यच. त्यांच्या विद्वत्तेच्या पुरांत विद्यार्थी गुदमरून जातात हें सांगणें नलगे. पण हें ज्ञानदान देखील वर्गाच्या चार भिंतींपुरतें डांबून ठेवण्याचा कोता व्यवहार त्यांच्यांत नाही. लेखनाला त्यांनी कधी नाही म्हटलें नाही आणि भाषणाचें प्रत्येक आमंत्रण मिशनरी चिकाटीने स्वीकारलें. महाराष्ट्रांत असें तालुका-गाव विरळा की जें त्यांनी आपल्या व्याख्यानसत्रांत एकदाहि घेतलेलें नाही. आणि जेथे जातील तेथे श्रोत्यांना थक्क करतात, अशी त्यांच्या वाणीची करामत. दोनदोन तास शब्दाला शब्द असा चिकटून वाहतो की मध्ये श्वासाला शिरकाव नाही. विरामचिन्हें अर्थावरून अंदाज बांधून श्रोत्यांनी मनांतल्या मनांत पुरवायचीं. समस्त श्रोते, भाषणसमाप्तीनंतर कांही काळाने स्वतः बोलूं लागण्याच्या स्थितींत आल्यावर, चकित होत्साते एकमेकांस पुसतात, "अहो! काय हें वाक्कौशल्य" (स्त्रीश्रोतेसुद्धा!). कमींत कमी दीड डझन अध्यक्षांनी त्यांना 'शब्दसृष्टीचे ईश्वर' असें तोंड भरून म्हटलें तें केवळ समारोपाच्या गहिवरांत नसावें. एरंडोलला असा प्रवाद आहे की त्यांच्या एका व्याख्यानानंतर कित्येक दिवसपर्यंत सभागृहांत त्यांचा आवाज घुमत होता. शब्दांची गर्दी ओसरेना, रेटारेटी झाली असावी, म्हणून सगळीं खिडक्यादारें उघडून टाकलीं तेव्हा दिवाणखाना निःशब्द झाला. कोठेहि श्रोते पांगतांना अहमहमिकेने त्यांचें कौतुक करीत— कोणी तैलबुद्धीचें, कोणी चौरस व्यासंगाचें, कोणी ज्ञानाच्या खोलीचें, तर

कोणी विचाराच्या उंचीचें, कोणी पाठांतराचें—तर कोणी भारल्यागत, फुफ्फुसाचें!—आणि हें सगळें लहान वयांत!

—पण डॉ० साळुंक्यांना हा सगळा गौरव आणि गवगवा आंत कोठे तरी खुपत असे. व्याख्यान संपलें, त्याबद्दल स्तुति ऐकली, की त्यांना उदासवाणें वाटे. आपण काय केलें याची खंत वाटे. सांगावयाचें तें राहिलें, नुसतेच खूपखूप शब्द बोललों—त्यांतले बहुतेक दुसऱ्यांचे. हतभागी मिडॅस राजाची ग्रीक पुराणांतील कथा (पृष्ठांकांच्या संदर्भापर्यंत) आठवे. ज्याला तो हात लावील त्याचें सोनें व्हावें असा त्या राजाला दैवी वर होता—पण तो शाप ठरला. कां की त्याच्या जेवण्याचें (जेवण्यापूर्वीच) सोनें होई आणि तो भुकेने तळमळे. तसेंच नाही का आपल्या स्मरणशक्तीचें? त्यांना एक लाजिरवाणा प्रसंग आठवला. व्याख्यानासाठी ते फुरसंगीला चालले होते. पुण्याहून फक्त अर्ध्या तासाचें अंतर—अगदी सदर्न रेल्वेने. गाडी नसेना, आपण वक्तशीर असावें (हा त्यांच्या दुय्यम गुणांपैकी एक) म्हणून रेल्वेचें वेळापत्रक जवळ बाळगलें होतें. प्रवासांत त्याचीं बरींच पानें सहज उलटून झालीं. (वाचनाचें तसें व्यसनच!) फुरसंगीला कसल्याशा मोठ्या नांवाच्या मंडळांत त्यांचें 'भारतीय अश्मस्थापत्याची मूल्यपरंपरा' या विषयावर व्याख्यान सुरू झालें; नेहमीप्रमाणे पाहतांपाहतां (अथवा ऐकतांऐकतां) त्याला तार चढली. हराप्पा आणि महेंजोदाडोचा सखोल परामर्श घेऊन डॉ० साळुंके दक्षिणेंत उतरले, आणि तिरुपतीच्या देवालयशिल्पाचा बारीक कीस काढूं लागणार—तोंच अकस्मात् सांधा चुकला. आणि तिरुपती, चेंद्रगिरी, मुंगिलीपट्टू, पानपाकम्, पकाला, कोट्टिकोटा, शॉर्टहँडपुरम्, पुतलपट्टु, चित्तूर, पेयनापल्ली, रमापुरम्, बोम्मसमुद्रम्, काटपाडी, वेल्लोरटौन, वेल्लोर कॅंटॉनमेंटम् ...अशी गाडी (अक्षरशः) स्टेशनें घेत धावूं लागली. तिला ब्रेक लागेना. भरधाव गाडीवरील ताबा गेलेल्या ड्रायव्हरप्रमाणे साळुंक्यांना घाम फुटला... आपण हें आवरूं शकत नाही हें त्यांना उमगलें...ते अगतिकपणे पुढे जात होते—तुरिंजापुरम्, तिरुवन्नमलाई, अछिच्छनुर, तिरुकोईल्लूर, वेंकटेशपुरम्, अकौंटपल्ली, विल्लपुरम्...असा खडखडाट चालू राहिला. तेविसापैकी बावीस श्रोत्यांना श्रवणभक्तीच्या आवेगांत हा गैरलागू भूगोल खटकला नाही. त्यांना तें इतिहासासारखें वाटलें. (अध्यक्षांचा अर्थात् डोळा लागला होता.) तेविसाव्या

श्रोत्याने मात्र प्रसंग ओळखून शिताफीने वक्त्यांना तांब्याभांडें दिलें. डॉ० साळुंके दोन भांडीं पाणी प्याले तेव्हा स्मरणाची ढास थांबली. व्याख्यानहि तेथेच थांबलें. सवयीप्रमाणे अध्यक्षांनी वक्त्यांची विद्वत्ता उद्धरली...वक्त्याला नको नको झालें होतें. सहज रेल्वेचें वेळापत्रक चाळलें काय आणि तें स्मरणांत घुसलें काय! असे आणखीहि किती तरी प्रसंग आठवले...काय ही उच्छृंखल स्मरणशक्ति! तिची ही गांजणूक कोठवर सहन करणार? बरें, त्या बयेला संधीच द्यायची नाही—तोंड आणि लेखणीचें टोपण बंद—असें म्हटलें तर ती आंतल्या आंत थैमान घालून निद्रा आणि संसारसुख यांचें एकसमयावच्छेदेंकरून खोबरें करीत असे. घुसमटल्यासारखें व्हायचें. आलिया भोगासी असावें सादर, आणखी काय? पण धीर सोडूं नये, उपाय करीत राहावें. काट्याने काटा काढायचा होमिओपॅथी पंथ सध्या ते आचरून पाहत आहेत. म्हणजे स्मरणशक्तीचा ताप आपणच चढवायचा—की तो आपोआपच उतरेल. गेलीं दोन वर्षे डॉ० साळुंके या आशेवर आहेत. अजून तसा गुण नाही (नुसताच ताप चढत आहे!). पण होमिओपॅथी म्हणजे कांही इंजेक्शनची अथवा बाटलीबंद औषधांची अघोर दवाबाजी नाही. तो धीरगंभीर पण टिकाऊ उपाय आहे या श्रद्धेच्या बळावर ते अजून वाचन, लेखन आणि भाषण यांद्वारा स्मरणशक्तीला सैल सोडीत असतात—नव्हे, चेतवीत असतात.

म्हणून हल्ली डॉ० साळुंक्यांचें लाडकें स्वप्न हें की एखाद्या दिवशीं सकाळी उठावें तो स्मरणशक्ति गेलेली. पत्नीचें नांवदेखील आठवायचें नाही. (अहाहा!) मनाला कसें हलकें हलकें वाटेल. जणु नव्या डावाला सुरुवात. आजवर इतक्या कष्टाने गोळा केलेलें ज्ञानहि बरोबर जाईल कदाचित्. जाऊं द्या. ज्ञान म्हणजे स्मृति असें प्लेटो की कोणी तरी म्हणून गेला तें खोटें नाही. कशाला हा अहंकार? प्राचीन भारतांत ठीक होतें. मुद्रण नव्हतें, लेखनावर पूर्ण विश्वास नव्हता; सगळें तोंडी. आपल्यासारखा ज्ञानाचा तोबरा तेव्हा मोलाचा ठरला असता. पण आता ज्ञानावरील आसक्तीमुळे पाठांतराचा लबेदा मागे कां लावून घ्यावा?...चिताडलेल्या स्लेटपाटीसारखें मळलेलें मन...आठवणींचा कलकलाट...स्मरणाचा चिखल, भूतकालाचीं जळमटें आणि कोळिष्टकें ...पूर्वी वाचनांत आलेलीं अभद्रें रूपकें गर्दी करीत...मग स्मृतिनाशाच्या त्या इंग्रजी कादंबऱ्या आणि त्यांतील कल्पना लांबवून तयार केलेले हिंदीपट चित्र

यांच्या गोड-आंबट आठवणी वळवळत. किती सुखी ते नायक—पण दैवाला त्याचें सुख पाहवत नाही; कसला तरी अपघात घडतो आणि तडकाफडकी त्यांची स्मृति परत येते...एवढा धूर्त दुष्यंत, कसें सोयीस्कर विस्मरण जमवलें होतें गृहस्थाने, पण आंगठीचें निमित्त होऊन सगळें संपलें. एकूण काय, 'स्मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' असा डॉ० साळुंक्यांनी संस्कृत सुस्कारा सोडला. निसर्गानेच जें योजिलें त्याला आपण कोठवर विरोध करणार?... समजा, कांही काळ वाचलेंच नाही तर? पण कोण जाणे, आपण वाचलें (अथवा ऐकलें) त्यापेक्षा अधिक आपल्या स्मरणांत रुतून बसलेलें आहे अशी चमत्कारिक शंका त्यांना कधीकधी बेचैन करीत असे. पूर्वजन्मींचें पाप म्हणतात तशापैकीच का हा कांही प्रकार?...पूर्वसंचिताची कल्पना खरी असेलहि. 'जननान्तर-स्मरणानि' बरें. ही अशी त्यांनी स्वतःची समजूत घातली.

पण निसर्ग आणि नशीब यांच्याइतकाच लोकांचाहि त्यांत दोष होता. लहानपणीं ज्याचा प्रामाणिक पोरबुद्धीने उपहास झाला त्याचा मोठेपणीं—कांहीसा भिडस्तपणामुळे आणि कांहीसा धूर्तबुद्धीने म्हणजे अप्रामाणिकपणे—गौरव होऊं लागला. त्यांत केवळ व्यासंगाची चाह असती तर वाद नव्हता. पण माणूस उगाच घडाघडा म्हणून दाखवतो आणि अर्थाचा थांगपत्ता लागूं देत नाही याचीच जणु तारीफ होती. नाही नाही तीं विशेषणें डॉ० वा० ग० साळुंक्यांना लावलीं गेलीं. 'विद्वान्'वर थांबलें नाही. डॉ० मिलिंदकुमार सुं० बोंगाळे यांनी त्यांचा सचित्र परिचय 'मोहन' (या साहित्य आणि पाककला या विषयांस वाहिलेल्या) मासिकाच्या गेल्या अंकांत 'डॉ० साळुंक्यांचें बार्हस्पत्य' या मथळ्याखाली लिहिला आहे तोच पाहा. त्यांत नेमक्या नकोत त्या गोष्टींवर स्तुति पाखडलेली आहे. तिची मजल कोठवर जावी! पावणेसात वर्षांत साळुंक्यांनी अकरा पुस्तकें व तीनशें एकोणतीस लेख लिहिले, हें कबूल—पण त्यांच्या लेखनाची दिवसाची सरासरी ९३·१७ ओळी भरते हें दशांश-प्रकरण कशाला? (त्या लेखाच्या जाहिरातींत 'मोहन'च्या व्यवसायचतुर संपादकांनी 'लेखणीचा ब्रॅडमन्' असें चरित्रनायकाचें वर्णन केलें तें त्यामुळे असावें). व्याख्याते म्हणून डॉ० साळुंक्यांची बहादुरी ही सांगितली की (प्रा० बोंगाळ्यांच्याच भारदस्त भाषेंत) "आचार्य साळुंक्यांच्या वैद्वत्याचें वाग्रूप मानसिक तद्वत्

शारीर प्रतिक्रियांची आविष्कृति करवितें." त्यापुढील सत्तावन्न ओळींचा सारांश (मराठींत) असा की 'श्रोत्यांना येणाऱ्या जांभया या वक्त्याचें ज्ञान पटल्याच्या खुणा आहेत.' ('मानजृम्भा' हा प्रा० बोंगाळ्यांचा मुळांतील शब्द.) त्यांच्या एका व्याख्यानाला म्हणे श्रोत्यांकडून १७२ जांभया व ९७ चुटक्या मिळाल्या. त्याच सुरांत बोंगाळ्यांनी साळुंक्यांच्या लेखनाची तारीफ केली आहे. साळुंक्यांना (आपल्याप्रमाणेच) खूप शब्द माहीत आहेत व अधिकांत अधिक शब्द कमींत कमी अर्थांत बसविण्याच्या त्यांच्या नैसर्गिक सवयीला 'शब्दवात' असें (त्यांच्या मानाने) सुटसुटीत नांव देऊन पुढे "या वात-प्रसरणाने रस-सुखाचें दोंदिल वाढेल' असा आशीर्वादवजा शेरा (थोडासा ज्ञानेश्वराचा आवाज काढून) मारला होता. अन्यत्र त्याच प्रकाराला 'वागुन्माद' आणि 'अक्षरस्राव' म्हटलें होतें. असो. साळुंके झाला तरी माणूसच! असली वेडीवाकडी स्तुति लागून तो कधी बावचळला तर त्यांत कांही जगावेगळें नाही. आपल्याला ज्याची लाज वाटते त्याचीच इतरांनी वाहवा करावी—म्हणजे आपलेंच तर चुकत नसेल, असा संभ्रम त्याला वाटूं लागावा यांत नवल नाही.

या अवस्थेंत डॉ० वा० ग० साळुंके सध्या आहेत. कृतकृत्यतेचें समाधान, उण्याची खंत, सुधारण्याची भीति हीं आलटूनपालटून त्यांच्यावर अंमल चालवीत असतात. पण ते हाडाचे शालीन म्हणून यशाने फुगले नाहीत आणि वृत्तीचे उदात्त म्हणून निराशेने खंगले नाहीत. माझ्यासारख्या स्नेह्यांना त्यांच्या भरीव विद्वत्तेचा अभिमान वाटतोच. पण त्याहूनहि उच्च आदर याचा वाटतो की अशा विषम मानसिक वातावरणांतहि ते शांति ढळूं न देतां आपलें लेखन भाषणाचें व्रत इतक्या कसोशीने पार पाडीत आहेत. हीच खरी थोरवी!

डॉ० वासुदेव गणपति साळुंके यांच्या या परिचयाला परिशिष्ट म्हणून त्यांच्या लेखनाचा एक छोटासा नमुना जोडीत आहोंत. गंभीर पुस्तकें आणि त्याच प्रकृतीचीं मासिकें यांच्याबद्दल भीतियुक्त आदर बाळगून त्यांच्या कधी वाट्याला न जाणाऱ्या वाचकांनी डॉ० साळुंक्यांचें लिखाण वाचलें नसण्याची शक्यता आहे. त्यांनाच आपण साधारण वाचक म्हणतों. अशा साधारण वाचकांना डॉ० साळुंक्याच्या विद्वत्ताप्रचुर, अवतरणखचित आणि संदर्भसंपन्न

शैलीची कल्पना येण्यासाठी त्यांच्या ‘वाग्विश्वरूपदर्शन’ या आगामी ग्रंथांतील (पृष्ठें: ११९ प्रास्ताविक + ४७७ + ८७ परिशिष्टें) फक्त दोनच पृष्ठें (३२७–३२८) येथे उद्धृत करतों. या ग्रंथाचें उपनाम “साहित्यांतील विविध कलाप्रकारांचें ऐतिहासिक, तौलनिक आणि रसात्मक सम्यक्समालोचन”. त्यावरून ग्रंथ-स्वरूपाची कल्पना येईल. उद्धृतभाग “आत्मसुकाळू : तथा लघुनिबंधाची लावण्यकळा” या प्रकरणांतील आहे.

या उताऱ्यांत मुख्य मजकूर थोडा व तळटीपा फार असें कोणास वाटण्याचा संभव आहे. पण त्यांतल्या त्यांत कमी तळटीपा असलेलीं हीं पृष्ठें निवडलेलीं आहेत हें कटाक्षाने सांगितलें पाहिजे. वस्तुतः डॉ० वा० ग० साळुंक्यांच्या लेखनांत तळटीप ही “पायाभूत” आहे, हें प्रा. बोंगाळ्यांचें म्हणणें खोटें नाही. किंबहुना तोच मुख्य मजकूर व वरील सलग ओळीं या केवळ जोड देण्यासाठी असाव्यात (“सातत्याचें सूत्र”—पुन्हा बोंगाळे) असें भासतें. डॉ० साळुंक्यांना फार आवडणाऱ्या साची येथील द्वारशिल्पाप्रमाणे टीपांचे दोन भव्य स्तम्भ व त्यावर छपरवजा, जवळजवळ झालरवजा, आडवें काम असें त्यांच्या बहुतेक छापील पानांचें मनोहर दृश्य असतें (“डॉ० साळुंक्यांचें मौलिक मुद्रण-शिल्प”—पुन्हा एकदाच बोंगाळे). असो. ‘दृश्य’ म्हणून पुढील दोन पृष्ठें डॉ० वा० ग० साळुंक्यांच्या लेखनाचीं प्रातिनिधिक नाहीत हें उघड आहे. पण इतर वैभवांची स्थूल कल्पना त्यांवरून येईल अशी आशा आहे.

[संदर्भः लघुनिबंधावरील या प्रकरणांतील मागील चौदा पानांत ‘निबंध’ शब्दाची फोड, मुख्यतः संस्कृत साहित्यशास्त्राच्या आधारें, पण ग्रीक, तुर्की, आणि प्राचीन मल्याळम्‌मधील समान कल्पना दाखवून, आणि कथ्थक नृत्यांतील बंध तुलनेसाठी योजून, केली आहे. आता पुढे].

लघुनिबंध या शब्दातील निबंध-पदाचें संक्षेपाने निरूपण[1] केल्यानंतर पूर्व-पदाकडे वळावें. लघु या विशेषणाचा लघुत्वपर[2] अर्थ सामान्यपणे केला जातो.

१. निरूपणें परस्तावला। अंतर्यामीं ॥ —स्वामी रामदास, दासबोध ५·७·३

२. लघुत्वमित्यल्पाक्षरत्वम्। अल्पत्वमवैपुल्यादुच्यते। विपुलस्य भावः वैपुल्यम्।
—परिभाषापुराण, ४८·७९

तो गुणवाचक[3] आहे. Brevity is the soul of wit,[4] या अर्थघन इंग्रजी वचनाची मला या प्रसंगीं आठवण होते. Wit चा अर्थ शेक्स्पिअरकालीन प्रचाराप्रमाणे Understanding असा घेतल्यास दुग्धशर्करान्यायाने वचनाचें माधुर्य आणि बलवत्ता अधिकच वाढतील. 'मधुमधुरा तव गिरा' यांतील मधु आणि 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे' यांतील मधु एकाच जातीचा—(quality) नव्हे हें विस्ताराने सांगण्याची आवश्यकता नाही. अर्थाअर्थांत विवेक[5] केला पाहिजे. जेथे 'मतिः श्रुतशालिनी' असेल तेथेच अर्थाचे तरल तरंग "अनुरागाचिये हळुवारपणें" मनःकोशांत प्रवेश करतात. पण ख्यातनाम संस्कृत साहित्यशास्त्रकार विश्वनाथ म्हणतात त्याप्रमाणे "सूक्ष्मः स्थूलमतिथिरसलक्ष्यः"[6] निरुद्योगाचार्यांच्या त्यावरील टीकेंतील "अत्र सौक्ष्म्यं चिन्त्यम्। स्थौल्यं च। असौकर्ममक्षमम्यमिति प्रौढ्यम्।" हें मर्मविश्लेषक विवरण कोणाला मोह घालणार नाही? पाश्चात्य साहित्यशास्त्रांत तर यात्रावत चित्तथरारक परम-सूक्ष्मता दृग्गोचर होते. प्लेटोपासून तो London Times Literary Supplement च्या गेल्या अंकापर्यंत या विषयाची गहिरी चिकित्सा झाली आहे. लक्झेंबुर्गचा मॉ० मूँका (Mooncalf) म्हणतो, "Words have no meaning; they have

३. गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिङ्गं न च वयः।

तसेंच: गुणगुणुनी अशिं गाणीं
फुलविशी गे तव वाणी
का राणी

—कवि वाय्० चंदर, ओंकार सोनापुरे दिग्दर्शित 'हमरस्त्यावर हंबरडा' या चित्रपटांत. फूट ७७१३ ते ७८०१]

४. Wit : (Obsolete) the faculty of thinking and reasoning in general mental capacity, understanding intellect, reason:
—*A New English Dictionary*

५. विवेकहीन जे जन। ते जाणावे पशुसमान। त्यांचें ऐकतां भाषण। परलोक कैंचा॥
—स्वामी रामदास, दासबोध १२·८·२४

६. साहित्यदर्पण, (भां० ओ० रि० इ० आवृत्ति, पृ० ४९, खालून ७ वी ओळ)

only associations"[७]. 'लघु'ची उपहासात्मक छटा येथे किंचितहि भासमान झाली तरी अर्थाच्या नाजूक पाकळ्या कोमेजतील.[८] अभिजात संस्कृत काव्य-नाटकांतील ललना-सौंदर्य सुकुमार चर्णींत आहे.[९] पुष्पमालेच्या आघाताने जिचे प्राण हरण केले ती अज-प्रिया इंदुमति, हरिणबालकांशीं निरागस क्रीडा करणारी तपोवनबालिका शकुंतला, वीणेचा भार असह्य होणारी उदयन-कामिनी वासवदत्ता इत्यादि लावण्यलतिका काय विशालदेहिनी होत्या ? "पुष्पांमाजी पारिजातकु" सूर्यफुलाच्या तुलनेने इवलसें असतें. असो. लघुपदांतील लाघवाचा कोमल ध्वनिहि रसिकमनांत मधुरभाव निर्माण करतो. "भाव बधिरला जीव महिरला" ही गोविंदाग्रजांनीं वर्णन केलेली, पण केशव-सुतांच्या "प्रकाश गेला तिमिर हरपला" याहून वेगळी, अवस्था यांत आहे. "नुसती हुरहुर होय जिवाला कां न कळे कांही" ही बालकवींची अनामिक थरथर त्यांत आहे. अर्थात् "मनांत माझ्या जी हुरहुर, जनांत काढीन तीचा सूर" या गोविंदाग्रजांच्या ओळींतील हुरहूर याहून निराळी हें ग्रहणशील रसिकांस आवर्जून सांगावयास हवें का ? ती तर कविवर्य भास्करराव तांब्यांच्या "कळा ज्या लागल्या जीवा मला की ईश्वरा ठाव्या" या तऱ्हेची (type) आहे

७. प्रा० मंडईकर यांच्या Inter Arts Guide, १९४९ आवृत्ति, पृ० १७६ वर उद्धृत

७ अ. Association : Used generally of the principle in accordance with which ideas, feelings, and movements are connected in such a way as to determine their succession in the mind or in the actions of an individual, or of the process of establishing such connections.
—*A Dictionary of Psychology*, p. 20

७ ब. शब्द म्हणजे न अर्थु । शब्द म्हणजे परिमळु ॥ या सखदेवाच्या अर्ध-ओवीवरून (सखदेवी, ९·१४) प्राचीन मराठी साहित्यकारांनाहि या नवतत्त्वोन्मेषाचा ओझरता स्पर्श झाला होता असें म्हटल्यास तें वावगें ठरेल का ?

८. "हाय हाय रे फुला,
काय जाहलें तुला." —कवि सदा वसंत ('फाटकें काळीज' पृ० १८) यांच्या या उदास-कातर ओळींचें स्मरण या क्षणीं न होणें अशक्य.

९. "नायिका तन्वी अल्पावयवा च"—रुय्यक

या लाघवाच्या, या मधुरभावाच्या आणि तरल आत्मीयतेच्या मंद सुगंधाने लघुनिबंधाचा आसमंत दरवळून गेलेला असतो.[१०] चोहीकडे आत्माराम या सुवासांत[११] लघुनिबंधकलेचा नितळ अर्क आहे. त्याची चिकित्सा शब्दांत कशी सामावणार ![१२] ती या कला-पुष्पाची निसर्गप्रकृति[१३] आहे. तें लावण्य आगळेंच[१४] आहे. त्याचें विवरण[१५] करणें हें "कठिण कठिण कठिण किती" हें सांगणें नको. त्याचें रंगरूप असें की हळवें मन व्यामोह-व्याकूळ व्हावें. दगडांवर पडलेलें आश्विनी चांदणें हें दूध समजून चाटणाऱ्या हरिणांची प्रतिमा बालकवींच्या अंतरांत सदैव नृत्य करीत असे. "जैसे शारदीयेचे चंद्रकळे माजीं अमृतकण कोंवळे ते वेंचिती मनें मवाळें चकोरतलगें." या ज्ञानेश्वरींतील प्राथमिक अवतरणांत तीच मृदु भावना आहे.[१६] या भावनेचा विलास लघुनिबंधवाचकाच्या अंतःकरणांत सुरू झाला की आनंदाचें भरतें येतें.[१७]

१०. फुलपाखरें परोपरी निर्वेधपणे फुलांवरी
जशीं स्वयें तरलित होती मंद तरल गंधावरती—बालकवि

११. Perfume—Substances, generally of complex composition, which by reason of their fragrance gratify the sense of smell'—*Encyclopaedia Britanica, Vol. 17th* (*P to Plan*) *14th Ed.*

१२. "केउता कल्पतरूवरी फुलौरा। कायसेनि पाहुणेरु क्षीरसागरा
ऐसा कवणेवासीं कापुरा। सुवासु देवो॥ —ज्ञानेश्वरी १०.११

१३. शैत्यं हि यत्सा प्रकृतिर्जलस्य—कालिदास, रघुवंश, ५·५४

१४. अन्यत् सौकुमार्यमन्यैव च कापि वर्तनच्छाया।
श्यामा सामान्यप्रजापतेः रेखैव च न भवति ॥ —(काव्यप्रकाश, पृ० ६९)

१५. विवरतां विवरतां मनाचे फडके होतो" —दासबोध, २०·८·२८

१६. कपाले मार्जारः पय इति करांल्लढि शशिन-
स्तरुच्छिद्रप्रोतान् विसमिति करी संकलयति।
रतान्ते तल्पस्थान् हरति वनिताप्यंशुकमिति
प्रभामत्तश्चंद्रो जगदिदमहो विप्लवयति। —शाङ्‌र्गधरपद्धति.

१७. "As a vale is watered by a flood"—Shelley

नवतारुण्याची अवघी नव्हाळी त्यांत आहे; तेथे विचाराला (thought) थारा नाही. चांचल्य, अधीरता, मादकता यांचीच ती कोवळीक जणु घडलेली आहे. "For having lost but once your prime You may for ever tarry"— Robert Herrick *(Oxford Book of English Verse, page 267)*[१८] ही यौवनपूजा, ही जीवनोन्मुख वृत्ति, याच्या अंगोपांगांत भिनली आहे. चंद्र आणि कमळ यांच्यांतील परस्पर-बंधासारखें हें लघुनिबंधकार आणि रसिक यांच्यांतील भाव-निबंधन आहे.[१९] "Melting of melodious words" यासारखेंच हें कांही तरी आहे.[२०] त्याचें अधिक वर्णन काय करावें ?[२१]

लघुनिबंध या नामविशेषाची मी आतापर्यंत जी सूत्ररूपाने[२२] चर्चा केली तिच्यावरून त्या साहित्यप्रकाराचें स्वरूप ध्यानांत येईलच. या चर्चेने जो प्रकाश पाडला आहे त्याला "वाट पुशीत" आपण त्याच्या अंतर्गृहांत जाऊं. एकूण "निश्चयेविण जें बोलणें। तें अवघेचि कंटाळवाणें। बाष्कळ बोलिजे वाचाळपणें। निरर्थक" हें समर्थ रामदासस्वामी म्हणालेच आहेत. (दासबोध, ५.१०.२५).

१८. याला समांतर संस्कृत सुचतें तें असें :
"विरम प्रसीद सुंदरि यौवनमनिवर्ति यातं तु ।"

१९. दिट्ठे वि हु होई सुहं जइ वि न पावंति अंगसंगाइं ।
दूरट्ठिओ वि चंदो सुणिव्वुइं कुणइ कुमुयाणं ॥
—वज्जलग्गं, ७८

२०. खोलखोल आहे भारी माझ्या मनाची वारव
फसाल हो जाऊं नका बघावया तळठाव !—शांता शेळके

२१. फुलां फुलसरां लेख चढे । द्रुती दुजी अंगुली न पडे
. . .
कैसा झकविलों असलगपणें । अक्षरांचेनि—ज्ञानेश्वरी,

२१ अ. "The essay evades description"
—Bob Mac Hover
("How to Enjoy The Essay" Chicago, 1952, P. 17)

२२. "स्वल्पाक्षरमसंदिग्धं सारवद् विश्वतोमुखम् ।
अस्तोभमनवद्यं च सूत्रं सूत्रविदो विदुः ॥"

१

# बेबी गोष्ट लिहिते

बेबी म्हणजे आमची—पण नांव नको, उगाच अवघडल्यासारखें व्हायचें तिला. म्हणून आपण तिला 'बेबी'च म्हणूं. तें अर्थात् तिचें घरांतलें लाडकें नांव. लहानपण केव्हाच ओसरलें, पण कौतुक सरलें नाही तेव्हा तें चिमणें नांवहि रेंगाळलें. म्हणजे ती फार मोठी अगदी 'बाई' झाली आहे असें नाही कांही. नेमकें वय कशाला? असें म्हणा ना की आपल्या बहुतेक नायिका असतात (जुन्या घाटाच्या) त्या चमत्कारिक वयाच्या आसपास आहे ती.

म्हणूनच असेल कदाचित्, बेबीची आई तिला फार हळुवारपणे वागवते; तिचे खुळे रुसवे-फुगवे सांभाळून घेते. कोणीहि आई करते म्हणा—(हें उगीच लिहायचें.) पण बेबीची आई हाडाचीच मायाळू; त्यांत एकुलतें अपत्य आणि खरें म्हणजे (एकंदरीने) फार गुणी. इतकें की सगळ्या घरादाराला तिचें कौतुक आहे. कोणी मनांत ठेवतात, कोणी जनांत सांगतात, इतकेंच. आणि बाहेर-देखील, मैत्रिणी सोडल्यास, तिची मोठी वाहवा. मैत्रिणींना थोडा मत्सर वाटणारच; एरवी त्याहि जीव लावतात.

बेबीच्या इतर गुणांशीं येथे कर्तव्य नाही. मी सांगणार आहें तिच्या गोष्टी लिहिण्याविषयी. (तिला नाही आवडणार हें—म्हणजे तिच्या नाजुक, फुलक्या लघुकथांना 'गोष्ट' हा धोपट, भरड, शब्द लावणें! पण तो दुसरा संभावित, छापील, शब्द येथे नको.) ती म्हणे गोष्टी सांगायला लागली अगदीच लहान्या

वयांत. आयाबाया अचंब्याने ऐकत, आणि दृष्ट काढायला आईला बजावत. दृष्ट तरी कितीदा काढायची? पोर त्याच गोष्टीला दर वेळीं नवी नक्षी द्यायची. आणि पुन्हा बोलणेंहि वयाला साजेलसें बोबडें नाही. अगदी बिकट शब्द, जोडाक्षरांसुद्धा, स्पष्ट, आणि लयींत आणि फाडफाड. तिची हरएक राजकन्या "अत्यंत सुंदर" आणि हरएक राजपुत्र "अत्यंत पराक्रमी" असे; आणखी पुष्कळसें "अत्यंत" असे, आणि हें दोन-सव्वादोन वर्षांत. नवव्या महिन्यांतच तिला बोलणें फुटलें अशी तिच्या आईची आठवण आहे. आठवण आणि त्यांत प्रेमळ माउलीची, तेव्हा महिन्या दोन महिन्यांची चुकभूल सोडली, तरी तें पुन्हा पुन्हा गिरवावें असें आहेच. वर्षा दीड वर्षांत कन्यारत्नाला शब्द आवरेनात. आई कधी कंटाळून म्हणे, कधी अभिमानाने, "आमच्या बेबीला गोवर-कांजिण्या नाही, सर्दी-पडसें नाही, दात-दाढांचा त्रास झाला नाही, तिला त्रास झाला फक्त जिभेचा." लिहिणेंहि अकालीं आलें; किमान वयांत विद्या सुरू झाली. तेथेहि एकंदरीत ऐकण्यापेक्षा सांगण्याकडेच वृत्ति अधिक. बेबीच्या गोष्टींनी शाळा गजबजून जाई; बाळगोपाळ खूष—आणि गुरुजनहि खूष, कारण त्यांना तोंडकामाठींत तेवढीच सूट!

—मग बेबी गोष्टी लिहूं न लागती तरच नवल. त्यांतच एखाद्या सत्प्रवृत्त गुरूचा उत्साह, आणि शिवाय घरची भर. तसें कांही केलें तर "अभ्यास सोडून शिंचं कांही तरी खरडतं" असें श्रीमुखांत वाजण्याचा तीर्थरूप काळ जाऊन "आमचं बबडं कनी कसं छांछान लिहितं"—चा मॉन्टेसरी जमाना उगवला होता. जाणत्या मासिकांनीहि, रुचिपालट म्हणून, मधूनमधून पोरां-सारखें लिहिणाऱ्या प्रौढांऐवजी, प्रौढांसारखें लिहिण्यास झटणाऱ्या पोरांना संधि देण्यास सुरुवात केली होती. लेखनवयाच्या एका गटांतून वरच्या गटांत बेबी पटापट उड्या मारूं लागली. पहिलें बक्षीस ठेवलेलें. आणि छापलें जात असे तें खरोखरीच तिने लिहिलेलें असे. त्यावर कोणाच्या उत्तेजनाचा हात फिरलेला नसे. तिची लेखणी मुळांतच मोठ्या चणीची, जरा थोराडच. ती कोठेहि उठून दिसे. आईला आभाळ ठेंगणें होई.

बोलण्याप्रमाणें बेबीचें लिहिणेंहि कधी फारसें बोबडें नव्हतें. ती चिमुरडी होती तेव्हाच सानेगुरुजींची लाट येऊन गेली; तिच्यांत जेमतेम बुचकळी मारून ती बाहेर पडली; त्यांत डुंबत राहिली नाही. पशुपक्ष्यांवर लिहिल्यासारख्या

माणसांविषयीच्या कनवाळू कहाण्या तिने त्या घटकेला लिहिल्या. पुढे ती त्यांतून कोरडी बाहेर पडली तरी त्या प्रकृतीचे कित्येक संपादक तिच्याविषयी अकारण, पण तिच्या वयाला साजेलसें, लाडेलाडें लिहीत राहिले.

बेबीने कविताहि खूप वाचली, पचवली. तीसुद्धा खरीखुरी, वाढलेली, कविता; पिकुटलेलीं, हिरवट, मुरकणारीं, गाणीं नव्हेत. कठीणपणाने ती गांगरली नाही; कठीण सोपें सगळें कंठगत. जरा टिचकी मारतांच भडाभडा म्हणून दाखवी. पण हेंहि खरें की सदैव तिन्हीसांजा किंवा चांदण्याची शुभ्र जाळी असल्यासारखी ती तेव्हा वावरे. वयपरत्वें तें व्हायचेंच.

—आणि त्याच सुमारास नव्या कथेची वावटळ सुटली. झालें. बेबी अगोदरच 'तसल्या' काव्याचें वारें प्यालेली. आता तिची लेखणी भिरभिरली. कागदावर ठरत ना इतके शब्द तिला ठाऊक, पण त्यांच्याशीं तिचें पटेना. ते तिला थिटे वाटूं लागले. आणि झिजलेले आणि गुळगुळीत. ती आता गोष्टी सांगण्याइतकीच गोष्टीविषयी सांगूं लागली. ती अशा तिडिकेने की कोणी चकित होऊन ऐकत, कोणी सुन्न होऊन. म्हणे कशी, "शब्दांच्या लोढण्यांनी कथा खचते. ती शब्दांच्या आरपार जायला पाहिजे..." एकदा तर तिरी-मिरीने म्हणाली, "शब्दांचीं कवचें फोडून आंतला अर्थाचा पिवळा बलक हवा मला." (तेव्हा तिच्या आईनेदेखील नाकाला पदर लावला!) तिच्या मतें शब्दांपेक्षा दोन शब्दांतील आणि दोन ओळींतील कोऱ्या जागेंत ("शुभ्र निःशब्दांत") अधिक अर्थ वसवतां येतो. ("आशयाच्या मुक्त विस्ताराआड अक्षरांचे कंस येत नाहीत.") किंबहुना "अक्षरांपेक्षा टिंबें आणि विरामचिन्हें हीं अधिक अर्थवाही" असा तिचा दावा—आणि आताशा तिच्या लिहिण्याचें रूपहि तसलेंच होऊं लागलें होतें. पान कसें मोकळें मोकळें दिसे.

आणि कांहीसें एकाएकीच तिचें बाललेखिकापण संपलें. आणि ती साहित्याच्या खुल्या जगांत आली. तीहि होतकरूपणाची पायरी टाळूनच. जणु एकदम 'प्रथितयश'. तोपर्यंत शाळा-कॉलेजचीं नियतकालिकें, कोठे एखादें स्थानिक साप्ताहिक, एखादा जिल्हासमाचार, ओळखीपाळखीच्या संपादकांचीं धडपडीं मासिकें, असल्या सुमार प्रकाशनांवर ती संतुष्ट असे. मोठ्यांच्या पंक्तीकडे तिने आशाळभूतपणे पाहिलें नाही. तसलेच चारदोन दिवाळी अंक तिच्या लेखांना मागणी घालत तेव्हा भोवतालच्यांना केवढा अभिमान वाटे!

ज्यालात्याला सांगत. पण ती महिरून गेली ती मुंबईच्या 'नवी पातळीं'च्या संपादकांकडून मागणीपत्र आलें तेव्हा! तिला खरेंच वाटेना क्षणभर. त्या मासिकाचीं ती भाविक पारायणें करी— आणि आता तिचेंच लिखाण त्यांत येणार! मोठा चोखंदळ संपादक तो; दर्जा नसला तर लिखाणाला हात लावणार नाही असा त्याचा लौकिक. त्याने ओळखली तिच्या लेखणीची ताकद एकूण. बेबीची पहिली कथा 'नव्या पातळीं'त आली तेव्हा तिला वेड्यासारखें झालें. आणि एकामागून दुसरें. पुण्याच्या 'आकार' या केवळ उच्च साहित्याला वाहिलेल्या छोट्या मासिकाच्या नामवंत संपादकाचेंहि आग्रहाचें पत्र आलें... मग हा आणि तो; तालुका-गावें आणि जिल्ह्याचीं शहरें मागे पडलीं. पुण्या-मुंबईच्या मोठमोठ्या मासिकांचीं आमंत्रणें धरणें धरूं लागलीं; खपाने मोठ्या मासिकांचीं आणि नांवाने मोठ्या मासिकांचीं. खास अंक म्हणूं नका, दिवाळी अंक म्हणूं नका...पाहतांपाहतां हें घडलें. कृतकृत्य झालें. खाशा पंक्तींत पान मांडलें गेलें. आईला तर आपल्या लेकीला कोठे ठेवूं नि कोठे नको असें झालें. भरभरून यायचें तिला...आणि तें पाहून बेबीहि फार फार सुखावून जायची, किंबहुना त्यानेच अधिक...

पण आईला बेबीच्या गोष्टी मात्र आता समजेनातशा झाल्या. पूर्वीप्रमाणेच, गोष्ट सुचली की बेबी आईला ती सांगे; घरांतील इतर मंडळीहि असत. त्यांनी होकार भरला की मग पुढे लिहिण्याचें. आता सगळे उत्साहाने मोठा होकार भरीत. बेबी अर्धेंकच्चें कांही लिहिणार नाही हा सगळ्यांना विश्वास. प्रत्येकाला वाटे, आपलें ऐकतांना कोठे दुर्लक्ष झालें असेल, एखादा दुवा चुकला असेल. कधी अर्ध्यावरच गोष्ट संपलीशी वाटे. मग धीर करून आई विचारी, "बेबी, पुढे काय?" झालें, बेबीचें बिनसलेंच; विरजण पडल्यासारखें होई.–ताडताड बोले..."हो! पुढे काय? सांगूं? पुढे लग्न झालें, ढुम्ढुम् वाजलें. चार पोरें झालीं..." बेबीच्या डोळ्यांत पाणी येई, आणि ती पाय आपटीत निघून जाई. मग इतर मंडळी आईलाच चापीत. "अहो, बरोबर आहे; आता काय ती काऊ-चिऊच्या गोष्टी लिहिणार? तुमचें आपलें कांही तरीच." बेबीची मावसबहीण विमल तिच्याहून जरा लहान. आपल्या या अक्काचा तिला फार अभिमान; नेहमी तिच्या पाठीपाठी करायची. ती कशी म्हणे, "मावशी, अक्का आता गोष्टी नाही लिहीत, कथा

लिहिते. त्यांना लघुकथा म्हणतात. त्यांत कांही पुढेबिढे होत नसतें.”
आईलाहि तें तात्काळ पटे विचारीला. ती मग बेबीला आवडणारें थालिपीठ
लावी आणि तिला समजावी. आणि त्याने खुललेली कन्या मातेला समजावी,
“त्याचं असं आहे, आई, कथेला कथानक नसतं, म्हणजे काय की बाह्य घटना
नसतात. समजलं? जें घडतं तें आंत. एखादाच अनुभव घ्यायचा. त्याच्या
सूक्ष्म छटा टिपायच्या; त्याचे नाजुक पापुद्रे हलक्या हाताने उलगडायचे. कळलं?
त्याच्या प्रतिक्रियांचा शोध घ्यायचा. म्हणजे असं बघ की जलाशयांत लहानसा
खडा टाकला तरी त्यांतून तरंगांचीं वलयं पसरतात, नाही का? तीं पृष्ठ-
भागावरचीं. त्याशिवाय आंत पाणी ढवळलं जातंच...आणि तें सर्व प्रतिमांतून
व्यक्त करायचं असतं, आई.” मग विमलहि असेंच अंतर्मन वगैरे कांहीसें
बोले. तें कळण्याआधीच, किंबहुना ऐकण्याआधीच, आईला पटलेलें असे.

तिला खरें पटलेलें असे तें हेंच की आपली बेबी लिहिते तें फार फार चांगलें
असतें; मग तें आपल्या आवाक्याबाहेर कां असेना, आपली गोष्टींची तहान
न का भागेना! बेबीने याहून चांगलें लिहिलें पाहिजे, तें मला समजायला
नकोच. मला बेबी समजते. ती रागावली, त्रासली, बडबडली तरी तें वर-
वरचं; आंतून ती लहान मुलासारखी मोकळी आणि प्रेमळ आहे. आणि
लिहिणं कांही सोपं नसतं. आम्हांला एक कार्ड लिहायचं म्हणजे केवढे कष्ट.
मग तिला काय होत असेल? आणि त्यांतहि उगाच कांही पोरांसाठी लिहिणं
नाही, ‘नव्या पातळी’साठी लिहायचं. गोष्ट—म्हणजे कथा—लिहायची, पण
तिच्यामध्ये कांही घडतां कामा नये. गूळसाखर न घालतां गोडधोडाचं
करण्यासारखंच तें. चेष्टा नाही...एकेका गोष्टीने कशी सुकून जाते पोरगी.
कांही तरी सुचतं, मग तें घोळवायचं, वाढवायचं...चारचार दिवस जेवणा-
खाणांत लक्ष नसतं. झोप नाही धड. आणि शेवटीं लिहायला बसली की डोकें
हातांनी दाबून लिहावें लागतें...पिळवटून लिहिते. एकेका शब्दासाठी तडफडते.
बघवत नाही अशा वेळीं तिच्याकडे...तिला सांभाळलें पाहिजे...

त्या दिवशीं अशीच बेबी गोष्ट लिहायला बसली होती. गेले तीनचार
दिवस ती अस्वस्थ होती; एकटीएकटी राही, अपरात्रीं गच्चीवर कोठे तरी एक-
टक पाहत उभी राही. अन्न चिवडून उठे, त्रागा करी. शेवटीं त्या सकाळीं,
खरें म्हणजे पहाटेच, बेबी लिहायला बसली. आईला गदगदा हालवून तिने

जागें केलें. म्हणाली, "आई, आता मूड आली आहे. आता मी दार लावून लिहायला बसणार. कोणी यायचं नाही त्या बाजूला, की गडबड नाही करायची. अगदी जेवायलासुद्धा हाक नाही मारायची. तूं सांग सगळ्यांना—" पण सगळ्यांनी तें ऐकलें होतें; अपेक्षित होतेंच या सुमारास तें, आणि बेबी तारस्वरांत आईशीं कानगोष्टी करीत होती.

आईने लगबगीने उठून चहा केला. त्यांत कोठे जरा दूध कमी की जास्त पडलें म्हणून बेबीचा नूर गेला आणि खायला करून देऊं का म्हणून विचारलें तेव्हा तर तिचा भडका उडाला. तिला खरोखरच म्हणायचें होतें, "माझ्या कथेला उकळी फुटली आहे, आणि तूं कसली खाण्याची गोष्ट काढतेस ?" आई गप्प बसली. तिला म्हणायचें होतें, "रिकाम्या पोटीं लिहूं नये बेबी; आणखी त्रास होईल तुला." बेबीने धाडकन् खोलीचें दार लावून घेतलें. घराला जाग आली. जो तो न बोलतां एकमेकाला बजावीत होता, 'आपली बेबी गोष्ट लिहायला बसली आहे, गडबड करूं नका कोणी...'

तिकडे खोलींत बेबी सगळें साहित्य पुढ्यांत घेऊन बसली होती. आखलेले कागद आणि तिच्या आवडीची गर्द निळी शाई भरलेलें तिच्या आवडीचें 'शेफर्स' पेन आणि कसलींशीं चारपांच फुलें. त्यांचा वास घेऊन तीं चुरगळलीं जात होतीं. पूर्वेकडच्या खिडकीशीं पुन्हापुन्हा उभी राहून बेबी पहिला उजेड फुटतांना पाहत होती. पेनमधील शाई दोनदा काढून पुन्हा भरली गेली. एकेका कागदाला अनेकदा दुमडून समास पाडले गेले. खुर्चीवरच्या बैठकीच्या विविध तऱ्हा झाल्या. डोकें तर कितीदा दाबून धरलें. आणखी काय काय केलें. पण 'मूड' आली होती तरी ठिणगी पडेना. नुसतेंच धुमसत होतें. नाकाडोळ्यांतून पाणी येऊं लागलें.

—मग बेबीने तो राग काढण्याचा मनोभावें प्रयत्न केला. प्रथम खुर्चीवर; ती उंचसखल झाल्याचें वाटलें म्हणून. मग पेनवर, आणि दौत तर उपडीच केली. आता बरबटलेल्या कागदांचे दातओठ खात बोळे करून टाकणें आलेंच; आणि डोळेहि अधिकच वाहूं लागले. त्यांच्या कडा पुसून बेबीने खिडकींतून खाली वाकत आईला तापलेल्या आवाजांत म्हटलें, "आई, कोण मूर्ख बंबांत विस्तव घालतोय तिथं ? सगळा धूर झाला आहे इथं." आईने काय म्हटलें तें नीटसें ऐकूं आलें नाही, पण बेबीच्या आवाजाचा ताप चढतच राहिला.

"तुला काय? इथं माझा धूर कोंडून प्राण जाईल. तोंपर्यंत तूं कांही करणार नाहीस." यावर आईने वर येण्याची तयारी दाखवली असावी—कारण बेबी आणखी ओरडून म्हणाली, "कोणी यायचं कारण नाही, माझं मलाच भोगलं पाहिजे." आणि खिडकींशीं उभी राहून बेबीने डोळ्यांतून पुष्कळसें पाणी काढलें. न पाहतांहि आईला तें कळलें. त्या माउलीला माहीत होतें की याचा अर्थ बेबीला लिहिण्यापूर्वीच्या वेदना होत आहेत; तिच्यावर रागावून उपयोगी नाही, उलट तिलाच सावरलें पाहिजे. मग तिने बेबीसाठी चहा करून विमलच्या हातीं पाठवला—तिला अशा वेळीं लागे तसा कडक चहा. दारावर विमलने टकटक करतांच बेबी कडाडली, "कोण आहे? मला कोणी नको आहे." विमल आहे असें समजतांच, "चालती हो! तूं कशाला आलीस तडफडायला?" चहाहि आहे असें समजतांच "ओतून टाक तो चहा मोरींत!" पण विमलने थोडा नेट धरतांच, बेबीने तिला चहासकट आंत घेतली आणि तो कढत चहा शक्य तेवढा घटाघट पिऊन झाल्यावर तिला बाहेर काढली. तेवढ्या अवधींत विमलने विस्फारल्या डोळ्यांनी खोलीभर पाहून घेतलें. पांचसहा कागद जमिनीवर पडले होते—कोणावरच दोनतीन ओळींपलीकडे लिहिलेलें नव्हतें. ते उचलून वाचण्याचा मोह आवरेना; पण तिने तो आवरला, कारण अक्काचा स्फोट होईल हें ठाऊक होतें तिला; मग तिचें कथा लिहिणें अधिक लांबेल...

बेबीने धाडकन् दार लावून घेतलें. मधली कडी आणि वरची खीळ लावली. कागदाचा बोळा कोंबून खिडकीची किरकिर बंद केली, आणि बेबी पुन्हा एकदा टेबलाशीं बसली. चहाचा शेक आंत छान बसला होता...आणखी दोनतीन कागद टाकून दिल्यावर बेबी लिहूं लागली—

विमल बाहेरच घुटमळत होती. जरा वेळाने, श्वास ओढून, तिने फटींतून पाहिलें—आणि लगबगीने जाऊन तिने दबलेल्या आवाजांत सगळ्यांना वर्दी दिली की जमलें अक्काचें, खरोखरच बसली लिहायला ती. आईला फार बरें वाटलें, आणि इतरांनाहि. फक्त विमलचा कोणी आते की-चुलतभाऊ भेटायला आला होता त्याने बेबीच्या या लेखन-स्तोमाविषयी अल्पशी शंका प्रदर्शित केली. तेव्हा विमलने त्याला ऐसा झाडला—"म्हटलं, अक्कासारखी लघुकथा लिहायची म्हणजे तुमचे कॉलेजचे फडतूस निबंध लिहायचे नाहीत. ही

लघुकथा म्हणजे...” विमलचा आवाज खणखणूं लागल्याचें ध्यानांत येतांच सगळ्यांनी शूः शूः करून तिला एकसुरांत दाबलें; त्या बापड्या कोणत्याशा भावानेदेखील. बंद खोलींतूनहि तीव्र शूःकार आला; पण शब्दांची फैर मात्र आली नाही—बेबी लिहिण्यांत व्यग्र होती.

—बेबी लिहीत होती, खोडत होती. एकेका शब्दासाठी वीस वीस मिनिटें डोकें धरत होती. पण तसला खडक फुटला की कांही वेळा झुळझुळ शब्द वाहत...पुन्हा अडथळा, पुन्हा डोकें धरणें...शब्द, शब्द, शब्द! मध्येच एखाद्या वाक्यावर काट, कारण तसलें आजवर फार जणांनी लिहिलें होतें. शिळीं, पचपचीत विशेषणें नकोत; भाषेचे गंजलेले साचे मोडून टाकले पाहिजेत. गीत ‘नादमधुर’ नको, मुद्रा ‘मोहक’ नको; नायिकेने अठराव्या वर्षात ‘पदार्पण’ करायला नको. नव्या प्रतिमा हव्यात; भाषा नव्या वळणाने लवली पाहिजे—

बेबी भाषा लववीत होती. कष्टाने, अट्टाहासाने; शब्दांच्या अनपेक्षित जोड्या जमवीत होती. ‘वेगळें’, ‘आगळें’ लेखन करीत होती. तें तसें आहे या होषांत आसमंताची आठवण विसरली ती. रागवायचेंहि विसरली. दाराबाहेरच्चीं पावलें तिने ऐकलीं नाहीत, खिडकींतून ऊन अंगावर आलें त्याचे चटके लागले नाहीत. पूर्ण तंद्री लागली होती.

नऊ वाजून गेले; दहा वाजले. आईचा जीव कासावीस होऊं लागला. ती दोनतीनदा मांजरपावलांनी खोलीपाशी येऊन गेली. बेबीने कांही खाल्लें नव्हतें. खरें म्हणजे गोष्टीचे वेध लागल्यापासून, दोन दिवस, ती अर्ध-उपाशीच होती. तिच्यासाठी आता तिखट सांजा केला होता. अगदी तिला हवा तसा झणझणीत. पण नेऊन द्यायचा कसा? पुन्हा बिनसायचें आणि गोष्टीवर पाणी पडायचें...आणखी खरं म्हणजे, इतरहि कुणाला भूक नव्हती; सगळेच ताटकळत होते—गोष्टीसाठी.

आणि बेबी बाहेर आली तेव्हा अकरा वाजून गेले होते. थकलेली, घामेजलेली, अस्ताव्यस्त, पण अगदी प्रसन्न. तीनचार कागद तिने लहान मुलाने आवडीचें खेळणें धरावें तसे घट्ट धरले होते. सगळे जण जमले. ते तिच्यापेक्षाहि अधीर होते. कागदांकडे पाहत, तिच्या तोंडाकडे पाहत, एकाग्रपणे ऐकूं लागले...

गोष्ट वाचायला पांचसहा मिनिटें लागलीं असतील-नसतील. छोटीशीच, हळुवार गोष्ट होती ती, आणि बेबीने वाचलीहि आपल्याच तालांत. सर्व जण खूष झाले आणि एकमेकाला तसें सांगूं लागले. सर्वांना भुका लागल्या. आईने बेबीच्या पुढ्यांत सांजाने भरलेली बशी ठेवली, वर खोबरें आणि कोथिंबीर. तिला बोलवत नव्हतें. बेबीलाहि. तिने दोन चमचे बळाने तोंडांत लोटले आणि पाणी पिऊन ती तिथेच आईच्या मांडीवर डोकें टेकून लेटली.

आईच्या डोळ्यांत आनंदाचीं आसवें होतीं, पण त्यांत चिंतेची छटाहि होती. कसें होणार या पोरीचें? किती सुकली ती एका गोष्टीने, डोळ्यांभोवती कशीं काळीं वर्तुळें जमलीं होतीं? काय ही शब्दांची कुसर? आणि एवढ्याशा वयांत? काय बरें गोष्ट होती? नीट आठवेना तिला. कोणी तरुण मुलगी तिनीसांजाची वडाच्या भल्यामोठ्या झाडाखाली पांच मिनिटें कोणाची वाट पाहून गेली इतकेंच. त्यावर सगळें रचलेलें—आणि तें किती नाजुक, नाजुक... कुणाची दृष्ट लागेल.

...आपल्या मांडीवरच्या त्या श्रांत मुखाचें चुंबन घ्यावें असें तिला क्षणभर वाटलें. पण आपल्यांत असें करत नाहीत. एवढी मोठी मुलगी—पण केवढी लहान!

१०

## फुकट्या मारुती

यंदाच्या जलप्रलयांत पुण्यांतलें बरें आणि वाईट काय काय वाहून गेलें याची मोजदाद अजून संपलेली नाही. वाड्यांपासून ताटवाट्यांपर्यंत नुकसानीचे हिशेब तयार होत आहेत. भरपाई, मदत, सगळें ठीक चालू आहे. जुन्या वास्तू नव्या वेषांत, किंवा जुन्यालाच ठिगळें लावून, उभ्या राहतील लवकरच; कांहींना स्थलांतर करावें लागणार. पण एका जुन्या देवस्थानाचा मात्र ठावठिकाणा उरलेला नाही; तें संपूर्णपणे मुठार्पण झालें. जीर्णोद्धार करावा म्हटलें तर एकहि चिरा जागेवर राहिलेला नाही....

त्याचा जीर्णोद्धार खरें म्हणजे शेपाउणशे वर्षांपूर्वीच व्हायला हवा होता; त्यापूर्वीच तें मोडकळीला आलें होतें. कोठे बूड टेकावें म्हटलें तर जागा नव्हती. तेथे कधी पणती लावल्याचें कोणाला आठवत नसे की कोणी फूल वाहिल्याचें. पुण्याला पुढे जीर्णोद्धाराची आणि इतिहाससंशोधनाची सवय लागली. तरीहि त्या देवाचें नशीब उघडलें नाही. तो उपेक्षितच राहिला. इतका की गेल्या दोनतीन पिढ्यांत त्याचें नांव देखील कोणाला ऐकून ठाऊक नाही. अगदी त्या वस्तींतल्या, कसब्यांतल्या, लोकांनाहि 'फुकट्या मारुती'ला कोण्या एके काळीं मोठी वर्दळ असे, आणि तीहि शास्त्रीपंडितांची आणि कलावंतांची, याचा बिलकुल पत्ता नव्हता. असणार कसा? नदीकाठीं चार चिरे एकत्र पडलेले असले आणि त्यांतून कुबट वास येत असला म्हणजे देव तेथेचि जाणावा

असें होत नाही. अशा वेवारशी दगडांचा कशाकशासाठी उपयोग होत असेल तें कोणीं सांगावें ?

या फुकट्या मारुतीचा पत्ता आमच्या एका विद्वान् स्नेह्यांना लागला तो अकस्मात् आणि अनपेक्षितपणे. मशारनिल्हे स्नेही आपलें नांव जाहीर करण्यास राजी नाहीत; सबब त्यांचा अधिकार सांगतों. त्यांनी सगळे पाश सोडले आणि जन्मभर महाराष्ट्राच्या इतिहासाचें सूक्ष्म अध्ययन केलें. त्यांच्या दप्तरांत गडगंज माहिती आहे; नुसत्या सदाशिवभाऊच्या तोतयाचे तीन रुमाल आहेत; आणि काय काय मुखोद्गत आहे! आनंदीबाईच्या एकंदर पैठण्या किती, शाल् किती, तें सगळें विणकरांच्या नांवानिशीपासून आणि खऱ्याखोट्या किंमतीसकट घडाघडा सांगतील. पुण्यांतील अन्य संशोधक कौतुकाचा आव आणून त्यांना 'इतिहासविषयांतले किडे' (बहुमानार्थी अनेकवचन) म्हणतात, पण तें साफ बुद्धीने नव्हे. म्हटलेंच आहे—बोद्धारो मत्सरग्रस्ताः (राहवत नाही म्हणून कंसांत सांगतों—प्रस्तुत स्नेह्यांना तें आवडलें नाही तरी—त्रिंबकजी डेंगळ्याचीं स्वदस्तुरचीं कांही पत्रें त्यांना सापडलीं आहेत. त्यांतलीं दोन ठाण्याच्या तुरुंगांतून लिहिलेलीं आहेत. त्यावरून मराठ्यांच्या इतिहासाच्या शेवटच्या प्रकरणावर नवा प्रकाश पडून इंग्रजांच्या विरुद्ध लढणारा पहिला क्रांतिकारक असें त्रिंबकजीचें नांव उजळेल.) असो. या स्नेह्यांकडे डॉक्टरेटसाठी मराठी इतिहासावर प्रबंध लिहिणारे विद्यार्थी माहिती जमविण्यासाठी नेहमीच येतात. (त्यांचे औपचारिक 'मार्गदर्शक' अर्थात् निराळे असतात.) अशाच एका विद्यार्थ्याला नेमका तपशील पुरविण्यासाठी ते पुण्यांतल्या कोणा साठ्ये सरदाराच्या जमाखर्चाच्या कीर्दवह्या पाहत होते. त्यांत शके १७१२–१३च्या सुमारास दर शनिवारीं 'फुकट मारुतीस' सव्वा पळी (आणि हनुमानजयंतीस सव्वापावशेर) तेल खर्ची पडल्याचा उल्लेख आढळतो. आपल्या प्रवृत्तीस अनुसरून त्यांनी या विषयाची पाठ धरली, बहुत कष्ट केले—पत्रव्यवहार, बखरी, वाके, कैफियती, थैल्या, चरित्रें हीं सगळीं पुन्हापुन्हा पालथीं घातलीं; नवीन साधनें मिळवलीं—आणि फुकट्या मारुतीचा छडा लावला. दुर्दैव असें की, हें संशोधन प्रसिद्ध करण्यासाठी त्यांनी जे अस्सल कागदपत्र एकत्र जमवले होते ते जलप्रलयाच्या त्या काळ-दुपारीं डोळ्यांदेखत मुठामाईने लांबवले. त्यांच्याजवळील आणखीहि असेंच अगणित साहित्य नष्ट झालें. तीस वर्षांच्या

दा. क्र. 93309

अविरत श्रमांवर तीस मिनिटांत पाणी पडलें. असें म्हणतात की दुसऱ्या दिवशीं सकाळीं संगम पुलाच्या कठड्यांत अडकलेले कांही कागद सापडले त्यांत नाना फडणिसाच्या दहाव्या लग्नाच्या याद्या होत्या! असो! 'फुकट्या मारुती'-वरील आपलें संशोधन आमच्या या स्नेह्यांकडून प्रसिद्ध होण्याचा संभव नाही—कारण 'नामूलं लिख्यते किंचित्' हा त्यांचा ठाम बाणा आहे. तेव्हा त्यांच्याकडून जें ऐकलें त्यावर आमचें हें लिहिणें 'सजवलें' आहे.

अगोदर नांवासंबंधी. श्रीरामप्रभूचे एकनिष्ठ अनुयायी म्हणून जे दैवतपदीं पोचले ते श्रीहनुमंत तथा मारुती यांना 'फुकट्या' हें विशेषण लावणें हें पावित्र्यविडंबन होय अशी परस्थांची भावना होणें साहजिक आहे; परंतु पुण्यपत्तनस्थांस तसें कदापि वाटायचें नाही. कां की देवांस माणसांसारखें घरगुतीपणाने वागवणें हें त्यांच्या अंगवळणीं पडलें आहे. (माणसांना तीं क्षुद्र जीवयोनींतील असल्यासारखें अहंकाराने वागवणें ही त्याच वळणाची दुसरी बाजू, हा श्री. काका वराडकरांचा सिद्धांत केवळ आकसाचा आहे!) त्यांत उपमर्द नाही, आपुलकी आहे. आणि हीं विशेषणें खरोखर त्या देवांचीं नव्हेत. खुद्द खुन्या मुरलीधरांवर 'तसला' भयंकर आरोप कधीच नव्हता. आरोप असलाच तर फार तर संगदोषाचा. तेंच 'छिनाल बालाजी'विषयी आणि मारुतिरायाच्या 'पत्र्या' 'गवत्या' इत्यादि स्थानिक अवतारभेदांविषयी. त्यांतच 'फुकट्या मारुती' आला; तो 'फुकट्या' कसा बनला याचीच ही कथा आहे. आदरें ऐकावी.

प्रस्तुत देवस्थानाची स्थापना निश्चित कधी व कोणीं केली हें सांगतां येणें कठीण आहे. कोणी पुंडम राऊळ नामें महानुभाव सतराव्या शतकाच्या आरंभीं यात्रा करीत पुण्यास आला होता. चिंतोबास या शिष्याने 'सकळी' लिपींत लिहून ठेवलेल्या त्याच्या 'लीळा' हल्लीच उजेडांत आल्या आहेत. त्यांत गावांत दिसलेल्या एका देवळाचा उल्लेख आहे: "गोसावी पुनवडा बीजें केले: दक्षिणाभिमुखू हणमंताचे देऊळ: तेयाचा आंगणीं पींपळु:" असें आहे. म्हणून तेंच हें देऊळ असें म्हणणें बरोबर नाही. पुनवड म्हणजे पुणें असा तर्क करायला जागा आहे. "चिंतोबासें भणितलें: तो देसू चिकटा: तेथ जाओ नैए:" पुढे आहे: "गोसावी ताकभातु ओरपण करीती." असो. देऊळ तेवढें प्राचीन नाही. गो० ब्रा० प्र० श्रीशिवाजीमहाराज यांच्या अष्ट-

प्रधानांपैकी एकाने शके १६०१च्या चैत्री पौर्णिमेस त्या देवस्थानाचें उद्घाटन केलें असावें असें मानण्यास पेडगांवकर बखरींत आधार आहे. आणखी असें की, श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या प्रेरणेने (आणि त्यांच्या त्रिवार्षिक आध्यात्मिक योजनेचा भाग म्हणून) महाराष्ट्रदेशीं या सुमारास मारुतीच्या मूर्ति स्थापन झाल्या त्या 'दक्षिण-पुच्छ' (म्हणजे शेपटाच्या गोंड्याला उजवीकडे 'मुर्डीव' असलेल्या) आहेत, तशीच ही होती. असो. छत्रपति राजाराम-महाराजांनी जिंजीहून यवनांचा वेढा शिताफीने पार करून "दहा होन भार आला दर्जाचा सिंदूर" पाठविला तो याच मारुतीवर चढविण्यासाठी असेल का ? असेलहि. पण एवढें निश्चित की, या स्थानाला माहात्म्य प्राप्त झालें तें पेशवाईच्या उत्तरार्धांत. स्वराज्याचें साम्राज्य होऊं घातलें होतें; पुणें दरबारचें वैभव हरघडी वाढत होतें. विद्वानांना असा दाता त्रिखंडांत लाभणें नाही अशी श्रीमंत पेशव्यांची कीर्ति लाहोर-मुल्तानपासून रामेश्वरा-पर्यंत गाजत होती. तिच्या आणि पेशव्यांच्या व अन्य मुद्पाकखान्यांच्या सुवासाने देशोदेशीहून ब्राह्मण पुण्याची दिशा धरूं लागले—वऱ्हाड, कोकण, कर्णाटक, तेलंगण, असल्या दूरच्या भागांतून. 'गुळाप्रति जैशा मुंग्या' तसे (पण रांग न लावतां) ते येत होते. "ब्राह्मण थोडी विद्या जहाली कांही म्हणतां येवो लागले ते पुणें गांवाची वाट पुसो लागती" असा मजकूर 'तवारिखे औंध' ऊर्फ 'पंतांची खतावणी' या ग्रंथांत आहे. रमणा संपला, लाखांची दक्षिणा वाटून पेशव्याचा खजिना रिता झाला, सरदारदरकदार आणि शिपाईप्यादे मुलुखगिरीसाठी उत्तरेप्रत रवाना झाले, तरी "वरकड ब्राह्मणें" परत जाण्यास राजी नाहीत अशी तक्रार सालोसाल पेशव्यांपुढे स्थानिक ब्रह्मवृंदाकडून गुदरली जाई. 'घाशीरामनाम्यां'त याचा अनेक कलमांत प्रपंच केला आहे. त्यांच्या उपरेगिरीचीं आणि लोचटपणाचीं उदाहरणें आहेत. "केवळ सोवळें आणि पळीपंचपात्री घेवोन चारी दिशांनी गर्दी करतात जैसे उभ्या पिकावर टोळ. श्रावण भाद्रपद संपला तरी दसरा दिवाळी संक्रांत किंक्रांत असें करीत शिमग्यापर्यंत डसून राहतात. जातांना दोन घोडीं वाकतील येवढा ऐवज लादून नेतात. विद्या म्हणावी तर चित्रावतीचा मंत्र म्हणण्यापुरती. पण शहरांत बेदिली व अनीति माजवितात. या अनिष्टास जोडा नाही. ईश्वरें नेमिलें न चुके." इत्यादि. त्यांचें पारिपत्य कसें करावें याविषयी

घाशीरामाने नानांशीं मसलत केल्याचें एका कागदांत नमूद आहे. शेवटीं पारिपत्य झालें तें घाशीरामाचें! पुण्यांतील विद्वानांची संख्या झपाट्याने वाढतच राहिली. दशग्रंथ आणि षड्दर्शनें कोळून प्यालेल्या पंडितांपासून ते पंचांग वाचून संकल्प सांगण्यापर्यंत विद्वत्तेच्या इयत्ता दक्षिणेसाठी दरबारने मंजूर केल्याच होत्या. त्यांतहि न बसणारे विद्वान् कांही तरी वल्गि काढून रमण्यांत प्रवेश मिळवीत. कोणी सुंठीचे पट्टे ओढून सर्दीपडशाने घसा बसल्याचें सोंग करतो व खुणांवर भागवतो; कोणी कांही तरी रेकतो आणि सांगतो की आमच्या देशीं संस्कृत असेंच म्हणतात; कोणी आपलें कुळनाम आणि गोत्र यांची वर्णी कोठल्या दरवाज्यावर अधिक लागेल याचा तपास घेतो; तर जे विशेष चलाख ते परीक्षक काय विचारणार याची अगोदरच बातमी काढून ठेवतात. असो. नानांनी असें योजिलें होतें म्हणतात की, निदानीस महाराष्ट्रभाषेंत शुद्धलेखन घालावें व ऱ्हस्वदीर्घांकडे डोळेझाक करून अनुनासिकें तरी सर्व जागच्या जागीं आहेत याची खात्री करून घ्यावी व मगच दक्षिणा द्यावी. पण तें बारगळलें. चातुर्मासांत पेशव्यांच्या या श्रावणांतल्या रमण्याशिवाय आणखीहि कोठें कोठे दानधर्म होत असेच. दोघांतिघां मातबर सरदारांच्या वाड्यांत दक्षिणा वाटली जाई. फार काय, पुणें दरबारांतील धर्मनष्ट निजामाचा वकील आणि मुंबईच्या टोपीकर इंग्रजाचा वकील यांनीहि कांही काळ "वैदिकांस पुराणिकांस व कळावंतांस उत्तेजन देणेसाठी" खैरात सुरू ठेवली होती. तेथेहि झुंबड उडे. टोपीकर तर पुण्यांतल्या त्याच्या अडत्याकरवीं हरप्रकारें पैसा आणि खुशामत पेरीत होता. त्याची तारीफ फार चाले. पुराणा-कीर्तनांतून होई. बुधवारांतील पोथ्यांच्या आणि शुक्रवारांतील हलवायांच्या कांही दुकानांत अशा स्तुतिपाठकांचे अड्डे हमेशा बसत. ते पेशव्यांच्या हिराबागेंतील रमण्यांत जाणाऱ्यांस बहुधा तुच्छ लेखीत. हें वितुष्ट पोटजातीच्या कुरकुरीवरून की शास्त्रांतील कसल्या वादंगावरून की केवळ अन्यत्र दक्षिणा अधिक मिळते म्हणून याबाबत निश्चित माहिती नाही.

शास्त्रीपंडितांखेरीज पुण्यांत तेव्हा कलावंतांनाहि महापूर आला होता. चितारीच तऱ्हेतऱ्हेचे होते. ते बरेचसे जयपूर-जोधपूरकडून आलेले. कोणी फूल हुंगणाऱ्या रावांची तसबीर काढण्यांत तरबेज, कोणी हुक्का ओढणाऱ्या राण्यांची, कोणी हत्तीची झुंज, तर कोणी श्रीकृष्णाचें ध्यान रंगविण्यांत. कोणी

पोथ्यांत विषयाप्रमाणे चित्रें रेखाटण्यांत कुशल तर कोणी भिंतीवर देवादिकांचीं चित्रें रंगविण्यांत. शाडूच्या, धातूच्या, संगमरवरी मूर्ति करणारे होते; नक्षी-काम करणारे कारीगार आणि मिनेगार. गायक-वादकांचे लोट वाहत होते; टप्पा गाणारे, ध्रुपदिये, ख्यालिये, कर्नाटकी बाज गाणारे होते; पखवाजी, कर्णेकरी, सनईवाले, सारंगिये होते. कलावंतिणींच्या ताफ्यांबरोबरचे साजिंदेहि गावांतून वेळींअवेळीं ठुमकत. सिरोंज आणि नरगुंदचे ताफे विशेष मशहूर. त्याशिवाय नटवे, दशावतारी, दशावधानी—कांही विचारूं नका. चंदगडचा कोणी उत्तमराव बहुरूपी आला होता. मोठा गुणी. त्याचे खेळ करायला पुरेशी कनात गावांत मिळेना, अशीं माणसें धावत ते पाहायला.

पुराणकीर्तनांनाहि देवळें आणि वाडे पुरे पडेनात. महिपतीबुवा ताहरा-बादकरांचेच तीनचार शिष्य एका वेळीं गावांत मुक्काम ठोकून असत. त्यांच्या ताम्हनांत पैसा मावत नसे. वर खाशी बिदागी. पुराण सांगणाऱ्यांत तळे-गांवच्या धोंडुबुवा भगीरथाची कीरत थोर. बायाबापड्यांची मोठी गर्दी जमे. धोंडुबुवा आपलीच कथा रंगवीत आणि डोळ्यांतून पाणी काढीत—स्वतःच्या देखील. कवींची तर पुण्यांत पेठ फुटली होती. असें म्हणत त्या वेळीं की उंबऱ्या गणपतीपासून कसब्या गणपतीपर्यंत दहा लक्ष कविता लिहून तयार आहे. घराघरांतून बाडांच्या थापी लागलेल्या असत. अण्णा आट-पाडीकरासारख्या शीघ्र कवीच्या माडीवर ही दाटी. मोठा कसबी माणूस. तो कलावंतिणींना गौळणी लिहून देई, टाळकऱ्यांना अभंग पुरवी, आणि कीर्तन-कारांना आर्या, श्लोक, साक्या करून देई. इतकेंच नव्हे तर राजकारणांतहि त्याचा बोरू कुरुकुरु चाले. बारभाईची फत्ते व्हायला त्याच्या कवनांचा बराच हातभार लागला असें बोललें जाई. चौकाचौकांत शाहीर त्याचीं कवनें म्हणत. असें किती वर्णावें? कोणी नामांकित कटाव करी; कोणी असा की फटके करण्यांत त्याचा हात धरतां येत नसे. कोण्या गहन-पंडिताने संस्कृतच्या धर्तीवर मराठींत 'आनंदी-चम्पू' काव्य केलें; पण "त्यांत मराठीपेक्षा संस्कृतच अधिक" ही अण्णाची चाटूक्ति सर्वांना पटली! कवि तसेच ज्योतिषी आणि मांत्रिक. नाना फडणिसांना त्यांचा फार नाद. त्यांना कशाकशाला मुहूर्त लागे; आणि मंत्रांची गरज भासे. वैद्यांची चलती होतीच. इथले होते; परदेशी होते. कनौजच्या गोमतीप्रसादचा फार दबदबा होता. शहरभर चूर्णें, भस्में आणि चाटणें यांचा

वास दरवळायचा; त्याशिवाय युनानी दवा. हैदराबादचे मुस्तफा हकीम यांच्या शागीर्दांना मोठ्यांकडचीं बोलावणीं असत. आणि नवीन कलम म्हणजे फिरंगी पाद्री. छातीवर टिचक्या मारीत आणि लहान शिशांतून कसलीं रंगीत ओखदें देत. खुद्द पेशव्यांकडे त्यांची येजा असे. शिवाय घोड्यांचे पागा-वैद्य असत आणि पोपटमैनांची तंदुरुस्ती पाहणारेहि होते. मल्लविद्या, तिरंदाजी-शिकविणारे होते.

असें पुणें विद्यांचें आणि कलांचें माहेरघर झालें होतें त्या काळची ही गोष्ट आहे. फुकट्या मारुतीचें माहात्म्य मोठें होतें. उन्हें उतरलीं की त्या देवळांत आणि ओवरींत शास्त्रीपंडित आणि कसबी कलावंत जमूं लागत. वस्तुतः पुण्यामध्ये बोळामागे दोनतीन देव आणि देवळें असत; पण बोळाबाहेरच्यांनी अगत्याने यावें असें भाग्य थोड्या देवांचें. अशीं मानाचीं देवस्थानें पांचसात तरी होतीं. पर्वतीवरील देवदेवेश्वराचें पहिलें. तेथील वहिवाट मुख्यतः अंत-रंगांतील दरबाऱ्यांची; तेथे राजकारणी मसलती व्हायच्या. बेलबाग-तुळशीबागेंत राजकारण्यांची दुसरी फळी आणि त्यांच्याशीं घसट ठेवणाऱ्या संभावितांची गर्दी असे. सोमवारांतल्या नागेश्वराला जात ते मुख्यतः देवासाठी आणि पुराणकीर्तनांतून कानावर कांही हरिनाम पडावें यासाठी. अशी प्रत्येकाची खास वहिवाट, तशी फुकट्या मारुतीचीहि होती. आणि त्या वहिवाटदारांना त्याचा फार अभिमान असे. घारोपंत कऱ्हाडकरांची ही आर्या प्रसिद्ध होती :

**आमुच्या देवांमाजीं धन्य असे एक मारुती फुकट्या**
**वस्त्रांमाजी जेवीं धन्य तुपाचा सुवास ज्या मुकट्या**

पण तें नंतरचें. आरंभीं प्रथा अशी की विद्वानांनी तेथे जमावें, आणि नदीचा गारवा अंगावर घेतघेत आपल्या शास्त्रांतील कांही शंकाफेड करून घ्यावी; अन्य शास्त्रांविषयी कांही पुसावें. येथे एका बाजूला राजकारणाचें वारें नव्हतें; शनिवारवाड्यांतील आणि सरदारांच्या सदरेंतील खलबतांशीं येथे कोणाला कर्तव्य नसे. असें म्हणतात की पानपतच्या हाहाःकाराची वार्ता आली त्या दिवशीं संध्याकाळींहि या मारुतीसमोर मध्वाचार्य आणि रामानुजाचार्य यांच्या अनुयायांत कंदन माजलें; तें कदाचित् खरें नसेल. पण त्या ठिकाणीं एके काळीं अशा वादांतच विद्वान् माणसें रमत हें खरें. विद्वानच, तेव्हा असूया, अहंकार,

असहिष्णुता इत्यादि विकार असायचेच. पण स्वार्थ नसे. तेंच कलावंतां-संबंधी. तेहि हळूहळू तेथे जमूं लागले. विद्वानांच्या संपर्काने त्यांनाहि वादाची चटक लागली. ध्रुपद श्रेष्ठ की टप्पा की ख्याल यावर गवय्ये तोंडें आणि गळे शिणवीत. त्यांत पुन्हा घराण्याचा पोट-वाद. अटीतटीचे सामने व्हायचे; त्यांत शास्त्रीमंडळीहि रस घेत. इतर शिष्टहि. वाग्भट हरि हा फडणिशींतला वाकबगार कामदार, पण गायनांतला त्याचा अधिकार त्याहूनहि मोठा. तो तावातावाने बोले; पण दुराग्रहाने नाही. थोरल्या माधवरावांच्या दिवसांत तो ध्रुपदियांच्या बाजूने बोले; सवाई माधवरावांच्या अमदानींत तो टप्प्याचें समर्थन करूं लागला; आणि दुसऱ्या बाजीरावाच्या काळांत तो ख्यालाशिवाय बात नाही म्हणूं लागला! पुन्हा आपण सगळें गाऊन दाखवी. बंगळूरच्या अय्याशास्त्र्याचें जरा निराळें. भिकबाळीला झटका देत मोठा लाघवी बोले, काकवी झिरपल्यासारखा. पाठशाळेंत तो काव्य-अलंकार यांची संथा देई. त्या विषयांत तो इतका मुरला होता की माळणीगवळिणींशीं त्याच होषांत बोले; मग गायनावर कसा बोले हें काय पुसावें? चित्रकारहि अशा वादांत सामील होऊं लागले. तेहि आपल्या कसल्या कसल्या वादांचे फराटे ओढत. सगळ्या वादांचा एकमेळ होऊं लागला. मौज अशी झाली की गायनाविषयी बोलत असतां कोणी चित्रकलेची रंगीत भाषा वापरायला लागला; चित्रकलेंत कोणी छंदःशास्त्राचें गण बसवून दाखवले; आणि काव्यांत तर कलांची खिचडी बनवीत. अय्याशास्त्री तर एकदा म्हणाले, "कविकुलगुरु कालिदासांत कारुण्याची मींड असते." इमारतखान्यांत असाच एक हुन्नरी कामदार होता. तो कोणत्याहि कलेचें गणित दगडचुन्यांत बसवून देई म्हणे (व्याकरणाचेंसुद्धा); कवितेला ओळंबा लावून तिची 'बंदीश' तपासे. हळूहळू हें वाढत चाललें; इतर कसबें त्यांत घुसूं लागलीं. नर्तकांची तोड्यांची भाषा आली, सुवर्णकार आपल्या तोड्यांचें सांगूं लागले, कबुतरबाज पंखांच्या तालाचें आणूं लागले. पण तें दुसऱ्याच्या कलेविषयी. कोणी सुगंधी म्हणालाच की आर्येला वाळ्याचा वास असतो आणि कामदेला हिन्याचा. असें गोलंकारी बोलणें होई; कोणाचें कोणाला नीट समजेना (सिंहस्थांतील यात्रेला जसे दहा भाषांचे लोक एका उपाध्याशीं एका वेळीं बोलतात तसे.) पण सगळेच एकमेकां "वाहवा, काय विद्वत्ता, काय रसिकता" असें म्हणत. पण माणसें चांगलीं; हेतु उत्तम. सगळ्या कलांचें ज्ञान व्हावें ही सद्बुद्धि. एखादा असाहि

असे की ज्यास कोणतीच कला उमगत नसे, पण सर्वांचें ऐकून घेऊन शेवटीं निर्णय दिल्यासारखा तो सगळ्या कलांमागील तत्त्व काय त्याचें फारच नव्या दृष्टीने विवरण करी. पण तें चालायचेंच. कळलें नाही तरी कानावरून चार व्युत्पन्न शब्द जायचे; सुस्वरांनी मन भरून जायचें.

हें पुढे कमीकमी होत गेलें. दक्षिणार्थींच्या झुंडी येऊं लागल्या. त्यांतहि मोठे विद्वान् आणि कसबी असत; पण भेसळ फार, आणि बुद्धि नेहमीच निर्मळ नसे. हळूहळू सगळेच डागळले. शास्त्रचिकित्सा कमी होऊन, दुसऱ्याला काय बिदागी मिळाली, किती बोलावणीं आलीं, कोणाचा आश्रय लाभला याची चिकित्सा वाढली. हेवेदावे सुरू झाले, क्षुद्र कारवाया माजल्या. थोरथोर त्यांत गुंतूं लागले. एवढा मोठा नारो शंकर कवि. एकदा मांडी घातली की पांचपांचशे कविता लिही असा लौकिक. त्याच्यासाठी शिऱ्याची शाई घोटायला एक शागीर्द खपत असे. शनवारवाड्यांत श्रीमंतांच्या तबकांतून विडा घ्यायचा तो. पण गणपतीपुढे की नवरात्रांत सरदार विंचुरकरांनी त्याचा आणि ग्वाल्हेर दरबारचा कवि बापूभैय्या याचा एकत्र सत्कार करून त्यांना प्रत्येकी चांदीच्या ताटांतून एकावन्न रुपये दिले आणि पगडी बांधली, तेव्हा नारोपंताने काय करावें ? त्याने सगळ्यांसमक्ष दोघांचेहि रुपये छनछन् मोजले आणि पगड्या बारीक नजरेने पाहिल्या आणि शेवटीं आपल्या पगडीला दोन झिरमिळ्या कमी आहेत यांत आपली मानहानि झाली असें खड्या सुरांत म्हणून तबक, पैसे आणि पगडी घेऊन तो तडफेने बाहेर पडला !

हे तो एका व्युत्पन्न कवीचें; मग इतरांचें काय वर्णावें ? स्वार्थाला सुमार राहिला नाही. तो कसा पुरवावा एवढाच विचार. पदरचें न सारतां पुरुषा कसा झोडतां येईल इकडे लक्ष लागलें. संध्याकाळीं मारुतीच्या देवळांत जमले की अगोदर उखाळ्यापाखाळ्या निघायच्या, जे गैरहजर त्यांची निंदा व्हायची आणि बोलणें यायचें तें भोजनावर. "कसें काय, शास्त्रीबुवा, काल गोळे सावकारांकडे काय बेत होता ?" पक्वान्नेंच नव्हे तर चटण्याकोशिंबिरीपर्यंत खोदूनखोदून चौकशी व्हायची. बेत उत्तम आणि यजमान उदार असें समजलें तर सावकाराशीं संधान बांधायचें; त्याचे आश्रित आणि खिदमतगार यांनाहि मोठेपणा द्यायचा. "नाही जाहला असा सावकार कलियुगीं" असलीं कवनें करायचीं. मग दुसऱ्याने नवा सावकार अथवा व्यापारी पाहावा अशी रीत पडली.

पण असे सावकार किती पुरणार ? आणि सगळयांपाशीच वर्णी लागत नसे. आणि एकदा परान्नक्षुधा प्रज्वलित झाली की कोठे हात पसरावे याचाहि विवेक राहीना. लग्नसराई म्हणजे पुण्याचें आताप्रमाणे तेव्हाहि वैभवच. झांशी दप्तरांतील पुण्याहून आलेल्या एका पत्रांत आहेच की "या वैशाखांत येथे दीड लाख जिलबी फुटली; लाडवांचा हिशेब नसे." त्या वेळचीं तीं लग्नकार्यें; कोण आला कोण गेला याची गणति नाही असा ऐसपैस बारदाना. या बुभुक्षित पंडितांचें आणि कलावंतांचें फावे. सरळ जाऊन यजमानास सांगावें, "आम्ही दशग्रंथी ब्राह्मण. वधूवरांस वैदिक आशीर्वाद द्यावयास आलों आहों." त्यांनीहि अदबीने म्हणावें, "यावें, बसावें; भोजनाचा अनुग्रह करावा." किंवा यांनी सांगावें, "आम्ही शराबुद्दिनखाँसाहेबांचे शागीर्द; अठरा वर्षे उस्तादांची पिकदाणी धुतली. या मंगल समारंभांत आमच्या मशहूर घराण्याची गायकी सुनवावी म्हणतों", किंवा "आम्ही फलाणे तस्वीरकारांचे चेले", किंवा "आम्ही वधूवरांचीं आणि उभय व्याह्यांचीं नांवें गोंवून मंगलाष्टकें करून देतों." कोण यजमान नको म्हणणार ? तसा एखादा खाष्ट असलाच तर अन्य उपाय असत. कधी गोत्रप्रवर किंवा कुंडलीसंबंधी किल्मिष उत्पन्न करायचें; कधी कुजबुज उठवावी की वरपरीक्षेच्या वेळीं वराने खर्डे लिहिले ते खरे दुसऱ्या कोणीं तरी लिहून दिलेले होते. आणखी कसलींकसलीं विघ्नें आणि अपशकुन निर्माण करायचे. इतकें करूनहि कधी सगळें सुरळित झालें तर तिघांचौघांनी भारदस्त पोशाख घालून तसेंच मंडपांत शिरावयाचें, एकमेकाचें आदराने स्वागत करून पंगत गाठावयाची आणि तेथेहि एकमेकांना आग्रह करायचा.

पण लग्नें कांही बारमहा चालू नसतात. एरवी दुसऱ्या क्लृप्त्या काढाव्या लागत. पोटाला चांगलेंचुंगलें कोठे मिळेल याची बातमी काढायची. हीं मोठीं माणसें; त्यांना शिष्य असत, आदराने त्यांच्या मागून फिरणारे असत. त्यांचा उपयोग करून घ्यायचा. कटाक्ष मात्र भोजन उंची असावें यावर. तशीं गरिबाघरचीं आमंत्रणें येतच, मोठ्या प्रेमादराने येत. त्यांना विचारायचें, "पक्वान्नें काय आहेत?" त्यांनी म्हटलें "खीर" तर गुरकावून सांगायचें, "एकच? घाल एखाद्या भिक्षुकास"; किंवा "गुळपोळी" म्हटलें तर खेकसायचें, "म्हशीस घाल..." वर आत्मसमर्थन असें : "पाक हें शास्त्र आणि कलाहि आहे. आमच्यासारख्या असामान्य रसिकांना त्यांत जें सर्वोत्कृष्ट तेंच हवें, तडजोड नको."

कधी आपापसांत गळेपडूपणा करवा. "वाः वाः, विश्वंभरशास्त्री, आपल्या गृहिणीची पुरणपोळी जेहेत्ते नामांकित इति श्रुणुते." शास्त्रीबोवांनी गाफीलपणे होय म्हटलें की आटपलेंच. "मग कधी मिळविणार तृप्त अतिथीचा आशीर्वाद?" केव्हा केव्हा देवळांत केवळ दर्शनासाठी आलेल्या संभावित गृहस्थालाहि अडचणींत टाकायचें, "कां हो, 'करंजींत करंजी रमाकाकूंची करंजी' असा जिचा लौकिक आम्ही ऐकत आलों ती आपलीच स्त्री का? मग कधी बोलावतां पडताळा घ्यायला?" तो बिचारा गृहस्थ कांही बोलण्याआधीच दोघेतिघे जण त्याला घेरून त्याच्या घराच्या दिशेने चालूं लागत.

हीच भाषा त्या देवळांत चालायची. आता तत्त्वज्ञानाचे पंथ आणि काव्य-नाटकांतील सौंदर्य आणि कलेंतील घराणीं यांतील वादस्थळांचा कोणी तेथे फारसा उल्लेखहि करीना. केलाच तर चुटक्या आणि जांभयांचें उत्तर मिळे. आता चर्चा होई ती खाण्यापिण्याच्या वेगवेगळ्या बाजांची, रुचीच्या ढंगांची. अगदी अटीतटीने होई. कोणी कर्नाटकी कडबूची महती सांगावी; कोणी म्हणावें, मथुरेच्या रबडीला तोड नाही; कोणी बंगालचा रसगुल्ला वाखाणावा. असे देशोदेशींचे अभिमान उफाळून यायचे. तसेच जातीपोटजातींचेहि. देशस्थ-कोकणस्थांचे दरबारी मतभेद अगदी ताटांपर्यंत आले. अन्य जाती होत्याच. पण या विषयाच्या चर्वणाने जणु लाळ सुटून नेहमीचे मतभेद आणि अभिमान मऊ होत आणि जात. जातिभेद निष्ठेने पाळणाऱ्या त्या पुण्यांत या मारुतीच्या साक्षीने ते निर्बंध शिथिल होऊं लागले—निदान रोटीव्यवहारांत. ते उघडपणे मोडणें शक्य नव्हतें. कारण धर्मसंरक्षक राजसत्तेने शिक्षा केली असती. सासवडचा भट जनार्दन नागनाथ याने प्रवासांत कोणा कोष्ट्याकडे अन्न घेतलें म्हणून त्यास ब्रह्मवृंदाने दिलेल्या प्रायश्चित्ताशिवाय कैद व दंडाची शिक्षा झाल्याचें वर्तमान दवंडी पिटून समस्तांस जाहीर करण्यांत आलें होतें. तेव्हा सांभाळणें बरें. मग अभक्ष्यभक्षणाचें काय लिहावें? मारुतीस येणारे शास्त्रीपंडित आणि ब्राह्मण कलावंत यांपैकी पुष्कळांस त्याविषयी कुतूहल उत्पन्न झालें आणि कुतूहल शमल्या-वर चटक लागली. पुर्तुगेजांच्या गोवें प्रांतांतील गोपाळकृष्ण शेणवी हा कलावंत कांही कामानिमित्त पुण्यास आला होता. तो गायन करी, मृदंग वाजवी, तसबिरी काढी आणि कविता लिही, असा हरहुन्नरी. वर पाककुशल आणि वाणीचाहि रसाळ. माशांचीं कालवणें आणि आमट्या यांसंबंधी तो अशा भक्तीने बोले की

ऐकणाऱ्याच्या क्षुधेस चिमटा काढावा. फुकट्या मारुतीसमोर त्याने दोनतीनदा असें मत्स्यावताराचें संकीर्तन केलें तेव्हा वाईकर गोविंदशास्त्री, पंडितराव पैठणकर, रंगनाथ कुळकर्णी पारनेरकर, नारायण तांबे चित्रकार, यांनी त्यास एका बाजूस नेऊन आपल्या बोलण्याची प्रचीति त्यांस करून देण्याचा आग्रह केला. तो तयार झाला. असें ठरलें की कात्रजच्या बागेंतील एखाद्या निवांत स्थळीं ती पाकसिद्धि करून भक्षावयाची. आयत्या वेळीं आणखी दोन शास्त्री हजर झाले. त्यांपैकी एकाने आदले दिवशीं माशांचें नांव काढतांच उपरणें नाकास लावलें होतें आणि दुसऱ्याने 'अनाचार' म्हटलें होतें. समस्त बेत नेमिल्याप्रमाणे पार पडत आला. पण तलावाची देखरेख करणाऱ्या कामदाराने त्यांस पकडलें. शेवटीं त्यास थोडें कालवण देऊन सुटका करून घेतली. तोहि ब्राह्मण होता.

अभक्ष्यभक्षणाच्या इतर प्रकारांचीहि तरतूद होऊं लागली. त्यासाठीहि सावध राजकारण लढवावें लागे. शहरांत म्लेंच्छ होतेच, पण त्यांच्याशी असा संपर्क ठेवणें कठीण होतें. मग सरदार हंबीरराव घोरपड्यांची कुळंबीण गांठ अथवा गौरा रहिमतपूरकर नायकीण हिच्या साजिंद्यास गांठ आणि मसालेदार बकऱ्याची सागुती किंवा कोंबडी मिळव असें सुरू झालें. तीहि खावयाची ती नदीपार होऊन हिंगण्यास, नाही तर दूर वानवडीस. चतुःशृंगीकडे शाक्तांचा अड्डा असे; ते अभक्ष्य तेंच भक्षीत, अपेय तेंच पीत आणि कुकर्म करीत, असा त्यांचा बदलौकिक. त्या अघोरी पंथाचा संपर्क टाळणें अवश्य होतें.

लखनऊच्या नंदलाल पखवाजीस गुळाचें व इतर जातीचें मद्य करण्याची कला अवगत आहे असें मारुतीसमोरील त्याच्या बोलण्यावरून समजल्यामुळे कांही जणांनी त्याचा स्नेह जोडला, आणि आपलें कसब (रसायणांतील) दाखविण्यास त्यास उद्युक्त केलें. विठ्ठलवाडीस एका झोपडींत त्याने सर्व सिद्धता केली; अनेक शास्त्रीपंडित आणि कवि कीर्तनकार पुराणिक आमंत्रण दिल्यासारखे तेथे पोचले. नंदलालच्या कलेचा सुवास पर्वतीवरील देवदेवेश्वरापर्यंत पोचला असें म्हणतात. कारवाई जाहली आणि नंदलालास मुसक्या बांधून कोतवालींत नेलें. पुढे कोतवालाच्या घरांतच त्यास कैद करून ठेवलें म्हणतात.

फुकट्या मारुतीस येणाऱ्या पंडितांचा असा धर्म घडत गेला. संध्याकाळीं तेथे जावें तें रात्रीची व दुसरे दिवशीं दुपारची पुडी कोठे लाभेल याच्या

विवंचनेसाठी. त्यांच्यापैकी बहुतांपाशीं पैका होता, भरलेलीं घरदारें होतीं. पण शक्य तोंवर स्वतःचें खाऊं नये अशी बुद्धि त्यांस होऊं लागली. त्यांत फुशारकीहि वाटे. या करणीमुळे संभावित गृहस्थ तें देऊळ वर्ज्य मानूं लागले; गरती स्त्री तर त्या बाजूस फिरकेना; कारण कोण हटकेल आणि भोजनसुख मागेल याची खात्री नव्हती. पंडितांपैकीहि जे अशा वर्तनाच्या अगदीच आहारीं गेले नव्हते त्यांना त्याची अरुचि उत्पन्न झाली. त्यांच्यापैकी जे भिडस्त त्यांना ताप होऊं लागला. पान, तंबाखू, तपकीर जवळ बाळगण्याची सोय उरली नाही; ती आपलीच समजून कोणीहि धृष्टपणे उचली.

अशी अवनति होत गेली त्या काळांतच त्या स्थानास 'फुकट्या मारुती' हें नांव पडलें. असें मानावयास जागा आहे की यापूर्वी कांही काळ त्यास 'पुख्खा मारुती' म्हणत. दुसऱ्या एका संदर्भात "पुख्खा-फुका-फुकटा" (अनादरार्थे टा) अशी व्युत्पत्ति रा० रा० म्हाळसाकांत बोंगाळे कोशकार यांनी लावून दाखविलीच आहे. असो. पेशवाईचा अंत होण्याच्या सुमारास या देवस्थानास दुर्लौकिकानें ग्रासलें. तेथील वर्दळ हळूहळू ओसरली. असें म्हणतात की शास्त्र आणि कला यांविषयी महान् आदर बाळगून नियमानें तेथें येणाऱ्या एका सज्जनास त्या पंडितांनी संपूर्ण नागवलें; तेव्हा त्यानें तळतळाट होऊन शाप दिला की, जो त्या देवळांत जाईल त्याच्या पोटांत आग पडेल. ही दंतकथाच असावी; पण इतकें मात्र खरें की त्या देवळांत कोणी जाईना. पुजारी नाहीसा झाला. मारुतीला शनिवारींदेखील तेल-शेंदूर चढेना; गिलावा पडून गेला त्याची कुणी डागडुजी करीना. उलट बिचाऱ्या मारुतीला फुकट्या ही उपाधी निष्कारण चिकटली.

—मधूनमधून मुठेला पूर येत, आणि काठावरचें हें देऊळ खिळखिळें करीत. देवाचा देवपणा संपला तेव्हा त्या दगडविटांचे कोणीहि कांही करावें! मारुतिरायच कधी अंतर्धान पावले कोणाला कळलें नाही. कोणी वास्तपुस्त केली नाही.

शेवटीं परवाच्या महापुरांत उरलेंसुरलें काय होतें तें नष्ट झालें. नांव पूर्वीच गेलें होतें, आता निशाणीहि गेली.

११

# आणखी एक सांस्कृतिक परिषद

शेंगवली येथे विश्वसाहित्यपरिषद कां भरावी हा प्रश्न निरर्थक आहे. विश्वाची कसली ना कसली चिंता वाहणाऱ्या परिषदा दिल्ली, पॅरिस, टोकियो, मॉस्को अशा ठिकाणींच भराव्या हें कोणीं सांगितलें? या गाजलेल्या ठिकाणांइतकाच शेंगवलीहि या विश्वाचा एक भाग आहे. विश्वाच्या वैचारिक आणि आध्यात्मिक व्यापाराची तीहि एक पेठ आहे; मग ती इवलीशी कां असेना! मुख्यतः याच विचाराने प्रेरित होऊन श्री० सौ० धनलक्ष्मीदेवी द्वादशापत्ये यांनी विश्वसाहित्यपरिषद शेंगवलीला भरविण्याचा बूट काढला. आणि त्यांचा प्रेमळ दरारा असा की, त्यांनी बूट काढल्यावर कांही खुसपट काढण्याची त्या तालुक्यांत तरी कोणाची हिंमत नव्हती. जरा घसरलेंच. देवीजींच्या आंतरिक माधुर्यबळाबाबत ' हिंमत 'सारखा आडदांड शब्द घुसायला नको होता. तो विसरणें. देवीजींच्या त्या तसल्या बळाचा प्रथम प्रभाव पडला तो शेंगवलीचे माजी इनामदार श्रीमंत धर्माजीराव दानपट्टे यांच्यावर. परिषदेच्या खर्चाची बरीचशी जिम्मेदारी त्यांनी उचलली. शिवाय खाशा पाहुण्यांच्या वस्तीसाठी त्यांनी आपल्या वाड्यांतलीं दोन दालनें देऊं केलीं. आणि वर जाजम, टेबलखुर्ची, कोच पुरवायचें कबूल केलें. या दातृत्वाचा श्रीमंत स्वागताध्यक्ष होण्याशीं तसा कांही सौदेवाईक संबंध नव्हता. तो योगायोग. "वाडवडिलांपासूनच दानाचा पट्टा मिळाला आहे," असें सद्गदितपणे देवीजींनी पुन्हा पुन्हा म्हणून दाखविलें तें कांही उगाच नव्हे.

आता खरें म्हणजे—आणि खाजगींत देवीजीहि कधी म्हणतात की, श्रीमंतांचें तें कांही मूळचें आडनाव नव्हे. मूळचे म्हणे ते दांडपट्टे. कोठल्याशा पेशव्याच्या कितव्याशा लग्नांत फेस येईपर्यंत दांडपट्टा फिरविल्यामुळे यांचा खापरपणजा बोथाटेचा दांडपट्टे झाला आणि तोहि अकरा गावांच्या इनामासह. पण यांचे वडिलांचे, म्हणजे श्रीमंत बजरंगरावांचे, वेळीं वाईचा कोणी दशग्रंथी विद्वान् वाड्यांत पोटभर संभावना झाली म्हणून तृप्तीचा ढेकर देतांना म्हणता झाला, "श्रीमंत, जेहेत्ते आपल्या कुळाचें खरें उपनाम दानपट्टे; त्याचा उद्धार करावा. दांडपट्टे हें कोण्या तरी हितशत्रूने भ्रष्टरूप केलें आहे." शास्त्रीबुवांची पुनश्च रुपेरी संभावना जाहली हें लिहिणें नलगे.

आणि तसेंच पाहायचें तर देवीजींनीहि, धर्माजीराव कधी कधी म्हणतात तसें, "आपुलं नाव सौंस्कृत करून टाकलं." तो इतिहास थोडक्यांत असा, देवीजींचा विवाह होण्यापूर्वी (त्या देवीजी नव्हत्या तेव्हा; नुसत्याच गोदुबाला भीमराव म्हसवडकर कुळकर्णी होत्या.) पुण्यांत त्यांचें चार यत्ता शिक्षण झालें होतें. लग्नांत पतीने रिवाजाप्रमाणे त्यांचें नांव बदलून धनलक्ष्मी ठेवलें. तसेंच त्यांनी पतीचें आडनांव 'बारपुते' होतें तें बदलून 'द्वादशापत्ये' ठेवलें तें केवळ संस्कृत आणि जोडाक्षरी भारदस्तपणासाठी नव्हे, तर त्या शुभलक्षणी, आशीर्वादात्मक आणि कुलऋणवाचक नावांत पुरुषांबाबत पक्षपात आणि स्त्रियांचा अनुल्लेख हे मुळांतील दोष नाहीत म्हणून. अशी बोलवा होती की नाव बदलल्याशिवाय तें सार्थ करावयास उद्युक्त होणार नाही हा बाणेदार निर्धार त्यांनी बोहल्यावरच व्यक्त केला. त्याचा इष्ट परिणाम झाला. आणि पुढे त्यांनी आपलें सांसारिक कर्तव्य यथाशक्ति पार पाडलें. असो. ओघांतच आलें तेव्हा त्यांच्या यजमानाविषयी थोडेसें...

नरसिंहरावजी द्वादशापत्ये (पूर्वाश्रमीचे बारपुते) ही मोठी असामी होती. वडिलांचा व्यवसाय कंत्राटदारीचा; तो चालू ठेवला. विद्या दुहेरी हिशेब ठेवण्यापुरती; तिचा अधिक हव्यास धरला नाही. व्यवसायाचीं गुह्यें मात्र आत्मसात् केलीं. त्यांत कर्तव्यवशात् इतरांस कठोर शिस्त लावली. स्वगृहीं मात्र सज्जनपणे आणि मृदुतेने भार्येचा मान राखला. तिच्या सांस्कृतिक उद्योगांचें चोज पुरविलें; तसल्या समारंभांत उचित वेष करून स्मितनमस्कारादि उपचार कसोशीने पाळले. गेल्या वर्षी त्यांच्या पन्नासाच्या वाढदिवसा-

निमित्त त्यांचा (आणि अर्थात् देवीजींचाहि) सत्कार झाला. त्या सभेंत कोणा एका प्राध्यापकाने म्हटलेंसुद्धा : "नरसिंहरावजी आणि धनलक्ष्मीदेवीजी यांचा संसार आधुनिक आणि आदर्शवत् नाही असें कोण म्हणेल? फार काय, रावजी म्हणजे नवा मनूच. 'स्वस्त्री स्वातंत्र्यमर्हति' हें त्यांचें ब्रीद." असो.

विश्वसाहित्यपरिषदेच्या आख्यानांत देवीजींच्या नमनालाच घडाभर शब्द नासले असें कोणी म्हणेल. पण त्या परिषदेंत देवीजी नमनापुरत्या नव्हत्या. परिषद म्हणजे त्या होत्या. सगळी त्यांची लीला होती ती.

—आणि परिषदेंत सर्वांना त्याची जाण होती. पंक्तींत वाढप करणाऱ्या स्थानिक शिक्षकांपासून ते परिषदेच्या अध्यक्षांपर्यंत देवीजींचा शब्द झेलण्याची प्रेमळ अहमहमिका लागून राहिली होती. समित्या, पोटसमित्या, अर्थात् होत्याच; कारण संपूर्ण लोकशाहीवर (आणि मतस्वातंत्र्यावर वगैरे) देवीजींची गाढ निष्ठा होती. ती उच्चारून दाखविण्यासाठी त्यांनी दोनदा परदेशगमन केलें होतें. (तिसऱ्यांदा केलें तें स्वतःच्या खर्चाने). असो. या सगळ्या समित्या स्वागतमंडळाने निवडल्या त्या देवीजींच्या सल्ल्यानेच. तेंहि बरोबरच. त्यांचें चैतन्य (आणि द्रव्य) नसतें तर शेंगवलीला असली परिषद कोठची भरायला? यापूर्वी तेथे एकच संमेलन भरलें होतें. आणि तें म्हणजे श्रीमंत बजरंगराव प्राथमिक विद्यामंदिराच्या माजी विद्यार्थ्यांचें. अशा कुग्रामाला आता थोरथोर पाय लागणार होते ते देवीजींमुळे.

तेव्हा अध्यक्षांपासून ते चटणीकोशिंबिरीपर्यंत सगळी निवड केली ती देवीजींनीच. अध्यक्षांची तर त्यांनी यादीच केली होती. भारताचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, प्रधानमंत्री अशा उतरत्या भांजणीने नकार घेतां घेतां देवीजी आचार्य आत्मप्रकाश (क्रमांक नऊ) यांजपर्यंत आल्या. हुकलेल्यांचा खेद न करतां मिळालेल्यांत त्यांनी संतोष मानला. आणि तो मानावा असेंच आचार्यांचें माहात्म्य नव्हतें का? विश्वशांतीला वाहून घेतलेला तो महान् पुरुष वर्षातून नऊ महिने परदेशांत संचार करीत असतो; जगाच्या तमाम दुःखांवर गुणकारी असा आध्यात्मिक तोडगा त्याच्यापाशीं असलेल्याचा गवगवा आहे तो काय उगाच? पुन्हा साहित्यिक. त्यांच्या अध्यक्षीय भाषणांचेच मुळी तीन खंड प्रकाशित झाले आहेत. इतर भाषणांचे चार की पांच. आणखी ग्रंथ आहेतच. वेद, उपनिषदें, भगवद्गीता, बुद्ध, हिंदी संस्कृति, जुने-नवे संत या व यांसारख्या

विषयांवर त्यांनी भरपूर लिहून ठेवलें आहे. मूळ हिंदींत अथवा इंग्रजींत. त्याचीं मग अनेक देशी भाषांत भाषांतरें. असा लेखनसंभार. त्यांचें वजन असें की साहित्यिक मानसन्मानदेखील आपल्या पायांनी चालून यावेत. तेव्हा परिषदेला तोलाचा अध्यक्ष मिळाला असाच सार्वत्रिक अभिप्राय पडला.

पण एवढी विश्वपरिषद; तेव्हा आणखी पांचदहा पाहुणे तरी शोभेलशा मापाचे हवेत. या देशांतील धेंडें मिळविणें हा, कोणींसें म्हटलें त्याप्रमाणे, देवीजींच्या हातचा मळ होता. पत्रलेखनाच्या साहेबी अदबींचा जरा सैल शिडकाव करून देवीजी देशी सावजाला सहज गार करतात; अगदी कामरूप ते सौराष्ट्र आणि हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतचीं थोर थोर माणसें घरचें कार्य असल्यासारखीं लगबगीने येतील असा देवीजींना विश्वास होता. आपुलकीचा 'ताजा कलम' हाताने लिहिलेलें त्यांचें छापील आमंत्रण पोचतांच अष्टदिशांनी होकार उठले. गौहत्तीहून नकुलचंद्र बरुआ, हुबळीहून विरूपाक्ष मुद्देविहाळमठ, त्रिवेंद्रमहून ललिथाम्मा नंबुद्रिचरण, साबरमतीहून रणछोडभाई दवादलाल, लुधिआनाहून गुर्दयालसिंग 'होष', इलाहाबादहून खमीसुद्दिन 'कैची', अशीं किती नांवें (आदराने) घ्यावींत? पत्र देखतांच समस्त मंडळींनी बिस्तरा बांधला. हो, पुण्याचे प्रा० कृ० त्रिं० स्वच्छंदे यांचा मुद्दाम उल्लेख हवा. आपल्या द्रष्टेपणाची बूज राखणारी कोणी (बाईमाणूस) आहे या विचारतुष्टींत त्यांनी तारेनेच आमंत्रण स्वीकारलें आणि पिशव्या भरल्या.

पण परदेशी चिजांवाचून विश्वपरिषद कशी साजरी होणार? निदान त्यांचा वास तरी हवा. देवीजींनी कंबर बांधली. त्रिखंडकीर्ति (किंवा पंचखंडकीर्ति) साहित्यकारांस अत्यादराचीं आमंत्रणें गेलीं. पण देवीजींची पुण्याई तोकडी पडूं लागली. आल्बर्तो मोराविआला जबर पडसें झालें होतें; आर्थर कोस्लरच्या कथेवर हॉलिवुडला (नव्वद लाख डॉलर्सचा) चित्रपट निघत होता; तेव्हा त्याला तेथे राहाणें प्राप्त होतें. प्रो० टॉयन्बी जपानमध्ये व्याख्यानाच्या दौऱ्यावर होता. अशा अडचणी निर्माण होऊं लागल्या. पण देवीजींनी पिच्छा सोडला नाही. चित्रपटांसाठी अवेळीं 'एक्स्ट्रॉ' पुरविणाऱ्यांप्रमाणे अडलेल्या समारंभांसाठी परदेशी पाहुण्यांची सोय जमविणाऱ्या संस्थांशीं त्यांनी संधान बांधलें; आणि थोडयाफार खटपटीने कार्यभाग साधला. 'कॅन्ड् कल्चर' या शिकागोच्या लोकप्रिय सर्वविषयगामी मासिकाचा (खप २,६८९,३२८)

पूर्वेकडील प्रतिनिधि बिली वाइल्डर, इतालिअन एअरलाइन्सचा एक दुय्यम प्रकाशनाधिकारी अँजेलो लोरेत्ती, फोटोग्राफीच्या सामानाचा जर्मन तज्ञ योहान कुर्त्झ (त्याचा मावसा मोठा प्राच्य-पंडित आहे), जॉर्जिया टीन-एजर्स या संस्थेतर्फे हिंदुस्थानच्या प्रवासासाठी आलेली कु० हेलन व्हाइट, आणि हाँगकाँगमधील एक शिक्षक टी वाँग या परदेशी पाचुंद्याने खरेंच मोठी शोभा आणली. शेंगवलीने एकसमयावच्छेदेंकरून इतके सोडाच, पण परदेशी माणूस क्वचित् पाहिला होता. दोन वर्षांखाली शेख वझीर मुहम्मद बशीर मुहम्मद हा पाकिस्तानी आला होता. अब्दुल कोंबडीवाला त्याचा चुलता; त्याला भेटायला. पण अगदीच पोरेंसोरें सोडल्यास बाकीच्यांनी त्याला ओळखला. तो म्हमद्या; कसलीशी उचलाउचली करून गायब झाला होता दहाबारा वर्षांपूर्वी. आणि कधीकाळीं कोणी गोरा पोलीस अंमलदार म्हणे कसल्याशा गुन्ह्याच्या तलासासाठी शेंगवलीला आला होता. त्याची कथा म्हाताऱ्या-कोताऱ्यांच्या तोंडांत असते. इतकेंच.

असा देवीजींनी सोहळा जमवला. वृत्तपत्रें आगामी परिषदेच्या बातम्या छापूं लागलीं; देवीजींच्या मुलाखती येऊं लागल्या. त्या जिल्ह्याचें साप्ताहिक मुखपत्र 'जनताजनार्दन' हें तर परिषन्मय होऊन गेलें. ओळीने तीन अग्रलेख येत्या परिषदेवर लिहून सर्व जगाचे डोळे तिच्याकडे कसे लागले आहेत हें त्याच्या संपादकांनी जिल्ह्यावर बिंबवलें. "राक्षसी संहारास्त्रांनी भयभीत आणि द्वेषसूक्तांच्या कोलाहलाने त्रस्त झालेल्या विश्वाला या जिल्ह्याकडून दिलासा मिळण्याचा योग यावा हें त्याचें महद्‌भाग्य नव्हे काय?" या भावभरित प्रश्नाने तिसरा लेखांक विराम पावला होता. अवघा जिल्हा उत्साहाने कामाला लागला. पण असल्या प्रचंड व्यापाच्या संमेलनाचा तेथे फारसा कोणाला अनुभव नव्हता. हें ओळखून पुण्याहून तीन व मुंबईहून दोन संघटनाकुशल माणसें आलीं आणि त्यांनी, आपापसांत तडजोड करून, नेतृत्व अंगिकारलें. मुंबईकरांनी तर छातीवर हात ठेवून सांगितलें की अर्ध्या प्रवास-भाड्याची सवलत मिळाल्यास तेथील किमान दीडशें स्त्रीपुरुष बोलावून समारंभास शोभा आणतों; त्यांत चर्चाविर्चा करण्यास उपयोगी पडतील असे अर्धा डझन विद्वानहि घालतों. पुणेकर म्हणाले, सगळा भाडेंखर्च व भोजनखर्च भागवत असाल तर दोन डझन माणसें मागवतों—आणि तीं एकजात विद्वान्. देवीजींनी

ही चढाओढीची कुरबूर गोड हसून थांबवली, आणि सर्वांच्या चातुर्याला संधि दिली.

आणि पाहतांपाहतां सगळें उभें राहिलें. भव्य मंडप, छानदार रोषणाई, शोभिवंत व्यासपीठ, कोच, खुर्च्या, बाकें—कांही विचारूं नका. पंचक्रोशींतील माणसें हें सगळें आ वासून पाहायला जत्रेसारखीं जमूं लागलीं. नरसिंहरावजी तर जातीने खपत होते हें काय सांगायला पाहिजे? धंद्यांतील नोकरमाणसें होतींच, पण स्नेह्यांचा हातभार होता. मंडपापासून गावच्या शिवारापर्यंतचा रस्ता शाळेंतील विद्यार्थ्यांनी श्रमदान करून ठीक केला. तेथून मुख्य सडके-पर्यंतच्या रस्त्याची लोकल बोर्डाने डागडुजी केली.

स्वागत-सभासदांची, प्रतिनिधींची आणि स्वयंसेवकांची संख्या प्रतिदिनीं वाढत होती. स्वागत-सभासदच शंभराच्या घरांत गेले. कोणी उत्साहामुळे, कोणी दडपणामुळे, कोणी लाजेकाजेस्तव, कोणी मिरविण्यासाठी; अशीं तऱ्हेतऱ्हेचीं माणसें होतीं त्यांत. त्यांत त्या भागांतले व्यापारी, वकील, डॉक्टर, लहानमोठे सरकारी अधिकारी, सर्व आले. उपाध्यक्ष सातआठ होते. त्यांत खालसा संस्थानांचे दोन दिवाण, एक माजी उपमंत्री, जिल्ह्यां-तील दोन्ही हायस्कुलांचे प्रिन्सिपॉल, एक निवृत्त मामलेदार आणि एक निवृत्त मुन्सफ होते. प्रतिनिधि तर कोठकोठच्या प्रांतांतून आले होते. एकंदर दीडशेंवर असावेत. त्यांची राहण्याची सोय त्यांच्या इतमामाप्रमाणे करण्यांत आली होती. परदेशी प्रतिनिधींसाठी बारा मैलांवरचा सरकारी डाक बंगला, देशी प्रतिनिधींपैकी बडीं धेंडें देवीजींच्या बंगल्यांत, लहान धेंडें धर्माजीरावांच्या वाड्यांत आणि उरलेले प्रतिनिधि शाळेच्या खोल्याखोल्यांतून. शाळेला धर्मशाळेची कळा आली होती. कांही असंतुष्ट आत्म्यांनी गैरसोयी-बाबत कुरबुर केली तेव्हा देवीजींनी लाघवी पण उच्च स्वरांत म्हटलें, "आपल्या प्रिय भारतभूमीच्या विविध भागांतून आलेल्या बांधवांनी येथे गुण्यागोविंदाने राहायला नको का? प्राचीन काळीं तीर्थाटण करणारे आपले पूज्य पूर्वज असेच आपुलकीच्या दाटीने, गुहेंत, देवळांत, अतिथिछत्रांत, झाडाखाली मिळेल तेथे, वस्ती करीत. एका कुटुंबासारखें. भारताची एकात्मता दाखवीत. तुम्हांला ती संधि आता मिळाली आहे. आपली ही परिषद म्हणजे विश्वाचें लघुरूप. तुमचा हा निवास म्हणजे निदान भारताचें लघुरूप व्हायला नको

का?" जातां जातां हलक्या आवाजांत त्यांनी म्हटलें म्हणे, "हें पसंत नसेल तर आपली सोय बघावी."

असो. संमेलनाचा आणखी किती वैभवशाली तपशील सांगावा? सगळें कसें चातुर्याने योजिलें होतें. प्रतिनिधींना तीन दिवसांत तीन मेजवान्या आणि दोन उपाहार ठरविले आणि त्यांच्या यजमानपदाचा मान पांच लक्ष्मीपुत्रांच्या गळ्यांत कसा बांधला, असल्या सुरस कथा सांगितल्या असत्या, पण खुद्द संमेलनाकडेच वळावें.

अशी थाटांत सुरुवात झाली म्हणतां! प्रवेशद्वाराशीं चौघडासनई, तेथून व्यासपीठापर्यंत लाल पायघड्या. व्यासपीठावर तर डोळे ठरत नव्हते. मागील पडद्यावर जगाचा रंगीबेरंगी नकाशा (तो तयार करण्यासाठी जिल्ह्यांतले समस्त भूगोलशिक्षक दिवसरात्र खपले होते); पीठावरील ती डोळे दिपविणारी प्रभावळ: देवीजी, अध्यक्ष, स्वागताध्यक्ष, उपाध्यक्ष, ते पांची सन्मान्य परदेशी प्रतिनिधी, नरसिंहरावजी; प्रेक्षकांतील पुढील रांगांना शोभा आणणारे उत्तमोत्तम वेषभूषेंतील स्त्रीपुरुष, हिरव्या फितीचीं फुलें वक्षावर ल्यालेले स्वागतमंडळाचे सभासद, निळ्या फुलांचे प्रतिनिधि, केशरी गणवेशांतील स्वयंसेविका आणि अर्धें तोंड वासून या सगळ्याकडे एकटक पाहणारे स्थानिक प्रेक्षक (प्रवेशमूल्य ६२ नये पैसे; विद्यार्थ्यांस निम्मा दर), खांबाखांबावरून लटकणारे चित्रांकित पुढारी, त्या झालरी, त्या झेंडूच्या माळा, ते भारत-नाट्यम्च्या अंगविक्षेपांसह 'फ्लॅश्'ने फोटो घेणारे वृत्त-छाया चित्रकार, लाउडस्पीकरमधून निनादणारीं तीं घोषितें...

स्वागतगीत संपून स्वागताध्यक्ष, श्रीमंत धमाजीराव दानपट्टे यांचें भाषण कधी सुरू झालें तें अनेकांना समजलेंहि नाही. एक तर तें इंग्रजीत होतें. स्थानिक श्रोत्यांपैकी जे शिकलेले होते त्यांपैकीहि बहुतेकांना त्यांतील अनेक शब्द गेलेले नव्हते. (वडूजच्या कोणा प्रोफेसराने तें कष्ट करून लिहून दिलें होतें म्हणे.) त्यांत तें श्रीमंतांनी वाचलें अशा वळणाने की इंग्रजी जाणणारांचीहि दिशाभूल व्हावी. आणि शिवाय मायक्रोफोन मधूनमधून आपली पट्टी बदलत होता, खाकरत होता. त्याला मौनाचे झटके यायचे. पहिलें भाषण म्हणून असेल! पुढे तो सरावला आणि वक्तेहि सरावलेले मिळाले. असो. इतक्या सगळ्या विघ्नांतून ज्यांना शब्द समजले त्यांना भाषणाचा अर्थ जो थोडासा उमगला तो असा. शेंगवलीला फार प्राचीन इतिहास आहे. तिसऱ्या-चौथ्या (किंवा डॉ०

यॉकॉस्कीच्या मताप्रमाणे इ० स० पू० सहाव्या) शतकांत विद्या-कलांचें केंद्र म्हणून भरभराटीला आलेलें शृंगवल्लरी हेंच. मराठेशाहींत येथे बरेचसें गोब्राह्मणप्रतिपालन झालें व निदान तीन संतकवि (महाराष्ट्राचा एकमेव परीटसंत रिठोबा परीट, 'फेसाचे अभंग' कर्ता; मल्हारबुवा कुलकर्णी ढेरवाडकर आणि हुसन्या मोमीन—ज्याच्या भेदी लावण्याहि गाजल्या आहेत) या परिसराला पुनीत करते झाले. अव्वल इंग्रजींत हावर्डसाहेबाचें दुसरें रीडर या जिल्ह्यांत प्रथम पोचलें तें या गावीं. साक्षरतेचें प्रमाण गेल्या तीस वर्षांत ६·३१ वरून १७·९१ पर्यंत पोचलें. म्हणजे जवळ जवळ तिप्पट झालें. ज्ञानाप्रमाणेच शौर्याची परंपरा. जुन्या काळांत दानपट्टयासारख्या घराण्यांनी ती सुरू केली. आधुनिक काळांतील प्रत्येक लढाईला या गावाने जवान पुरविले. तशीच देशभक्ति. विविध कारणांसाठी येथील चव्वेचाळीस माणसें तुरुंगांत गेलीं. आताच्या समाज-कल्याण योजनासंबंधी तपशील सांगून झाल्यावर आजची सांस्कृतिक नि ड म्हणून शेंगवली ते थेट मुंबईपर्यंत एस्० टी० सुरू व्हावी अशी मागणी केली. या सगळ्या मुद्यांच्या अनुषंगाने श्रीमंत धर्माजीरावांनी ठायींठायीं भारताच्या आध्यात्मिक परंपरेविषयी कांही ना कांही म्हटलें; त्या त्या समयीं व्यासपीठा-वरील श्रोत्यांनी टाळ्या वाजविल्या. भाषणांतीं जो टाळ्यांचा प्रचंड गजर झाला त्याला खुद्द श्रीमंतांचा हात लागला होता. पुढेहि एकदोनदा स्वतःविषयी कोणी गौरवाचे वा आभाराचे उद्गार काढले तेव्हा श्रीमंतांनी त्याच निर्मम वृत्तीने टाळ्या वाजवल्या.

पुढचा संस्कार अध्यक्ष-प्रशस्तीचा. आघाडीला देवीजी होत्या. आचार्य आत्मप्रकाशांची अलौकिक साधना, त्यांच्यांतील भारतीयतेचा परिपाक, आजच्या जगाला आध्यात्मिक मार्गदर्शन करण्याचा त्यांचा असामान्य अधिकार, या-विषयी त्या "जितक्या कळकळीने, तितक्याच नाट्यपूर्णतेने, जेवढ्या सुरेलपणे, तेवढ्याच सहजपणे" बोलल्या. (क्रियाविशेषणें कोणा वार्ताहराचीं.) पण खरी छाप पडली ती त्यांच्या इंग्रजीची. श्रोत्यांपैकी बहुतेकांनी तसलें कधी ऐकलें नव्हतें. देवीजींच्या साहेबी भाषेला, उच्चाराच्या ठसक्याला, लाडिक हावभावांना पुढे छापील वृत्तांतांत अनेक व्युत्पन्न विशेषणें लावलीं; पण नेमिनाथशेट (विडी कारखानदार) यांनी त्याला 'फर्मास' म्हटलें त्यांत सगळ्यांच्या मनाचा अभिप्राय आला. देशी, अगदी मराठी, नांवेंदेखील त्यांनी (मेम)साहेबी

ढंगांत म्हटलीं. आणखी तीनचार भाषणें झालीं. त्यांत श्रोत्यांच्या विशेष पसंतीस उतरलें सांगलीच्या रामभाऊ हायस्कूलच्या गांगल गुरुजींचें संस्कृत भाषण. त्यांत खूप सुभाषितें होतीं. त्यानंतर कार्यवाहांनी संदेश वाचून दाखविले. राष्ट्राध्यक्षांपासून प्रादेशिक कीडनिवारक समितीच्या अध्यक्षांपर्यंत अनेक देशी व कांही परदेशी थोरांनी आस्थेवाईकपणे अभीष्टचिंतन केलें होतें. मग बावीस संस्थांचे हार चढवले.

आणि आचार्य आत्मप्रकाशांच्या उत्स्फूर्त अध्यक्षीय भाषणाबद्दल काय लिहावें? भाषण कसलें तें?—वाणीचें धरण फुटल्यासारखा शब्दांचा प्रलय माजला. आणि शब्द तरी कसले? हे वजनदार आणि कठीण कठीण. इंग्रजीचे तीनचार गुरुजी मांडीला मांडी लावून तसले शब्द आळीपाळीने टिपून घेत होते. त्यांच्या बोटांस घाम फुटला पण शब्द संपेनात. स्पेलिंग जमेना. तेंच अवतरणांचें. अहो, कोणाकोणाचीं द्यावींत? होमर-शेक्सपिअरपासून थेट हॅमरशोल्ड-केनेडीपर्यंत. आणि संस्कृतचें तर पुसूं नका. वेद काय, उपनिषदें काय, गीता काय! कालिदास, भवभूति, भर्तृहरि...कोणी जुनी असामी ठेवली नाही. एक पाश्चात्य अवतरण तर दुसरें पौर्वात्य; असें जोडकाम चाललें होतें. मुद्दा एकच: 'वैश्विक विचारैक्य." किंबहुना विचारहि एकच: चिरंतन आध्यात्मिक मूल्यें. अवघी परिषद मंत्रमुग्ध झाली होती. कोणी डोळे विस्फारून, कोणी मिटून, कोणी असहायपणे तोंड उघडें टाकून, कोणी खालच्या ओठावर वरचे दात रोवून, कोणी शेजाऱ्याच्या खांद्यावर मान टाकून—असा श्रवणभक्तीचा उन्मनी सोहळा माजला. मधूनच टाळ्यांचा कल्लोळ उठे. त्याची जणु सूचना देवीजी देत—अभावितपणे. अभावितपणेच असेल, पण भाषणभर आचार्यांच्या शेजारीं बसलेल्या देवीजी वाक्यावाक्याला पसंतीचे सस्मित हावभाव करीत होत्या. अर्थानुरोधाने मुद्रेवर हर्षशोकाचे आवेग दाखवीत होत्या. (जणु आपल्याच भाषणाचा 'प्लेबॅक' देत आहेत!) कधी एखाद्या शब्दालाच 'आह्'च्या चीत्काराने दाद देत. (अगदी—आणि कंसांत—खरें लिहायचें म्हणजे चारपंचमांश सभा देवीजींकडे डोळे लावून होती—कान अर्थात् आचार्यांकडे!) अशी तल्लीनता विरळा!

मुख्य अधिवेशन तर थाटांत पार पडलें. देवीजींच्या चेहऱ्यावर कृतकृत्यतेचें ठसठशीत पूट चढलें (तें चढलें 'आयव्हरी' पावडरच्या थरा-

वर). त्या पुटाची पडछाया त्यांच्या भोवतालच्या कार्यकर्त्यांवर दिसत होती. त्याशिवाय श्रीमंत धर्माजीरावांच्या तोंडभर ओघळत होता तो आगळाच अभिमान. त्यांच्या कोणा पूर्वजाने कोठे दांडपट्टा फिरवला असेल, आणखी एखाद्याने लढाईत किंवा वाड्यांत कोठे चिल्लर पराक्रम केला असेल, पण असलें कोणीं केलें नव्हतें. शेपांचशे माणसांसमोर उभें राहून भाषण करायचें— किंवा वाचायचें—आणि तेंहि इंग्रजींतून. माणसेंहि गावरान नाहीत. "अख्ख्या विशेवांतून" (शब्द त्यांचेच!) आलेलीं. त्यांत पुन्हा कांही साहेब—अगदी साफ गोरे. त्या आनंदाच्या भरांत श्रीमंतांनी कमेटीच्या 'मेंब्यांना' "कोंबडीचें" जेवण कबूल केलें.

झालें, आता उरले फक्त परिसंवाद आणि सांस्कृतिक कार्यक्रम. हीं नांवेंच जरा जास्त सांस्कृतिक होतीं. पण त्यांचा नीटसा अर्थ कळला नाही किंवा तीं नीट म्हणतांहि आलीं नाहीत तरी स्थानिक मंडळींना तीं आवडत. इंग्रजी नांवें याहून अवघड. 'शिंपोजम्' की 'सिंपोसिअम्' असा एकदा दोघा कार्यकर्त्यांत वाद माजला, तेव्हा पुण्याच्या एका साक्षेपी प्राध्यापकांनी दोघांनाहि चूक ठरवून 'सायंपूजिअम्' हाच शुद्ध उच्चार असा ग्रीक हवाला दिला. इतकेंच नव्हे तर ग्रीक व संस्कृत या भाषा एककुलोत्पन्न असल्याचा पुरावा त्या शब्दांत असल्याचें ठामपणे सांगितलें. 'कल्चरल प्रोग्रॅम' तेवढा अवघड वाटला नाही. कल्चरची कानांना चांगलीच सवय झाली होती. असो.

पहिल्या परिसंवादाचा विषय होता : 'साहित्य आणि विश्वाचें ऐक्य'. विषयाचा व्याप ध्यानांत घेतां तो पावणेतीन तासांत आटपला हें आश्चर्यच. त्याचें कांहीसें श्रेय त्या सभेचे अध्यक्ष रणछोडभाई दवादलाल यांस दिलें पाहिजे. दहाबारा मिनिटांपार वक्ता गेला की, ते स्वतःच उठून बोलूं लागत. देहाप्रमाणे त्यांचा आवाजहि विशाल; पुन्हा आर्जवी. या सगळ्याच्या एकत्रित परिणामाने त्यांचें अध्यक्षपद यशस्वी झालें. या परिसंवादाला सुरुवात केली ती नकुलचंद्र बरुआंनी. त्यांना वीस मिनिटें मिळालीं. त्यांत ते मुख्यतः विश्वाविषयी बोलले. फार तळमळीने बोलले म्हणून असेल, पण त्यांतून बाहेर पडलेच नाहीत. त्यामागून प्रा० स्वच्छंदे साहित्यावर बोलून गेले. साहित्याच्या जुन्या-नव्या व्याख्या, त्यांतील व्यक्तिस्वातंत्र्य, त्याचें नैतिक अधिष्ठान, आधुनिक साहित्याची क्षुद्रता आणि समाजद्रोहकता असे अनेक पोटविषय त्यांनी दहाबारा

मिनिटांत कोंबले. चिरक्या आवाजांत पण तावातावाने, अगदी प्रेषिताच्या आवेशांत, बोलले. मागाहून एका पोरसवदा वक्त्याने त्यांच्या भाषणांतील विसंगति दाखविण्याचा प्रयत्न केला; पण असली विघातक वृत्ति परिषदेंत नको असें म्हणून रणछोडभाईनी तीन मिनिटांतच त्याला थांबवला, आणि 'विधायक आणि विघातक यांतील द्वंद्व' या विषयावर ते स्वतः अकरा मिनिटें बोलले. असो. आणखी सातआठ भाषणें झालीं. बिली वाइल्डर 'ऐक्य' या विषयावर मोठ्या गप्पिष्टपणे बोलला. त्याचा एक मुद्दा चिंतनीय होता. म्हणाला, "ऐक्याची हडेलहप्पी कल्पना नको. ऐक्य कोणाशीं करावें याबाबत निर्णय-स्वातंत्र्य हवें." यांत संपूर्ण विषयापर्यंत कोणताच वक्ता पोचला नाही. प्रत्येकाने आपापल्या कप्प्यावर वक्तव्य केलें, आणि हे "सगळे कप्पे कल्पनेने एकसंध करून विषयाचा समग्र आकार प्रतीत होणें कठीण पडूं नये" असें मुंबईच्या एका संपादकांनी लिहिलें तें खरें असावें. याशिवाय शुद्ध विषयांतरें होतींच. ललिथाम्मा नंबुद्रिचरणने स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय जगांत शांति नांदणार नाही असें बजावलें. उलट हेलन व्हाइटच्या मतें चूलमूल-परायण हिंदी स्त्रीपाशीच सुखसमाधानाची गुरुकिल्ली आहे. पं० बद्रीप्रसाद चौबे यांनी संस्कृत भाषेची महती सांगितली व तिचें माहात्म्य आणि वारसा आता हिंदीला मिळाला असल्याचें जाहीर केलें. प्रा. चिंतामण व्यवहारे यांनी प्रकाशक लेखकाला वाजवी मोबदला देत नाहीत अशी तक्रार केली. अशीं दशदिशांना भाषणें पांगल्यासारखीं वाटलीं तरी त्यांना मुळांत एकवटणारें सूत्र होतें आणि तें म्हणजे या विश्वांत ऐक्य हवें आणि तें भारतीय साहित्याच्या पुण्याईनेच लाभेल. हा गाढ निष्कर्ष समारोपाच्या भाषणांत रणछोडभाईनी काढून दाखवला. पुन्हा एकदा श्रोते खूष झाले. कमीअधिक अस्खलित इंग्रजींत इतकें वक्तृत्व कानावरून जाण्याचा योग त्यांच्यापैकी फारच थोड्यांच्या नशिबीं यापूर्वी आला होता. अशीं तऱ्हेतऱ्हेचीं माणसें, कांही चमत्कारिक नांवांचीं, तीं आपल्याला उद्देशून कांही तरी सांगत आहेत या कल्पनेनेच केवढें बरें वाटत होतें! ते नक्की काय सांगत आहेत हें नच कळलें तरी चालण्यासारखें होतें.

पहिल्या परिसंवादाचा विषय असा उंचींत भव्य होता, तर दुसऱ्याचा रुंदींत प्रशस्त होता. तो असा: 'भारतीय भाषा: भूत आणि भवितव्य.' योजना अशी की आपल्या चौदा भाषांचा व त्यांतील साहित्याचा इतिहास

प्रत्येकीं पांच मिनिटांच्या निबंधांत सादर करावयाचा. हा पूर्वार्ध. उत्तरार्धांत भवितव्याची चर्चा. अध्यक्षस्थानीं सर यू० के० नमःशिवायम् यांची स्थापना झाली. त्यांच्या उजव्या हाताशीं सांगासवरायला देवीजी होत्या. त्यांनीच प्रथम अध्यक्षांची ओळख करून दिली. सरसाहेबांच्या आजवरच्या इतिहासाचें त्यांनी तेरा मिनिटांत संक्षिप्त समालोचन केलें आणि त्यांची विद्वत्ता, चारित्र्य, देशभक्ति, रसिकता, प्रेमळपणा इत्यादि गुणांचा केवळ आठ मिनिटांत उडता गौरव केला. "सर यू० के० म्हणजे पूर्व आणि पश्चिम, आणि भारतीय संस्कृतीच्या संदर्भांत, उत्तर आणि दक्षिण, यांचें मधुर रसायन आहे. वैश्विक सभ्यतेचा हा केवळ आटीव अर्क आहे. हें विश्वाचें अणुरूपच म्हणा ना." हा टाळ्यांचा गजर झाला; तो सरसाहेबांच्या गौरवाइतकाच, किंवा त्याहून अधिक, देवीजींच्या कौतुकासाठी होता. सर यू० के० म्हणजे गाजलेला वक्ता. तो काय हार जातो? त्यांनी सुरुवातच केली. "या अणूचें आणखी विच्छेदन नको. स्फोट होईल." स्फोट झाला तो हशाचा. देवीजी तर अडीच मिनिटें घुसळून घुसळून हसू काढीत होत्या. त्यामुळे, निश्चित विनोद न उमगलेला, बहुसंख्य श्रोतृवर्गहि या हसाहसींत सामील झाला. या उच्च संमेलनांत, नाही तरी, हसण्याला विशेष संधि मिळाली नव्हतीच. तेवढेंच गांभीर्य निचरून गेलें! पण सरसाहेब म्हणजे मुरलेला दरबारीहि. त्यांनी चक्रवाढव्याजाने स्तुतीची परतफेड केली; आणि देवीजींना लाजवलें. (दोन्ही अर्थांनी!) कसल्या कसल्या पौर्वात्य आणि पाश्चात्य नायिकांना तुलनेने हीन ठरविलें, आणि शेवटीं म्हटलें, "श्रीमती धनलक्ष्मीदेवींत लक्ष्मी आणि सरस्वतीदेवी एकत्र वास करतात हें सांगण्यांत विशेष काय? तशा त्या वारंवार करतात हें मी स्वानुभवाने सांगतों. तसें त्या दोघींत द्वैत नाही, साम्य आहे. राजा रविवर्म्यांचीं त्या दोघींचीं चित्रें पाहा. अलंकार आणि आसनं आणि आसमंताचा थोडा तपशील सोडल्यास जणु जुळ्या बहिणी. पण देवजींतील संगम त्याहून उदात्त आहे. सत्त्वशुभ्र गंगा, प्रीतिराजस यमुना आणि सुप्तगंभीर सरस्वती यांची ही त्रिवेणी आहे. हें मोक्षाचें द्वारच म्हणा ना!" टाळ्यांनी मंडप गदगदा हालला. देवीजींनी पदराने अर्धवट तोंड झाकण्याचा सुरेख आविर्भाव केला. नरसिंहरावजी पहिल्या रांगेंत कोचावर बसले होते; त्यांनाहि सगळें नीटसें कळलें नाही, पण हा लाजण्याचा विषय आहे हें त्यांनी ताडलें व तद्वत्

वर्तन केलें. असो. अशी ही खुशामतीची जुगलबंदी छान रंगली; पण तिनेच किती वेळ खाल्ला. मग सर यू० के० विषयाकडे वळले—किंवा वळल्यासारखें वाटलें, इतकेंच.

अध्यक्षांचें प्रास्ताविक भाषण यापुढे एकोणतीस मिनिटें चाललें. त्याचा सूर असा : 'प्राचीन साहित्याच्या मानाने आधुनिक साहित्य टुकार आहे. एकोणिसाव्या शतकानंतर इंग्रजी व युरोपीय साहित्यहि खुजटलें. पण तें जुनें इंग्रजी आणि आपलें प्राचीन संस्कृत यांच्या जोड आधारावरच आपली प्रगति शक्य आहे. सामान्य लोकांच्या बाजारी भाषांना नाहीतर कसलें भवितव्य?' येथेहि देवीजी सारख्या दाद देत होत्या, डुलत होत्या, हसत होत्या. भाषण लांबलें तसें व्यासपीठावरील ते चौदा विद्वान् निबंधवाचक अस्वस्थपणे पुन्हा पुन्हा घड्याळाकडे पाहूं लागले; अध्यक्षांनी लावलेल्या सुरामुळेहि चलबिचल वाढली. कुजबुज सुरू झाली. दोघांचौघांनी म्हणे कडवटपणे अध्यक्षांच्या भूत-भवितव्याची चर्चा सुरू केली. भूतकाळावर सारवासारव करून पुन्हा एकदा उज्ज्वल भवितव्य घडविण्याच्या त्यांच्या धडपडीचा कोणीं उल्लेख केला; कोणीं त्यांच्या सार्वजनिक चारित्र्याचा, कोणीं खाजगी शीलाचा. कुजबुज वाढली तसें देवीजींनी हसत डोळे वटारून ती बंद केली. शेवटीं एकदा सरसाहेबांनी आवरलें. (की देवीजींनीच तें केलें कोण जाणे!) अजून चौदा निबंध वाचायचे होते आणि प्रास्ताविकांतच तासभर वेळ गेला होता. पुढे उत्तरार्ध. थोडें अंकगणित जाणणाऱ्या श्रोत्यांत आतापासूनच चुळबुळ सुरू झाली. कोणी पाय मोकळे करायला बाहेर पडले; ते वेटे लौकर मोकळे होईनात म्हणून त्यांपैकी बहुतेक जण फिरायला गेले. देवीजींनीहि झटपट आकडेमोड करून अध्यक्षांकरवी जाहीर केलें की प्रत्येक विद्वान् वक्त्याने आपल्या निबंधाचा सारांश अडीच ते तीन मिनिटांत सांगावा. चारदोन विद्वान् उसळणार होते, पण देवीजींच्या मार्दवाने संथावले. आणि एकामागून एक चौदा विद्वानांनी आपल्या निबंधाचा सारांश मांडला. कोणी एक सोडून एक परिच्छेद वाचला; कोणी अशी दौड केली की विराम-चिन्हांचाच काय पण अर्थाचाहि धुव्वा उडाला. कोणी निम्माशिम्मा निबंध सोडून दिला. दोघांनी आत्मविश्वास घट्ट करून लेखी निबंधाकडे न पाहतां तोंडी सारांश सांगण्याचें धाडस केलें. त्यांपैकी एक भलतीकडेच वाहावला आणि दुसरा इंग्रजीचा सराव व सभाधीटपणा नसल्यामुळे अडीच मिनिटें फक्त अडखळला.

तिघांचे सारांश अध्यक्षांनी घंटा बडवूनहि पांच मिनिटांपार गेले. सर्वांत उत्तम ठरलें बंगाली साहित्यावरचें भाषण—चारुचंद्र मुखोपाध्यायाचें. चारुचंद्रांची युगत अशी. त्यांनी आपल्या निबंधांतील सगळीं विशेषणें गाळलीं, आणि अडीच मिनिटांच्या घंटेला समेवर येऊन 'वाहवा' घेतली. थोड्या फुशारकीनेच त्यांनी नंतर कोणालासें सांगितलें की क्रियाविशेषणें गाळलीं असतीं तर पावणे-दोन मिनिटांत संपवलें असतें—आणि अवतरणें गाळलीं असतीं तर फक्त एका मिनिटांत. पुन्हा ऐवज तोच !

—बहुतेक निबंधांचा ऐवज एकसारखा होता. आपली भाषा फार प्राचीन; तिची परंपरा महान्. आज तिचे कांही लेखक असे आहेत की त्यांना इतर वाङ्मयांत तोड नाही मिळायची. मिळालीच तर इंग्रजींत; अथवा युरोपांत. चिन्नबसवप्पा हा आमचा ईलिअट, मगिंदरसिंग हा आमचा डी० एच्० लॉरेन्स; क्ृ० व्यं० भातखंडे म्हणजे सवाई सार्त्र; फलाणा हा फॉकनेर अधिक हेमिंग्वे अधिक चॅपेक !...आणि सिलोनी आणि डिलन टॉमस आणि टेनेसी विलियम्स आणि चेकॉव्ह...सगळे गोरे बिल्ले चढविले जात होते. आपल्या भाषेंतील आधुनिक साहित्यावर दोघांनी टीका केली. त्यांपैकी एकाने जुन्या वाङ्मयावरील निष्ठेमुळे तें विशेष वाचलेंच नव्हतें असें दिसलें; दुसऱ्याने जुनेंहि वाचलें नसावें. तो सेवानिवृत्त आय्० सी० एस्० अधिकारी होता. मराठी साहित्यावर बोलणारे प्रा० स्वच्छंदे हे यांपैकी पहिले.

यानंतर चर्चा. बहुमताचा कल असा होता की आपल्या भाषा थोर, लेखक थोर, आणि त्यांचें भवितव्य फारच थोर आहे. फक्त वाचकच कमी पडतो. प्रा० स्वानंद सुखात्मे म्हणाले की वाचकाचें अस्तित्व हा कलावंतावर जुलूम आहे; त्याला वाचकापासून स्वातंत्र्य ("Freedom from the Reader") हवें. श्री० मदनगोपाळजी म्हणाले की "आपल्या प्रत्येक भाषेंतील प्रत्येक पुस्तकाचीं इतर भाषांत भाषांतरें झालीं पाहिजेत. तरच राष्ट्रीय एकात्मता साधेल." कोणी म्हणाले ती हिंदीमुळे साधेल, कोणी संस्कृतमुळे, कोणी अश्लील वाङ्मयाला बंदी घातल्यामुळे, तर कोणी गोवधबंदीमुळे. मग मुद्दा निघाला की वाचक असा बेभरवशाचा आणि हलक्या पातळीवरचा, तेव्हा लेखकाचा त्राता कोण ? ते माजी आय्० सी० एस्० म्हणाले की अर्थातच आपलें सरकार. त्याला अनेकांनी कडाडून विरोध केला. सॅम मिनोचर होमजी

मूठ आपटून म्हणाले : "या शासनशाहीने आपलें वाटोळें होतें आहे. जेव्हा तेव्हा आपलें सरकार." आद्यभास्करन्ने त्यांना दुजोरा दिला. "सरकारच्या पुढ्यांतील माणसें, त्यांचे पूर्वग्रह, कोती बुद्धि यामुळे खऱ्या कलावंतांची उपेक्षा होते. सरकारच हवें तर परकें बरें. पूर्वग्रह नसतात. उदार दृष्टिकोण असतो. मात्र तसें खरें लोकशाही सरकार हवें." प्रा० व्यवहारे यांच्या मतें नव्या युगांत ती 'नव्या मालदारांची' (the new aristocracy) जबाबदारी आहे. आपले यशस्वी व्यापारी आणि कारखानदार यांनी कलावंतांची जोपासना केली पाहिजे; तें सरकारचें काम नव्हे. हाँगकाँगच्या टी वाँगचा याला पाठिंबा मिळला. आणखीहि भाषणें झालीं; मोठी रंगत आली; थोड्या ठिणग्याहि उडाल्या. नव्हे, त्या परिषदेंत चैतन्य आलें. असे तीव्र मतभेद उच्चारले जात असतांहि देवीजी सर्वच भाषणांना सारख्याच उत्साहाने मान डोलावत होत्या; स्मिताची रुंदी काय अमीअधिक असेल तेवढीच. त्यांनी स्वतः फक्त प्रा० व्यवहाऱ्यांच्या भाषणाला पुस्ती जोडून म्हटलें की आपल्या संस्थानिकांनी, जहागीरदारांनी, इमानदारांनी पूर्वी कलेला आश्रय दिला तो पुढेहि दिला पाहिजे...अध्यक्षांनी समारोप सातआठ मिनिटांतच गुंडाळला; श्रोते कमी झाले होते म्हणून नव्हे तर मेजवानीची वेळ होऊन गेली होती, कलेक्टरसाहेब व त्यांच्या श्रीमती खोळंबल्या होत्या म्हणून. तरी बोललेच. हल्लीच्या नांवांना बळी पडूं नका, इंग्रजी आणि संस्कृत 'क्लॅसिक्स'कडे पाहा, आपल्या चौदा भाषांत चौदा टेनिसन हवेत. त्याच्या 'एलेजी इन् कंट्री चर्चयार्ड' सारखी कविता निर्माण व्हायला हवी (येथे कोणी तरी फिसफिसलें)...इत्यादि.

असे हे परिसंवाद. त्यांचे सुबक वृत्तांत नुकतेच बाहेर पडले आहेत, ते पाहाण्यासारखे आहेत. देशोदेशीं प्रती जाणार त्यांच्या आणि शेंगवलीचें नांव गाजणार...लौकरच खुद्द देवीजी कोठल्याशा शिष्टमंडळाबरोबर बर्लिनला जाणार आहेत तेव्हा शेदोनशे प्रती स्वतः योग्य लोकांना देतील...त्यांतून आणखी परिषदा...आणखी परदेशयात्रा...

परिषदेचीं उपांगें कांही कमी पडलीं नाहीत. दोन रात्रीं 'सांस्कृतिक कार्यक्रम' झाले. 'लोकनाट्य' म्हणून तमाशाची थोडी चुणूक दाखवली, पण चावटपणा काढून. सोंगाड्याने गौळणींना अडवलें तें सहकारी दुग्धालयाची वर्गणी गोळा करण्यासाठी. "सख्यासाठी झुरतें मी बाई" हें लावणीचें तोंड "सत्यासाठी

झुरतें मी बाई" असें अगदी निर्लेप करून टाकलें. तेव्हा "हा सत्त्या कनच्या गावचा?" असा टारगट सवाल कोण्या श्रोत्याकडून उठला. दोघेचौघे तर "ही उपासाची लावणी नको आपल्याला" म्हणून बाहेर पडले. त्यावर "हीन अभिरुचि" असा प्रा० स्वच्छंद्यांनी शेरा मारला. असो. पण बहुतेक शिष्ट-मंडळी कौतुकाची मुद्रा धारण करून बसली होती. परदेशी पाहुण्यांपैकी एकदोघेच हजर असत. त्यांना देवीजी इंग्रजींत भाषांतर करून सांगत. तेहि कर्तव्यबुद्धीने कौतुक करीत. मराठी न जाणणाऱ्या देशी पाहुण्यांना कोणी ना कोणी हिंदींत अथवा इंग्रजींत भाषांतर करून सांगे. भाषांतरांत तर उरलासुरला अर्थहि आणखी सपक होई. असो. असेच नाटकांचे प्रवेश झाले. एक संस्कृत शाकुंतलांतील होता. दुष्यंताने कोल्हापुरी पटका बांधला होता व सर्व श्लोक बोलपटांतील नवनव्या चालींत बसवले होते. "याने शाकुंतलाची कालातीतता (timelessness) सिद्ध होते" असें प्रा० स्वच्छंदे कु० हेलन व्हाईटच्या कानाशीं म्हणाले. नृत्यें होतींच—भारतनाट्यम् आणि कथाकळी आणि कथ्थक आणि मणि-पुरी. कांही स्थानिक फुगड्याहि झाल्या. भावगीतें, कवाल्या, भजनें, संगीत लेझीम—करमणुकीच्या सर्व तऱ्हा पुरविण्याची कोशीस झाली. खास पाहुण्यांच्या खाण्यापिण्याचीहि. देवीजींनी तिकडे जातीने लक्ष दिलें होतें. साहेब लोकांसाठी (आणि त्यांच्या निमित्ताने) मुंबईहून इटालियन भटाऱ्याने केक्स, डब्यांत बंद केलेलीं हरतऱ्हेचीं खाद्यें, नवलाईचीं फळें मागविलीं होतीं पण साहेबलोकांनी आपलींच खाद्यें मागूनमागून खाल्लीं. कु० हेलनने सांडग्या-साठी जीव टाकला; जातांना डबा भरून नेले. कांद्याचीं भजीं 'वॉंडरफुल' असल्याचा वाइल्डरसाहेबांचा अभिप्राय पडला. "अगदी स्थानिक चीज खिलवा" असा आग्रह धरला तेव्हा झुणकाभाकरीचा बेत केला. डोळ्यांतून पाणी काढून साहेबांनी पृच्छा केली, "या पदार्थविशेषाचें नामाभिधान काय?" देवीजींनी मुलायमपणे सांगितलें, "झुङ्काभॅकर." "वॅाट अ म्यूझिकल नेम!" प्रा. उंब्रजकर त्याचें इंग्रजी भाषांतर करून सांगूं लागले तेव्हा कु० हेलनला ठसका लागला...अशा प्रेमळ गमती किती वर्णाव्या?

—परिषदेच्या समारोपांत एकमेकांचे आभार मानण्याची अहमहमिका लागली होती. तो प्रसंग साधून अध्यक्षांनी, सर यू० के० नी व आणखी एकदोघांनी मोठमोठीं भाषणें टाकलीं; पण त्याचें कोणी मानलें नाही. पोरेंसारेंच

नव्हे तर बापईमाणसेंहि दिसेल त्या तिऱ्हाइताची स्वाक्षरी घेत होतीं; क्वचित् ती करतां आली नाही की विचारणाऱ्याला भूल उमगायची. पण खेळीमेळी बिघडली नाही.

—मग पाहुणे पांगले. मंडप सुना झाला; मग त्याचा सांगाडा उरला; तोहि नाहीसा झाला. शेंगवलीला सुनेंसुनें वाटूं लागलें. पण तिचा उर भरून आला तो देवीजींच्या कर्तबगारीने...एक बाईमाणूस, पण तिच्यासाठी साता-समुद्रापारचे लोक येतात!

—देवीजी बिचाऱ्या शिणल्या होत्या. पण त्यांना धन्य धन्य वाटत होतें. शेंगवलीलाहि वाटत होतें.

१२

## प्रस्तावना कशी लिहावी ?

मराठी वाङ्मयाच्या बाजारांत आता प्रस्तावनांना पुन्हा तेजी येणार असा माझा कयास आहे. तेव्हा हा मोका साधून होतकरू आणि होऊं घातलेल्या प्रस्तावनाकारांच्या सोयीसाठी त्या वाङ्मयप्रकारांचें तंत्र तपासावें म्हणतों. आजवर तें कोणीं केलें नाही. इतर अनेक प्रकारांचीं तपशीलपर तंत्रें पढतशहाण्यांनी सांगितलीं आहेत; कथा, कादंबरी कशी लिहावी, निबंध कसा बनवावा, कविता कशी तयार करावी हें आता त्यावरील पुस्तकें वाचल्याने समजतें. त्यांतहि, दोन तऱ्हा आहेत. एक, प्रच्छन्न; दुसरी, अप्रच्छन्न. मराठी भाषेंत सांगायचें म्हणजे एक, काय मसाला जमवायचा आणि तो कसा रांधायचा हें सरळसोट सांगणारी. दुसरी, (या वाङ्मयप्रकारांचें सखोल विश्लेषण करण्याच्या निमित्ताने) त्यांत काय असावें आणि काय नसावें हें आडून सांगणारी. जसें : परीक्षेच्या बाजारासाठी उघडपणे लिहिलेलीं 'गाईड्स्' (अथवा टिपण्या अथवा प्रश्नोत्तऱ्या) आणि त्याच हेतूने पैदा केलेलीं पण 'प्रवेशिका' ('इंट्रोडक्शन टू...') सारख्या संभावित नांवाचीं चोपडीं. इतर वाङ्मयप्रकारांवर पहिल्या तऱ्हेचीं पुस्तकें खपमान पाहून निघतीलच. सध्या आत्मचरित्रांची चंगळ आहे. तेव्हा कोणी एक प्राध्यापक इंग्रजी पुस्तकें पुढ्यांत ठेवून मराठींत 'आत्मचरित्र कसें लिहावें?' यावर एक पुस्तक घडवीत आहे म्हणतात तें खोटें नसावें. असो. (किंवा नसो.)

तें ठीक, पण प्रस्तावना हा वाङ्मयप्रकार कसा अशी शंका कोणी काढील! ती भाबडी आहे. तसा त्याचा स्वतंत्र उल्लेख आपल्या साहित्यविषयक ग्रंथांत नसेल; कारण इंग्रजींत तो नसतो. साहेब कवितासंग्रह प्रसिद्ध करतो तो तसा अगदीच भुंडा असतो. मोठी प्रस्तावना सोडाच, साधा 'दोन शब्द'चा आशीर्वादहि त्यांत बांधत नाही. इतरांचें जाऊं द्या; स्वतः कवीहि कृतज्ञता बोलून दाखवीत नाही; प्रकाशकाविषयीहि! त्या थंड्या लोकांत रीतच नाही ती. आपल्याकडे आहे; आपल्या शालीन, शिष्ट आणि श्रद्धावान् संस्कृतीचा ती एक भाग आहे. कवीने आपल्या गुरु-उपगुरूंचा सद्गदित उल्लेख करायचा असतो. ज्या स्नेह्यांनी उत्तेजन दिलें, ज्या संपादकांनी प्रथम कविता छापल्या, ज्या विद्यार्थिनीने सुंदर हस्ताक्षरांत मुद्रणप्रत तयार केली, ज्या कोणीं मुखपृष्ठ रंगवलें आणि ज्या प्रकाशकांनी निःस्वार्थपणे हा बोजा अंगावर घेतला त्यांचे आश्रिताच्या आवेगाने आभार मानावयास हवेत. ते नसले तर मी कुठचा असा बापुडवाणा भास हवा. तेव्हा इंग्रजींत नसलेला असा देशी वाण आपल्यांतहि कधी कधी आढळतो, त्याची दखल घेणें, चीज करणें, अवश्य आहे. प्रस्तावना हा असा मराठी वाण आहे.

अर्थात् ही प्रस्तावना परक्याची, स्वतः लेखकाची नव्हे. खांडेकरांसारखा एखादा लेखक शॉप्रमाणे दीर्घ प्रस्तावना लिहून उरलेल्या ग्रंथाचें रहस्य विशद करतो. पण तो खरा ग्रंथाचाच एक भाग; जणु पूर्वक्रिया. आणखी कोणी ग्रंथाची मूळ कल्पना कशी सुचली (किंवा कोठून उचलली), तो लिहायला निमित्त काय झालें, इत्यादि कमीअधिक खरी माहिती पुरवतात; पण त्याला कोणी प्रस्तावना म्हणत नाही; निराळेंच कांही कांही म्हणतात.

एकूण, प्रस्तावना हा खास मराठी नग आहे; त्याची स्वतंत्र जडण-घडण आहे. वाङ्मयप्रकार म्हटला म्हणजे चालू विद्वद्भाषेंत त्याला 'विशिष्ट आकार', 'पातळ्यांचा छेद'. 'कलात्मक आगळीक' (किंवा आगळेपणा) आणि 'बहिरंगाची अंतरंगाशीं जवळीक' असले गुण लागतात. शिवाय तो वाचनीयहि असावा अशी प्रामाणिक वाचकाची अपेक्षा असते. प्रस्तावनाहि कित्येकदा मूळ ग्रंथापेक्षा अधिक वाचनीय असल्याचा निर्वाळा अनेकदा मिळतो. वर उल्लेखिलेले महान् आवाजदार गुण असलेलें लिखाण वाचनीय नसतें हें नेहमीच खरें नव्हे. तो टीकाकारांचा कर्कश आवाज; कलावंताचा नव्हे. आणि

त्यांतील हवा काढून टाकल्यास ते सगळे गुण अगदीच मोघम असल्याचें दिसून येईल. प्रस्तावना हा टीकालेखनाचाच एक भाग आहे असें वरवर वाटलें, तरी तें वरवरचेंच. मूळ ग्रंथ न वाचतां त्यावर मत प्रदर्शित करणें, ग्रंथकाराऐवजी स्वतःचा वडेजाव सांगणें किंवा सुचविणें, विषयांतर करणें, इत्यादि साम्यस्थळें असलींच तरी तीं गौण आहेत. वैषम्येंच अधिक. थोडक्यांत सांगायचें म्हणजे टीकावाङ्मयांत 'कलात्मक अलिप्तता', 'आवर्तात्मक आत्मनिष्ठा',... पण नको तो भाषांतऱ्या शब्दजंजाळ! सुज्ञांस अधिक समजावून सांगणें नलगे.

आता थेट विषयास भिडावें. मूलभूत प्रश्न असा की प्रस्तावना कशाला? त्याला अनेक उत्तरें संभवतात. वाग्भटाने वाग्बट्टला आशीर्वाद द्यावा, बुजुर्गांने नवजवानाच्या पाठीवरून कौतुकाचा हात फिरवावा, हें एक. लेखकाच्या कलेचें गुह्य हुडकण्यांत वाचकाला मार्गदर्शन करावें हा दुसरा. प्रस्तवनाकाराच्या पुण्याईने ग्रंथाची प्रतिष्ठा वाढवावी हा तिसरा. तेवढी पुण्याई त्याच्या गाठीं नसल्यास प्रस्तावनाकाराचा टिळा चढवून त्याला ती मिळवून द्यावी; तशा खुशामतीने त्याचेंच नव्हे तर आणखी कोणाचीं 'अंतरें जिंकावीं' आणि साहित्य-हाटांत त्याचे टक्के करावे; परतफेडीच्या शिष्टाचाराने लेखकालाहि प्रस्तावनाकार होण्याची संधी मिळेल म्हणून; निदान मूळ पुस्तक अगदीच रोड असल्यास प्रस्तावनेंत तेवढेंच त्याचें अंग भरेल म्हणून...अशीं किती उत्तरें द्यावींत? बारीक दृष्टीने पाहिलें तर कदाचित् प्रस्तावनेगणिक वेगळें उत्तर मिळेल. वाङ्मयीन मौलिकता म्हणतात तिचाच हा एक मासला.

प्रस्तावनांचे पांच प्रकार असतात. पांचच कां? कारण असे प्रकार बहुधा पांचच असतात. निदान तसा संकेत आहे. (तीन नसले तर—पण तीन म्हणजे फार कमी पडतात.) खरें म्हणजे त्याहून अधिक पाडतां येतील; पण सगळे पांचांतच बसवतों. हें नुसतें तात्त्विक पिसणें नव्हे; प्रत्यक्ष उदाहरणावरून विगमन-पद्धतीने हें वर्गीकरण केलें असल्याचें स्पष्ट होईलच.

त्या पांच प्रकारांचीं नांवें अशीं : आशीर्वादात्मक, अवतरणात्मक, असंबद्ध, अतिशयोक्त, आणि अतिविशाल. अशा नांवनिशींत अनुप्रास साधावा हा संकेतहि पाळल्याचें जाणत्यांनी ओळखलें असेलच. नांवांकडे फाजील चिकित्सेने पाहूं नये, अनुप्रासाच्या निकडीची सवलत द्यावी, ही मागणी ओघानेच आली. वैकल्पिक नांवें आणि पोटप्रकार अवश्य तेथे येतीलच.

*आशीर्वादात्मक प्रस्तावना*

हा सर्वांत जुना प्रकार. शेंसव्वाशे वर्षांची परंपरा असलेला. 'इंग्लंड देशाचें भूगोलवर्णन' (१८३९?) या रा० रा० कोंडो मोरेश्वर यांच्या ग्रंथास (पृष्ठें २४) "मे० आनरेबल मि० वुइल्यम् फ्रांसिस ष्टुअर्टसाहेबबहादुर, कौन्सिलाचे मेंबर, यांणीं कृपावंत होऊन" प्रस्तावना लिहिल्याचें नमूद आहे. अशा कृपावंत प्रस्तावना लिहिण्याची जोखीम पुढे साहेबबहादुरांकडून देशी रावबहादुरांकडे आली. तेथून रावसाहेबांकडे घसरली. त्या पदव्यांचा टेंभा कमी झाल्यावर देशभक्तांची पाळी आली. देशभक्तीने साहित्यसेवा मोजण्याची टूम ओसरल्यावर साहित्यिकालाहि हा ज्येष्ठपणा मिळूं लागला. पण, एकंदरीने, हा प्रकार केवळ साहित्यिकासाठी नाही. त्याच्या आशीर्वचनाला तें वजन येत नसावें. या प्रकाराला कधी 'पुरस्कार' असेंहि म्हणतात. तो कित्येकदा पत्ररूपांत असतो. उदाहरणार्थ, एका नव्या कवितासंग्रहाला आचार्य भडसावळे यांची पत्ररूपाने प्रस्तावना आहे; तिच्यांतील कांही भाग :

प्रिय बंधु,

आम्ही अर्वाचीन काव्य वाचीत नसतों. पण आपण कवितासंग्रहाचीं स्थूल मुद्रितें प्रेमाने पत्ठविलींत म्हणून थोडासा नेम मोडून कु० दमयंतीकडून त्यांतील कांही पानें वाचून घेतलीं. तिने मोकळेपणाने वाचलीं यावरून त्यांना विकाराची बाधा झालेली नाही असें आम्ही समजतों. आपलें स्खलनशील वय आणि हल्लीचा काळ हीं ध्यानांत घेतां आपला संयम स्तुत्यर्ह मानावा लागेल.

आपल्या काव्याचे विषय वाचून संतोष झाला. अद्य कवीला क्रौंचमिथुनाने जागृति आणली; मानवमिथुनाने नव्हे. क्रौंच हा सत्त्वाचें प्रतीक. तें भंगतांच "श्लोकत्वमापद्यत तस्य शोकः" आपल्या काव्यांत असा सत्त्वभंगजन्य शोक प्रतीत झाला. आपण वृत्तनियम निष्ठेने पाळतां यावरून नियमनावर आपली श्रद्धा आहे, बेलगामी स्वातंत्र्यावर नाही हें उघड आहे.

चिच्छक्ति तुमच्या हातून असेंच आत्मकल्याणकारी आणि परकल्याणप्रद काव्य लिहवो अशी प्रार्थना.

जय रामायण.

आपला भ्राता,
(आचार्य) दाजी भडसावळे

पूर्वीच्या रावबहाद्दुरी प्रस्तावनेच्या अंतीं 'जगन्नियंत्यापाशीं प्रार्थना' असे —किंवा 'श्रीशारदेच्या पदारविंदीं' तिच्या वरदहस्ताची विनंती. याचप्रमाणे— पीठाचे गुरु अथवा बुवा अथवा म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष आशीर्वाद देतात. साहित्यिकाने दिल्यास त्यांत शारदा, चिच्छक्ति वगैरे नसतात. "अमुकाग्रजांची परंपरा तुम्ही चालवाल असें म्हटल्यास तें चूक होईल असें नाही" असें कांही तरी सावध आणि पातळसें असतें. कारण अमुकाग्रजांच्या इतर चेल्यांना सांभाळायचें असतें.

'छांदोग्य' या वाह्यात् मासिकाने एका बिनीच्या टीकाकाराच्या संग्रहाचें परीक्षण काल्पनिक प्रस्तावनेच्या रूपांत केलें होतें. त्याचा शेवट असा : "अशीच तुम्हांला इंग्रजी ग्रंथांतून आणि नियतकालिकांपासून स्फूर्ति मिळो एवढीच त्या साहित्यनियंत्यापाशीं प्रार्थना."

***अवतरणात्मक प्रस्तावना***

प्रस्तावनाकाराच्या दृष्टीने ही सर्वांत सोयीची. लेखनाला अत्यंत सुलभ, आणि किमान कष्टाने कमाल जागा भरणारी. उदाहरणच द्यावें. प्रा० शांताराम गुळवेलकर यांनी कु० प्रियंवदा पोंक्षे यांच्या 'पियु पियु' या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिली आहे. तिचा आरंभ असा :

"कु० प्रियंवदाताई पोंक्षे या माझ्या एके काळच्या विद्यार्थिनी. विद्यार्थी-दशेंतहि त्यांचें काव्याचें प्रेम उठून दिसत असे. कॉलेजच्या भित्तिपत्रासाठी त्या नियमित कविता पाठवीत. त्यावरून कवयित्री म्हणून त्यांचा उज्ज्वल भविष्यकाल आम्हांला दिसत होता. या संग्रहाने ती अपेक्षा पूर्ण केली आहे.

कु० प्रियंवदाताईंचें मन किती संवेदनाशील आहे हें पुढील ओळींवरून कोणासहि दिसून येईल. (यापुढे कवितेच्या ८ ओळी.) निसर्गाचें त्यांचें निरीक्षण किती सूक्ष्म आहे पाहा. (यापुढे ३ अवतरणें : एकूण १४ ओळी.) पण निसर्गाच्या सौंदर्याइतकीच त्याच्या शिकवणीची त्यांना ओढ आहे असें पुढील ओळी वाचल्यावर कोण रसिक म्हणणार नाही? (२ अवतरणें—१३ ओळी.)

भावना आणि विचार या कवितारूपी नाण्याच्या दोन बाजू, असें एका ख्यातनाम पाश्चात्य साहित्यशास्त्रज्ञाने लिहिलेंच आहे. प्रियंवदाबाईंच्या काव्यांत

भावनेइतकाच विचारहि प्रज्वलित आहे. पण त्याचा आविष्कार मम्मटाचार्यांनी सांगितलेल्या 'कान्तासम्मिततयोपदेश' पद्धतीचा आहे. थोडेसे मासले उद्धृत करतों : (५ मासले; २९ ओळी.) त्यांची महाराष्ट्रावर भक्ति आहे (२ अवतरणें, ११ ओळी), तेवढीच भारतभूमीवर आहे (३ अवतरणें, १४ ओळी), पण जगावरहि आहे (४ अवतरणें, १९ ओळी).

वात्सल्य हा तर स्त्रीजीवनाचा अलंकार. लोरेत्ता वायोलिनी या इतालिअन कवयित्रीप्रमाणेच प्रियंवदाबाईंनी मुलांची फुलांशीं तुलना केली आहे. (३ अवतरणें, १६ ओळी.) त्याच बालभावाने त्या मृत्यूविषयीहि लिहितात. (१ अवतरण, ७ ओळीं.) पण जगांतील अन्यायाविषयी आवेशाने. (२ अवतरणें, १२ ओळी.) यावरून केशवसुतांची कोणाला आठवण होईल.

अंतरंगाप्रमाणे बहिरंगाचेंहि वैचित्र्य प्रियंवदाबाईंपाशीं आहे. त्या सुनीत जेवढ्या सफाईने लिहितात (अवतरण—एक सुनीत); तेवढ्याच सहजपणे अभंग (दोन अभंग). आणि मुक्तछंद (तीन अवतरणें–१५ ओळी) लिहूं शकतात. हें सर्वांनाच साधतें असें नाही. अधिक सरावाने त्या याहूनहि चांगल्या लिहितील.

प्रियंवदाबाईंच्या वैशिष्टयांचें मीं हें विवरण केलें आहे त्यावरून महदंबेपासून शांता शेळक्यांपर्यंत मराठी कवयित्रींची जी कोमल परंपरा आहे तिच्यांत प्रियंवदाबाईंना निश्चित स्थान मिळेल असा कोणालाहि भरंवसा वाटेल."

प्रस्तावना नेमकी आठ पानें भरली. (तेवढ्या जागेचा वायदा ठरलाच होता.) त्यापैकी पावणेसात पानें अवतरणांनी घेतलीं तें अलाहिदा. जुन्या संगीत नाटकांतून कधी नायक रंगांत आला की एकापाठोपाठ चारपांच पदें म्हणतो, मध्ये श्वास घेण्यापुरतें अथवा जिरेटोप किंवा मुगुट सारखा बसवण्यापुरतें थोडेंसें गद्य वापरतो : आणि असें पहा, प्रिये—किंवा : म्हणून म्हणतों, प्रियतमे—किंवा : ऐकच तर, नराधमा...तसें या प्रस्तावनेचें. त्या अर्थाने ती काव्यमय आहे. न वाचतां प्रस्तावना भरकटून काढल्याचा सवंग आरोप येथे गैरलागू आहे. उद्धृत केलेल्या दीडदोनशें ओळी तरी प्रा० गुळवेलकरांनी वाचल्या असणार. (म्हणजे त्यांनीच लिहून काढल्या असल्यास !) असल्या प्रस्तावनेची आणखी एक सोय म्हणजे वृत्तपत्रांसाठी 'घाईचीं परीक्षणें' लिहिणाऱ्यांना आयतेच स्तंभभरू मुद्दे व अवतरणें मिळतात. म्हणून

तेहि कृतज्ञताबुद्धीने अशा प्रस्तावनांना रसिक, मर्मग्राही, साक्षेपी, रसोद्ग्राही, विश्लेषक यांपैकी दोनतीन तरी विशेषणें लावतात. निदान विद्वत्तापूर्ण (किंवा व्यासंगपूर्ण) तरी म्हणतात. खुद्द प्रियंवदाबाईनी आपल्या 'दोन शब्दां'त गुरुवर्यांचे "सखोल पण सहानुभूतिपूर्ण चिकित्सा करून उत्तेजन दिल्याबद्दल" गहिवरून आभार मानले आहेत.

असा हा प्रकार सोपा, सोयीचा आणि सुटसुटीत आहे. त्याने मतभेद होण्याची अडचण नसते. "सर्वे तु सुखिनः सन्तु" हें प्रा० गुळवेलकरांच्या टीकालेखनाचें आणि एकंदर साहित्यिक जीवनाचें ब्रीद आहे असें म्हटलें गेलें आहे तें उगाच नव्हे. वेळ अथवा कामाचा उरक नसला तरी कोणाला नाही म्हणून दुखवूं नये अशा गोडव्याला ही झटपट-प्रस्तावना उपयोगी पडते.

***असंबद्ध प्रस्तावना***

ही पुढील परिस्थितींत उपयोगी पडते.

(१) पुस्तक वाचलें नसेल तर. (२) पुस्तकावर (चांगलें) लिहिण्यासारखें कांहीच नसलें तर.

उभय परिस्थितींत लिहिण्याचें तंत्र जवळजवळ तेंच. कला, जीवन, मानसशास्त्र, महाराष्ट्र संस्कृति, राष्ट्रीय एकात्मता, अध्यात्म असल्या हमखास विषयांवर कांही सर्वसाधारण विचार प्रकट करावेत. नंतर ज्या वाङ्मयप्रकारातील तें पुस्तक असतें त्याविषयी कमीअधिक मोघम चर्चा करावी. वाटल्यास त्याचा मराठींतील इतिहास खपेल तेवढ्या विस्ताराने द्यावा. आणखी वजन व पानभरती हवी असल्यास इंग्रजींतील थोडा इतिहास टाकावा; जातां जातां फ्रेंच, इटालियन, रशियन इत्यादींविषयीहि जरा 'तौलनिक दृष्ट्या' लिहावें. हें सगळें करून झाल्यावर—

"या विशाल आणि विविध पार्श्वभूमीवर प्रस्तुत पुस्तकाचा विचार व्हावयास हवा एवढेंच येथे सुचवून ठेवतों. लेखक नवखा आहे, त्याच्या अनुभूतीची कक्षा मर्यादित आहे, त्याचा विषय वेगळा आहे, याबद्दल अवश्य तेवढी सहानुभूति दाखविली जाईलच. ती दाखविल्यास रसिकांना या पुस्तकांत समाधान देईल असें बरेंचसें आढळावें." असा प्रस्तावनेचा शेवट करावा. हें सगळें जरा अधिक कोरडें वाटल्यास मधूनमधून लेखकाविषयी आपुलकी

दाखवावी, पण खुद्द पुस्तकाविषयी कांही विशेष विधान न करण्याची काळजी घेतलेली बरी.

असली प्रस्तावना लिहितांना इंग्रजी आणि अन्य युरोपीय वाङ्मयाचे इतिहास, आणि मराठीचाहि, आणि तत्सम संदर्भ-ग्रंथ हाताशीं असल्यास पुन्हा पुन्हा कोणाला विचारावें लागणार नाही. वेळप्रसंगीं त्यांतून वाक्येंच्या वाक्यें उचलावीं; पानेंच्या पानें नकोत; कदाचित् कोणाच्या लक्षांत येईल.

## *अतिशयोक्त प्रस्तावना*

अतिशयोक्ति अर्थात् स्तुतीची. मोजदाद केल्यास, याच प्रकारच्या प्रस्तावना सर्वांत अधिक आढळतील. सुप्रसिद्ध पत्रकार श्री० केशवराव कुळकर्णी यांचा हा हातखंडा खेळ. ते म्हणतातच : "प्रस्तावना लिहायचीच तर आम्ही खणखणीत स्तुति करतों. उगीच चिरचिर करीत नाही त्या कळकटासारखी. (म्हणजे प्रा० गो० श्री० कळके.) आम्ही ऐसपैस शाबासकीच देणार. नाही तरी त्याकरिताच प्रस्तावना मागतात." यांतील अतिरेक सोडल्यास थोडें तथ्य निश्चित आहे. प्रस्तावना मिळविण्याचा मुख्य उद्देश पुस्तकाला उठाव मिळावा, त्याचा बोलबाला व्हावा हाच असतो. निदान बहुतेक पुस्तकांबाबत तारीफ कमी पडली तर लेखक खट्टू होतो, रुसतो; प्रकाशकहि नाराज होतो. नवथर लेखकच नव्हे, तर चार पुस्तकें पाहिलेला, सगळें केलेंसवरलेला, जुना लेखकहि या बाबतींत हळवा असतो. तो चक्क रागावतो. मग भिडेस्तव प्रस्तावनाकार बदलून देतो. उण्यांकडे कानाडोळा करतो, आणि स्तुतीचीं सातआठ भरघोस (पण अर्थहीन) विशेषणें वाढवून देतो. केशवराव कुळकर्णी कशालाहि 'असामान्य', 'युगप्रवर्तक', 'उत्तुंग' 'अद्भुत', वगैरे म्हणून टाकतात. गोविंदाग्रजांनंतर (किंवा देवलांनंतर किंवा हरिभाऊंनंतर किंवा ज्ञानेश्वरांनंतर) हाच असें ठासून सांगतात. "अगा ऐसा जाहला नाही" या थाटांत. कुळकर्णी हे सर्वांत लोकप्रिय प्रस्तावनाकार. यांचा एकंदर हिशेब काढल्यास आजमितीस मराठींत प्रत्येकीं पांचसहा हरिभाऊ आपटे, बालकवि, गडकरी, केशवसुत, देवल, किर्लोस्कर लेखन करीत असावेत. इतकेंच की, प्रस्तावनाविषय असलेल्या लेखकाला विरोधाने उठाव देण्यासाठी त्या त्या वाङ्मयप्रकारांतील सध्यांचे इतर सर्व लेखक 'फडतूस' आहेत असेंहि ते सांगतात. म्हणजे तो हिशेब गडबडलाच!

या प्रकाराचा एक पोटप्रकार म्हणजे स्तुति करायची ती झगझगीत परदेशी फूटपट्ट्या वापरून. मग ती अचाट वाटते. एक उदाहरण: प्रा. चिं. बा. नामजोशी यांनी 'किशोरकुमार' यांच्या कादंबरीला लिहिलेल्या प्रस्तावनेंत पुढील परिच्छेद आहे:

"किशोरकुमारांत गॉल्सवर्दीची सामाजिक दृष्टि आहे तेवढीच हेन्री जेम्सची कलात्मकता आहे; आल्डस् हक्स्लीचें द्रष्टेपण आहे, तेवढीच विल्यम फॉकनेरची वस्तुनिष्ठा आहे. त्यांच्या शैलींत रोमे रोलॉंची तरलता, स्टेफान् झ्वाईगची भेदकता आणि तुर्जेनीव्हची वेधकता आहे. त्यांच्यांत कदाचित टॉलस्टॉयचा आवाका नसेल, पण स्टाइन्बेकची विविधता आहे..."

## *अतिविशाल प्रस्तावना*

प्रस्तावनेची संधि मिळतांच प्रबंध लिहिण्याचा हा प्रकार सहसा नवथर प्रस्तावनाकारच करतो. कांही मुरलेलेहि करतात. मूळ पुस्तकाचा सबबीसारखा उपयोग करून त्या लेखकाची पार्श्वभूमि तपशिलाने रंगवायची, त्याच्यावर कोणाकोणाची छाया पडली तें ठामपणे सांगायचें, त्याच्या गुणदोषांची किचकट चिकित्सा करायची आणि त्याचें व त्या वाङ्मयप्रकाराचें भविष्य सांगायचें. हें सगळें अशा अवसानांत की आपल्याला बरोब्बर नाडी सापडली आहे या सगळ्यांची. लेखकाला उजाळा देण्यासाठी पार्श्वभूमींत काळा रंग खूप भरावयाचा असतो. पूर्वीचे लेखक कोठे घसरले, कलेशीं त्यांनी बेइमानी कशी केली, तेव्हाचीं वाङ्मयीन मूल्यें क्षुद्र कशीं होतीं, हें घोळवून सांगितलें की लेखक मोठा दिसतो, प्रस्तावनाकार त्याहून मोठा दिसतो आणि पंचवीस-तीस पृष्ठांचा मजकूर तयार होऊन पुस्तक वजनदार होतें. अशा चारपांच प्रस्तावना एकत्र छापल्या की टीकावाङ्मयांत मोलाची भर पडते. मिळाल्यास असली संधि शहाण्याने गमावूं नये.

हे प्रस्तावनेचे पांच प्रमुख प्रकार. त्यांचें नीट मनन करून, काळवेळ पाहून, लेखकाचा आणि प्रकाशकाचा वकूब जोखून, प्रस्तावना लिहिल्यास लिहिणाऱ्याचें भलें होईल. त्याला अधिकाधिक मागणी येईल.

याशिवाय प्रस्तावनांचे एकोणीस उप-प्रकार संभवतात. पण कालस्थलाभा-वास्तव, आणि सगळेंच स्पष्ट करून दाखविल्यानें साहित्य-विचारांतील व्यंजनेला

(म्हणजे सूचकतेला) बाध येतो असा पूर्वसूरींचा संकेत आणि प्रघात असल्या-कारणाने, त्या इतरे-प्रकारांचा प्रपंच येथे करीत नाही.

परंतु यापैकीं कोणत्याच प्रकार-उपप्रकारांत न बसणारी प्रस्तावनेची एक वेगळीच जात अलीकडे दृष्टोत्पत्तीस येत आहे. तिला कोणी 'नव-प्रस्तावना' असें म्हणतात. तिच्यांत प्रस्तुत पुस्तकाच्या प्रस्तावापेक्षा नवताच अधिक असते. तिचें दृश्य रूपहि आगळें असतें. तिच्यांत भूमितीच्या आकृत्या, बीजगणिताचीं चिन्हें, शास्त्रीय (वाटणारे) फॉर्म्युले इत्यादि नेत्रोद्दीपक वैशिष्ट्यें आढळतात. तद्वत्, चित्र, नृत्य, संगीत, स्थापत्य, शिल्प, इत्यादि अप्रस्तुत कलांची परिभाषा आणि परिमाणें साहित्याला लावण्याचा खटाटोप त्यांत असतो; आणि भाषेचा डौल असा असावा लागतो कीं निश्चित अर्थनिष्पत्ति होऊं नये. विस्तारभयास्तव येथेच थांबावें.

१३

# अभिनव काव्यबोध

*प्रास्ताविक*

"रामायण आधी, मग झाला राम" या चालीवर "काव्याचा इतिहास आधी, मग कवि" असें म्हणतां येईल. हें वरवर पाहतां उफराटें भासलें तरी 'देखण्या' बुद्धीला त्यांतील अर्थ स्पष्ट होईल. त्या अर्थाचे विकल्प आणि पदर उलगडून दाखवावेत.

१. (अ) इतिहासकार द्रष्टा असतो. कालच्या साहित्याचा इतिहास त्याने लिहिला असें (मुखपृष्ठावरून) वाटलें तरी तो खरोखर उद्याच्या काव्ययोजनेचा आराखडा असतो. त्याबरहुकूम उद्याचा कवि लिहिणार हें अपरिहार्य आहे.

अथवा

(ब) ज्या कालाचा इतिहास आपण लिहीत आहोंत त्या काळांत काव्य-प्रांतांत काय काय घडणार हें आपण पूर्वी अजमावलें होतें, त्याप्रमाणे सहीसही सगळें घडलें, घालून दिलेल्या कोष्टकाबाहेर कोणी कवि घसरला नाही—हा अभिनिवेश आणि कृतकृत्यतेचा आनंद अशा इतिहासांत असतो. (क्ष) यांत

१. देखण्या = अंतर्दृष्टिशील. पाहा : "भावार्थदीपिकेची शब्दार्थदीपिका, पृष्ठ ३८९ (म्हणजेच प्रा० डॉ० स० दा० खुपरे यांचा पीएच्० डी० चा प्रबंध)

काळाची थोडी उलटापालट होते, पण सापेक्षतावादाचा अत्याधुनिक चष्मा लावून तिकडे डोळेझाक करावी. (ज्ञ) काळाचें बंधन कोणाला? म्हटलेंच आहे :

**कालाचा मेकॅनो**
**विसकटून,**
**मोडतोडून—**
**जोतें बांधूं वर,**
**टॉवर भुईंत (शीर्षासनयोगी)**
**—उलटी विहीर—**
**अहो, आम्ही त्वष्टे,—नवमेकॅनिक**
**कालाचे कलिकाल.**

**—विनाश सासवडकर**

१). (अ) व (ब) हे दोन्ही इतिहासकार द्रष्टाशाखेंतीलच. जगांत ही शाखा तुरळक आढळली तरी महाराष्ट्रांत (विदर्भ, मराठवाडा आणि गोमंतक धरून) ती विपुल आहे.[२]

२) "इतिहास हेंच अटळ सत्य; कवि अथवा कलावंत हा एखाद्या व्यक्तीबाबतचा प्रतिगामी गैरसमज" हें भाई ला० ल० बुंद यांचें मत या दृष्टीने ध्यानांत घेण्यासारखें आहे.

३) विद्यापीठांच्या परीक्षांसाठी मराठी साहित्याचा अभ्यास करणाऱ्यांवर प्रा० भ० गं० जंतरकर यांनी आपल्या "मराठीचा मर्मग्राहक" (तथा "प्रथमवर्ष ते पीएच्० डी० पर्यंतचा मार्गदर्शक") या[३] लोकप्रिय ग्रंथांत साहित्येतिहासाचें

२. श्री. प्रभाकर परवचे यांच्या मतें निरनिराळ्या देशांत द्रष्ट्यांचें लेखकांशीं प्रमाण असें : इंग्लंड-फ्रान्स वगैरे पश्चिम-युरोपीय देश—१ : ३१७·८; अमेरिका (म्हणजे युनायटेड स्टेट्स्) १ : २९·३७; रशिया वगैरे पूर्व-युरोपीय देश—·०१ : ४१२६७·९; नवा चीन—·०१ : १४६७२·९; हिंदुस्थान—१ : २९·३६ महाराष्ट्र—१ : २·८७; ("लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य आणि संस्कृति, लिमिटेड", वार्षिक अहवाल, १९५३)

३. प्रकाशक : ग्रीको-रोमन बुक डेपो, मुंजाबाचा बोळ, पुणें

माहात्म्य असेंच ठसविलें आहे. ते म्हणतात, "मराठी साहित्याचा मी येथे आकर्षक पण सोप्या पद्धतीने मांडलेला इतिहास, प्रिय विद्यार्थीविद्यार्थिनींनो, नीट स्मरणांत ठेवा. परीक्षेंत त्याचा हटकून उपयोग होईल. लेखकांचे गुणदोष व त्यांचे परस्परसंबंध ह्यांवर विशेष लक्ष ठेवा. सवड मिळाल्यास लेखकांचें मूळ लिखाण चाळून पाहावें; पण त्याने वैचारिक गोंधळ होणार नाही एवढी खबरदारी घ्यावी."

काव्येतिहासाचें, किंबहुना साहित्याच्या इतिहासाचें, वर विशद केलेलें महत्त्व ध्यानांत घेतां महाराष्ट्रांत गेल्या कांही वर्षांत अशा इतिहासांची निष्पत्ति फार झाली ह्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांही नाही. कोणी व्याख्यानरूपाने, कोणी लेखमालेंतून हस्त्यांनी, कोणी प्रश्नोत्तरतंत्राने, तर कोणी टिपणें एकत्र टाचून, इतिहास बनवितो. तसेंच कोणी आपलीं (मौलिक) मतें मांडतो, कोणी इतरांचीं कष्टपूर्वक गोळा करतो, तर कोणी फक्त इतरांचीं खोडून काढतो. सारांश, ज्याला जो उद्योग झेपेल तो आपल्या परीने इतिहास लिहितो. "साधनानाम् अनेकता" हेंच खरें.

या इतिहासांमुळे मराठी टीका-साहित्याची वजन आणि आकार या बाबतींत शीघ्र वाढ होत आहे[४] हें अभिनंदनीय असलें तरी अशा ग्रंथांतील "वैदग्ध्य, सौक्ष्म्य आणि प्रागल्भ्य" साधारण वाचकाच्या आवाक्यांत येत नाही. त्याशिवाय भाषेची अडचण असते. उदाहरणार्थ, वर अवतरणचिन्हांत दिलेले शब्द हे प्रा० भ० गं० जंतरकर यांच्या वाङ्मयेतिहासांतील गुण आहेत असें प्रस्तावनाकार—आणि त्यांचे ज्येष्ठ स्नेही—प्रा० ह० रा० खिरे लिहितात. असतील; पण साधारण वाचकाला त्याचें काय होय ? ते गुण आहेत हेंसुद्धा स्पष्ट सांगितलें म्हणून कळतें; नाही तर त्या शब्दांच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून ती दुष्कृत्यांची यादी आहे अशी घोर शंका यावयाची. तसेंच मम्मट, क्रोचे,

४. 'बुधगाव उच्च ग्रंथमंदिर' या संस्थेच्या ताज्या (शके १८७५) प्रतिवृत्तांतील पुढील वाक्यें पाहा : ग्रंथमंदिरांतील कपाटांत जागेची टंचाई वाढत आहे. विशेषत: मराठी टीका आणि टीकाशास्त्र या शाखेंत ती फारच वाढलेने त्या शाखेच्या कपाटांत पुस्तकें एकावर एक आडवीं रचून ठेवण्याचा प्रयोग करणेंचें ठरविलें. ग्रंथालयशास्त्राच्या दृष्टीने तो महत्त्वाचा आहे. त्यामुळे वाळवी कमी लागते, असा अनुभव आहे.

कझामिअँ, च्यूईँ–गम्–च्याँव, इत्यादि विशेषनामें हे विद्वान् लेखक फारच सामान्यपणे आणि सलगीने वापरतात. त्याने वाचक बुजतो. तसेंच आदर्शवाद, अंतर्मनप्रक्रिया, भृङ्गावर्तनी, अर्धसमवृत्त, च्छेकापन्हुति, अतिसारवास्तवता असल्या पोक्त परिभाषेने तो गांगरतो; आणि एकंदरीने भारदस्त विशेषणांच्या गर्दीत गोंधळतो. हें एवढें मोठें ज्ञान साध्यासुध्या वाचकाठायीं विद्वान् लेखकाने कां बरें गृहीत धरावें ?

ही सगळी परिस्थिति जमेस धरून आम्ही मराठी काव्याचा साधारण वाचकाला सहज समजेल असा इतिहास लिहिण्याचें अंगावर घेतलें आहे. त्यांत [१] विद्वानांचे उल्लेख–विशेषतः (अ) परदेशांतील आणि (ब) बटबटीत नावांच्या; [२] तौलनिक चर्चा (म्हणजे जसें, "अ ची भावनात्मकता ब हून पृथगात्म असली तरी ढ च्या मानाने ईषत्परपुष्टच आहे" अथवा "अंबु-कुमारांचें काव्य वाचतांना कुणा रसिकाला वाल्मीकीची आर्तता, संजीवनी-बाईचें नादमाधुर्य, उमरखय्यामची सुरई आणि शेलीच्या केसांच्या बटा यांची मधुर आठवण होणार नाही?"); [३] काव्यशास्त्र, छंदःशास्त्र, भाषाशास्त्र, सौंदर्यशास्त्र, मनोविश्लेषणशास्त्र, मुद्रणशास्त्र[५] इत्यादि कोणत्याहि शास्त्रांतील भेसूर परिभाषा; आणि [४] शैली (अ) लालित्य. म्हणजे (१) नाजुकसाजुक शब्द, (२) शब्दांचा अनैसर्गिक क्रम, व (ब) उच्चता. म्हणजेच (१) मराठी शब्दांचे लद्दू संस्कृत प्रतिस्पर्धी, (२) वृद्धीचा अतिरेक करून घडविलेलीं भाववाचक नामें (जसें, "मौर्ख्य". आम्ही मूर्खाला मूर्ख म्हणतों आणि त्याच्या करणीला मूर्खपणा. तसेंच माणुसकी (मानव्य नव्हे), गाढवपणा (गार्दभ्य नव्हे), (३) अकारण समास आणि (४) फाजील विशेषणें—या उपद्रवांना बंदी करण्यांत येईल. क्वचित् अपवाद केलाच तर तो घट्ट कारणासाठी आणि केवळ वाचकाच्या हितासाठी केला जाईल असें आगाऊ आश्वासन देऊन ठेवतों.

या इतिहासाचे किती खंड पाडावयाचे, ते कां, त्यांची नांवनिशी,

५. उदाहरणार्थ : "पृष्ठाचा डबल क्रौन आकार, दहा पॉइंट निर्णयसागरी टाइपांतील शार्दूलविक्रीडित ओळीमध्ये टाकलेल्या दोन लेडा व मथळ्याचा ब्ल्याक पायका यामुळे सौ० रमाबाईचीं सुनीतें मोहक वाटतात."

—प्रा० श्री० श्री० दिंडे (पांच पांच कवयित्री: दुसरी पंचकडी)

वापरायचा कागद व टाईप यांविषयी आमची पूर्ण योजना जाहीर होतांच निकराचे (पण, अर्थात्, तात्त्विक) वाद माजतील याबद्दल आम्हांस गाढ विश्वास आहे. निरनिराळ्या जाती-पोटजाती आणि संयुक्त महाराष्ट्राचे सर्व विभाग (शक्य तों जिल्हे) ह्यांना या इतिहासांत ज्यांचा परामर्श घ्यायचा त्या कवींच्या निवडीबाबत योग्य प्रतिनिधित्व देण्याची खबरदारी आम्ही घेणार आहोंत; तरीहि (पोट)जातिद्वेष आणि भौगोलिक (व इतर) कंपूशाही केल्याचे आरोप होणें हें साहजिक (आणि महाराष्ट्रधर्मास अनुसरून) आहे. या सगळ्या वादांच्या रंगतींत इतिहास लिहिण्याचेंच राहून जाईल, म्हणून आधुनिक काव्याच्या खंडांतील पहिलें प्रकरण लिहून होतांच प्रसिद्ध करीत आहों. तें विसाऱ्यादाखल मानावें.

[वि० सू०—हा सगळा खटाटोप साधारण वाचकासाठी केला असल्यामुळे यापुढे वाचक शब्दामागे 'साधारण' हें विशेषण गृहीत धरावें. असाधारण वाचकांनी स्वतःला कांही लावून घेऊं नये.]

## *श्री. कृष्णाजी केशव दामले—म्हणजेच 'केशवसुत'*

*(आधुनिक कवितेचे सुप्रसिद्ध पहिलेच निर्माते)*

गेल्या पाऊणशे-ऐंशी वर्षांत आधुनिक कवितेची चाळ मजल्यामजल्याने वाढतवाढत जाऊन आज डोळ्यांत मावेनाशी झाली आहे. तिचा[1] पाया ज्यांनी घातला तेच हे गाजलेले केशवसुत. त्यांच्या कवितेशिवाय वेच्यांचीं पाठ्य-पुस्तकें,[2] आणि त्यांना प्रथम वंदन केल्याशिवाय आधुनिक काव्यावरील

१. "तरीसुद्धा ती कवींच्या गर्दीला पुरी पडत नाही, म्हणून ते दाटीवाटीने राहतात. व्हरांड्यांत पथाऱ्या, आणि त्यांवर अस्ताव्यस्तपणे आपण, पसरून सामाजिक स्वास्थ्य आणि नीति यांबाबत अवघड प्रश्न निर्माण करतात, म्हणून येत्या पंचवार्षिक योजनेंत सदरहू चाळीस आणखी पाखे, पायखाने, आणि पोटमाळे यांची जोड देण्याची तरतूद केली आहे."—आरोग्याधिकाऱ्यांचा अहवाल.

२. लौकरच त्यांच्या कविता 'कॉपीराइट'च्या मुदतीबाहेर जातांच अशा पुस्तकांतून अधिक संख्येने येतील.

लेख मिळणें कठीण. पण, आरंभीं आधुनिक काव्य म्हणजे काय, त्याचीं खरीं-खुरीं लक्षणें कोणतीं, आणि तें जुन्या काव्याहून वेगळें कसें हें आपण थोडक्यांत पाहूं या.

*१. काव्याचे विषय :*

| | |
|---|---|
| जुन्याचे 'लौकिक' | नव्याचे 'अलौकिक' |
| म्हणजे सभ्य लोकांच्या व्यवहारांतील. उदाहरणार्थ : 'मुलांनी गुरुजनांशीं करावयाचें वर्तन', 'अनियमितपणापासून होणारे तोटे', 'वऱ्हाडांतील कमिश्नऱ्या व कमिश्नर-बहादुरांच्या वंशावळी', इत्यादि. —पण प्रतिष्ठित | म्हणजे निरुपयोगी आणि वेडबंबू. उदाहरणार्थः चंद्र, तारे वगैरे आकाशस्थ मंडळी, फुलें, इत्यादींस सलगीने उद्देशून अथवा मंगळावरील रमणीस (किंवा बास्फोरसच्या सामुद्रधुनींतील जलपरीस किंवा कॉन्स्टेबलच्या चित्रांतील कृषिकन्येस) प्रेमपत्र. कोणताहि विषय चालतो. (रांगोळी, घुबड, स्त्री वगैरे.) |
| पुराणकालीन | वर्तमान-व-भविष्यकालीन |
| मनुज (म्हणजे सरसकट मनुष्यजातीविषयी पण, व्यवहारांत महाराष्ट्रांतील हिंदूविषयी—त्यांतहि 'उच्च' जातींविषयी.) हें नैतिक पातळीवरून. | मी[३] (स्वतःला विश्वाचा घरजावई मानून बडेजाव सांगणें, 'मी' या प्रथमपुरुषी सर्वनामाचा फाजील उपयोग.) मामुली दुखण्याखुपण्याची गळा काढून जाहिरात. |

परंतु

| | |
|---|---|
| निवृत्ति | प्रवृत्ति |
| (संसार असार, केवळ माया, म्हणोन, त्यावर आसक्ति न ठेवतां परलोकासाठी तयारी करावी अशी मनुजामागे भुणभूण.) | (संसाराची तरफदारी. किर्लोस्कर मासिकें अथवा 'सुखी संसार'सारखे मथळे असलेलीं विवाहप्रसंगीं भेट देण्यास योग्य पुस्तकें यांच्या सांच्यांतील. एकंदरीने चळवळ्ये.) |

३. यालाच अंतर्लक्षी, आत्मनेपदी, आत्मकेंद्रित, वैणिक, असलीं लफ्फेबाज विशेषणें लावून शेफारून ठेवलें आहे.

“आहे-तें-उत्तम आहे; पूर्वी याहून उत्तम होतें” व “ठेविलें अनंतें तैसेचि राहावें.”

मोडतोडीला चिथावणी. अन्यायांविरुद्ध ओरड आणि त्यांच्या बळींविषयी सहानुभूति (बळी : स्त्री, अस्पृश्य, दरिद्री वैगेरे.) म्हणून तुतारी-डंका-रणशिंग असलीं लढाऊ संगीतांतील नांवें, किंवा हुंदके, निराशा. अशक्य गोष्टींचा (उदाहरणार्थ, वीज दौतींत भरून ठेवण्याचा) ध्यास. हात पोळला किंवा दौत फुटली म्हणून दुःख.

प्रेम : तिऱ्हाईतपणे; आपण नामानिराळे.

१. शारीरिक (अ) : देवदेवतांचें आणि

(ब) संस्कृत साहित्यांतील नायकनायिकांचें.

अ आणि ब फार गरम असल्यास जाडजाड संस्कृत शब्दांत आणि श्लेषांत गुंडाळून. पण ‘अ’तून परमार्थ काढावयाची सोवळी सोय.

२. आध्यात्मिक–माणसाचें देवावर. (नंतरची पायरी प्रेम. पण यांतहि अनेकदा (१) चा वास देण्यांत येतो.)

प्रेम : स्वतःचें. प्रेमविषय

१. निश्चित

(अ) पत्नी (आपली)

(ब) (बाल)विधवा (दुसऱ्याची)

२. मोघम

(अ) समस्त स्त्रीजात (तरुण, म्हणजेच जवळजवळ सुंदर.)

(ब) केवळ कल्पनेंतील. भयंकर सुंदर वैगेरे–आणि गुणसुद्धा (आकाशींची चांदणी, वनांतील अथवा जळांतील परी, इत्यादि)

**निसर्ग** (हात राखून) ईश्वराच्या करणीचा आणि करुणेचा पुरावा म्हणून. तपशील थोडा. (आणि सर्वसाधारण. उदाहरणार्थ पुष्प म्हणजे कोणतेंहि फूल)

**निसर्ग** (सढळ)

त्याचे गुण : (१) सुंदर (२) उदात्त (३) संसाराने गांजलेल्याला निवारा. जमेल तेवढा तपशील. फुलाबिलांचीं नांवें, रंग, इत्यादि. पक्षी, निर्झर, वसंतऋतू वैगेरे.

**मुलें**

उपदेश निमूटपणे ऐकून घेण्यासाठी

**मुलें** = फुलें. लाडिकपणाने किंवा रडवेपणाने लिहिण्यासाठी.

*२. काव्याची भाषा आणि रचना :*

**भाषा**

संस्कृत शब्दच फार; त्यांच्या जोडणी-पुरतें मराठी.

**रचना**

(अ) लंबीचवडी

(ब) अक्षरगणवृत्तें (मुख्यतः), म्हणजे ऱ्हस्वदीर्घासकट अक्षरें ज्या त्या जागीं फिट्ट बसलीं पाहिजेत. "यमाचा यगण राधिका रगण मारावा मगण" हें तोंडपाठ असल्याचें दाखविल्याशिवाय काव्य करावयास परवानगी नसे.

एकाच कवितेंत अनेक वृत्तें.

**भाषा**

बरेंचसें मराठी; फोडणीपुरतें संस्कृत.

**रचना**

(अ) तोकडी

(ब) मात्रावृत्तें किंवा जाती (मुख्यतः), म्हणजे मात्रा मोजून कविता करणें

हा प्रकार थोडा सैल असल्यामुळे मुलीबाळींच्या गळ्यांत सहज बसतो. म्हणून त्यांना, व त्यामुळे इतरांना, आवडूं लागला.

एका कवितेंत सहसा एकच वृत्त.

*३. किरकोळ :*

**आरोग्य** : जुन्या कवींची प्रकृति मजबूत. त्या मानाने नव्यांची तोळामासा, म्हणून त्यांपैकीं बरेचसे लहान वयांतच दगावले. म्हणूनच दीर्घकाव्य लिहिण्याइतका दम नाही !

**नांवें** : नव्यांपैकी अनेकांनी लाजेरपणाने अथवा टूम म्हणून टोपणनांवें घेतलीं.

(अ) नातीं जाहीर करणारीं : (१) विशेष नातीं—अमुकाग्रज, तमकीसुत, (२) सामान्य नातीं—जननीजनकज.

(ब) कांहीच थांगपत्ता लागूं न देणारीं : बालशाहीर, चंडोल, जगन्मित्र, कुणीतरी, वगैरे. (हें शेवटचें टोपणनांव नव्हे—एखाद्या कविमंडळाचें.)

जुन्या कवींचीं आडनांवें सहसा लेंभे, लोंढ, ओक, रिसबूड, साखरपेकर अशीं असून त्यापूर्वी शास्त्री, तात्या असलीं ठणठणीत उपपदें असत. नव्यांची कविता मासिकपुस्तकांतून आणि संग्रहांतून (विशेषतः वेच्यांतून) प्रासिद्ध होऊं लागली. जुन्यांना ती सवय आणि सोय नव्हती.

वरील त्रोटक पण मुद्देबंद तपशिलावरून जुनी कविता आणि आधुनिक कविता यांतील फरक प्रिय वाचकांच्या मनावर ठसला असेलच. महत्त्वाची सूचना : वर दिल्याप्रमाणे आधुनिकांनी जें जें केलें त्यालाच (काव्यांत) क्रांति केली असें म्हणतात.

आता आधुनिक कवितेच्या पित्याकडे वळूं या.

केशवसुतांच्या जन्माबद्दल चरित्रकारांत एकमत आहे; पण मरणाबद्दल नाही—म्हणजे त्या घटनांच्या तारखांबद्दल. त्यांनी आपला फोटो काढूं दिला नाही, आणि स्मारक साजरें करणाऱ्यांची व शाळांसाठी क्रमिक पुस्तकें तयार करणाऱ्यांची गैरसोय करून ठेवली. पण आपल्या तोंडाबाबत कोणी चांभारचौकशी करूं नये अशी त्यांची इच्छा असली तरी तें 'कुरूप' आणि 'दुर्मुखलें' असल्याचें सांगून त्यांनी भक्तांची पंचाईत केली आहे. असो. त्यांची प्रकृति अशक्त व किरकोळ असे हें त्यांच्या काव्यांतील त्राग्यावरून पटतें. (यालाच आत्मलेखन म्हणतात.) त्यांचा जन्म कोकणांत, शिक्षण बडोदें, वर्धा, नागपूर, पुणें येथे व नोकरी मुंबई, खानदेश व धारवाड येथे म्हणून ते बृहन्महाराष्ट्राचे कवि मानले जातात. (म्हणूनच त्यांचा भूगोल विषय चांगला होता.) 'केशवसुत' हें नांव आणखी कोण्या कवीने वापरल्याचें आढळेल; नकलेपासून सावध राहावें. मात्र एखाद्या कवीच्या बापाचें नांव केशव असणें हा त्याचा (म्हणजे बापाचा) दोष नव्हे.[४]

केशवसुतांची खास प्रसिद्धी पुढील दोन अंगांबद्दल आहे :

(१) त्यांच्या (गाजलेल्या) कवितांचा अर्थ समजत नाही[५]; (२) त्यांची भाषा खडबडीत आहे. या अंगांचा थोडक्यांत विचार :

(१) 'हरपलें श्रेय' ह्या कवितेचा अर्थ अजून कोणालाच समजलेला नाही. म्हणून ती केशवसुतांची सर्वोत्कृष्ट कविता मानली जाते. त्यांतील रूपकें दात

४. "आम्ही नव्हतों अमुचे बाप, उगाच कां मग पश्चात्ताप ?"—केशवसुत.

५. या गुणाला 'दुर्बोधता' म्हणतात. या दृष्टीने काव्याचे प्रकार तीन : (१) सुबोध : जें वाचकाला आणि कवीला समजतें. (२) दुर्बोध : जें वाचकाला समजत नाही पण कवीला समजतें. (३) अबोध : जें वाचकाला समजत नाही आणि कवीलाहि समजत नाही.

पाडण्याइतकीं वातड आहेत. (तीं सगळीं सोडून दाखविणारांस आधुनिक मराठी काव्यग्रंथांचा अख्खा सट इनाम.) 'झपूर्झा' हें एका कवितेचें नांवच पाहा. केशवसुतांच्या पहिल्या संग्रहाचे संपादक श्री० हरि नारायण आपटे यांना असें वाटलें की मुंबईत ज्या पठाण फेरीवाल्याकडून केशवसुत मनुका विकत घेत त्याच्या पुश्तु भाषेंतील हा शब्द (बहुधा लोकगीतांतील) असावा. त्यांनी सहज कागदावर उतरून ठेवला, आणि गफलतीने तो कवितेंत मिसळला गेला.[६] हरिभाऊंनी तो कवितेंतून खड्यासारखा निवडून बाहेर काढला. पण मूळ प्रतीबरहुकूम लिखाण छापावें असा पुढे विद्वानांत कायदा झाल्यामुळे तो शब्द परत आला. 'जा पोरी जा' या परकरी गाण्याचें तें जलद लयींतील आणि वारें प्यालेलें रूप आहे, अशी टीकाकारांनी चलाख मखलाशी केली आहे.[७] अशा कवितांत शून्यशोधन किंवा गूढगुंजन असतें असें म्हणण्याचा शिष्टसंप्रदाय आहे. असो.

(२) केशवसुतांचें काव्य फार उत्तम असें लाजेकाजेस्तव म्हणणाऱ्यांनाहि त्यांची भाषा ओबडधोबड असल्याचें कबूल करावें लागलें आहे. त्यांची एकहि कविता ग्रॅमोफोन रेकॉर्डवर आलेली नाही, अथवा रेडिओवरून कोणीहि—विशेषतः गायिका—त्यांचें भावगीत गात नाही, यावरून त्यांना गोडगोड शैलींत लिहितां येत नव्हतें हें उघड आहे.

**येथें गोष्टी आम्ही करीत होतों,**
**होतों विद्याभ्यासहि करीत होतों.**

अथवा

६. केशवसुत आपल्याबरोबर पुश्तु शिकत होते, व आपण दोघेहि कंदाहारला बच्चा-इ-साकूच्या वडिलांच्या निमंत्रणावरून जाणार होतों, पण ब्रिटिश आणि अफगाण सरकारने संगनमत करून जाऊं दिलें नाही, असें मामा वरेरकर म्हणाल्याचें श्री० गोस्वामी मानवप्रकाशम् यांनी नमूद केलें आहे. ही स्वामीजींचीच थाप असणार, पण या पठाणी संपर्कावरून केशवसुतांच्या कांही कवितांतील आडदांडपणाची संगति लागते.

७. अशीच हुतूतूच्या खेळावरील एक वीरश्रीची कविता, "थूथूथूथू", तुतारी मंडळांच्या कोणा सभासदाने केल्याचें ऐकिवांत आहे.

अलिकडलें तें सगळें खोटें
म्हणती धरुनी ढेरीं पोटें
धिक्कार अशा मूर्खांलागुनि

असल्या भरड ओळी केशवसुतांत कोठेहि भेटतात. याला रे बाबा काव्य का म्हणायचें? आजचा कोणीहि भावगीतकार हाच अर्थ अगदी नाजुकसाजुक शब्दांत बसवून देईल. केशवसुतांनी मुद्दाम, चिडखोरपणाने, हें अवलक्षण केलें आहे. "कठिण शब्द या धोंड्यांनी करितों हाणाहाण" अशी मुळी कबुलीच दिली आहे त्यांनी.

पण केशवसुतांचा प्रामाणिकपणा खरोखरच वाखाणण्यासारखा आहे. कवि हा वेडापीर असतो, भ्रमिष्ट असतो, असें ते पुन्हापुन्हा सांगतात. वयाने वाढला तरी त्याचा पोरपणा जात नाही ("प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवीचा असे") हें वेड कवितेने लावलें म्हणून तिच्यावर ते फिर्याद लावतात. पण कधी कधी हा झटका फार वाढून त्यांत ते कवींच्या अचाट सामर्थ्याबद्दल वाह्यात् वल्गना करतात. त्यांना म्हणे धोंड्यांतून दिसतें; तेच मनुष्यजातीचे कानडोळे, देवाचे लाडके आणि शारदा त्यांना कानांत मंत्र देते. कविता अशी असावी आणि तशी नसावी असें मला सांगणारा कोण टिक्कोजी (म्हणजे टीकाकार), असली उर्मट भाषा त्यांनी वापरली आहे.[८] काव्याच्या ताकदीबद्दल त्यांचे अचाट गैरसमज होते. एकेका ओळीची तरफ वापरून जग उलथून टाकणार म्हणे! असली दंडेली आणि असले विक्षिप्त अहंकार यांचा राग मानावा की कीव करावी? कवीने कसें गोडीगुलाबीने बोलावें; पण गोडीचें केशवसुतांना वावडेंच आणि गुलाबापेक्षा काटेच त्यांना अधिक जवळचे! घुबडावर कविता लिहिणारा हा कवि!

अर्थात् स्वभावाला औषध नाही. कविस्वभावाला नाहीच नाही! जगावेगळें असें कांही तरी त्यांत हवेंच. "कवि हा जन्मावा लागतो" म्हणतात तें याच थाने की जन्मतःच त्याचें असें झालेलें असतें; व्यक्तिशः त्याला जबाबदार धरूं नये.

८. टीकाकार माधव त्र्यंबक पटवर्धन (म्हणजेच कवि माधव जूलियन्) यांना या उर्मटपणाचा आणि आत्मस्तुतीचा राग आला तो काय उगाच?

केशवसुतांना "कवींचा कवी" ही पदवी दिली जाते. तिच्यांतील अभिप्राय हाच असावा की हा वेगळेपणा (म्हणजे तिरपागडेपणा) त्यांच्यांत इतर कवींहून चढ—आणि इतर कवींना त्याचा (तुलनेसाठी) आधार! तसे त्यांच्या काव्यांत (चांगले) गुणहि आहेत. 'तुतारी', 'नवा शिपाई' वगैरे कविता अशा खणखणीत आहेत की मोठ्याने म्हणतांना आपल्याला उगाच जोर चढतो, आणि बरें वाटतें. कसाहि आवाज असला तरी चोरावासा वाटत नाही. बहुधा त्यांची भाषा इतकी सोपी असते की शब्दकोशाची गरज भासत नाही. आणि ही सोपी भाषा, सैल रचना आणि गचाळ शैली छापलेली—आणि वाखाणलेली—पाहिल्यावर आपल्यालाहि काव्य जमेल असा भरंवसा वाटूं लागतो, काव्याची भीति कमी होते, "हेंही नसे थोडकें".

शेवटचा एकच मुद्दा : पॉल्ग्रेवच्या गोल्डन् ट्रेझरी (भाग चौथा) या संग्रहांतील कवितांचा खूप अभ्यास केल्यामुळे केशवसुतांच्या कवित्वाला स्फुरण मिळालें—आणि त्यांतील कांही कवितांचे पडसाद त्यांच्यांत उमटले आहेत (म्हणजे नक्कल केली.) असें कांही शहाणे टीकाकार म्हणतात. तसेंच असावें. आम्ही त्या इंग्रजी संग्रहांतील आणि केशवसुतांच्या कविता-संग्रहांतील कवितांची लांबी बारीकपणे मोजून पाहिली. सरासरी जवळजवळ तेवढीच भरली. (पॉ० गो० ट्रे० ७·३ इंच; के० क० ७·४१ इंच.—इंग्रजीच्या मानाने मराठी भाषा जरा पसरटच आहे हें लक्षांत घेतां ·११ चा फरक हा कांहीच नव्हे!) श्री. केशवसुत विद्यार्थी असतांना आजच्यासारखीं परीक्षार्थी ज्ञानाचीं हुकमी साधनें (गाईड्स वगैरे) नसल्यामुळे त्यांना मूळ कविता वाचाव्याच लागल्या असतील. म्हणून ते केशवसुत झाले. म्हणून नंतरच्या काळांत दुसरे केशवसुत झाले नाहीत.[१] पुढे होणें नाही. त्यासम तो.

मराठी ग्रंथ संग्रहालय
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

१. नारायण केशव बेहेऱ्यांचें सोडा.

REFBK-0013309

‘अभिरुचि’ मासिकामध्ये साहित्य आणि कला यांविषयी मार्मिक, खव्याळ, निःस्पृह पण रसग्राही लेखन करणारे ‘निषाद’ म्हणजेच मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष. त्यांच्या ललित-लेखनाचा पहिला संग्रह ‘खर्डेघाशी’मध्ये होत आहे. मराठी साहित्याच्या क्षेत्रांतील सोंगेंढोंगें, वेडें आणि ‘सांस्कृतिक’ जीवनांतील भाबडेपणा व बनेलपणा हें राजाध्यक्षांच्या लेखणीचें प्रमुख लक्ष्य. सरसकट साऱ्या साहित्याची किंवा कवींच्या कुळाचीच हुर्रेवडी करण्याचा अरसिक चरबटपणा या लेखांमध्ये दिसणार नाही. साहित्यांतलें जें जें कांही चांगलें आहे, त्याविषयीची मुरलेली समज—आणि श्रद्धा—येथे पानापानावर दिसेल. त्या अभिजात कलेचा स्थूल-सूक्ष्म अपमान होतांना दिसतो, तेव्हा उपहास, उपरोध, विडंबन या आयुधांनिशी राजाध्यक्षांची लेखणी मर्मभेदाला सज्ज होते. विशिष्ट व्यक्तींऐवजी कांही प्रवृत्ति हा विषय असल्यामुळे त्यांत अकारण बोचरेपणा नाही; इंग्रजी व देशी वाङ्मयाच्या गाढ व्यासंगांतून लाभलेल्या नागर, नर्म—आणि साहित्यांतील संदर्भांचा अचूक, सूक्ष्म उपयोग करणाऱ्या लवचिक शैलीमुळे, आजच्या सांस्कृतिक जीवनाचीं हीं ‘विंगचित्रें’ उठावदार झालीं आहेत.